१५९६

म. ग्रं. सं. ठाणें

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : इतिहास
सं. क्र. : १६९

REFBK-0001318

परचुरे, पुराणिक आणि मंडळी.
बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई नं. ४

लोकमान्य

टिळक यांजवरील जमानतीचा खटला

संपादक
दा. वि. गोखले
बी. ए. एलएल् बी.

१९१६

प्रकाशक
धी प्रिंटिंग एजन्सी
प्रिंटर्स, बुकसेलर्स अँड पब्लिशर्स
पुणे शहर

मातृभूमीचें आह्वान!

लोकमान्यांनीं आपल्या ६१ व्या वाढदिवशीं (ता. २३ जुलै १९१६) त्यांना दिलेल्या मानपत्रास उत्तर देतांना पुढील दिव्य उद्गार काढले—

आज आपणां सर्वांपुढें जें राष्ट्रकार्य आहे तें इतकें मोठें, इतकें व्यापक आणि इतकें जरूरीचें आहे कीं, त्याला आपण सर्वांनीं माझ्यापेक्षां कितीतरी पट अधिक निश्चयानें आणि स्फूर्तीनें लागलें पाहिजे; तें दिनावधीवर टाकून चालावयाचें नाहीं. आपली मातृभूमि आपणां सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आह्वान करीत आहे. आणि मला वाटत नाहीं कीं, तिचे पुत्र या आह्वानाचा अव्हेर करतील! तथापि माझें कर्तव्य म्हणून मी आपणांस शेवटीं एवढीच विनंति करीत आहें कीं, मातृभूमीच्या या आह्वानाकडे लक्ष देऊन कोणताहि भेदभाव मनांत न ठेवतां आपण सर्व 'राष्ट्रदेव' होऊं या. येथें चढाओढ नाहीं, मत्सर नाहीं, मानापमान नाहीं व संकटाची भीति धरूनहि उपयोग नाहीं. कार्य सिद्धीस नेण्यास परमेश्वर समर्थ आहे.

रा. न. चिं. केळकर

लोकमान्य टिळक

रा. र. पां. करंदीकर

ना. न्या. बॅचलर

ना. न्या. शहा

ना. बॅ. जिना

बॅ. बॅप्टिस्टा

बॅ. येरुळकर

लो० टिळकांवरील खटला

सिंहावलोकन

प्रस्तुतसारख्या पुस्तकास प्रस्तावना लिहिणें म्हणजे ती 'होमरूल-'ची प्रस्तावनाच होय. शिवाय साधारण रीत्या प्रस्तावनेचा अर्थ पुस्तकासंबंधानें जो समजला जातो त्याहून प्र-स्तावन म्हणजे स्तुतिदर्शक अशा योजनेनें ही प्रस्तावना समजली जावी हें अन्वर्थकच होईल.

अनेक वर्षे हिंदुस्थानांतील रहिवाशांस केव्हां विचार करण्यास मिळेल अशी ज्या बाबतींत उत्कट जिज्ञासा दिसूं लागली होती, तो विषय म्हणजे हिंदुस्थानाकरितां होमरूल–साम्राज्यान्तर्गत स्वराज्य–कोर्टांत खेंचून आणण्याचें श्रेय लो० टिळक यांच्या व्याख्यानांस मिळालें व तेणेंकरून अश्रुतपूर्व वाटाघाट सर्व जनसमूहास करण्यास सवड मिळाली इतकेंच नव्हे, तर सरकारपक्षाकडूनहि होमरूलसंबंधीं अमुक एक प्रकारचें कांहीं सांगावें असा संदेश, हा खटला चालविण्यासंबंधानें आपणास कांहीं नाहीं, 'इतका तरी उलगडा सरकारी बाजूनें तत्पक्षीय बॅरिस्टर मि. विनिंग यांजकडून कोर्टांत उघड झाला ही लहानसहान गोष्ट नाहीं. मद्रास हायकोर्टांतील वाटाघाटींतहि तेथील सरकारपक्षातर्फे ॲडव्होकेट जनरल यांनीं 'होमरूलविरुद्ध आपल्यास कांहीं सांगण्यास सरकारचा संदेश नाहीं.' असें स्पष्टपणें सांगितलें होतें. याहिपूर्वी एका महत्त्वाच्या कज्जांत कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश यांनीं "स्वराज्य-"संबंधीं वाटाघाट राजद्रोहात्मक नाहीं असें ठरविलें होतें, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेलच. एकंदरींत होमरूलबद्दल सरकारचा दृष्टिकोण वांकडा नाहीं असें निदर्शनास आलें हें सकृद्दर्शनीं दिसून येतें.

प्रेस ॲक्टाखालीं आक्षेपार्ह होणारे लेख व इं. पी. कोड. क. १२४ अ अगर १५३ अ-प्रमाणें आक्षेपार्ह ठरविले जाण्यास पात्र होणारे लेख यांमध्यें अंतर आहे, हा विशेष नेहमीं लक्षांत बाळगला पाहिजे. प्रेस ॲक्टाखालीं को-

णत्या परिस्थितीमध्यें कोणता लेख कसा आणला जाईल, हें निश्चितपणें सरकाराशिवाय इतरांस समजलें जाणें दुरापास्त होण्याइतका व्यापक तो ॲक्ट बनला गेला आहे, हें कलकत्ता हायकोर्टाचें म्हणणें मद्रास हायकोर्टांतहि मान्य झाल्यासारखेंच आहे. तितका अनिश्चितपणा इं. पी. को. क. १२४ अ अगर १५३ अ संबंधानें नाहीं, ही तफावत प्रस्तुत खटल्याचे निकालावरून स्पष्ट दिसून येते.

मद्रास हायकोर्टांत मिसेस बेझंट यांचे कामीं तक्रारी चालल्यावेळीं ऑनरेबल ॲडव्होकेट जनरल यांनीं असें बोलून दाखविलें कीं, "कायद्याचे कात्रींत न सांपडतां होमरूलसंबंधानें लेख लिहितां येणें शक्य कोटींपैकीं आहे. तथापि ते कसे लिहिले असतां कायद्याचें उल्लंघन होत नाहीं हें उदाहरणानें स्पष्ट करणें कठिण आहे." ती नड अंशतः दूर झाल्याचें या कामांतील हायकोर्टाचे ठरावावरून दिसून येणारें आहे. आतां लो. टिळकांचें भाषणांमध्यें उपेक्ष्य असा कांहीं मजकूर आहे, असें गृहीत धरून चाललें तरी एखादे दुसरे वाक्यावरून अगर कल्पनेवरून सर्व लेखांस दोषार्हत्व येतें, असा कित्येक प्रसंगीं मानला जाणारा सिद्धान्त सर्वथैव अबाधित नाहीं, इतकें तरी या खटल्याचे निकालावरून स्पष्ट होत आहे.

लो. टिळकांसारख्या गृहस्थांस चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन मागितला जातो, तेव्हां 'चांगली वर्तणुक' म्हणजे काय, हा प्रश्न जनतेनें सोडविण्याचें मनांत आणल्यास क्रि. प्रो. कोड कलम १०८ मध्यें कल्पिलेली 'चांगली वर्तणूक' त्या कलमांत सांगितलेल्या निकषानें ताडावयाची आहे. आणि त्यापैकीं १२४ अचे व्याप्तींत येणारे लेख अगर भाषणें प्रसृत करणें हा एक मुलाख आहे. एका संस्कृत कवितेंत—

यथा चतुर्भिः कनकं परीक्ष्यते
निघर्षणच्छेदनतापताडनैः ।
तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते
श्रुतेन शीलेन गुणेन कर्मणा ॥

असा कसोटीचा निर्णय लिहिला आहे, त्याला प्रस्तुतच्या कायद्यानें प्रो. को. कलम १०८ नें जोड दिली आहे. 'शील' शब्दाच्या व्याख्येंत कायद्याचे भाषेंत बोलावयाचें तर १०८ कलमांत वार्णिलेलें वर्तन समजलें पाहिजे. आजन्म

उत्तम शील बाळगण्याचा कृतसंकल्प असला तरी, वर्षापुरता देखील जामीन कायदा मागूं शकतो हा या कलमांतील इत्यर्थ आहे. ‘ स्वराज्य ’ याला इंग्रजी Home Rule शब्द हायकोर्टाचे एका न्यायाधीशांचे ठरावांत प्रसंगानें योजिला आहे; तर तो ‘ स्वराज्य ’ शब्द अनेक भिन्नार्थांनीं प्रपूरित आहे, ही गोष्टहि दुसरे न्यायाधीशांनीं सांगून ठेविली आहे. तेव्हां हरएक प्रसंगीं ‘ स्वराज्य ’ शब्द निरुपद्रवी असलाच पाहिजे हा त्रिकालाबाधित सिद्धान्त मानतां येत नसून त्या त्या विषयाच्या धोरणाप्रमाणें तो शब्द सोपद्रव किंवा निरुपद्रव समजला जाणारा आहे. तथापि हिंदुस्थानाकरितां स्वसंवेद्य व क्रमानें वर्धिष्णु अशी राज्यकारभाराची सत्ता मागणें व हिंदी जनतेच्या ताबेदारींत कारभार आणणें असा हेतु ज्या चळवळीचा स्पष्टपणें असेल त्या चळवळीनें–त्या स्वराज्याच्या चळवळीनें–कायद्याचें उल्लंघन होत नाहीं असें ठाम मत हिंदी जनतेस न्यायदेवतेनें दिलें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. लो. टिळक यांनीं स्वराज्याची आपली भावना जी व्यक्त केली, ती ना. न्या. सर. एस्. बॅचलर यांनीं आपले ठरावांत उद्धृत केली आहे. ती वाचली असतां त्या ध्येयाची खूण लोकांस सहजीं कळेल. हा एक मार्ग खुला करून दिल्याबद्दल न्यायमूर्तींचे आभार मानलेच पाहिजेत.

पण ध्येय जरी अगदीं निर्दोष, पवित्र व अवश्य असलें तरी तें साध्य होण्याचे मार्ग कोणते सुचविले जातात, इकडेहि व्याख्यानाच्या परीक्षेचा झोंक असतोच. म्हणून रा. टिळकांनीं गाइलेल्या स्वराज्याचे ध्येयाची प्राप्ति ही कोणत्या मार्गानें क्रमानें करून घ्यावयाची हेंहि ज्या उक्तींवरून न्यायमूर्तींच्या कयासास आलें, ती टिळकांची उक्तिहि न्यायमूर्ति यांनीं आपले निकालांत अवतरणचिन्हांत दिली आहे. त्याचाहि सारांश रा. टिळक यांनीं न्याय्य पथानें व सनदशीर पद्धतीनें हें ध्येय साध्य करावयाचें प्रतिपादित केलें आहे असाच आहे.

सामान्य जनतेपुढें संकलीकरण करून बोलूं गेल्यास अर्थविपर्यासाचा भास यथामति कसा होतो हें डि. मॅ. यांनीं केलेल्या ठरावावरून व हायकोर्टाचे ठरावावरून उघड होणारें आहे. क्रमिक जुन्या पुस्तकांतून एका ज्योतिष्यानें ‘ माझें आयुष्य किती ?’ या एका राजाच्या एका प्रश्नास दिलेलें उत्तर केवळ भाषेच्या उपयोगामुळें साधक-बाधक कसें झालें हें सांगितलें आहे. ‘ तुमच्यादेखत मुलेंबाळें मरतील इतकें अधिक तुमचें आयुष्य आहे ’ या म्हणण्यांत व ‘ मुलाबाळां-

पेक्षां तुम्हांस उदंड आयुष्य आहे' असें म्हणण्यांत काय अंतर असतें, हें त्या गोष्टींतील राजानें सिद्ध केलें आहे. सुसंस्कृत लोकसमूहापुढें बोलण्याची भाषापद्धति वेगळी व अज्ञसमूहास एखादी गोष्ट समजावून सांगण्याची पद्धति वेगळी असूं शकते. नामदार हायकोर्टाचे ठरावांत या पर्यायास अनुलक्षून "Remembering the politically ignorant audience which Mr. Tilak was addressing" हे अवतरणांतील शब्द आहेत. वास्तविक पाहिलें असतां बेळगांवास व नगरास प्रांतिक अगर जिल्हासभेकरितां जमा झालेल्या व बेळगांवसारख्या व नगरासारख्या गांवांतील सर्वसाधारण जनसमूहानें राजकीय विषयाचे बाबतींत इतकें अज्ञ असावयास नको होतें. परंतु स्वराज्य (Home-Rule) या विषयास अनुभवानें अपरिचित अशा जनतेस प्रस्तुतच्या स्थितींत अज्ञपणा केव्हांहि पतकरणें अवश्यक आहे. म्हणून अशा जनतेस समजावून सांगण्याचे क्रमांत योजिलेली भाषासरणि ही तज्ज्ञ लोकांपुढें बोलण्याचे प्रसंगाहून वेगळी असणार. इंग्रज मुत्सद्दी काय बोलतात हें कांहीं कांहीं हिंदी लोकांस शेवटपर्यंत समजत नाहीं यांतील, अगर लार्ड कर्झनसारख्या राजकारणपटूनें राणीसरकारच्या मोल्यवान जाहीरनाम्यास कसपटासमान कां लेखावें यांतील, रहस्य तरी वरील कारणांतच असलें पाहिजे. एकंदरींत विचारांत साम्य असलें तरी देखील भाषापरिभेदामुळें विपर्यास भासतो. के० गोखले यांचें गर्भित अगर रा. टिळक यांचें खुलें मांडलेलें ध्येय कांहीं प्रसंगीं एकच असलें तरी वेगळे वेगळे परिणाम कां घडावे, हें उदाहरण सोडविण्यास प्रस्तुतचा खटला एक साधन होऊन राहील. मिसेस बेझंट यांनीं इंग्रजींत लिहिलें अगर त्या इंग्रजींत बोलल्या, तरी देखील एखादे प्रसंगीं व त्या धोरणानें दरएक प्रसंगीं त्यांचे भाषेचा अर्थ वेगवेगळा करतां येणें शक्य असतें, हें खरें; परंतु अशीं उदाहरणें खेरीज करून होमरूलसारखी चळवळ सार्वत्रिक होऊन सर्वांच्या मनांत भरण्यास रा. टिळकांच्या प्रस्तुतच्या भाषणांतील दोषार्ह म्हणून हायकोर्टाच्या ठरावांत दर्शविलेला भाग खेरीज करून या खटल्यांत ज्याकरितां डि. मॅ. यांनीं टिळकांचेकडून जामीन मागितला, त्यासारखीं भाषणें कायद्याच्याच दृष्टीनें गर्ह्य नाहींत असें जर या खटल्यानें जनतेच्या निदर्शनास आलें आहे, तर या खटल्याचा परिणाम हितकरच झाला असें म्हटलें पाहिजे. टिळकांचा

जामीन दूर केला या दृष्टीनें जितकें महत्त्व या निकालास आहे, त्यापेक्षांहि कोणती भाषा, कोणतें ध्येय, कोणते उपाय समोर ठेवून होमरूलची चळवळ करणें साध्य आहे, हें या निकालानें प्रतिपादित केलें, ही गोष्ट जास्त किंमतीची आहे. तसेंच खऱ्या होमरूलच्या प्रतिपादनास अनुकूलता केवळ उघडपणें न दिली तरी आपण प्रतिकूल आहों असें सरकाराकडूनहि या कामीं दाखविण्यांत आलें नाहीं, ही महत्त्वाची कामगिरी या खटल्यानें घडवून आणिली.

परंतु याहिपेक्षां विशेष महत्त्वाची एक गोष्ट या खटल्यांत घडून आली. 'सरकार' या शब्दाची व्याख्या कांहीं प्रसंगास अनुलक्षून पीनलकोडमध्यें घातली आहे. टिळकांचे भाषणांतील रोख असा होता कीं, अदृश्य शक्ति हें सरकार व तसेंच त्याचें मूर्त स्वरूप म्हणजे आपणांवर राज्य करणारे तक्तारूढ राजे व पार्लमेंट आणि तत्समान अधिकारी हे सरकार समजले जावेत; तदितर नोकरांत गणावे. परब्रह्म व माया यांचा दृष्टान्त टिळक यांनीं उदाहरणार्थ घेतला आहे. हिंदी जनतेच्या कल्पनेनें सायुध सशक्तिक मूर्ति ईश्वरस्वरूप खरी; परंतु मूर्ति भंगली अगर हरवली म्हणून उपास्य दैवत नाहींसें झालें असें कधींहि व कोणीहि—परम भक्तहि—मानीत नाहीं. तद्वतच नोकरांपैकीं एखादा नको म्हणणें अगर अमुक लक्षणाचा तो पाहिजे म्हणणें राजास दूषणात्मक नाहीं, असें सांगण्याचा कटाक्ष होता. प्रस्तुत हायकोर्टाचे ठरावांत राजदेवतेचीं अंगें म्हणजे विशिष्ट नोकरी ही देवताच समजावी व कांहीं विशिष्ट नोकरीविषयींचे उद्गार हे राजनिष्ठापूर्वक असावे हें बरें, असें ध्वनित केलें आहे. हा वादग्रस्त मुद्दा लवकरच कायदेकौन्सिलपुढें येऊन त्याची छाननी झाली पाहिजे. तथापि हायकोर्टाचे ठरावांत, या खटल्यांत कायद्यासंबंधानें विशेष नवीचे प्रश्न नसूनहि, हकीकत—घडलेल्या गोष्टी—अगर लेखांचा अर्थ यांचीच छाननी होण्यासारख्या दर्ज्याचा हा खटला आहे असें समजण्यांत आलें आहे.

असें जरी असलें तरी आणखी एका गोष्टीबद्दल प्रशंसापर उद्गार काढल्यावांचून राहवत नाहीं. रा. टिळक यांचे बोलण्याचा रोख सिव्हिल सर्व्हिसवर विशेष होता व आहे; व ना. न्या. सर एस्. बॅचलर हे त्यामधील प्रस्तुतचे कामगारांपैकीं श्रेष्ठतमांतील एक आहेत असें असून, प्रत्यक्ष त्या सर्व्हिसबद्दल अस्पृहणीय उद्गार ज्या भाषणांत प्रसंगानुसार आले असे खुद्द ना. न्या. यांचे कया-

सास आलें, त्या भाषणांबद्दल केवळ न्यायाच्या समतोल काटयानें परीक्षण व तोल करण्याचें नाजूक काम इतकें चोख रीतीनें न्यायमूर्तींनीं केलें, ही गोष्ट सर्व न्यायकोर्टांस उदाहरण घालून देण्यासारखी झाली, यांत संदेह नाहीं. म्हणूनच रा. टिळकांचाच नव्हे, तर सर्व रयतेचा ब्रिटिश राज्याविषयींचा आदर वाढत्या प्रमाणावर आहे, हें उघड आहे. ब्रिटिश सरकारच्या सहानुभूतीनेंच आम्हांस स्वराज्य मिळवावयाचें आहे असे राजनिष्ठ देशभक्तीचे उद्गार टिळकांचे भाषणांतून निघाले, त्यालाहि हा आदरच कारणीभूत असला पाहिजे.

एकंदरींत स्वराज्याचें (होमरूलचें) ध्येय, उपाय व परिभाषा हीं एकसमयावच्छेदेंकरून जगास कळविण्यास या खटल्याच्या साग्र व 'इत्थंभूत' इतिहासाचें अवलोकन साधनीभूत होईल. प्रसंगानें कांहीं कांहीं गोष्टी मौजेच्या अशा आतां वाटण्यासारख्या आहेत. रा. टिळक यांस त्यांचे ६१ वे वाढदिवसासंबंधानें उद्यांच एक लक्ष रुपये नजर केले जाणार आहेत, त्या अर्थीं त्यांजकडून भरभक्कम रकमेचा जामीन मागण्यास सबळ कारण आहे, अशा अर्थाची फिर्यादीपक्षाची विनंति हास्योत्पादक दिसते. जामीनकीची रक्कम वाढविण्याचे कामीं महाराष्ट्र व मध्यप्रांत यांनीं प्रेमपुरःसर टिळकांच्या देशभक्तीकरितां त्यांस केलेली नजर उपयोगांत आणली जाईल, असें कोणाचे स्वप्नींहि नव्हतें. तसेंच ज्या दिवशीं ही प्रेमाची नजर जनतेनें करावयाची, त्याच दिवशीं सकाळीं ही करडी 'नजर' फिर्यादीपक्षाकडून झाली, हाहि एक समय कवीनें एका ठिकाणीं वर्णिलेल्या उदयास्ताचे समयाची आठवण करून देणारा झाला. त्यांतूनहि सकाळीं अशा प्रकारची 'नोटीस' दाखल झाली, तरी त्याची किंचितहि छटा रा. टिळकांच्या एकंदर आचरणावर त्या दिवशीं किंवा नंतर खटला चालू असतां मुळींच नव्हती. याचें खरें कारण रा. टिळकांच्या मनांत वसत असलेली ब्रिटिश न्यायप्रियतेवरील व आपण अंगीकारलेल्या ध्येयावरील श्रद्धा व मनाची खंबिरी हीं होत यांत मुळींच संशय नाहीं.

लघुलेखनपद्धति अद्यापि पूर्णत्वास पोंचली नाहीं. अर्थातच बोलण्याच्या ओघांत जलद उच्चारलेलीं वाक्यें-अगर उद्गारवाचक अथवा काकर्थी वाक्यें जशींच्या तशीं उतरून घेणें अशक्य होतें. अशा स्थितींत आक्षेपार्ह भाग तसेच आहेत कीं कसे, हा प्रश्न उत्पन्न होतो. तथापि रा. टिळक यांनीं त्या सबबीचा अंगीकार

प्रस्तुत कामीं केलेला नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. भाषांतरें क्वचित् प्रसंगीं हेलकाव्याचीं झालीं आहेत हें जरी खरें असलें, तरी एखादे वाक्यावरून अगर शब्दावरून सर्व भाषणाचा परिणाम ठरविणें वाजवी नाहीं, हें हायकोर्टाचे निवाड्यांतील तत्त्व अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्या गृहस्थानें मूळ भाषांतर केलें त्याहून कमी दर्ज्याच्या त्याच ऑफिसांतील दुसऱ्या नोकरानें त्याचें यथार्थत्व सिद्ध करण्यास कोर्टांत यावें हा प्रकार ठीक वाटण्यासारखा नव्हता. भाषांतरावरून सदोषपण अगर निर्दोषपण ठरविण्याचा प्रघात जसजसा कमी होईल तसतसा न्यायकोर्टावरील प्रजेचा विश्वास ज्यास्त ज्यास्त वाढत जाईल.

हायकोर्टांत तपासणी-अर्जाचें काम चाललें त्या तारखेस सरकारचे वाजूनें नामदार ॲडव्होकेट जनरल असून शिवाय बॅरिस्टर मि. बिनिंग, मि. स्ट्रांगमन व मि. पटवर्धन आणि सरकारचे नेहमींचे हायकोर्ट वकीलहि होते इतकेंच नव्हे, तर पोलीस खात्यांतील मि. गायडर हजर असून पुण्याचे सरकारी प्रासिक्यूटर खा. ब. दावर होहि होते. नामदार ॲडव्होकेट जनरल यांस सल्ल्याचें बळ इतक्या माणसांकडून कां पाहिजे होतें, हा प्रश्न मुग्ध आहे. पुढें केव्हां तरी खलासा होईल.

डि. मॅ. कोर्टांत काम चालले वेळीं एक प्रकार साहजिक रीत्या घडला. रा. टिळक यांनीं खटल्याचे उपयोगाकरितां आपल्या तिन्ही भाषणांच्या कोर्टांतून खऱ्या करून घेतलेल्या नकला सोयीसाठीं छापून काढल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं प्रती कोर्टाच्या नजरेस आल्या तेव्हां डि. मॅ. यांनीं सूचनापर उद्गार काढले कीं, जर हीं भाषणें क. १०८ खालीं येणारीं आहेत, तर त्यांच्या प्रती वांटल्या न जातील अशी दक्षता ठेवावयास पाहिजे. त्या प्रसंगास जरूरीचें कायदेशीर उत्तर देतांना रा. केळकर यांनीं कळविलें कीं, न्यायकोर्टांतील यथातथ्य हकीकत प्रसिद्ध करण्यामध्यें कायद्याचें उल्लंघन होत नाहीं. वास्तविक पाहतां त्यापूर्वींच इतर म्हणजे क्रॉनिकलसारख्या वर्तमानपत्रांनीं सदर भाषणांचा उद्धार केलेला होता.

खटल्यांतील हकीकतीवरून ना. न्यायमूर्तींचे आदरपूर्वक आभार मानण्यांत येतात, तें वास्तविक आहे हें जसें दिसून येतें, तसेंच हा खटला निर्भीडपणें व यथाशास्त्र कोर्टापुढें मांडण्यांत ना. बॅरिस्टर जिना व रा. टिळकांचे

मित्र व होमरूल-लीगचे प्रेसिडेंट बॅरिस्टर मि. बाप्टिस्टा यांनीं कौशल्य दाखविलें, तें अनुकरणीय आहे हेंहि विसरतां कामा नये.

खटल्याचा निकाल सांगतांना न्यायाधीश यांनीं पक्षकारास (प्रसंगीं आरोपीस) कांहीं बोलावें कीं कसें, हा मुद्दा दृष्टीआड होण्यासारखा नाहीं. आपला ठराव पुढें वरिष्ठ कोर्टांत फिरला तर आपलें पक्षकारांस लागून बोलणें अगर समजावून सांगणें विद्रूप दिसतें ही गोष्ट बरेच न्यायाधीश ध्यानांत घेऊन वागल्यास नडीचा प्रसंग बहुतकरून टळेल.

सातारा
१०।१२।१६ } र. पां. करंदीकर.

आत्मनिवेदन

लोकमान्य टिळक हे खरोखरच एक असाधारण पुरुष आहेत. या हिंदुस्थान देशामध्यें आपापल्या शक्तियुक्तीप्रमाणें देशाची सेवा करणारे टिळकांवांचून दुसरे कोणी नाहींत असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. परंतु लोकमान्यांच्या ठिकाणीं शक्तियुक्तींचा जो अलौकिक मिलाफ दिसून येतो तो मात्र अनुपम आहे हें खरें. राजकीय चळवळ ही तत्त्वतः त्रिकालाबाधित व एकरूप असली, तरी कालभेदानें व परिस्थितिभेदानें तिच्या बाह्य स्वरूपांत फरक पडतो व त्यामुळें वेळोवेळीं चळवळींचें स्वरूप व विषय बदलत असतात. टिळकांच्या जन्मकाळचा असा एक विशेष दिसतो कीं, या राष्ट्राच्या राजकीय चळवळींत ज्या ज्या वेळीं रूपपालट झाला त्या त्या वेळीं त्यांचेवर कांहीं तरी संकटें आलींच. किंबहुना हीं संकटें व स्वजनपरजनांचीं दूषणें सहन करूनच त्यांनीं राजकीय चळवळीच्या शकटाला आजपर्यंत गति दिलेली आहे.

प्रस्तुत प्रसंग विचारांत घेतला तरी असेंच दिसून येईल कीं, **होमरूल** किंवा **स्वराज्य** हा राष्ट्रीय चळवळीचा एकच विषय होण्याची वेळ येतांच संकटानें त्यांना गांठलें. परंतु या वेळीं मात्र देशाच्या सुदैवानें टिळक हे संकटमुक्त झाले; अर्थातच इंग्रजी न्यायदेवताहि या यशाची अंशभागी किंबहुना जननी आहे यांत शंका नाहीं.

अशा या यशस्वी खटल्याची हकीकत वर्तमानपत्रांत घाईघाईनें व संक्षेपतः दिलेली असावी व तीहि वर्तमानपत्रांच्या अंकांबरोबरच लयाला जावी, हें बरें नव्हे असें जाणून आम्हीं या खटल्यांतील अस्सल कागदपत्र मिळविले, व त्यांचे आधारें या खटल्याचीं इंग्रजी व मराठी पुस्तकें तयार केलीं. हीं पुस्तकें तयार करितांना आम्हांस आमच्या पुष्कळच मित्रमंडळींचें साह्य घ्यावें लागलें हें उघड आहे. परंतु त्यांच्या कर्तव्यनिष्ठेला भिऊन आम्ही त्यांचा नामनिर्देश करूं शकत नाहीं. तरी पण आमच्या इंग्रजी पुस्तकाच्या प्रस्तावनेचे लेखक रा. रा. **न. चिं. केळकर** व मराठीच्या प्रस्तावनेचे लेखक रा. रा. **दादासाहेब करंदीकर** यांचें साह्य जाहीर झालें असल्यामुळें आम्हांसहि जाहीर रीतीनेंच त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

संपादक व प्रकाशक

२१-३-१९८०

लो० टिळक यांजवरील खटला

शनिवार ता. २२ जुलै १९१६ रोजीं मि. जेम्स अडोलफस गायडर डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस सी. आय्. डी. यांनीं पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. जी. डब्ल्यु. हॅच आय्. सी. एस्. यांचे कोर्टांत क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम १०८ प्रमाणें रा. बाळ गंगाधर टिळक यांचे विरुद्ध पुढीलप्रमाणें फिर्याद दाखल केली.

फिर्याद

(निशाणी नं. १)

पुणें येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांचे कोर्टांत

जेम्स अडोलफस गायडर

डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस सी. आय्. डी.

विरुद्ध

बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल्एल्. बी., मुक्काम पुणें

क्रिमिनल प्रोसीजर कलम १०८ प्रमाणें तक्रार. मीं वर वर्णन केलेला जेम्स अडोलफस गायडर पुढील तक्रार करीत आहें.

(१) वर वर्णन केलेले बाळ गंगाधर टिळक यांना यापूर्वी राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाल्या असून ते खालीं दिल्याप्रमाणें राजद्रोही मजकुराचा–म्हणजे ज्या मजकुराचा प्रसार करण्याबद्दल इंडियन पीनल कोडच्या १२४ कलमाप्रमाणें शिक्षा होते अशा मजकुराचा–तोंडानें फैलाव करीत आहेत.

(२) त्यांनीं "होम–रूल" वर पुढील ठिकाणीं भाषणें केलीं.

(अ) त्यांनीं १ मे १९१६ रोजीं संध्याकाळीं इतिहाससंशोधक मंडळाची सभा समाप्त झाल्यावर बेळगांव येथें, (ब) अहमदनगर येथें ३१ मे १९१६ रोजीं कापड बाजारांतील व्यापाऱ्यांच्या मानपत्रास उत्तर देतांना कापडबाजाराच्या मागील उघड्या जागेंत व (क) अहमदनगर येथें पुनः तारीख १ जून १९१६ रोजीं जुन्या कापडबाजारांत खुल्या जागेंत भाषणें केलीं. या सर्व भाष-

णांच्या वेळीं त्यांनीं बादशहा अगर कायद्यानें प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश राज्याविरुद्ध द्वेष, तिरस्कार किंवा अप्रीति उत्पन्न केली किंवा करण्याचा प्रयत्न केला.

(३) सदरहू बाळ गंगाधर टिळक पुनः तशींच भाषणें करीत राहतील अशी धास्ती आहे.

(४) वर उल्लेख केलेल्या भाषणांच्या नकला सोबत जोडल्या आहेत.

(५) सुनावणीच्या दिवशीं कोर्टांत साक्षीदार उभे केले जातील.

(सही) एस्. सी. दावर, पब्लिक प्रासीक्युटर.
पुणें ता. २२ जुलै १९१६ } (सही) **जे. ए. गायडर.**

फिर्याद–अर्ज वाचल्यावर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं मि. गायडर यांस त्यांची कैफियत देण्यास हुकूम केल्यावरून मि. गायडर यांनीं पुढील कैफियत दिली.

मि. गायडर यांची प्रतिज्ञेवर कैफियत
(निशाणी नं. २)

मी जेम्स अडोलफस गायडर शपथ घेऊन प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं:—

मीं बाळ गंगाधर टिळक यांच्या बाबतींत आज दाखल केलेली फिर्याद माझ्या विश्वासाप्रमाणें खरी आहे. माझ्या हाताखालच्या नोकरांनीं मजला दिलेली माहिती, माझ्या ऑफिसमधील रेकार्ड आणि इतर कांहीं साधनांनीं उपलब्ध झालेली माहिती यांवरून मीं वरील विधानें केलीं आहेत.

(त्यांच्यापासून) बराच मोठा म्हणजे सुमारें पन्नास हजारांचा जामीन मागण्यांत यावा असें माझें म्हणणें आहे. टिळक हे चांगले संपन्न गृहस्थ आहेत. "केसरी" छापखाना व गायकवाडवाडा त्यांच्या मालकीचा आहे, त्यांचें दांडगें वजन आहे, व त्यांचे स्नेही चांगले सधन आहेत. त्यांचे स्नेही त्यांना उद्यां वाढदिवसानिमित्त एक लक्ष रुपयांचा अहेर करण्याकरितां पैसा जमवीत आहेत. त्यांच्यापासून एक वर्षाकरितां जामीन मागण्यांत यावा अशी माझी मागणी आहे. ज्या तीन भाषणांवर माझी भिस्त आहे तीं तिन्ही भाषणें व त्यांचें भाषांतर मी यासोबत दाखल करतों.

(सही) **जे. ए. गायडर.**

डि. म्याजिस्ट्रेटचा शिक्का

माझ्यासमोर सही केली
जी. डब्ल्यू. हॅच, डि मॅ. पुणें.

मि. गायडर ह्यांनीं दाखल केलेल्या माहितीवरून व प्रतिज्ञालेखावरून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट ह्यांनीं पुढीलप्रमाणें हुकूम काढला.

मॅजिस्ट्रेटसाहेबांचा पहिला हुकूम

ज्याअर्थी मी, जी. डब्ल्यू. हॅच, डि. मॅ. पुणें, ह्यांना अशी माहिती लागली आहे कीं, माझ्या अधिकारहद्दींत पुणें येथें राहणारे बाळ गंगाधर टिळक हे राजद्रोही मजकूर पसरीत असतात, व हें सिद्ध करण्याकरितां त्यांनीं बेळगांव येथें १ मे १९१६ रोजीं आणि अहमदनगर येथें ३१ मे व १ जून १९१६ रोजीं "होमरूल" ह्या विषयावर दिलेल्या व्याख्यानांचे रिपोर्ट माझेपुढें दाखल करण्यांत आलेले आहेत,

त्याअर्थी मी असा हुकूम देतों कीं, एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल [क्रि. प्रो. कोडच्या कलम १०८, ११२ प्रमाणें] सदर बाळ गंगाधर टिळक ह्यांनीं वीस हजार रुपयांचा जातमुचलका व दहा दहा हजार रुपयांचे दोन जामीन कां देऊं नयेत ह्याबद्दल त्यांनीं कारण दर्शवावें.

(सही) **जी. डब्ल्यु. हॅच,** डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, पुणें.

वरील हुकूमान्वयें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. हॅच यांनीं पुढीलप्रमाणें रा. टिळक यांना समन्स काढलें.

समन्स

[क्रि. प्रो. कोड कलम ११४ प्रमाणें]

बाळ गंगाधर टिळक, नारायण पेठ, पुणें सिटी, यांस—

ज्याअर्थी विश्वसनीय माहितीवरून मला असें दर्शविण्यांत आलें आहे कीं, तुम्ही राजद्रोही मजकुराचा प्रसार करीत आहां, त्याअर्थी एक वर्षपर्यंत शान्तता राखण्याची हमी म्हणून तुम्ही वीस हजारांचा जातमुचलका व दहा दहा हजारांचे दोन जामीन कां देऊं नयेत ह्याबद्दलचें कारण दर्शविण्याकरितां ह्या नोटिशीनें तुम्हांस ता. २८ जुलै १९१६ रोजीं दुपारीं बारा वाजतां डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत हजर राहण्यास हुकूम करण्यांत येत आहे. मी आपल्या हातानें व कोर्टाच्या शिक्कामोर्तबासह ही नोटीस दिली, ता. २२ जुलै, १९१६.

(सही) **जी. डब्ल्यु. हॅच,** डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, पुणें.

सदरहु समन्स पुण्याचे डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस मि. बॉइड

यांनीं स्वतः ता. २३ जुलै १९१६ रोजीं नारायण पेठेंत रा. टिळक यांच्या वाड्यांत सकाळीं साडेदहा वाजतां रा. टिळक यांचेवर बजाविलें. ता. २३ जुलै हा दिवस रा. टिळक यांचा ६१ वा वाढदिवस असल्याकाणानें त्या दिवशीं त्यांची ठिकठिकाणची पुष्कळ मित्र व अनुयायी मंडळी त्यांचें अभिनंदन करण्याकरितां वाड्यांत जमली होती, व रा. टिळक हे त्यांच्याशीं बोलत बसले असतांनाच समन्स बजाविण्यांत आलें.

रा. टिळक यांचेतर्फे रा. सीताराम केशव दामले बी. ए. एल्एल्. बी. वकील यांनीं ता. २५ रोजीं खटल्याची तारीख पुढें नेमावी व फिर्याद-अर्ज प्रतिज्ञालेख, भाषणें व त्यांचीं इंग्रजी भाषांतरें वगैरे कागदपत्रांच्या नकला मिळाव्या म्हणून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टांत केलेला अर्ज मंजूर होऊन रा. दामले यांना नकला वगैरे देण्याचा हुकूम झाला.

ता. २ आगस्ट १९१६ रोजीं खानबहादुर दावर पब्लिक प्रासिक्युटर हे सरकारतर्फे व रा. टिळक यांचे तर्फे रा. दामले हे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांच्या कोर्टांत हजर होते. दोन्ही बाजूंच्या वकिलांचें म्हणणें ऐकून घेऊन खटल्याच्या सुनावणीचा दिवस ता. ७ आगस्ट मुक्रर करण्यांत आला.

दिवस पहिला

सोमवार ता. ७ आगस्ट १९१६

(मि. जी. डब्ल्यु. हॅच, आय्. सी. एस्. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेब बहादुर यांचे कोर्टांत.)

ता. ७ रोजीं दोनप्रहरीं बरोबर १२ वाजतां पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेब बहादुर यांचे कोर्टांत समन्सांतील हुकुमाप्रमाणें रा. टिळक हे स्वतः हजर होते.

सरकारतर्फे बॅरिस्टर बी. डी. बिनिंग व बॅरिस्टर पटवर्धन हे हजर होते. शिवाय त्यांच्या मदतीकरितां पुणें येथील सरकारी वकील खानबहादुर एस्. सी. दावर हे हजर होते व स्वतः फिर्यादी मि. गायडर हेहि हजर होते.

रा. टिळक यांच्या तर्फे ना. बॅरिस्टर महमदअली जिना व बॅरिस्टर येरूळकर हे हजर असून, त्यांच्या मदतीस रा. रा. दादासाहेब करंदीकर व रा.

स. रा. बखले बी. ए. एल्‌एल्‌ बी., हायकोर्ट वकील, रा. काकासाहेब पाटील, सी. के. दामले. बी. ए. एल्‌एल्‌. बी., रा. न. चिं. केळकर बी. ए. एल्‌एल्‌. बी. व रा. शंकर गोपाळ लेले वकील (अहमदनगर) हजर होते.

प्रारंभी बॅ. बिनिंग म्हणाले कीं, आक्षेपित भाषणें सिद्ध करण्याकरितां मी साक्षीदार बोलावितों. परंतु बॅ. जिना यांनीं या गोष्टीला हरकत घेतली कीं, हा पुरावा प्रारंभींच घेऊं देऊं नये. कारण, चालू खटला हा वारंट केसप्रमाणें चालला पाहिजे व फिर्यादीपक्षानें पुरावा देण्यापूर्वी त्यांचा खटला काय आहे हें स्पष्टपणें पुढें मांडलें पाहिजे. बॅ. बिनिंग उत्तरादाखल म्हणाले कीं, थोडक्यांत खटला काय आहे हें सांगण्यास मी तयार आहें. परंतु सगळीं भाषणें वाचून दाखवून त्यांवर टीका करीत बसण्याचें मला कारण दिसत नाहीं. तथापि मी आक्षेपित भाषणें पुढील अर्थाचीं आहेत असें म्हणतों.

(१) ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानास कायमच्या दास्यांत ठेविलें आहे.

(२) ब्रिटिश सरकार हिंदुस्थानाबाबद आपलें कर्तव्य करीत नाहीं. सरकार इंग्लंडच्या हिताकरतांच आपला राज्यकारभार चालवितें.

(३) ब्रिटिश सरकार हें खेरें सरकारच नाहीं. कारण, ज्या गोष्टी त्यांनीं केल्या नाहींत व ज्या गोष्टी त्यांनीं कराव्या अशी लोकांची इच्छा आहे त्या गोष्टी करा म्हणून सांगितलें असतां त्यांना अपमान वाटतो.

(४) ब्रिटिश सरकारला स्वतःसंबंधीं अतिशय घमेंड आहे आणि ज्या ज्या गोष्टी आपण करतो त्या सर्व पूर्णपणें बरोबर आहेत असें त्यांना वाटतें.

(५) ब्रिटिश सरकार आणि त्यांचा अधिकारी वर्ग यांचा मुख्य हेतु स्वतःचीं ‘ खवखवणारीं पोटें ’ भरावीं, हा आहे.

(६) कलेक्टर्स, कमिशनर्स, आणि दुसरें आडवे येणारे लोक यांची जरूरी नाहीं.

(७) नामधारी साम्राज्यसत्तेशिवाय सर्व ब्रिटिश सत्ता शक्य तितक्या लवकर नाहींशी केली पाहिजे.

(८) पन्नास वर्षांच्या अवधींत हिंदुस्थानच्या लोकांना ब्रिटिश सरकारला सुशिक्षित करतां आलें नाहीं म्हणूनच हिंदी लोकांनीं स्वतःचा कारभार स्वतः चालविणें हें योग्य आहे.

(९) ब्रिटिश लोक राज्य करण्यास नालायक आहेत म्हणून ते येथून गेले पाहिजेत.

(१०) देवाचा पुजारी म्हणजेच ब्रिटिश सरकार व त्यांचे अधिकारी यांना काढून टाकलें पाहिजे; कारण, ते लोकांचें कल्याण करित नाहींत.

(११) हिंदुस्थानांतील जबाबदार अधिकारी बादशहापासून खऱ्याखुऱ्या गोष्टी लपवून ठेवतात म्हणून हिंदुस्थानास न्याय मिळत नाहीं.

(१२) व्हाइसरॉय व हिंदुस्थानांतील इतर अधिकारी यांना जास्त पगार मिळण्याचें कारण एवढेंच कीं, तो परभारें हिंदुस्थानच्या तिजोरींतून मिळतो.

(१३) अधिकारी वर्गाचा पहिला हेतु हा असतो कीं, त्यांचा पगार बिनबोभाट मिळावा.

(१४) सध्यांची वेळ ही हिंदुस्थानास 'होमरूल' मिळविण्याकारितां चळवळ करण्यास योग्य आहे.

(१५) सरकार ही चळवळ वाईट समजतें याचें कारण, ही चळवळ यशस्वी झाल्यास त्यांचें नुकसान होईल.

(१६) सर्व भाषणांमधून बादशहांची इच्छा आणि हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था यांमध्यें मोठें अंतर दाखविलें आहे.

(१७) कंपनीच्या कारकीर्दींत गव्हर्नर जनरल यांना पुढील प्रकारें पत्र येत असेः "या वर्षी इतका फायदा झालाच पाहिजे, तो वसूल करा व इकडे आम्हांकडे पाठवून द्या." अशा तऱ्हेची राज्यव्यवस्था सुरू होती. लोकांच्या कल्याणाकडे मुळींच लक्ष दिलें जात नसे. ही राज्यव्यवस्था बरी नव्हती. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींत पार्लमेंटालाहि ही व्यवस्था नापसंत झाली. परंतु पुन्हां हल्लीं देशाची राज्यव्यवस्था कंपनीच्या पद्धतीनुरूपच चालविली आहे.

(१८) हिंदुस्थानांतील कोणीहि या सरकारला किंवा त्यांच्या नोकरांना इकडे या म्हणून बोलावणें केलें नव्हतें, म्हणून त्यांची गरजहि नाहीं.

(१९) आमचीं गाऱ्हाणीं दूर करा असें सांगितलें असतां सरकार तिकडे दुर्लक्ष करतें म्हणून सरकार शाहणें व उदार नाहीं.

(२०) सरकारची दृष्टि इतकी अंध झाली आहे कीं, त्यांच्याच रिपोर्टांतून काढून दाखविलेले आंकडेहि त्यांना दिसत नाहींत.

(२१) हें सरकार मुळीं सरकारच नव्हे; कारण, तें आपल्या सर्व जबाबदाऱ्या टाळतें.

(२२) मुख्य प्रश्न हा आहे कीं, हिंदुस्थानसारख्या राष्ट्राला पशूप्रमाणें वागविण्यांत यावें कीं काय ?

(२३) जर या होमरूलच्या चळवळीचा रस्ता कोणी अडवतील तर त्यांना धक्का देऊन रस्त्यापलीकडे ढकललें पाहिजे.

अशा स्वरूपाचीं भाषणें रा. टिळकांसारख्यांनीं अज्ञान श्रोतृसमाजापुढें करणें हें लोकांमध्यें सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न होण्यास कारणीभूत होतें. वरील विधानें होमरूल चळवळीच्या मिषानें करण्यांत आलेलीं आहेत. तत्त्वतः यांत खरी चळवळ नाहीं. फक्त विधानें करणाऱ्याची सरकाराविषयींची द्वेषबुद्धि मात्र स्पष्ट दिसते.

याप्रमाणें आपली बाजू पुढें मांडल्यावर बॅ. बिनिंग यांनीं सरकारतर्फेच्या साक्षीदारांच्या साक्षी घेण्यास सुरुवात केली.

प्रथम लघुलेखक व सबइन्स्पेक्टर

त्र्यंबक भिकाजी दात्रे यांची साक्ष

घेण्यास सुरुवात झाली. शपथविधि आटोपल्यावर बॅ. बिनिंग यांनीं आपल्या प्रश्नांस सुरुवात केली. बॅ. बिनिंग यांच्या प्रश्नांस उत्तरें देतांना रा. दात्रे म्हणाले कीं, अठराव्या परिषदेंत हजर राहण्याकरितां गेल्या मे महिन्यांत बेळगांव येथें मला पाठविलें होतें. मे महिन्याच्या पहिल्या तारखेस सायंकाळीं सहा वाजतां परिषदेच्या तंबूंत रा. टिळक यांनीं दिलेल्या व्याख्यानास मी हजर होतों. मि. गायडर यांच्या हुकुमावरून मी परिषदेस व सभेस हजर होतों. मराठी लघुलिपीमध्यें भाषणें उतरून घेतलीं व हें माझें खास काम आहे. हें काम मी गेलीं सहा वर्षें करित आहें. बेळगांव येथील टिळकांचीं भाषणें मीं लघुलिपींत घेतलीं आहेत. (निशाणी A या वह्या कोर्टास सादर केल्या).

बॅ. जिना:—भाषणें म्हणून या वह्या पुरावा मानतां येणार नाहींत. पुराव्यास पोषक म्हणून फार झालें तर मानण्यांत याव्या. कारण, टिळकांनीं केलेलें भाषण हें नव्हे; यावरून फक्त एवढें सिद्ध होतें कीं, टिळकांचें भाषण लघुलिपीमध्यें घेतलें गेलें होतें.

मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं बॅ. जिनांची तक्रार टिपून ठेवली.

बॅ. बिनिंगच्या प्रश्नासः—लघुलिपीवरून बालबोधी मराठी मीं लिहून काढलें. टिळकांचें भाषण मीं जसें ऐकलें तसें यांत टिपलें गेलें आहे. (बालबोध मराठी लिहिलेल्या वह्या निशाणी B कोर्टास सादर केल्या.) ज्यावेळीं मीं भाषण लघुलिपींत उतरून घेतलें त्यावेळीं रा. टिळक यांच्यापासून मी चारपांच कदमांवर होतों. रा. टिळकांचें भाषण झालें त्यावेळीं गर्दी पुष्कळ होती. सर्व जातींचे लोक त्यांत दिसत होते.

१९१६ च्या मे महिन्याच्या ३१ व्या तारखेस नगर येथील कापडबाजाराच्या मागील उघड्या जागेंत सायंकाळीं सात वाजतां रा. टिळक यांनीं दिलेल्या व्याख्यानास मी हजर होतों. सर्व जातींचे लोक हजर होते. तें भाषण मीं लघुलिपींत घेतलें आहे. (निशाणी C कोर्टांत दाखल केली) टिळकांनीं भाषण केलें त्यावेळीं मी त्याच्यापासून चारपांच कदमांवर होतों. (बालबोध मराठी वह्या निशाणी D कोर्टांत दाखल केल्या). हें बालबोध मराठी भाषण माझ्या समजुतीनें बरोबर आहे. १९१६ च्या १ ल्या जून रोजीं अहमदनगर येथें रा. टिळक यांनीं जें व्याख्यान दिलें त्या व्याख्यानास हजर होतों. तेंहि व्याख्यान मीं लघुलिपींत घेतलें आहे. (लघुलिपीच्या वह्या व त्यांचें बालबोध मराठी लिहिलेल्या वह्या निशाणी E आणि F कोर्टांत हजर केल्या). बॅ. जिना यांनीं उलटतपासणी तहकूब ठेवली. नंतर

अनंत कृष्ण ठाकूर बी. ए. यांची साक्ष

सुरू झाली. बॅ. बिनिंग यांच्या प्रश्नास उत्तर देतांना ते म्हणाले कीं, मी मुंबई युनिव्हर्सिटीचा बी. ए. आहें. मला ओरिएन्टल ट्रान्सलेटरच्या हपिसमध्यें आज दहा वर्षे नोकरी आहे. मला दाखविलेलें मराठी कागदपत्र मीं वाचले आहेत. मीं स्वतः इंग्रजी भाषांतर केलेलें नाहीं; परंतु मीं तें तपासलें आहे. भाषांतरें बरोबर आहेत.

बॅ. जिना म्हणाले, टिळकांच्या भाषणांचीं इंग्रजी भाषांतरें साक्षीदार रा. ठाकूर यांनीं केलेलीं नाहींत. यांनीं फक्त भाषांतर तपासून पाहिलें आहे. मूळ भाषांतरकाराला साक्षीदार म्हणून आणल्यास बरें होईल. मूळ भाषांतरकाराची तपासणी घेतल्याशिवाय भाषांतरें दाखल करून घेण्यास माझी हरकत आहे.

उत्तरादाखल बॅ. बिनिंग म्हणाले, मूळ भाषांतरकार हजर करण्याचा आपला इरादा नाहीं. या साक्षीदाराची साक्ष माझ्या कामास पुरेशी आहे.

बॅ. जिनांची तक्रार लिहून घेतली गेली आणि तिन्ही भाषांतरें निशाणी G. H. I. हीं पुराव्यांत दाखल केलीं गेलीं. बॅ. जिना यांनीं उलटतपासणी तहकूब ठेवली.

यानंतर बॅ. बिनिंग यांनीं टिळकांना पूर्वी राजद्रोहाच्या आरोपावर अमुक अमुक शिक्षा झालेल्या आहेत असा दाखला पुराव्यांत दाखल करण्यांत यावा अशी मागणी केली.

बॅ. जिना यांनीं या गोष्टीस हरकत घेतली. ते म्हणाले, टिळकांवरील हल्लींचा आरोप पिनलकोडच्या १०८ कलमाखालीं आहे. हें १०८ कलम लागूं होतें असें अगोदर सिद्ध झालें पाहिजे. तोंपर्यंत पूर्वींच्या गुन्ह्यांचा दाखला पुराव्यांत घेणें बरोबर होणार नाहीं. गुन्हा शाबीत झाल्यावर शिक्षा सुनावण्याचा प्रश्न येतो त्या वेळीं असा दाखला पुराव्यांत देणें योग्य असतें; तत्पूर्वी नव्हे. पूर्वी एकादे वेळीं टिळकांना राजद्रोहाबद्दल शिक्षा झालेली असली म्हणून याहि वेळीं त्यांनीं राजद्रोहाचा गुन्हा केलाच असला पाहिजे असें अनुमान निघणें शक्य व इष्ट नाहीं. म्हणून हा दाखला पुराव्यांत घेण्यांत येऊं नये एवढीच कोर्टाला विनंति आहे. बॅ. बिनिंग यानीं पुराव्याचा कायदा कलम १४ हें आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोर्टास दाखविलें. शिवाय ३२ इं. लॉ. रिपोर्ट पान १३ याचाहि आधार दिला.

बॅ. जिना म्हणाले, हा मागील गुन्ह्यांचा दाखला पुराव्यांत घेतल्यास कोर्टाचें मन कलुषित होईल असें माझें म्हणणें नाहीं. पण आजचा आरोप टिळकांच्या हल्लींच्या कृत्यांनीं शाबीत झाला पाहिजे, म्हणून हा दाखला पुराव्यांत घेणें योग्य नाहीं. कारण, या दाखल्यावर भिस्त ठेवणें म्हणजे दुसऱ्याच्या मतावर अवलंबून राहण्यासारखें होणार आहे.

मॅजिस्ट्रेट म्हणाले, हा दाखला पुराव्यांत घेतला जावा. दाखल्यांत असें लिहिलें आहे, कीं पहिल्या वेळीं टिळकांना १८ महिन्यांची शिक्षा झाली होती व दुसऱ्या वेळीं सहा वर्षांची शिक्षा व १००० रु. दंड झाला होता.

बॅ. जिना म्हणाले, सरकारनें दंड माफ केला आहे. बॅ. बिनिंग यांनीं दाखल्यांतून दंडाचा उल्लेख काढून टाकण्यास आपली सम्मति दिली.

नंतर बॅ. जिना यांनीं कोर्टास विनंति केली कीं, बॅ. विनिंग यांनीं भाषणांतील कोणकोणते भाग आक्षेपार्ह आहेत हें दाखविलेलें नाहीं. तें समजल्याशिवाय आपणास बचावाकरितां पुरावा द्या असें म्हणणें बरोबर नाहीं. फिर्यादअर्जांतहि कोणत्या विवक्षित भागांवर सरकारचा आक्षेप आहे हें दिलेलें नाहीं.

मॅजिस्ट्रेट म्हणाले, फिर्यादअर्जाप्रमाणें सर्व भाषणच आक्षेपार्ह आहे असें बॅ. विनिंग यांचें म्हणणें दिसतें. बॅ. विनिंग म्हणाले, माझा रोख सर्व भाषणाविरुद्ध आहे. निरनिराळ्या विवक्षित भागांवर नाहीं. मॅजिस्ट्रेट म्हणाले, अमुक एक वाक्य अगर वाक्यें आक्षेपार्ह आहेत असें दाखवावयास लावून फिर्यादीस बांधून घेणें हें बरोबर नाहीं. बॅ. विनिंग यांनीं त्यांच्या समर्थनार्थ कांहीं मुद्दे दाखविलेच आहेत.

बॅ. जिना म्हणाले, माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, कोणता भाग आक्षेपार्ह आहे हें स्पष्ट कळावें. उदाहरणार्थ, बॅ. विनिंग यांनीं जो पहिला मुद्दा दिला आहे कीं, ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानच्या लोकांस कायमचें दास्यांत ठेवलें आहे. या मुद्द्याच्या समर्थनार्थ अतिशय वाईट भाग तरी त्यांनीं काढून दाखवावा. हें जर दाखवलें गेलें नाहीं तर सगळ्या भाषणांत त्या मुद्द्याच्या समर्थनार्थ एकहि वाक्य नाहीं असें होईल.

बॅ. विनिंग म्हणाले कीं, मीं विवक्षित भाग दाखवावे असेंच जर म्हणणें असेल तर मी ते भाग दाखवितों, त्यांवर बॅ. जिनांनीं खुणा करून घ्याव्या.

बॅ. विनिंग यांनीं आक्षेपार्ह भाग तिन्ही भाषणांतून दाखवून दिले.

बॅ. जिना यांनीं मराठी लघुलिपीच्या वह्या तपासण्याकरितां खटला तहकूब करावा अशी विनंति केली. ती विनंति मान्य करण्यांत येऊन खटल्याचें काम दोन वाजतां तहकूब झालें.

दिवस दुसरा

मंगळवार ता. ८ आगस्ट १९१६

बॅ. बॅप्टिस्टा हे टिळकांच्या तर्फे बॅ. जिना यांच्या मदतीस हजर होते.

त्र्यंबक भिकाजी दात्रे यांच्या उलटतपासणीस बॅ. जिना यांनीं सुरुवात केली. त्यांच्या प्रश्नास उत्तर देतांना दात्रे म्हणाले कीं, निशाणी A ही पहिल्या भाषणाची मराठी लघुलिपीची वही आहे. मी मिनिटास ११० ते १२० पर्यंत शब्द

लघुलिपींत घेऊं शकतों. साधारण वक्ते मिनिटास ११० शब्द बोलतात. टिळक ७०।८०।९० शब्द बोलतात. त्यांचें भाषण मीं सर्व टिपून घेतलें आहे. कांहीं भाग मी पेनसिल दुरुस्त करतांना घेतला नसेल. टिळकांचें भाषण चालू असतांना पेन्सिल करावी लागली कीं नाहीं हें माझ्या लक्षांत नाहीं. देशपांडे या नांवाचे एक पोलिस सबइन्स्पेक्टर लघुलेखक आहेत तेहि टिपून घेत होते. निशाणी A. C. आणि E सर्व माझ्या हातच्या आहेत. निशाणी A मधील सर्व भाषण मीं सभेच्या वेळीं उतरून घेतलें आहे. देशपांडे हेहि उतरून घेत होते. आम्ही दोघांनीं मिळून दोघांच्या लघुलिपीवरून बालबोध मराठी तयार केलें आहे. त्यांनीं घेतलेलें कांहीं शब्द मीं घेतले नसतील, चुकी होणें शक्य नाहीं. कोणतेंहि वाक्य गाळलेलें नाहीं; कांहीं शब्द गळले गेले असतील. 'कांहीं ठिकाणीं' हा शब्द वरचेवर येऊं लागल्यानें मीं उतरून घेतला नाहीं. परंतु समजण्याकरितां मीं खुणा केल्या आहेत. राज आणि राज्य यांमध्यें चुकी होणें शक्य नाहीं. मी स्वतः लघुलिपीमध्यें राज आणि राज्य यांमध्यें भेद करीत नाहीं. मी सी. आय्. डी. मध्यें आहे. मला पगार ७० रु. मिळतो. मी पांचसहा वर्षें भाषणें टिपून घेत आहें. मीं आठनऊ दिवसांत बालबोध तयार केलें; देशपांडे व मीं या दोघांनीं मिळून केलें आहे. म्हणून कांहीं भाग माझ्या हस्ताक्षरांत व कांहीं भाग देशपांडे यांच्या हस्ताक्षरांत आहे.

फेरतपासणी

मला लघुलेखनाशिवाय दुसरें कांहीं काम करावें लागत नाहीं. कांहीं वेळां जास्ती व कांहीं वेळां कमी पण वर्षभर काम असतें.

अनंत कृष्ण ठाकूर यांची उलटतपासणी

प्र०—"व्यापारी कंपनीच्या धोरणावर राज्यवेवस्था आहे." याचा अर्थ राज्यवेवस्था तशी आहे असा होत नाहीं काय ? उ०—तसा अर्थ होत नाहीं. बादशहाची व्यवस्था असा अर्थ होतो. मॅजिस्ट्रेट म्हणाले, टिळकांनीं राज्यधोरण असा शब्द वापरला असेल व रिपोर्टरानीं राजधोरण असें उतरून घेतलें असेल. बॅ. जिना म्हणाले, हाच माझा मुद्दा आहे. बॅ. जिना यांनीं मि. ठाकूर यांची उलटतपासणी पुढें चालू केली.

प्र०—व्यवस्था कांहीं अडली नाहीं; म्हैसूरमध्यें काय अडली आहे ? या

वाक्यांत 'अडली' याचें भाषांतर 'Obstructed' असें केलें आहे तें बरोबर आहे काय? उ०—होय. प्र०—'अडणें' म्हणजे 'to stop hinder Impebe' असे शब्द नकोत काय? यावर बॅ. बिनिंग यांनीं आपण 'Obstruct' शब्दाऐवजीं 'Impebe' शब्द मान्य करतों असें कळविलें. नंतर पुनः साक्षीदारास प्र०—'राज्यधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर' याचें भाषांतर तुम्ही काय कराल? उ०—Sovereign's policy is in accordance with Trading Company's policy. प्र०—हें भाषांतर बरोबर आहे काय? राज्यधोरण म्हणजे 'State Policy' नव्हे काय? उ०—नव्हे. 'राज्यधोरण' म्हणजे 'State Policy' होईल, पण 'राजधोरण' म्हणजे 'Soverign's personal Policy.' प्र०—राज्यधोरण आणि राजधोरण या शब्दांचा घोंटाळा होण्याचा संभव आहे कीं नाहीं? मॅजिस्ट्रेटः—तुमच्या प्रश्नाचा असा आशय आहे काय कीं बोलतांना रा. टिळक यांनीं 'राज्यधोरण' असा शब्द वापरला असून लघुलेखकानें 'राजधोरण' असें लिहून घेतलें? बॅ० जिनाः—होय. माझा तोच मुद्दा आहे. कोर्टानें पुढें उलटतपासणी चालविण्यास सांगितल्यावर प्र०—'तर त्याला आम्ही धक्का देऊन बाहेर जाणें आहे' याचें भाषांतर कसें कराल? उ०— We shall have to go out by giving him a push. प्र०—तर मग या भाषांतरांत 'We have to go out' असें भाषांतर कां केलें आहे? उ०—दोहोंचा अर्थ एकच होतो. प्र०—या वाक्यांतल्या क्रियापदाचा काळ कोण? उ०—वर्तमानभविष्य. प्र०—या वाक्याचें भाषांतर 'We may have to go out etc.' असें होणार नाहीं काय? उ०—नाहीं. प्र०—वर्तमानभविष्य काळाचा अर्थ संभव probability दर्शक होणार नाहीं काय? उ०—नाहीं; हेतुदर्शक होतो. प्र०—तर मग 'जाणें आहे' यांत संभवाचा अर्थ निघत नाहीं? उ०—नाहीं. प्र०—'सरकार' या शब्दाचें भाषांतर काय? उ०—Government. प्र०—याचा दुसरा अर्थ होत नाहीं काय? उ०—'सरकार' या शब्दाचे दुसरेहि अर्थ आहेत; पण तें संदर्भावर अवलंबून राहील. प्र०—ब्युरॉक्रसी याला मराठींत प्रतिशब्द आहे काय? उ०—ब्युरॉक्रसीचें मराठींत अधिकारीवर्ग असें भाषांतर होईल; परंतु दुसरा एखादा तंतोतंत लागू पडणारा शब्द आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. प्र०—पण 'सर-

कार ' हा शब्द बहुर्थी आहेना ? दिवाणी कोर्टाला ' सरकार ' हा शब्द लावतां येईल का नाहीं ? उ०–तसा तो शब्द लावला तर ती चूक होणार नाहीं. प्र०–कलेक्टरला ' सरकार ' हा शब्द लागू करतां येईल कीं नाहीं ? उ०– लागू केल्यास चालेल. साधारणतः कोणाहि दिवाणी अथवा मॅजिस्ट्रेटी अम्मलदाराला तो शब्द लावतां येईल. प्र०–' घमेंड ' या शब्दाचा अर्थ काय ? उ०–Conceit. प्र०–हा शब्द कोणत्या तरी कोशांतून पाहून वापरला आहे काय ? उ०–नाहीं. कारण, मला तो शब्द येत होता. प्र०–बरें, हें पहा, या कोशांत ' घमेंड ' शब्दाला Conceit शब्द नसून ' Over-confidence असा प्रतिशब्द आहे. हा शब्द येथें चालेल कीं नाहीं ? उ०–संदर्भावरून चालेल. दोनहि शब्दांचे अर्थ बहुतेक सारखेच आहेत. प्र०–मग ' घमेंड ' म्हणजे जवळजवळ ' Over-confidence ' असेंच समजावयाचें ना ? उ०–होय. प्र०– 'तीन धूर्तांची गोष्ट ' यांतील 'धूर्त' शब्दाचें भाषांतर काय ? उ०–Rogue. डॉ. भांडारकर यांच्या पुस्तकांत हाच अर्थ दिलेला आहे. प्र०–' तूं मोठा धूर्त आहेस ' याचें भाषांतर you are a very shrewd man ' असें नाहीं काय ! उ०–होय. वॅ. जिना (कोर्टास उद्देशून):–'धूर्त' शब्दाला ' rogue ' हा प्रतिशब्द बरोबर नाहीं. त्याच्याऐवजीं 'cunning ' हा शब्द योग्य होईल. प्र०–' गुलामगिरी ' याचा अर्थ काय ? उ०–Slavery. प्र०–या शब्दाचा Slavery खेरीज दुसरा कांहीं अर्थ नाहीं काय ? उ०–दुसरा कोणताच अर्थ संभवत नाहीं. प्र०–या कोशांत ' गुलामगिरी ' याला ' Slavery ' असा प्रतिशब्दच दिलेला नाहीं. ' Servility ' वगैरे शब्द आहेत. आतां तरी ' गुलामगिरी ' याचा दुसरा अर्थ Servility होतो हें मान्य कराल काय ? उ०–कदाचित् तसाहि अर्थ होईल. प्र०–या व्याख्यानांचें भाषांतर कोणी केलें ? उ०–रा. ओक यांनीं. प्र०–ओक कोण ? तुमचे वरिष्ठच ना ? उ०–होय. प्र०–मग त्यांचें भाषांतर तुम्हीं तपासून पाहिलें ? उ०–तें मीं मुळाशीं ताडून पाहिलें आणि तें बरोबर आहे असें मला आढळून आलें. प्र०–म्हणजे तुम्ही तुमच्या वरिष्ठाचें भाषांतर तपासून त्यावर ' बरोबर आहे ' असा शिक्का मारलात म्हणावयाचा ! बरें, पण हे ओक कोठें आहेत ? उ०–मुंबईंत. प्र०–तुम्हांस ते अलीकडे केव्हां भेटले होते ? उ०–पंधरा दिवसांपूर्वी मुंबईस आणि

चारपांच दिवसांपूर्वी पुण्यासहि भेटले होते. प्र०–‘ राज्यव्यवस्था ’ याचें भाषांतर ‘ Administration of the State ’ असें करावयास नको काय? यावर बॅ. विनिंग यांनीं सांगितलें कीं, सरकारी भाषांतर चूक आहे का बरोबर आहे याचा वाद न करतां मी बॅ. जिना यांनीं सुचविलेलें भाषांतर कबूल करतों. त्यांस बॅ. जिना म्हणाले कीं, पण मी कांहीं सरकारी भाषांतर बरोबर आहे असें म्हणत नाहीं; असो. प्र०–‘ खर्चणाराचें खर्चतें, पण कोठावळ्याचें पोट दुखतें ’ ही म्हण तुम्हीं ऐकिली आहे काय? उ०–होय. ती प्रसिद्ध म्हण आहे. प्र०–या म्हणीचा अर्थ काय? उ०–‘ पोट दुखतें ’ म्हणजे यजमानानें खर्चिलें तर तें कोठावळ्यास आवडत नाहीं. प्र०–रा. आपटे यांच्या म्हणीच्या पुस्तकांत त्याचा अर्थ काय दिला आहे? उ०–यजमान खर्चाची परवानगी देतो, पण त्याचा मुनीम खर्च करण्यास कांकूं करतो. प्र०–हा अर्थ बरोबर आहेना? उ०–होय. प्र०–‘हल्लींच्यासारखी राज्याची व्यवस्था असली तर युरोपियन राष्ट्रांत इंग्लंडला कांहीं अधिकार देतां येत नाहीं.’ या वाक्याचा अर्थ काय तें सांगूं शकाल काय? उ०–याचा बरोबर अर्थबोध होत नाहीं. प्र०–‘ राष्ट्राचा वाद आहे; अमुक एका राष्ट्राला पशूसारखें वागवावयाचें का त्या राष्ट्रांतील लोकांना माणसें आहेत असें समजून इ.’ याचें भाषांतर वाचा पाहूं? उ०–‘ It is a national question whether a particular nation is to be treated like a beast &c.’ प्र०–या वाक्यांत ‘ पशु ’ शब्दाला beast च्या ऐवजीं cattle असा शब्द घातला तर चालणार नाहीं काय? उ०–नाहीं. प्र०–‘ गुरासारखें ’ याचें भाषांतर काय? उ०–Like cattel. प्र०–पशु आणि गुरें यांत अंतर आहे काय? उ०–गुरें म्हणजे गाय, बैल वगैरे आणि पशु म्हणजे वरच्याशिवाय कुत्रीं, डुकरें वगैरे. ‘ पशु ’ शब्दांत गुरांचा समावेश होतो; परंतु गुरांत पशूंचा समावेश होत नाहीं. प्र०–मग ‘ पशु ’ हा शब्द जास्ती व्यापक आहेना? त्याचें भाषांतर Lower animals असें नाहीं का करितां येणार? उ०–नाहीं. Low beasts असें करीन! प्र०–येथें तुलना कोणाकोणामध्यें आहे? उ०–पशु आणि मनुष्य यांमध्यें. प्र०–मग पशूसारखें वागविणें म्हणजे काय? Treating without taking into considertion their desires, their likings, their voice

their sentiments. प्र०-होय ना! बरें, तें असो. 'सगळी रात्र जागून चोर ज्या वेळीं आला त्या वेळीं निजलेले, अशी तुमची स्थिति होईल' असें वाक्य तुम्हीं ऐकलें आहे काय? उ०-होय. बरेच वेळां ऐकलें आहे. प्र०-तर मग ती म्हणच आहे म्हणावयाची? उ०-ती कांहीं हुबेहुब म्हण आहे असें नाहीं. प्र०-हुबेहुब नसो, पण जवळजवळ ती म्हणच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं? असो; युद्ध सुरू झाल्यानंतर टिळकांनीं जें 'डिक्लेरेशन' केलें होतें तें तुम्हीं वाचलें आहे काय? (बॅ. बिनिंग यांनीं या प्रश्नास हरकत घेतली.) उ०-नाहीं. मला माहीत नाहीं. यानंतर रा. ठाकूर यांस सर्व भाषणें वाचून जेथें जेथें 'गुलामगिरी' हा शब्द आला आहे तेथें तेथें त्याचें भाषांतर काय करण्यांत आलें आहे तें पाहून येण्यास सांगितलें. नंतर दुसरे एक लघुलेखक व सबइन्स्पेक्टर सी. आय्. डी.

सोमनाथ शंकर देशपांडे यांची साक्ष

सुरू झाली. ते म्हणाले, गेल्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस बेळगांव येथें झालेल्या व्याख्यानास मी व दात्रे हजर होतों आणि दोघांनींहि टिळकांचे भाषण लघुलिपींत घेतलें. मीं जें ऐकलें तें बरोबर रीतीनें टिपून घेतलें आहे. (निशाणी K आणि L या दोन वह्या त्यांनीं कोर्टांत हजर केल्या). मी टिळकांपासून चारपांच कदमांवर होतों. मी या वेळीं दोन पेनसिली घेऊन गेलों होतों. मला दाखविलेलें बालबोध रूपांतर मीं माझ्या वहीवरून बरोबर केलें आहे.

शॉर्ट-हॅन्ड नोटस् पहावयास मिळाव्यात म्हणून खटल्याचें काम तहकूब करावें, अशी बॅ. जिना यांनीं विनंति केली व ती विनंति मान्य करण्यांत आली.

दिवस तिसरा

बुधवार ता. ९ आगस्ट १९१६

अनंत कृष्ण ठाकूर यांची उलटतपासणी

बॅ. जिना यांच्या प्रश्नासः—मीं सर्व भाषणें तपासून पाहिलीं; सर्व ठिकाणीं 'गुलामगिरी' याचें भाषांतर 'स्लेव्हरी' असें केलें आहे. मला आपट्यांची संस्कृत डिक्शनरी ठाऊक आहे, ती प्रसिद्ध आहे. 'पशू' हा संस्कृत शब्द आहे. पशूचें भाषांतर कॅटल असें होऊं शकेल. कॅटलमध्यें पशूचा समावेश होतो.

फेरतपासणी

डॉ. भांडारकर यांचें संस्कृत दुसरें पुस्तक सुप्रसिद्ध आहे. प्रो. रानडे यांचा इंग्रजी-मराठी कोश प्रसिद्ध आहे. गुलामगिरी आणि दास्य यांपैकीं दास्य याचें बरोबर भाषांतर 'बॉंडेज' हें आहे.

(कोर्टाच्या परवानगीनें)

उलटतपासणी

दास्य म्हणजे सर्व्हिटयूड नव्हे. सर्व्हिस असाहि अर्थ होत नाहीं. 'सर्व्हिटयूड' असा दास्य याचा नेहमींचा अर्थ नाहीं. डिक्शनरींत लिहिलें असेल. दास्य याचा सर्व्हिटयूड किंवा सर्व्हिस असा अर्थ होऊं शकेल.

सोमनाथ शंकर देशपांडे यांची उलटतपासणी

मी दोन वर्षें लघुलेखकाचें काम करीत आहें. मला सत्तर रु. पगार मिळतो. कधीं कधीं मला कांहीं शब्द सोडावे लागतात. परंतु सर्व वाक्य कधींहि सुटत नाहीं. कधीं कधीं वाक्य चुकीनें घेतलें जातें आणि या नोटबुकामध्यें चूक लिहून घेतलेली असतील व कांहीं गळलीं असतील. भाषणांत मधून मधून हशा होतो व टाळया वाजतात. परंतु टिळकांनीं उच्चारलेलें प्रत्येक वाक्य मीं घेतलें आहे. टाळया व हशाच्या योगानें ऐकण्यांत व्यत्यय आला नाहीं. कारण त्या वेळीं वक्तेहि थांबत असत. टाळया संपल्यावर वक्ता बोलण्यास आरंभ करतो, असा माझा अनुभव आहे. मी जवळजवळ शंभर सभांस आजपर्यंत हजर होतों. कांहीं कांहीं ठिकाणीं दात्रे यांच्या लघुलिपींत व माझ्या लघुलिपींत फरक आहे. 'राज' आणि 'राज्य' यामध्यें मी फरक करतों. ऐकतांना दोन्ही शब्दांत घोंटाळा होणें शक्य नाहीं.

बॅ. जिना यांनीं 'राज' आणि 'राज्य' हे दोन्ही शब्द लघुलिपींत कागदावर लिहिण्यास सांगितलें व कोर्टास विनंति केली कीं, जर उत्तर देण्याचा हक्क जात नसेल तर तो कागद पुराव्यांत दाखल केला जावा.

बॅ. बिनिंग म्हणाले—उत्तर देण्याचा जिनांचा हक्क मी काढून घेऊं इच्छित नाहीं. बॅ. जिना यांनीं त्याकरितां लपंडाव करण्यास नको.

बॅ. जिना म्हणाले कीं, बॅ. बिनिंग यांना आपण घरीं आहों असें वाटतें. मला या कोर्टाचा या मुद्दयावर हुकूम पाहिजे. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं उत्तराचा हक्क

जाणार नाहीं. असें सांगितल्यावर कागद दाखल करण्यांत आला. नंतर म्या. नीं

रा. टिळक यांची जबानी

धेण्यासाठीं त्यांस आपल्या टेबलाजवळ येऊन उभें राहण्यास सांगितलें. शपथविधि झाल्यानंतर प्र०–तुम्ही पहिल्या मेला बेळगांव येथें व ३१ मे व १ जून रोजीं नगर येथें तुमच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे स्वराज्य या विषयावर भाषणें अगर व्याख्यानें दिलीं काय? उ०–होय. स्वराज्य किंवा होमरूलवर हीं व्याख्यानें दिलीं. व्याख्यानांच्या हस्तपत्रिकांवर दोन्ही शब्द लिहिले होते. प्र०–तुम्हीं तुमच्या भाषणांचा मराठी तर्जुमा तुमच्या वकीलांनीं मागून घेतलेला वाचला आहे काय? उ०–होय. प्र०–तुम्ही जें बोललां आहांत त्याचा बरोबर रिपोर्ट दिला गेला आहे काय? उ०–शब्दशः बरोबर नाहीं. प्र०–मुख्यार्थानें बरोबर आहे कीं नाहीं? उ०–एकंदरींत सर्वसाधारणरीत्या तो बरोबर असो, परंतु कांहीं ठिकाणीं वाक्यें गळलीं आहेत व कांहीं ठिकाणीं अपुरीं आहेत असें मला आढळून आलें. प्र०–हीं व्याख्यानें देण्यांत तुमचा हेतु काय होता? उ०–होमरूलची तरफदारी करणें व होमरूल म्हणजे काय हें समजावून देणें व तें मिळविण्याकारितां उत्तम उपाय कोणता हें दाखविणें आणि होमरूल-लीगचे सभासद होण्यास लोकांचीं मनें वळविणें. प्र०–होमरूल म्हणजे काय हें थोड्या शब्दांत मला स्पष्ट करून सांगूं शकाल काय? उ०–हें सर्व माझ्या भाषणांत दिलेलें आहे. प्र०–सरकारनें राजद्रोहाच्या आरोपावरून तुम्हांवर खटले केले होते काय? उ०–होय. प्र०–दोन्ही वेळां तुम्हांस शिक्षा झाल्या होत्या काय? उ०–होय. प्र०–तुम्हांला आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय? उ०–नाहीं; तें मी माझ्या वकीलावर सोंपवितों.

याप्रमाणें रा. टिळक यांची जबानी झाल्यानंतर बॅ. जिना यांनीं आप-ल्यास पुरावा द्यावयाचा नाहीं असें सांगितलें. नंतर फिर्यादीतर्फे

बॅ. बिनिंग यांचें भाषण

सुरू झालें. ते म्हणाले, बचावाचा पुरावा काय आहे हें मला माहित नसल्यामुळें मीं मोठ्या अडचणींत पडलों आहें असें वाटतें. अनुमानधपक्यानें बोलावयाचें म्हणजे कांहीं शब्दांचें भाषांतर चुकीचें आहे असा बचावाचा रोख दिसतो. परंतु त्यांनीं सुचविलेले शब्द जरी त्या ठिकाणीं घातले तरी भाषणांचा अर्थ बदलेल

असें मला वाटत नाहीं. मला मराठी येत नाहीं, ही गोष्ट माझ्या फायद्याची नाहीं. दास्य या शब्दाचा अर्थ 'स्लेव्हरी' या शब्दानें दाखविला जात नाहीं असें म्हणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. परंतु माझ्या मतें टिळकांच्या म्हणण्याचा रोंख हिंदुस्थान कायमचें गुलामगिरींत राहणें असा तरी खास आहे. दास्य आणि गुलामगिरी हे दोन शब्द भाषणांत एकत्र आलेले आहेत, आणि त्यांचा अर्थ 'बॉंडेज' आणि 'स्लेव्हरी' असाच आहे. शब्दाच्या अर्थाच्या संशयाचा फायदा आरोपीला देणें योग्य आहे; पण दास्य याचा अर्थ 'सर्व्हिस' असा तरी होतो. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या रानड्यांच्या कोशांत सर्व्हिस या शब्दाचा अर्थ दास्य असा दिला आहे. व त्याच कोशांत 'बॉंडेज' याचाहि अर्थ दास्यच दिला आहे. बॅ. जिना यांनीं कँडीच्या कोशाचा आधार घेतला होता. पण त्यांत सुद्धां दास्य याचा अर्थ सर्व्हिटयूड, सर्व्हिस, सर्व्हंटशिप असाच दिला आहे. आपट्यांच्या कोशांत दास्य याचा अर्थ सर्व्हिटयूड, बॉंडेज आणि स्लेव्हरी असा दिला आहे. रा. टिळक यांच्यासारख्या अनुभवी व कुशल अशा वक्त्यांनीं असला शब्द वापरावा याचें आश्चर्य वाटतें. कायमची नोकरीगिरी 'स्लेव्हरी-'पेक्षां अधिक चांगली खास नाहीं. गुलामगिरी म्हणजेच स्लेव्हरी आणि असाच अर्थ रानड्यांच्या कोशांत दिला आहे. धूर्त शब्दासंबंधानें असें सांगण्यांत आलें आहे कीं, धूर्त म्हणजे 'कनिंग' असा अर्थ होतो. पण 'कनिंग' लुच्चा मनुष्य सन्माननीय असतो असें नाहीं. डॉ. भांडारकर यांनीं धूर्त शब्दाचा अर्थ 'रोग' असा दिला आहे. 'घमेंड' याचें भाषांतर 'ओव्हरवीनींग कॉन्फिडन्स' असें सुचविण्यांत आलें आहे. परंतु फिर्यादी पक्षाच्या भाषांतरांत व या भाषांतरांत फारसा फरक नाहीं. होमरूल हें कायदेशीर ध्येय आहे किंवा नाहीं अथवा या विषयाचा वाद व्हावा कीं नाहीं यासंबंधानें मी आज बोलूं इच्छित नाहीं. जो कोणी बोललेल्या शब्दांनीं बादशहा अगर कायद्यानें प्रस्थापित झालेलें राज्य यांच्यासंबंधानें द्वेष, तिरस्कार अगर अप्रीति उत्पन्न करील अगर करण्याचा प्रयत्न करील त्यास शिक्षा व्हावी एवढेंच माझें म्हणणें आहे, व हेंच १२४ अ कलम आहे. माझें म्हणणें इतकेंच कीं, रा. टिळक यांनीं १२४ अ कलमाखालीं येतील अशीं भाषणें केलीं आहेत म्हणून त्यांनीं एक वर्षपर्यंत चांगल्या वर्तणुकीचा जामीन द्यावा.

रा. टिळक यांना १२४ अ कलमाखालीं दोनदां शिक्षा झाली आहे,. ही गोष्ट मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं लक्षांत ठेवावी. त्यांना प्रथम झालेल्या १८ महिन्यांच्या शिक्षेंतील कांहीं शिक्षा कांहीं अटींवर कमी करून त्यांना जरी सोडण्यांत आलें होतें तथापि ते राजद्रोही भाषणाचा फैलाव करीतच होते.

बॅ. जिना यांनीं या म्हणण्यास हरकत घेतली व ते म्हणाले कीं, निकालामध्यें त्या अटी न दिल्यांकारणानें टिळकांनीं त्या अटी पाळल्या नाहींत हें म्हणण्यास बॅ. बिनिंग यास कांहीं आधार नाहीं.

बॅ. बिनिंग यांनीं ती गोष्ट कबूल केली. ते पुढें म्हणाले, रा. टिळक यांस दुसऱ्यांदा सहा वर्षांची शिक्षा दिली गेली होती. परंतु त्याचीहि दरकार न बाळगतां ते भाषणें करीतच आहेत. कितीहि सूचना दिल्या तरी त्या निरुपयोगी ठरतात अशी या मनुष्याची स्थिति आहे. ते पुनःपुन्हा भाषणें करतात. तीं भाषणें थांबविण्याकरितां कांहीं उपाय केलाच पाहिजे; नाहींतर यापेक्षां वाईट गोष्टी ते करतील.

बॅ. बिनिंग यांनीं आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुढील आधार दाखविले.

२२ बॉंबे पा. ११२, ८ बॉं. लॉ. रि. ४५७,
१० ,, ,, ८६६, २० अलाहाबाद ,, ५५,
३२ मद्रास ,, २७, ३४ कलकत्ता ,, ९९९.

ज्या वेळीं कोणताहि मनुष्य सरकारासंबंधानें द्वेष, तिरस्कार, अप्रीति, श्रोत्यामध्यें उत्पन्न होईल अशा तऱ्हेचीं भाषणें करतो त्या वेळीं तो मनुष्य १२४ अ खालील गुन्हा करतो. एकाद्या कलेक्टरनें अगर कमिशनरनें एकादी चुकीची गोष्ट केली असें म्हणण्याचा अधिकार कोणासहि आहे; परंतु सगळेच कलेक्टर्स अगर कमिशनर्स यांनीं चुका केल्या आहेत असें समुच्चयानें म्हणण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं. रा. टिळक यांनीं सरकारी अधिकाऱ्यांबद्दल तिरस्कार उत्पन्न केला आहे. कलमांतील शब्द असे आहेत कीं, द्वेष, अप्रीति अगर तिरस्कार उत्पन्न करणें म्हणजे १२४ अ कलमाखालील गुन्हा करणें आहे.

स्वराज्य व होमरूल हे शब्द व्याख्यानाचा विषय म्हणून हस्तपत्रिकांवर लिहिले होते कीं नाहीं हें मला माहित नाहीं. मीं काळजीपूर्वक लक्ष देऊन भाषणें वाचलीं आहेत; परंतु स्वराज्य अगर होमरूल यासंबंधाचा एकादा

मसुदा मला आढळला नाहीं. भाषणांमध्यें कांहीं मौजेच्या व कांहीं कंटाळवाण्या अशा गोष्टी सांगितल्या आहेत व वक्तृत्वकौशल्याच्या दृष्टीनें त्या उत्तमहि असतील; परंतु होमरूल अगर स्वराज्य यांची व्याख्या कोठेंहि दिली नाहीं. उदाहरणार्थ, बेळगांवचें भाषण घ्या. या भाषणांत रा. टिळक यांनीं होमरूल अगर स्वराज्य यासंबंधीं नेमका खुलासा कोठेंहि केला नाहीं. म्हणून सरकार-तर्फे माझें असें म्हणणें आहे कीं, होमरूलचें मिष करून सर चार्लस फॅरन यां-च्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कायद्यानें प्रस्थापित झालेल्या राज्यावर अ-प्रामाणिक व अनैतिक असे हेतु लादण्याचा रा. टिळक यांनीं प्रयत्न केला आहे. आणि लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, रा. टिळक यांना दोनदां शिक्षा झाली आहे तरी तोच गुन्हा ते करीत आहेत. बेळगांव येथील भाषण ऐकण्यास सर्व जातींचे व वर्गांचे लोक हजर होते. आणि भाषणांत 'स्वराज्य' 'स्वराज्य' म्हणजे काय असे अनेक वेळां प्रश्न विचारून त्या प्रश्नाला उत्तर देण्याचा मात्र मुळींच प्रयत्न केला नाहीं. भाषणांत मुख्यत्वेंकरून एकच गोष्टीवर कटाक्ष आहे. ती ही कीं, होमरूलसंबंधीं चर्चा करूं लागल्याबरोबर सरकार त्याच्या विरुद्ध जातें. मी भाषणांतील कांहीं भाग वाचून दाखवतों. (वाचून दाखविले). या भाषणांत सरकारी अधिकाऱ्यांना अतिशय घमेंड आहे, त्यांची दृष्टि स्वार्थी आहे, इत्यादि आरोप केले आहेत. याचा परिणाम श्रोत्यांमध्यें सरकाराविषयीं अप्रीति खास उत्पन्न होईल असें मला वाटतें. उदाहरणार्थ, मी भाषणामधून कांहीं उतारे दाखवितों. (या ठिकाणीं भाषणांतील कांहीं भाग वाचून दाख-विला.) माझ्या समजुतीप्रमाणें रा. टिळक यांना ज्या गोष्टी करण्याचा हक्क आहे त्यापेक्षां अधिक हक्क मला स्वतःलाहि नाहींत.

बॅ. जिना म्हणाले, मि. बिनिंग म्हणतात ही गोष्ट खरी नाहीं. मि. बिनिंग यांना रा. टिळक यांच्यापेक्षां अधिक हक्क खात्रीनें आहेत. बॅ. बिनिंग यांनीं भलतींसलतीं विधानें करण्यापेक्षां जे कागदपत्र कोर्टापुढें पुरावा म्हणून दाखल केले आहेत त्यासंबंधींच त्यांनीं बोलावें हें बरें.

बॅ. बिनिंगः—रा. टिळक यांचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थान स्वरा-ज्यास पात्र आहे, व सरकार ही गोष्ट पूर्णपणें जाणून आहे. तथापि स्वराज्याचे हक्क सरकार हिंदुस्थानास देत नाहीं इतकेंच नव्हे, तर विलायतेंतील अव्यक्त

सरकारची हिंदी लोक स्वराज्याला पात्र नाहींत अशी खोटीच समजूत करून देतें. मी जर हिंदी मनुष्य असतों व अशा तऱ्हेचें एखादें व्याख्यान ऐकलें असतें तर खात्रीनें माझ्या मनांत सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न झाली असती. कोणत्याहि देशांत तेथील सरकारावर अशा तऱ्हेचे वाईट दोषारोप कोणी करूं शकेल काय ? हीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, लोकांनीं टाळ्या वाजवून व 'shame shame' म्हणून आपली पसंती व्यक्त केली आहे; व मला वाटतें, वक्त्याच्या वक्तृत्वाचा गौरव लोकांनीं टाळ्यांनीं केला व सरकारच्या तिरस्करणीय वर्तनाबद्दल "shame shame" म्हटलें.

विशेषतः भाषणाचा शेवटचा भाग सरकाराविरुद्ध द्वेष व तिरस्कार खास उत्पन्न करील. ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी पद्धति राणीसरकारच्या राज्यांतहि चालू आहे, असा रा. टिळक यांचें म्हणण्याचा आशय आहे, व असें म्हणणें म्हणजे सरकारचा व्यापारी कावा आहे व म्हणूनच तो अत्यंत तिरस्करणीय आहे, असें भासविण्यासारखें आहे. स्टेटसेक्रेटरी हा एक सरकारचा जांवई आहे व म्हणून तो आम्हांस नको असें म्हणणें म्हणजे हिंदुस्थानचा राज्यकारभार ज्यांच्या नियंत्रणानें चालतो त्यांची जागा केवळ वशिल्याच्या तट्टांनीं भरली जाते असें म्हणण्यासारखें आहे.

अहमदनगर येथील पहिलें भाषण हें बेळगांव येथील भाषणापेक्षांहि वाईट आहे. यांत सरकारावर परकीपणाचा आरोप केला असून सरकार आपलें कर्तव्य करीत नाहीं, फक्त इंग्रज लोकांच्याच कल्याणाकडे त्याची दृष्टि आहे असें भासविण्याचा रा. टिळक यांनीं प्रयत्न केला आहे. सरकारसंबंधीं अप्रीति अशा भाषणांनीं खात्रीनें उत्पन्न होईल असें मला वाटतें.

इतकें भाषण झाल्यानंतर बॅ. बिनिंग यांनीं विनंति केल्यावरून तिसऱ्या दिवसाचें काम पुरें करण्यांत आलें.

दिवस चवथा

(गुरुवार ता. १० आगष्ट १९१६ दुपारीं १२ वाजतां)

बॅ. बिनिंग यांनीं आपलें भाषण पुढें चालू केलें. ते म्हणाले, रा. टिळक यांचा एक मुद्दा असा आहे कीं, हिंदुस्थानसरकारानें हिंदुस्थानांतील लोकांना पात्र केलें नाहीं असें म्हटलें असतां अधिकारी वर्गास अतिशय राग

येतो. याच वाक्याच्या शेवटीं लोकांनीं टाळ्या वाजविल्या आहेत. यावरून या वाक्यानें सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न झाली असल्याचा संभव आहे. रा. टिळक यांचें आणखी असेंहि म्हणणें आहे कीं, हिंदी व इंग्रज प्रजेला समान रीतीनें वागविलें जात नाहीं. जिकडे सत्ता असते तिकडे शहाणपण असतें ही मात्र टिळकांची अगदीं नवी कल्पना आहे. अहमदनगर येथील श्रोत्यांना रा. टिळक हे बजावून सांगतात कीं, सरकारनें त्यांचे उद्योगधंदे बुडविले आहेत. पण मला वाटतें, गेल्या पन्नास वर्षांत सर्व उद्योगधंद्यांची सारखी भरभराट चालू आहे. रा. टिळकांच्या मतानें सरकारची नोकरी पतकरणें हें मनुष्यपणास शोभेसें नाहीं. जर आपल्याला स्वराज्य मिळालें तर पशूसारखें न वागवितां मनुष्यासारखें वागविलें जाईल. मला वाटतें, हें विधान सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न करील. त्यांची अशी कल्पना आहे कीं, होमरूल मिळालें म्हणजे काय वाटेल तें करितां येईल. मला वाटतें, खात्रीनें रामराज्यच सुरू होईल! रा. टिळक म्हणतात, "मी तुम्हाला कोणतेंहि बेकायदेशीर कृत्य करण्यास सांगत नाहीं." परंतु या म्हणण्या बरोबरच रा. टिळकांचा पूर्वेतिहासहि लक्षांत घेतला पाहिजे. हिंदुस्थानसरकारच्या राज्यव्यवस्थेचा सी. आय्. डी. हा एक प्रमुख भाग आहे. परंतु रा. टिळक यांनीं सी. आय्. डी. विरुद्ध वाटेल तसें तोंडसुख घेतलें आहे. रा. टिळक हे होमरूल मिळावें म्हणून चळवळ करितात व ती चळवळ हाणून पाडावी म्हणून त्यांना कोर्टांत खेंचलें नाहीं; तर ती चळवळ करण्याकारितां त्यांनीं स्वीकारलेला मार्ग आक्षेपार्ह आहे, म्हणून आपण सर्व आज कोर्टांत उभे आहोंत. होमरूल-वर व्याख्यान देतांना टिळकांनीं अक्षम्य असे उद्गार काढले आहेत. या भाषणां-तून होमरूलचा एकहि मसुदा रा. टिळक यांनीं पुढें मांडलेला नाहीं. होमरूलच्या प्रश्नासंबंधीं मी आज कांहींच मत देत नाहीं. त्या प्रश्नाचा या खटल्याशीं कांहीं-एक संबंध नाहीं. स्वतःचा राज्यकारभार स्वतः चालविण्याची इच्छा करणें हें साहजिकच आहे. व्यक्तिशः मला हें ध्येय सरकाराविषयीं द्वेष व तिरस्कार उत्पन्न न होऊं देतां पुढें ठेवणें इष्ट आहे असें वाटतें. परंतु दुर्दैवानें रा. टिळक यांनीं तसें केलें नाहीं. त्यांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचलीं असतां कोणालाहि असें आढळून येईल कीं, स्वराज्याची कल्पना पुढें मांडण्यापेक्षां सरकारलाच त्यांनीं अधिक शिव्या दिल्या आहेत. (या ठिकाणीं बॅ. बिनिंग यांनीं आपल्या भाष-

णाच्या आरंभीं सांगितलेलीं आक्षेपित वाक्यें वाचून दाखविलीं.) थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे रा. टिळकांनीं अधिकारी वर्गावर स्वार्थी दृष्टीचा, अप्रामाणिकपणाचा व नालायकतेचा आरोप केला आहे. शेवटीं मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधि म्हणून जो अधिकारी वर्ग येथें आहे त्याविरुद्ध जर वरील आरोप असतील तर १२४ अ कलमांत सांगितल्याप्रमाणें सरकारविरुद्ध द्वेष व तिरस्कार उत्पन्न करण्याचा टिळकांनीं गुन्हा केला आहे.

दुसऱ्या एकदोन लहान गोष्टी मला सांगितल्या पाहिजेत. मूळ भाषांतरकारास साक्षीस बोलावला नाहीं अशी बॅ. जिना यांची तक्रार आहे. परंतु मला वाटतें कीं, जर एक जबाबदार मनुष्य साक्ष देण्यास उभा केला आहे तर या तक्रारींत काय अर्थ आहे? बॅ. जिना यांच्यासारख्याच्या खुबीदार उलट तपासणींत मूळ भाषांतरकार कदाचित् फसला गेला असता, म्हणून उलट तपासणींत मुळींच गोंधळणार नाहीं अशा खंबीर व जबाबदार मनुष्यास साक्षीस बोलाविला यांत चूक काय झाली? दुसरी गोष्ट ही कीं, कोर्टानें रा. टिळक यांस आपल्या भाषणासंबंधीं पूर्ण खुलासा करण्याची संधि दिली असतांहि त्यांनीं तसें न करितां आपला सारा भार वकिलावरच टाकला-हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

बॅ. जिनाः—मीं तसें त्यांना सांगितलें होतें.

बॅ. बिनिंगः—पण माझ्या मतानें त्यांचा स्वतःचा खुलासा त्यांच्या धंदेवाल्या सल्लागारापेक्षां अधिक पटला असता.

नंतर टिळकांच्या बचावार्थ

बॅ. जिना यांचें भाषण

सुरू झालें, ते म्हणाले, टिळकांच्या तर्फेनें या कोर्टांत भाषण करण्यांत माझी परिस्थिति थोडीशी नाजूक झाली आहे. कारण, ज्या सिव्हिल सर्व्हिसवर व ब्यूरॉक्रसीवर टिळकांनीं तडाखे ओढले आहेत असें बॅ. बिनिंग यांचें म्हणणें आहे त्याच वर्गांतील एका व्यक्तीसमोर मला भाषण करावयाचें आहे. परंतु असले क्षुद्र विचार मनांत न आणतां कोर्ट माझें म्हणणें निःपक्षपातानें पूर्णपणें ऐकून घेईल अशी मला आशा आहे. टिळकांच्या वतीनें बोलतांना मुख्य अडचण ही आहे कीं, त्यांचीं लेखीं भाषणें आपणापुढें नसून सी. आय्. डी. च्या लघुलेखकांनीं त्यांचीं म्हणून जीं भाषणें पुढें केलीं आहेत त्यांवरून त्यांचा अभि-

प्राय ठरवावयाचा आहे. या दोघां लघुलेखकांना पुण्याहून टिळकांच्या भाषणांचा रिपोर्ट घेऊन त्यांना शक्य तर शब्दांत पकडण्याला पाठविण्यांत आलें होतें; अर्थातच त्यांचें मन टिळकांविषयीं शुद्ध असेल असें म्हणवत नाहीं; कारण, साक्ष देतांना हे दोघे इसम आपल्या हातून चूक होण्याचा संभव आहे एवढें देखील कबूल करीनात! तरी पण त्यांना अखेरीस कांहीं शब्द किंवा वाक्यें चुकलीं असतील हें कबूल करावेंच लागलें. या लघुलिपींतून त्या भाषणांचें पूर्ण लिपींत रूपांतर झालें आणि पूर्ण लिपींतून इंग्रजींत भाषांतर करणारा इसम उलटतपासणींत लटपटेल म्हणून दुसरा खंबीर साक्षीदार बोलविण्यांत आला. परंतु त्याला देखील कांहीं शब्द व भाषांतर चुकल्याचें कबूल करावेंच लागलें. अशा तऱ्हेनें रूपांतर पावलेलीं भाषणें पुढें आलीं असल्यानें तीं सामान्यतः आपला अभिप्राय दर्शवितात एवढेंच टिळकांनीं कबूल केलें आहे. आतां पहिला मुद्दा हा आहे कीं, हीं भाषणें १२४ अ कलमाखालीं येतात कीं काय? ही कसोटी लावतांना बॅ. बिनिंग यांनीं दर्शविल्याप्रमाणें येथलें एक वाक्य तेथलें एक वाक्य असें वेंचून घेणें युक्त नाहीं, असें इ. स. १८६८ त लॉर्ड फिडझिराल्ड यांनीं म्हटलें असून बंगालच्या 'वंगवासी' खटल्यांत व मुंबई-कोर्टांतल्या टिळकांच्या खटल्यांतहि हें तत्त्व अनुसरण्यांत आलें होतें. त्या तत्त्वास अनुसरून या भाषणांत राजद्रोह आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. माझें असें म्हणणें आहे कीं, हीं भाषणें १२४ अ कलमाच्या दुसऱ्या स्पष्टीकरणाखालीं येतात. कारण, त्या भाषणांत राजकीय धोरणावर टीका असून तें राजकीय धोरण असंतोष किंवा द्वेष उत्पन्न न करितां कायदेशीर मार्गानें बदलून घ्यावें असें त्यांत प्रतिपादन आहे. असो. मि. बिनिंग यांनीं पूर्वीच्या शिक्षेचा जो मुद्दा अगोदरच पुढें आणला, तो आणणें बरोबर नव्हतें. १०८ कलम हें भावी राजद्रोहाचें प्रतिबंधक आहे. या कलमाप्रमाणें जामीन घ्यावा अगर न घ्यावा हें ठरवितांना टिळक हे आज काय करीत आहेत अगर उद्यां काय करतील याचाच विचार केला पाहिजे. त्यांना १९ वर्षांपूर्वी अगर आठ वर्षांपूर्वी राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली यावरून ते आज जें कांहीं करीत आहेत तेंहि राजद्रोहात्मक आहे असें कोर्ट समजणार नाहीं अशी मला आशा आहे. टिळकांच्या भाषणांचा ग्रंथ लावतांना बॅ. बिनिंग यांची एक मोठी चूक झाली ती ही कीं, हीं भाषणें कोणत्या परिस्थितींत कोणत्या उद्दे-

शानें झालीं हें त्यांनीं लक्षांतच घेतलें नाहीं. बेळगांवास होमरूलचा संघ स्थापन करण्यांत आला होता. या संघावर अधिकारी व बिनअधिकारी वर्गाकडून टीका होत होती. त्या टीकेंतील विधानें खोडून काढण्याकरितां आणि होमरूलचीं तत्त्वें समजून देऊन वर्गणीदार जमविण्याकरितां हीं व्याख्यानें झालीं आहेत. या व्याख्यानांचे वेळीं पांच हजार श्रोतृसमूह जमत असे. त्यांत बरेच श्रोते अगदीं अज्ञानी असत. अर्थातच अशा श्रोत्यांसदेखील समजेल इतक्या सुलभ रीतीनें उदाहरणें व दाखले देऊन रा. टिळक यांस व्याख्यान द्यावयाचें होतें. या व्याख्यानांत टिळकांनीं होमरूल हें ब्रिटिशांकडून व ब्रिटिश अमलाखालींच मिळवावयाचें आहे असें स्पष्टपणें सांगितलें. हा राजद्रोह आहे काय? टिळकांनीं स्वराज्याची व्याख्याहि अगदीं साधी व सोपी अशी करून अडाणी लोकांसहि समजेल अशी विशद करून सांगितली. त्यांत त्यांनीं असें दर्शविलें कीं, स्वराज्य म्हणजे इंग्रजांचें राज्य जाऊन जर्मनांचें राज्य यावें असें नव्हे, तर आपला कारभार आपल्या संमतीनें चालावा. त्यांनीं आपल्या भाषणांत जो 'सरकार' हा शब्द वापरला आहे तो सिव्हिल सर्व्हिसला उद्देशून वापरला आहे. अडाणी लोकांना सिव्हिल सर्व्हिस म्हणजे काय कळणार? म्हणून त्यांनीं त्याबद्दल सरकार हा शब्द वापरला आहे; पण हा शब्द कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारला उद्देशून नसून येथल्या अधिकाऱ्यांचा वाचक आहे हें श्रोतृवर्गास कळत होतें. सिव्हिल सर्व्हिस खातें किंवा गुप्तपोलीस कांहीं सरकार नव्हे आणि 'सरकार' या शब्दांत सी. आय्. डी. सारख्या खात्याचाहि समावेश होतो हें मि. बिनिंग यांचें मत ग्राह्य धरलें, तर मग असल्या सरकारला कोपरापासून हात जोडून दुरूनच नमस्कार असो! पिनल कोडाच्या १२४ व्या कलमांत जो 'सरकार' शब्द उपयोजिला आहे तो कोणत्याहि एखाद्या खात्याला उद्देशून लाविलेला नाहीं. तुम्ही लष्करी खात्यावर टीका केली, किंवा जंगलखात्यावर अथवा पोलीसखात्यावर टीका केली तर काय तो राजद्रोह होऊं शकेल? अर्थात् नाहीं. त्याचप्रमाणें टिळक यांची सिव्हिल सर्व्हिसवरील टीकाहि राजद्रोहात्मक होऊं शकणार नाहीं. टिळकांचा मुख्य कटाक्ष हल्लींच्या राज्यपद्धतीवर आहे. कोणास गवत कापावयाचें झालें किंवा वाघ मारावयाचा झाला तरी सरकारची परवानगी पाहिजे! ही स्थिति बदलली पाहिजे; पण तो फेरबदल देखील एकदम व्हावयाचा

नसून आस्ते आस्ते व्हावयाचा आहे, असें टिळकांचें म्हणणें आहे; आणि हें स्थित्यंतर पार्लमेंटच्यामार्फत घडवून आणावयाचा आपला उद्देशहि टिळकांनीं स्पष्टपणें जाहीर केला आहे. यानंतर, हिंदुस्थान देश जरी मागसलेला आहे तरी त्यास होमरूल देण्यास ब्रिटिश जनतेची नाखुषी नाहीं; परंतु युरोपिअन व हिंदी अधिकारीवर्गच या मागणीच्या आड येतो असें सांगून टिळकांनीं दृढ निश्चयानें मागणी करण्याकरितां होमरूलचे सभासद होण्यास सांगितलें असून या कामीं सी. आय्. डी. च्या दवकावणीस भिऊं नका असेंहि सांगितलें आहे. यांत राजद्रोह कोठें आहे? भाषणांतील कांहीं शब्द न रुचण्यासारखे असतील-कदाचित् एखाददुसऱ्या व्यक्तीच्या मर्मस्थानीं झोंवण्यासारखेहि असतील. अशी कडक अगर मर्मभेदक भाषा वापरूं नये असेंहि कोणाचें मत असूं शकेल; पण तेवढ्यानें ते शब्द राजद्रोहात्मक ठरत नाहींत. उदाहरणार्थ, टिळकांनीं सांगितलेली तीन धूर्तांची गोष्ट घ्या. या गोष्टीचा मि. बिनिंग यांनीं मोठाच बाऊ केला आहे; परंतु या गोष्टीचें मर्म त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. ‘धूर्त’ याचा ‘Rogue’ असा अर्थ जरी कोशांत दिलेला असला तरी त्या गोष्टीचा संबंध लावतांना सामान्य माणसाला दुसऱ्या लबाड माणसाच्या उपदेशावरून तूं फसूं नको असा इषारा देण्याकरितां या गोष्टीचा उपयोग नेहमीं करीत असतात. खुद्द डॉ. भांडारकरांनींच ही ‘तीन धूर्तांची’ गोष्ट वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सांगून ना. गोखले व इतर सभासद यांच्या आक्षेपावरून युनिव्हर्सिटी बिलाचा मी त्याग करणार नाहीं असें सांगितलें होतें. त्या वेळीं कौन्सिलच्या सभासदांस भांडारकरांनीं Rogue म्हटलें असा कोणी आक्षेप घेतला नाहीं. होमरूलच्या बाबतींत ही गोष्ट सांगण्याचा टिळकांचा उद्देश एवढाच होता कीं, “स्वराज्याची मागणी करूं नका, स्वराज्याला आम्ही अपात्र आहों, स्वराज्यसंघाचे सभासद होऊं नका, स्वराज्याची मागणी राजद्रोहात्मक आहे” असले भलभलते आक्षेप पुढें करून भोळ्या अज्ञानी लोकांची दिशाभूल केली जात आहे ती होऊं नये व त्यांनीं आपलें होमरूलचें साध्य त्याज्य मानूं नये. हें सांगण्यांत राजद्रोह कसा होतो तेंच कळत नाहीं. टिळकांच्या भाषणावर मि. बिनिंग यांचा आणखी एक आक्षेप असा आहे कीं, त्यांनीं स्वराज्य किती दिवसांत-एका पिढींत का दोन पिढ्यांत का तीन पिढ्यांत-देणार ती मुदत सांगा अशी मागणी केली. पण यांत बिघडलें तें

काय ? फिलिपाईन बेटांना इतक्या मुदतींत स्वराज्य देऊं असें अमेरिकेनें सांगितलें नाहीं काय ? मग येथेंच या मुदतीच्या मागणीचा एवढा धाक कां पडावा ? १८५८ सालचा इंडिया–ॲक्ट मात्र अमलांत आला आणि १८५८ चा राणीसरकारचा जाहीरनामा मात्र तसाच कोंपऱ्यांत पडून राहिला असें टिळक म्हणाले, असा एक मि. बिनिंग यांचा मुद्दा आहे; परंतु टिळकांची ही तक्रार सकारण नाहीं काय ? १८५८ सालीं कंपनीसरकार जाऊन त्याच्या जागीं राणीसरकारचें राज्य झालें; परंतु कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या जागीं स्टेट-सेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल आलें आणि त्यांच्या हातांत सर्व सत्ता गेली. राणीच्या जाहीरनाम्यांत ब्रिटिश प्रजाजनांचे जे हक्क आहेत तेच तुम्हांस देऊं असें वचन असून इकडे हें सर्वसत्ताधारी इंडिया–कौंसिल कशाला ? ही राज्यपद्धति पूर्वीच्या कंपनीच्या राज्यपद्धतीच्याच वळणावर गेली आणि ती बदलली पाहिजे हेंच स्पष्ट सांगण्याचा टिळकांचा हेतु आहे. आतां टिळकांनीं ब्रिटिश अधिकाऱ्यांना ' परकी ' (aliens) म्हटलें म्हणून सांगण्यांत येतें; परंतु यांत विशेष तें काय आहे ? ' परकी ' याची व्याख्या टिळकांनीं आपल्या भाषणांत केलीच आहे. या शब्दांत कांहीं धर्माचा, जातीचा किंवा जन्मभूमीचाहि संबंध येत नाहीं. हिंदुस्थान हाच आपला देश असें समजून येथें राहणारे व त्याच्याच कल्याणार्थ झटणारे जे लोक असतील ते कोणत्याहि देशांत जन्मले असले अगर कोणत्याहि धर्मांचे असले तरी ' परकी ' नव्हेत. परंतु या अर्थानें ब्रिटिश अधिकारी हे परकी आहेत ही गोष्ट लॉर्ड क्रोमर व स्वतः ऑस्किथ यांनीं देखील कबूल केली आहे; मग टिळकांनींहि तो शब्द वापरला म्हणून त्यांत काय मोठेंसें बिघडलें ? ब्युरॉक्रसींतल्या लोकांना येथील हवा मानवत नाहीं, आपलें घरदार सोडून त्यांस इतकें दूर यावें लागतें अशी अधिकारी वर्गाची स्वतःचीच तक्रार असते आणि त्यासाठीं त्यांस मोठाले पगारहि देण्यांत येतात. ही जर वस्तुस्थिति आहे तर ' हवा न सोसवेल ' अशा परक्या देशांत तुम्ही येतां तरी कां असा टिळकांचा उपरोधिक प्रश्न आहे; आणि अर्थातच ' तुम्हांस हवा सोसवत नसेल तर तुम्ही इकडे येऊं नका ' असें सांगण्यांत टिळकांनीं गुन्हा काय केला ? बरें, यावर अधिकारी वर्गाकडून असें प्रत्युत्तर येईल कीं, ' आम्ही न आलों तर तुमचा राज्यकारभार अडेल.' या आक्षेपाचें खंडन म्हणून टिळकांनीं म्हैसूरचा दाखला देऊन

असें सिद्ध केलें आहे कीं, म्हैसूर संस्थानांतील जिल्ह्यांत जर राज्यकारभार अडला नाहीं तर ब्रिटिश मुलुखांत तरी तो कां अडावा ? अशा रीतीनें शक्य तितक्या प्रत्येक आक्षेपास रा. टिळक यांनीं सप्रमाण उत्तर दिलें आहे. होम-रूलविरुद्ध पुढें येणाऱ्या सर्व आक्षेपांचें खंडन करून श्रोत्यांची खात्री पटवून देणें हाच त्यांचा उद्देश होता; याकरितां श्रोत्यांस समजतील अशीं उदा-हरणें देऊन त्यांनीं तो विषय स्पष्ट केला आहे. अर्थातच त्यांत अडाणी-पणाचा अगर हास्यास्पदतेचा भाग कांहींच नाहीं. 'जें सरकार आपणावरील जबाबदारी टाळतें तें सरकारच नव्हे' या वाक्याचा रोख असा आहे कीं, अधिकारी वर्गानें येथें आगगाड्या केल्या, तारायंत्र केलें, इतर अनेक सुधारणा केल्या; परंतु त्या पुरेशा नाहींत. अर्थातच अधिकारी वर्गानें लोक-हिताच्या आणखीहि कित्येक गोष्टी करावयास पाहिजे होत्या हेंच त्यांचें म्हणणें आहे. याच संबंधांत, 'खर्चणाराचें खर्चतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें' ही म्हण योजिली आहे; परंतु याचें सरकारी भाषांतर म्हणजे मूळ भाषणाचा खून आहे. असल्या भाषांतरावरून श्रोत्यांच्या मनावर काय परिणाम होईल याचा तर्क करणें योग्य नव्हे. श्रोत्यांना मराठी कळत होतें व त्यांना त्या म्हणीचा योग्य तो अर्थ कळला असून त्यांत राजद्रोहाचा बिलकूल गंधहि नाहीं. देशाचा व्या-पार बुडाला असें टिळकांनीं सांगितलें, यावरहि मि. बिनिंग यांनीं आक्षेप घेतला आहे; परंतु ज्याला ज्याला म्हणून हिंदुस्थानचा इतिहास अवगत आहे, त्याला त्याला वस्तुस्थिति काय आहे ती ठाऊकच आहे. ब्युरॉक्रसीच्या कृती-मुळेंच व्यापार बुडाला असें कांहीं टिळकांनीं म्हटलें नाहीं. तथापि कापडाच्या गिरण्यांवरील जकातीचा इतिहास ज्यास ठाऊक आहे त्यास या बाबतींत आमचे हात कसे बांधले गेले आहेत तें कळेलच. 'धक्का देऊन बाहेर जाणें आहे' अशा अर्थाचें जें वाक्य आहे त्यांतला कांहीं तरी भाग अपुरा राहिलेला दिसतो. त्या अर्धवट वाक्याचा नीट अर्थच लागत नाहीं; परंतु त्यावरून इतकें दिसून येतें कीं, स्वराज्यप्राप्तीकरितां इतर दरवाज्यांतून न जातां पार्लमेंटच्या द्वारेंच आम्हांस जाणें आहे. त्या वाटेनें जाऊं नका, दुसऱ्याच वाटेनें जा, असें जर अधिकारी वर्ग म्हणेल, तर तें ऐकूं नका; पार्लमेंटच्याच दारानें जा असें टिळ-कांनीं सांगितलें. यांत राजद्रोह काय आहे तें कळत नाहीं. विठोबा पाहिजे

परंतु मधले पुजारी व बडवे नकोत, याचा सिव्हिलियन्सकडेच सर्व सत्तेचा मक्ता नको एवढाच अर्थ आहे. त्यांतहि गोरे सिव्हिलियन्सवर मात्र टिळकांचा कटाक्ष आहे आणि हिंदी सिव्हिलियन्सवर नाहीं असें नाहीं; कारण, कित्येक वेळां हिंदी सिव्हिलियन्सच गोऱ्यापेक्षांहि अधिक अरेराव असतात असें टिळकांनीं सांगितलें आहे. अर्थातच त्यांचा आक्षेप गोऱ्या किंवा काळ्या सिव्हिलियन्सवर नसून या पद्धतीवरच आहे. या पद्धतीची सुधारणा व्हावी असें एकट्या टिळकांनींच सुचविलें आहे असें नाहीं; तर हौटन आणि फील्डिंग हल्ल यांनींहि या पद्धतीवर अशीच टीका केली आहे. कार्यकारी अम्मलदार हे इतर देशांतल्याप्रमाणेंच येथेंहि लोकांस जबाबदार पाहिजेत, एवढेंच टिळकांचें मुख्य सांगणें आहे. सरकारनें लोकांस मुद्दाम दास्यांत आणि गुलामगिरींत ठेवलें असा त्यांजवर कोणीच आरोप केला नसून हल्लींच्या राज्यपद्धतीनें लोकांची अशी हीन स्थिति होते, सबब ती पद्धति बदला, असें टिळकांनीं म्हटलें आहे. एक पद्धति सोडून तिच्या जागीं दुसरी पद्धति सुरू केली पाहिजे, हें सिद्ध करतांना पहिल्या पद्धतींतील दोष व दुसऱ्या पद्धतींतील गुण स्पष्टपणें दाखवावयास नकोत काय ? तसे दोष दाखविणें हें १२४ अ खालील दुसऱ्या स्पष्टीकरणान्वयें राजद्रोह होऊं शकत नाहीं. सर वॉल्टर लॉरेन्स हे व्हाइसरॉयांचे खासगी चिटणीस होते. त्यांनींहि हल्लींच्या राज्यपद्धतीच्या जागीं नवीन सुधारलेली राज्यपद्धति सुचविली होती आणि तिचाच अनुवाद टिळकांनींहि केला आहे. सारांश, लोकांनीं आळस सोडावा, उद्योगास लागावें, आणि आपण १४ व्या शतकांत राहत नसून विसाव्या शतकांत आहों हें लक्षांत बाळगावें एवढांच त्यांत उद्देश आहे. आणि हा उद्देश राजद्रोहात्मक आहे असें कोण म्हणूं शकेल ? टिळकांच्यासंबंधानें आधींच अधिकाऱ्यांचीं मनें कलुषित आहेत. त्यांतून ज्या गुप्त पोलीसखात्याकडून त्यांच्या भाषणांचा रिपोर्ट झाला त्याचें कांहीं त्यांजवर विशेष प्रेम असेलसें दिसत नाहीं. अशा माणसांनीं दिलेल्या अपुऱ्या व ठिकठिकाणीं चुकलेल्या रिपोर्टावरून एकाद्याविषयीं मत बनविणें हें निःपक्षपातपणाचें होणार नाहीं. शिवाय गुप्त पोलिसांच्या खात्यांतील माणसांकडून तयार झालेल्या भाषणांतून येथला एक शब्द, तेथलें एक वाक्य निवडून काढून 'हा पहा राजद्रोह' 'हा पहा राजद्रोह' असें ओरडत सुटणें खरोखरीच

अन्यायाचें होईल. यास्तव अखेरीस कोर्टास माझी एवढीच विनंति आहे कीं, त्यांनीं सर्व भाषणांचा समग्रतेनें विचार करून व तीं भाषणें करण्याचा उद्देश लक्षांत घेऊन या भाषणांविषयीं मत बनवावें. अशा दृष्टीनें पाहिलें असतां फिर्यादीपक्षातर्फे जो पुरावा पुढें आला आहे त्यावरून रा. टिळक यांजकडून जामीन घेतला पाहिजे असें सिद्ध होत नाहीं.

बॅ. जिना यांचें वरील आशयाचें भाषण झाल्यानंतर डि. मॅजिस्ट्रेट यांनीं आपण शनिवार ता. १२ रोजीं बारा वाजतां निकाल सांगूं असें कळविलें, व चवथ्या दिवसाचें कोर्टाचें काम संपलें.

खटल्याचा निकाल

(ता. १२ आगष्ट १९१६)

बरोबर बारा वाजतां रा टिळक मॅजिस्ट्रेट कोर्टात हजर झाले. त्यांच्या तर्फे बॅ. येरूळकर, रा. वखले, रा. करंदीकर हायकोर्ट वकील, रा. केळकर, रा. काकासाहेब पाटील वगैरे वकील व इतर स्नेही मंडळी हजर होती. सरकारतर्फे मि. गायडर व खानसाहेब दावर सरकारी वकील हजर होते.

बरोबर १२॥ वाजतां मॅजिस्ट्रेटसाहेब स्थानापन्न झाले व म्हणाले:—

" मि. टिळक, तुम्हांला नोटिशीप्रमाणें जामीन देण्याचा हुकूम होत आहे. मी कांहीं जजमेंट वाचून दाखवीत नाहीं. त्याची नक्कल दिली जाईल. तुमच्यावर जामिनकीचा मुकद्दमा झाला व इतर कलमांखालीं फिर्याद झाली नाहीं, याबद्दल तुम्ही आपल्याला भाग्यवान (fortunate) समजा. तुम्ही अशा तऱ्हेची वर्तणूक ठेवूं नये म्हणून ही तुम्हांला व तुमच्या स्नेह्यांना सूचना (warning) आहे. नंतर रा. टिळकांनीं पुढील जातमुचलका लिहून दिला—

चांगल्या वर्तणुकीविषयीं मुचलका

[क्रि० प्रो० को० १०८, १०९ व ११०]

ज्यापेक्षां मी बाळ गंगाधर टिळक राहणार पुणें याला एक वर्ष मुदतीपर्यंत हिज् म्याजिस्टी धी किंग, एम्परर आफ् इंडिया यांशीं व त्यांच्या प्रजेशीं चांगल्या प्रकारें वागेन असा मुचलका लिहून देण्याचा हुकूम झाला आहे, त्यापेक्षां मी लिहून देतों ऐसाजे—सदर्हु मुदतीपर्यंत हिज् म्याजेस्टी धी किंग, एम्परर ऑफ इंडिया यांशीं व त्यांच्या प्रजेशीं चांगली वर्तणूक ठेवीन; आणि

याप्रमाणें न वागलों तर मी हिज् म्याजेस्टी धी किंग, एम्परर ऑफ इंडिया यांस वीस हजार रुपये दंड देईन.

आज ता. १२ आगस्ट सन १९१६ } सही बाळ गंगाधर टिळक.

आम्हीं लिहून देतों कीं, सदरीं सांगितलेले बाळ गंगाधर टिळक हे हिज् म्याजेस्टी धी किंग एम्परर ऑफ इंडिया यांशीं व त्यांच्या सर्व प्रजेशीं सदहू मुदतींत चांगली वर्तणूक ठेवतील याविषयीं आम्ही त्याला जामीन आहों आणि ते त्याप्रमाणें न चालतील तर आम्हीं एकत्र व प्रत्येकीं हिज् म्याजेस्टी धी किंग एम्परर ऑफ इंडिया यांस दहा दहा हजार रुपये दंड देऊं.

आज ता. १२ आगस्ट सन १९१६ } सह्या
१ त्र्यंबक हरि आवटे, मालक इंदिरा प्रेस.
२ गणपत विठोबा नाईक मोरवाळ, कांट्राक्टर, व्यापारी.

मॅजिस्ट्रेटसाहेबांचा निकाल

डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट पुणें यांचे कोर्टांत जे. ए. गायडर, डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस पुणें यांच्या अर्जावरून या कोर्टानें क्रिमिनल प्रोसिजर कोडचें कलम १०८ व १११ अन्वयें बाळ गंगाधर टिळक यांजवर एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याकरितां वीस हजारांचा जातमुचलका व दहा दहा हजारांचे दोन जामीन देण्याचा हुकूम कां करूं नये याचीं कारणें दाखविण्याबद्दल नोटीस काढली.

बी. जी. टिळक यांना यापूर्वी राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली असून जो प्रसिद्ध केला तर इंडियन पिनल कोडच्या १२४ अ कलमाखालीं शिक्षेस पात्र होईल असला राजद्रोही मजकूर ते तोंडीं पसरवीत असतात, अशी मि. गायडर यांची तक्रार असून त्याच्या पुराव्यार्थ टिळकांनीं ता. १ मे व ३१ मे आणि १ जून १९१६ रोजीं केलेल्या भाषणांचे लघुलिपिलेखकांनीं तयार केलेले रिपोर्ट व त्यांचें इंग्रजी भाषांतर दाखल केलेलें आहे.

मि० टिळक यांजवर समन्स काढलें असून मुकदमा २८ रोजीं सुरू व्हावयाचा होता. पुढें प्रतिवादीच्या विनंतीवरून मुकदम्याची तारीख २ आगस्ट करण्यांत आली व त्यानंतर दोन्ही पक्षांच्या अर्जावरून ही तारीख ७

आगस्ट मुकरर करण्यांत आली.

फिर्यादीच्या पुष्टीकरणार्थ दिलेला पुरावा मीं ऐकला. दोघां शॉर्टहँड-रिपोर्टरांच्या जबान्या व ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या ऑफिसपैकीं एका ट्रान्स्लेटरची जबानी हाच तो पुरावा आहे. रिपोर्टर लोकांनीं आपण केलेले भाषणांचे रिपोर्ट बरोबर असल्याचें, व ट्रान्स्लेटरांनीं भाषांतर बरोबर असल्याचें सांगितलें आहे. टिळकांना पूर्वीं राजद्रोहाबद्दल शिक्षा झाल्याचा दाखला क्रि. प्रो. कलम ५११ प्रमाणें फिर्यादीतर्फे पुराव्यास देण्यांत आला, त्यास प्रतिवादीतर्फे हरकत घेण्यांत आली; पण ती मीं अमान्य केली. टिळकांच्या पूर्वींच्या शिक्षेपैकीं दंडाचे हजार रु. मात्र परत देण्यांत आल्याविषयीं मि. जिना यांनीं उल्लेख केला व तो मि. बिनिंग यांनीं मान्य केला.

टिळकांनीं कोर्टाच्या प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें कीं, जरी कांहीं किरकोळ चुका भाषणांच्या रिपोर्टांत राहिल्या असल्या तरी एकंदरींत रिपोर्ट बरोबर आहे. होमरूलचें स्पष्टीकरण करून टीकाकारांस उत्तर देण्याचा आणि तें मिळविण्याचा उत्तम मार्ग दाखविण्याचा आपला उद्देश होता असें टिळक म्हणाले. त्याचप्रमाणें लोकांना होमरूलचे सभासद होण्याचाहि त्यांनीं उपदेश केला. होमरूल म्हणजे काय हें थोडक्या शब्दांत सांगूं शकाल काय, असें विचारण्यांत आलें असतां ‘माझ्या भाषणांत तें आहे’ असें त्यांनीं उत्तर दिलें.

आरोपीनें आपल्या तर्फे साक्षीदार पुढें आणलेले नाहींत. त्यांच्या वकीलानेंहि भाषणांच्या भाषांतराच्या शुद्धतेवर विशेष आक्षेप घेतलेला नाहीं. ह्यांची फक्त कांहीं शब्दांच्या भाषांतराविरुद्ध तक्रार असून त्याचा मी येथें विचार करितों. पहिल्या भाषणांत [निशाणी G] तिसऱ्या पानावरील ४ थ्या ओळींतील ‘धि’ हा शब्द निष्कारण असल्याचें व तसेंच त्या पृष्ठाच्या मध्यावर आलेल्या Entity शब्दाऐवजीं Form हा शब्द पाहिजे असें दर्शविण्यांत आलें आहे. पांचव्या पानावरील conceit ह्या शब्दाऐवजीं over-confidence असा शब्द असावा; ६ व्या पानावरील धूर्त याचा प्रतिशब्द rogue असा वापरला आहे तो चुकीचा आहे. ७ व्या पानावरील accumualated शब्दाऐवजीं collected शब्द वाचावा; आठव्या पानावरील obstruction शब्दाऐवजीं hinerance शब्द घालावा व नवव्या पानावर

Soerveign's policy या शब्दाऐवजीं State policy या शब्दाचा उपयोग केला पाहिजे होता असेंहि आरोपींचें म्हणणें आहे. पहिल्या भाषणांत सुचविलेल्या दुरुस्त्या फक्त इतक्याच असून त्यांतील शेवटची मात्र जरा महत्त्वाची आहे असें ह्या कोर्टास वाटतें. या ठिकाणीं मराठीमध्यें राजधोरण (Sovereign's policy) असा शब्द आहे; तेथें 'राज्यधोरण' असा शब्द असता तर State policy हें त्याचें भाषांतर बरोबर झालें असतें. एक लघुलेखक 'राज' व 'राज्य' यांत भेद करीत नाहीं, दुसरा असा भेद करतो. तें कसेंहि असलें तरी व्याख्यात्याच्या शब्दाचा ऐकतांना विपर्यास होण्याचा संभव आहे, असें कोर्टास वाटतें. एकंदर भाषणाचा रोख पाहिला तर ९ व्या पानाच्या शेवटीं 'राजधोरण' या शब्दाऐवजीं 'राज्यधोरण' हाच शब्द सयुक्तिक दिसतो, यास्तव संशयाचा फायदा आरोपीस देऊन मी तेथें 'राज्यधोरण' हाच शब्द घेऊन चालतों. दुसऱ्या भाषणांत [निशाणी H पहा] दुसऱ्या पानावर दोन दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या आहेत. "Ruling power" च्या ऐवजीं Administration of the state अशी पहिली दुरुस्ती फिर्यादीतर्फे स्वीकारण्यांत आली आहे. दुसरी दुरुस्ती म्हणजे एका अवघड भागांत आलेल्या Aliens (परके लोक) शब्दाच्या जास्त चांगल्या अशा भाषांतरासंबंधाची होय. हें सुधारलेलें भाषांतर साक्षीदार नं. २ याच्या जबानींत दिसून येईल. या भाषांतरानें युक्तिवादावर कांहींएक परिणाम होत नाहीं. तिसऱ्या भाषणांत (परिशिष्ट I पहा) पहिल्या पृष्ठाच्या खालीं आलेल्या Slavery आणि Bondage या शब्दांस आरोपीतर्फे हरकत घेण्यांत आली. मुळांतील मराठी शब्द गुलामगिरी व दास्य असे आहेत. साक्षीदार नं. २ हे गृहस्थ कसलेले भाषांतरकर्ते असून या शब्दांचें भाषांतर बरोबर झालेलें असल्याचें आपल्या जबानींत सांगतात. आरोपीतर्फेचें म्हणणें असें आहे कीं, गुलामगिरी या शब्दाचें भाषांतर Servitude या शब्दानें करावें. दास्य या शब्दालासुद्धां Servitude हाच प्रतिशब्द सुचविण्यांत आला आहे. पृष्ठ ३ यावरील 'पशु' शब्दाचें भाषांतर Beast या शब्दानें केलेलें आहे, त्यासहि आक्षेप घेण्यांत आलेला आहे. व Beast याच्या जागीं Animal, Cattle यांपैकीं एकाद्या शब्दाची योजना केली जावी असें आरोपीतर्फे सांगण्यांत आलें. सर्व भाषणांतून जेथें जेथें

म्हणून ‘ गुलामगिरी ’ हा शब्द आलेला आहे, तेथें तेथें त्याचें भाषान्तर Slavery या शब्दानें करण्यांत आलेलें आहे व आरोपीतर्फे त्या त्या ठिकाणीं Servitude या शब्दाची योजना सुचविलेली आहे. आरोपीतर्फे ज्या जागीं भाषांतरास आक्षेप घेण्यांत आला आहे, त्या सर्वांची संपूर्ण यादी वर दिलेली आहे. असे कांहीं भाग आहेत कीं, जेथें कांहीं शब्द गळलेले आहेत व त्यायोगानें अर्थ थोडासा संशयात्मक होतो. एकंदरीनें, G, H आणि I या तीन परिशिष्टांत दाखल केलेलीं इंग्रजी भाषांतरें हीं मूळ रिपोर्टांचीं शुद्ध भाषान्तरें होत, हें ठरविण्यास कोर्टास फारशी अडचण वाटत नाहीं; आणि ज्या अर्थीं भाषणाचे रिपोर्ट घेणारे लघुलेखक हे आपल्या धंद्यांत वाकबगार आहेत आणि ज्या अर्थीं मि० टिळक हे जें कांहीं बोलले तें जसेंच्या तसें आम्हीं उतरून घेतलें असें त्यांचें म्हणणें आहे, त्या अर्थीं त्यांच्या साक्षीच्या सत्यत्वाबद्दल शंका येण्याचें कोर्टास कारण दिसत नाहीं. फिर्यादीतर्फेचे वकील मि. बिनिंग ह्यांचा भर सबन्ध उताऱ्यांवर आहे. त्यांचा भर ज्या उताऱ्यांवर आहे ते उतारे परिशिष्ट G, H व I यांवर कोर्टानें तांबड्या पेनसिलीनें खुणा केलेल्या आहेत. ते स्पष्टपणें असें म्हणतात कीं, होमरूलवरील चर्चा योग्य आहे कीं अयोग्य आहे याबद्दल माझा मुळींच वाद नाहीं. या विषयावर मुळींच कांहीं मत प्रदर्शित करावयाचें नाहीं, असें त्यांस सरकाराकडून सांगण्यांत आलेलें आहे. इं. पि. को. कलम १२४ अ याखालीं येणाऱ्या ज्या राजद्रोहात्मक मजकुराबद्दल त्यांची तक्रार आहे तो मजकूर म्हटला म्हणजे ज्या ठिकाणीं टिळक हे आपल्या भाषणांत सरकारावर अप्रामाणिक आणि अशुद्ध हेतूंचा आरोप करितात तो होय. ता. १ मे रोजीं टिळकांनीं जें भाषण केलें त्याचें थोडक्यांत विवरण करतां असें आढळून येतें कीं, त्यांनीं हिंदुस्थानांतील सरकारचे दोन भाग करण्याचा प्रयत्न केला आहे. ते दोन भाग म्हणजे ‘ अदृश्य इंग्लिश सरकार ’ (Invisible English Government) व ज्याकडून अदृश्य सरकार कार्य घडवून आणतें असें दृश्य सरकार (Visible Government by whose hands invisible Government is getting work done) यांपैकीं पूर्वीचें विधान टिळकांच्या मतें बरोबर आहे. परंतु नंतरच्या वाक्यांत मात्र Pass into other hands दुसऱ्याच्या हातांत जावें असे शब्द जेथें

आहेत तेथें आमच्या म्हणजे लोकांच्या हातांत Into our own hands असा अर्थ आपण घेत असल्याचें ते स्पष्टीकरण करितात. एखाद्या अधिकाऱ्याला, मग तो शिपाई असो कीं गव्हर्नर असो, काढून टाका, असें सरकारास सांगणें म्हणजे राजद्रोह नव्हे, असें त्यांनीं आपल्या श्रोतृवर्गास बजावलें. हल्लींचें सरकार लोकांवर नीट रीतीनें राज्य करीत नाहीं असें त्यांनीं आपलें स्पष्ट मत असल्याचें दर्शविलें. त्यांनीं गाऱ्हाणीं म्हणून एक यादी दिली आहे, त्यांत 'कुलकर्णीवतनें रद्द करणें' 'जंगलखात्याचा जुलूम' 'दारूबाजीचा फैलावा,' 'योग्य शिक्षणाचा अभाव' 'बेळगांव येथें काढून घेतलेला ज्यूरीचा हक्क' 'कर्नाटकांत कॉलेज नसणें' हीं गाऱ्हाणीं आहेत. ते म्हणतात, "या गोष्टींचें अस्तित्व आपणांस कां भासतें? याला फक्त एकच उत्तर आहे. त्यांच्या जागीं जर तुम्ही अधिकारी असतां किंवा अधिकाऱ्यांवर जर लोकमताचा दाब असता, तर अशा गोष्टी कधींहि घडून आल्या नसत्या." नंतर ते आपल्या श्रोतृवृंदाला सांगतात कीं, "आपण असहाय आहोंत. कलेक्टरला अर्ज केल्याशिवाय आपणांस कांहींहि करतां येत नाहीं. ह्यापेक्षां कांहीं तरी अधिक चांगली व्यवस्था आपणांस पाहिजे. हल्लींचे अधिकारी लोकांनीं निवडलेले नसल्यामुळें ते आपणास उत्कृष्ट ज्ञान असल्याचें समजतात. हीहि त्यांची घमेंड किंवा फाजील आत्मविश्वास आहे. हे अधिकारी (bureaucrats) आम्हांला म्हणतात, 'तुम्ही आमच्या इच्छेप्रमाणें वागा.' आम्ही त्यांना म्हणतों, 'तुम्ही आमच्या इच्छेप्रमाणें वागा.' यापुढें त्यांनीं या देशांतील सरकारास लोक व 'अदृश्य राजा अथवा सरकार' यांच्यामधील 'देवता' या शब्दानें संबोधिलें आहे. "ईश्वर रागावत नाहीं, परन्तु ह्या देवता रागावतात." त्यांनीं अज्ञानाच्या हातीं अधिकार जाऊं न देण्याचा प्रयत्न करणाऱ्या पंचांचें उदाहरण दिलें आहे. पंच अज्ञानास वेडसर व वद्चालीचा ठरवितात, कोर्टांत जातात व त्यास वेडा ठरवून घेतात. "येथेंही आतां असाच कांहींसा प्रकार होऊं लागला आहे." यानंतर पुढें तीन धूर्तांची गोष्ट आली आहे. मि० जिना यांनीं या गोष्टीस डॉ. भांडारकरांच्या कौन्सिलमधील एका भाषणाच्या आधारावर सभ्यतादर्शक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या भाषणांत त्यांनीं ना. गोखल्यांसारख्या मान्य पुरुषांचा ज्यांत अंतर्भाव झाला आहे अशा आपल्या प्रतिस्पर्ध्यांस या गोष्टींतील तीन धूर्तांची उपमा दिली आहे.

परंतु एकच गोष्ट निरनिराळ्या रीतींनीं सांगतां येते व तिच्यावरून निरनिराळे मथितार्थ निघूं शकतात. रा. टिळक यांस होमरूलची चळवळ न करणारे हिंदी लोक व ह्या गोष्टींतील धूर्त यांच्यांतील साम्य श्रोतृवर्गाच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें. आपल्या हक्काच्या मिळकतीस म्हणजे स्वराज्यास आपणास पारखे करूं पाहणाऱ्या ह्या लोकांच्या लपंडावास भुलूं नका असेंहि त्यांस श्रोत्यांस बजावावयाचें होतें. नंतर त्यांनीं पात्रतेचा विचार केला आहे. रा. टिळकांनीं इंग्लंडांतून इकडे येऊन साठ साठ वर्षें वयाच्या मामलेदारांवर अधिकार चालविणाऱ्या तरुणांविरुद्ध केलेल्या विधानांसारखीं विधानें आक्षेपार्ह आहेत (व मि. जिना यांनींहि आरोपीतर्फे हें कबूल केलें आहे.) त्यांच्याविषयींचा वादविवाद रा. टिळकांनीं पुढील प्रश्न करून संपविला आहे. "तुम्ही आम्हांस किती दिवसपर्यंत शिकवीत राहणार? ... ... याचा शेवट तरी केव्हां होणार? कीं आम्हीं शेवटपर्यंत असेच तुमच्या सत्तेखालीं गुलामांसारखें राबत राहणार?" ते पुढें म्हणतात, "ज्या लोकांचें शिक्षण ह्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे, ज्यांना सुधारणें हें ज्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे, तें कर्तव्य करण्याचें एका बाजूस राहिलें. प्रयत्न करतात दुसऱ्या बाजूला. सांगावयाचें कीं, आम्हीं कितीहि प्रयत्न केले तरी हे लोक ह्या कामाला तयार होणें अशक्य आहे. अशा तऱ्हेच्या सबबी अव्यक्त सरकारपुढें मांडावयाच्या म्हणजे एकप्रकारें हा आपला स्वार्थाचा धंदा आहे असें मी समजतों." यापुढें म्हैसूर संस्थानच्या सुव्यवस्थित राज्यकारभाराचा उल्लेख करून रा. टिळक म्हणतात, "राज्यकारभार चालविण्यास हिन्दी लोक नालायक आहेत असें म्हणण्याचा उद्देश त्यांस सदैव दास्यांत ठेवावें; त्यांस गुलामांप्रमाणें राबवावें आणि त्यांची बुद्धिमत्ता व त्यांची लायकी वाढविण्याचे मार्ग कुंठित करावे हाच आहे." श्रोतृसमूहानें ह्या उद्गारांबद्दल टाळ्या वाजवून 'शेम! शेम!' असे उद्गार काढले.

पुढल्या प्यारिग्राफांत ईस्ट इंडिया कंपनीच्या पैशाच्या अथवा व्यापारी धोरणाचा त्यांनीं निर्देश केला आहे. "त्या धोरणाप्रमाणें लोकांच्या कल्याणाचा विचार करण्यांत येत नसे. १८५८ सालीं राणीसरकारांनीं राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं; परंतु अधिकारी वर्ग होता तोच कायम राहिला. कंपनीचे डायरेक्टर गेले व त्यांचे जागीं स्टेट सेक्रेटरी आले. हे स्टेट सेक्रेटरी–गव्हर्नर जनरल

नव्हे--हिंदुस्थानांत खर्च किती करावा व कर किती बसवावा हें ठरविणार. हें निवळ व्यापारी धोरण आहे. राणीसरकारचे हातांत जरी राज्यसूत्रें गेलीं व त्यांनीं जरी तो बडा जाहीरनामा काढला, तरी राणीसरकारचें धोरण (दुरुस्ती-प्रमाणें सरकारचें धोरण) त्या जाहीरनाम्याच्या पायावर उभारलेलें नाहीं. सिंहासनाधिष्ठितांचें धोरण कंपनीच्या व्यापारी धोरणाबरहुकूम आहे. राज्यव्यवस्थाहि कंपनीप्रमाणेंच आहे. व मध्यंतरीं जाहीरनाम्याला कोणी विचारलेंहि नाहीं." (हंशा, टाळ्या.)

नंतर ते म्हणतात, "अधिकारी वर्ग (bureacracy) स्टेटसेक्रेटरी व गव्हर्नर जनरल हे आम्हांला 'तुम्हांला जास्त अधिकार व जागा देतों' अशा थापांनीं झुलवीत आहेत."

टिळकांनीं स्टेट सेक्रेटरीला जांवई ही उपमा देऊन त्यांची नेमणूक गफलतीनें होते असें दर्शविलें आहे. यानंतर परकीय लोकांना मार्गांतून ढकलून द्यावें असेंहि सुचविलें आहे. हवा सोसत नव्हती तर तुम्हांस यावयास सांगितलें कोणीं असाहि त्यांनीं कलेक्टरादि अधिकाऱ्यांस प्रश्न विचारिला आहे. वॅ० जिनांनीं ही सर्व टीका विशिष्ट अधिकाऱ्यांविषयीं आहे, सरकाराबद्दल नाहीं, असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; पण तो मला मान्य नाहीं. १८५८ मधील ज्या कायद्यानें प्रचलित राज्यव्यवस्था स्थापिली गेली त्या कायद्यांत कायदेशीर बदल करविण्याचा टिळकांचा उद्देश आहे असाहि जिनांचा कोटिक्रम आहे; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, हा बदल करण्याकरितां योजलेली भाषा राजद्रोही असतां उपयोगी नाहीं. टिळकांवर १८९७ सालीं जो राजद्रोहाचा खटला झाला त्यांत राजद्रोहाची विस्तृत चर्चा झालेली आहे आणि म्हणून मी त्यासंबंधानें जास्त विवरण करीत नाहीं.

हें टिळकांच्या पहिल्या भाषणांसंबंधानें झालें. त्यांच्या नगर येथील दोन भाषणांतहि असाच राजद्रोही मजकूर आहे. त्यांतहि सरकारला परकीय म्हटलें आहे, 'कोळावळे' म्हटलें आहे. सरकारला शिक्षणाला पैसे सांपडत नाहींत; पण अधिकाऱ्यांना लठ्ठ पगार द्यावयाला पैसा आहे. पन्नास वर्षांत जें सरकार रयतेला स्वराज्यास पात्र करीत नाहीं तें राज्य करण्याला लायक नाहीं असें म्हटलें आहे. याशिवाय लोकांस उद्देशून 'गुलाम' हा शब्द वापरला

आहे. तिसऱ्या भाषणांत ही गुलामगिरीची कल्पना जास्त विस्तृत केली आहे. त्यांनीं श्रोत्यांना असें विचारिलें आहे कीं, जोंपर्यंत देशांत गुलामगिरी आणि दास्य आहे, तोंपर्यंत राष्ट्राचे गुण कसे उदयास येतील? त्याचप्रमाणें लोकांना एके ठिकाणीं पशु अशी संज्ञा दिलेली आहे. आपल्या भाषणाला असें केल्याशिवाय रंग [Interest] येणार नाहीं असें वाटल्यामुळें त्यांनीं हें केलेलें आहे. टिळकांनीं आपल्या भाषणांत 'ब्यूरॉक्रसी' हा इंग्रजी शब्द जसाच्या तसाच योजला आहे हें खरें; पण त्यांचा उद्देश व्हाइसरायापासून तों पोलीस शिपायापर्यंत समावेश असलेल्या अखिल सरकारासंबंधानें आहे, यांत मला संशय वाटत नाहीं. टिळकांना दोनदां राजद्रोहाची शिक्षा झाली. दुसरी शिक्षा भोगून घरीं आल्यास त्यांस दोनच वर्षें झालीं आहेत. आतां भाषणें करण्याचा त्यांनीं आपला उद्देश बेळगांव येथें जाहीर केला असल्यामुळें त्यांच्यापासून जमानत घ्यावी असें माझें मत आहे.

हायकोर्टांतील हकीकत

ता. २३ आगस्ट १९१६ रोजीं मुंबई हायकोर्टांत पुण्याच्या डि. मॅजिस्ट्रेट साहेबांच्या हुकुमाविरुद्ध रा. टिळक यांनीं पुढील रिव्हिजन अर्ज केला.

बाळ गंगाधर टिळक, राहिवासी पुणें.

विरुद्ध

राजेसरकार

पुण्याचे रहिवासी बाळ गंगाधर टिळक यांचा नम्र अर्ज

आदरपूर्वक असें निदर्शनास आणतोः—

पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. हॅच यांनीं अर्जदारास क्रिमिनल प्रो. कोडाच्या १०८ कलमाखालीं चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन देण्यास सांगितलें व त्यांच्या हुकुमावरून १२ आगस्ट १९१६ रोजीं एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल २०,००० रुपयांचा जातमुचलका व १०,००० रुपयांचे दोन जामीन अर्जदाराकडून घेण्यांत आले.

ह्या हुकुमानें वाईट वाटून अर्जदार नामदार कोर्टाजवळ दाद मागण्याकरितां विनवीत आहे कीं, कोर्टानें खटल्यांतील कागदपत्र व रेकार्ड मागवून

घेऊन खालील कोर्टाचा हुकूम पुढें दिलेल्या कांहीं कारणास्तव रद्द करावा.

१. खालील कोर्टानें इं. पी. कोडच्या १२४ अ· कलमाचा चुकीचा अर्थ केला असून त्यांतील दुसऱ्या स्पष्टीकरणाकडे दुर्लक्ष केलें आहे.

२. नोटिशीप्रमाणें कारण दाखविण्याकरितां अर्जदार कोर्टांत हजर झाला असतां अर्जदारासमक्ष मॅजिस्ट्रेटनीं फिर्याद दाखल करणारा-(Informant) ची तपासणी घेतली नसल्याकारणानें विद्वान् मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं खटला चालविण्यांत क्रि. प्रो. कोडाच्या ११७ कलमाचें पूर्ण अवलंबन न करण्यांत चूक केली आहे.

३. खालील कोर्टानें अर्जदारास सहा वर्षांपूर्वी झालेली शिक्षा पुरावा म्हणून भलत्याच वेळीं दाखल करण्यांत व अर्जदाराच्या भाषणांचा अर्थ तदनुरोधानें लावण्यांत कायद्याच्या दृष्टीनें चूक केली आहे.

४. ज्या शब्दांकरितां व शब्दसमुच्चयाकरितां अर्जदाराकडून जामीन घेण्यांत आला आहे ते शब्द व शब्दसमुच्चय पुरेशा कायदेशीर पुराव्याशिवाय दाखल करून घेण्यांत विद्वान मॅजिस्ट्रेटांनीं कायद्याच्या दृष्टीनें चूक केली आहे.

५. लघुलिपिलेखकांनीं निर्दिष्ट केलेल्या cheers वगैरे शब्दांवरून कायदेशीर पुराव्याशिवाय विद्वान् मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आपलें जजमेंट पूर्वग्रह-दूषित होऊं दिलें आहे.

६. कोर्टासमोर फिर्यादीतर्फे दाखल करण्यांत आलेलीं तिन्ही भाषणें शब्दशः लिहून घेतलेलीं नव्हतीं व म्हणून क्रि. प्रो. कोडच्या १०८ कलमाखालीं काढलेल्या हुकुमास तो कायदेशीर आधार नाहीं.

७. क्रि. प्रो. कोडच्या १०८ कलमाखालीं अर्जदारावर कायद्याप्रमाणें खटला करतां येत नाहीं.

८. अर्जदारानें आपल्या भाषणांत भाषणांचा उद्देश जरी मुद्दाम विवरण करून सांगितला होता, तरी खालच्या कोर्टानें भाषणांचा अर्थ व त्यांची व्याप्ति यांचा विपर्यास केला आहे.

९. भाषणांत अर्जदाराचा मुख्य उद्देश गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट या कायद्यांत दुरुस्ती करून हल्लींची राज्यपद्धति बदलण्याचा होता. म्हणून हीं भाषणें १२४ अच्या दुसऱ्या स्पष्टीकरणांत येतात.

१०. इं. पी. कोडाच्या १२४ अ कलमान्वयें हीं भाषणें (त्यांपैकीं एखादें किंवा त्यांचा कोणताहि भाग) आक्षेपार्ह नाहींत.

११. हिंदुस्थानास होमरूल पाहिजे हें सिद्ध करण्यांत १२४ अ कलमान्वयें आक्षेपार्ह वाक्यें उच्चारण्याचा अर्जदाराचा कधींहि हेतु नव्हता, किंवा त्यानें असें केलेंहि नाहीं. परंतु आपलें मत प्रतिपादन करतांना होमरूल मिळालें असतां हल्लीं-च्या पद्धतींतील दोष नाहींसे होण्याचा संभव आहे एवढयाच गोष्टीचा त्यानें निर्देश केला. होमरूलबद्दल फिर्यादीपक्षानें कांहींच आक्षेप घेतला नाहीं व होमरूल किंवा स्वराज्य (हें इंडियन लॉ रिपोर्टर ३४ कलकत्ता पान ९९१) कायदेशीर मानण्यांत आलें असल्यामुळें सार्वजनिक सभेत त्याच्या सिद्धयर्थ लोकांस उपदेश करणें गैरकायदा नाहीं.

१२. १२४ अ कलमांतील "ब्रिटिश इंडियामध्यें कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार" या शब्दांचा भलताच अर्थ कनिष्ट कोर्टानें घेतला असून क्रि. प्रो. कोडच्या १७ व्या कलमांत व्याख्या केलेल्या "गव्हर्नमेंट" शब्दाशीं ते समानार्थक आहेत असें मानण्यांत त्या कोर्टानें चुकी केली आहे.

१३. जजमेंटमध्यें उद्धृत केलेलीं भाषणें अगर भाषणांतील उतारे अप्रीति उत्पन्न करण्यासारखीं आहेत असें जें कोर्टानें ठरविलें आहे तें भाषणांचा सामध्यानें विचार केला असतां त्याचा जो योग्य आणि स्वाभाविक अर्थ निघू शकतो त्याशीं विसंगत आहे व तसें ठरविण्यास या मुद्दयावर प्रत्यक्ष असा पुरावाहि दाखल करण्यांत आला नाहीं.

१४. लघुलेखक रिपोर्टरांच्या जबानीपुरताच विचार केला तर ती कोर्टानें दिलेल्या ठरावास पोषक होण्यास कायद्याच्या दृष्टीनें अपुरी आहे; आणि लघुलेखकांच्या नोट्स किंवा नोट्सवरून साध्या लिपींत केलेलें त्यांचें भाषान्तर हीं पुराव्यादाखल दाखल केलेलीं नसल्यामुळें तीं कोर्टानें सोडलेल्या हुकमास बळकटी आणण्याकरितां कायदेशीर असा पुरावा मुळींच होत नाहींत.

१५. नोट्स ह्या निःसंशय चुकीच्या आणि कांहीं ठिकाणीं अपुऱ्या आहेत. कायद्याच्या दृष्टीनें त्या पुराव्यादाखल घेतां येत नाहींत. भाषान्तर बरोबर आहे कीं नाहीं हें ताडण्याकरितां मूळ भाषान्तरकर्त्याची साक्ष घेण्यांत आली नाहीं. मि. ठाकूर यांची जबानी कायदेशीर जबानी नव्हे.

१६. कनिष्ठ कोर्टानें ज्या उताऱ्यांवर भिस्त ठेवून आपला हुकूम सोडला, ते उतारे ज्या संबंधांत आहेत, तो मागील पुढील संबंध न पाहतां ते घेतले आहेत.

१७. भाषान्तरामध्यें मराठी उताऱ्यांचा खरा रोख निघून जात असतो आणि त्यांस वेगळेंच स्वरूप प्राप्त होत असतें, ही गोष्ट कनिष्ठ कोर्टानें लक्षांत घेतली नाहीं.

१८. मराठी म्हणी आणि गोष्टी यांचा खरा मथितार्थ भाषान्तरामध्यें आणलेला नाहीं आणि म्हणून दाखल करण्यांत आलेलीं भाषांतरें हीं मराठींतील उतारे व दृष्टान्त समजावून घेण्यास योग्य साधनें नव्हत.

१९. घेतलेल्या जामीनाची रक्कम फार भारी आहे.

कळावें, हा अर्ज.

बाळ गंगाधर टिळक यांच्या तर्फेचे वकील.

रा. सदाशिव रामचंद्र बखले, बी. ए. एल्एल्. बी. हायकोर्ट वकील हे रा. टिळक यांचे तर्फे ना. न्या. बीमन व ना. न्या. सर जॉन हीटन यांचे कोर्टांत ता. ३० आगष्ट १९१६ रोजीं अर्ज घ्यावा म्हणून विनंति करण्याकरितां हजर होते.

रा. बखले आपल्या भाषणांत म्हणाले कीं, रा. टिळक यांच्या व्याख्यानांचा उद्देश कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविरुद्ध टीका करण्याचा नसून सरकारचें जें राजयंत्र आहे त्यावर टीका करण्याचा होता. म्हणून विवक्षित वाक्यें हुडकून न काढतां सर्व व्याख्यानें एकत्र वाचून तीं व्याख्यानें राजद्रोही आहेत कीं काय या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे. भाषांतरें बोलून चालून बरोबर नाहींत हें फिर्यादापक्षानेंहि कबूल केलें आहे.

न्या. बीमनः—हा सर्व पुराव्याचा प्रश्न आहे. पुराव्यावरून मॅजिस्ट्रेटला भाषणें राजद्रोही असें वाटलें, आणि तशीं आहेत कीं नाहीं, हें पुराव्यावरूनच सिद्ध झालें पाहिजे.

रा. बखले पुढें म्हणाले, मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं खटला चालवितांना खटला चालविण्याच्या नियमाचें उल्लंघन केलें आहे. प्रथमतःच ज्या फिर्यादीच्या माहितीवरून समन्स काढलें त्या फिर्यादीची (मि. गायडर) क्रि. प्रो. को. ११७

व्या कलमाप्रमाणें साक्ष घेतली पाहिजे होती. या साक्षीवरून मि. गायडर यांना कसली माहिती लागली होती हें स्पष्ट झालें असतें.

न्या. बीमनः–खटल्याची चौकशी झाली नव्हती काय ? खटल्यांत पुष्कळ साक्षी झाल्या आहेत.

रा. बखलेः–परंतु मि. गायडर हे प्रथम माहिती देणारे फिर्यादी होते, व त्यांची साक्ष घेतलेली नाहीं.

न्या. बीमनः–मि. गायडर यांची साक्ष झाली असती तर त्याचा तुम्हांला असा काय उपयोग झाला असता ? फार तर व्याख्यानें दिलीं गेलीं होतीं एवढें त्यांनीं सांगितलें असतें.

रा. बखलेः–दुसरी चुकी मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं प्रत्यक्ष भाषणें काय आहेत हें लघुलिपीच्या वह्यांवरून ठरविलें. खरोखर पाहूं गेलें असतां या वह्या पुराव्यांत घेतां येत नाहींत. फार तर स्मरणशक्तीस चालन देण्याकरितां त्यांचा उपयोग करतां आला असता.

न्या. बीमनः–यांत चुकी ती काय झाली ? वह्या म्हणजे भाषणाचा पुरावा आहे असें कोणीहि म्हणत नाहीं. स्मरणशक्तीस चालन देण्याकरितांच त्यांचा उपयोग केला गेला आहे.

रा. बखलेः–तिसरी चुकी म्हणजे ज्या गृहस्थांनीं मुंबईंत बसून या भाषणांचीं भाषांतरें केलीं त्यांची साक्ष घेतली नाहीं, व तीं भाषांतरें दुसऱ्याच एका गृहस्थांनीं येऊन दाखल केलीं; आणि भाषांतर बरोबर आहे असा दाखला या त्रयस्थ गृहस्थाकडून घेतला आहे.

न्या. बीमनः–या तुमच्या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? या मराठी भाषणांचें भाषांतर केलें गेलें आहे; आणि हें भाषांतर ज्यांना मराठी उत्तम येतें अशा गृहस्थांना दाखविलें आणि तें बरोबर आहे असा शेरा त्यांनीं दिला आहे.

रा. बखलेः–आणखी एक चुकी ही आहे कीं, रा. टिळक यांना पूर्वी शिक्षा झाल्या आहेत, असा दाखला चौकशीच्या शेवटीं पुराव्यांत दाखल न करतां चौकशीच्या प्रारंभींच पुराव्यांत दाखल केला गेला आहे.

न्या. बीमनः–यांत कांहीं शिक्षा वाढविण्याचा प्रश्न नाहीं. शिवाय क्रि. प्रो. को. प्रमाणें जामीन किती रकमेचा घ्यावयाचा हें रा. टिळक यांना दिलेल्या

नोटिशींत स्पष्टपणें नमूद केलें आहे. रा. टिळक हे सुप्रसिद्ध गृहस्थ आहेत आणि त्यांच्या आयुष्यांतील बहुतेक गोष्टी आम्हां सर्वांच्या परिचयाच्या आहेत. अन्याय कोठें झाला हें मला सांगा.

°न्या. हीटनः—तुमच्या अशिलाच्या खटल्याच्या बाबतींत कोठेंहि अन्याय झालेला मला दिसत नाहीं. भाषणें राजद्रोही नाहींत म्हणून अपील करतों असें पाहिजे तर तुम्ही म्हणा.

रा. बखले यांनीं मॅजिस्ट्रेटसाहेबांचा हुकूम वाचून दाखविला आणि ते म्हणाले, भाषणांमधून एकच गोष्ट स्पष्ट दिसते कीं, चालू राज्यपद्धतींत कांहीं फरक करावा एवढाच रा. टिळक यांचा हेतु व्याख्यानें समग्र वाचलीं असतां स्पष्ट दिसून येतो. सरकार व सरकारचें राज्ययंत्र यांत फार फरक आहे. सरकारासंबंधानें कोणाचीच तक्रार नाहीं. सरकारच्या राज्ययंत्रांत मात्र १९१५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या ॲक्टमध्यें फरक करून सुधारणा घडवून आणावी असा रा. टिळक यांचा हेतु आहे.

न्यायमूर्तींनीं अर्ज मंजूर केला.

मुंबई येथील हायकोर्टांत

(क्रिमिनल रिव्हिजन अर्ज नं. २३२ स. १९१६)

अर्जदार बाळ गंगाधर टिळक

विरुद्ध

राजेसरकार

(ना. न्या. सर स्टॅन्ले बॅचलर व ना. न्या. शहा यांचेपुढें)

बुधवार ता. ८ नवंबर १९१६

रा. टिळक यांच्या तर्फे ना. बॅ. महमद अली जिना, बॅ. बप्टिस्टा व बॅ. येरूळकर हजर होते. त्यांच्या मदतीस रा. बखले व रा. करंदीकर हायकोर्ट वकील हजर होते. सरकारतर्फे ना. बॅ. जार्डिन हे हजर असून त्यांच्या मदतीस बॅ. स्ट्रँगमन, बॅ. बिनिंग, बॅ. पटवर्धन व मि. पाटकर सरकारी वकील हजर होते.

कोर्टाला उद्देशून बॅ. जिना म्हणाले, महाराज! क्रि. प्रो. कोड कलम १०८ खालीं पुण्याचे डि. मॅजिस्ट्रेट यांनीं रा. बाळ गंगाधर टिळक यांना पुढील हुकूम सोडला आहे. (हुकूम वाचला:—मी तुम्हांस हुकूम करतों कीं, तुम्हीं एक वर्षपर्यंत चांगल्या वर्तणुकीबद्दल वीस हजारांचा जातमुचलका व दहा दहा हजारांचे दोन जामीन द्यावे.) आतां आपण जर १०८ कलम पहाल तर आम्हांला असें सिद्ध करणें प्राप्त आहे कीं, १०८ कलमाप्रमाणें (कलम वाचलें) रा. टिळकांनीं राजद्रोही मजकुराचा फैलाव केला नाहीं. व कोर्टालाहि रा. टिळक हे राजद्रोही मजकुराचा फैलाव करतात कीं काय हेंच पाहणें आहे. या खटल्यांत तोंडानें व्याख्यानें दिलेलीं आहेत, तेव्हां या व्याख्यानांतून राजद्रोही शब्द उच्चारले गेले आहेत कीं काय हें पाहणें आहे. कलम १२४ अ पुढीलप्रमाणें आहे. (कलम वाचलें.) मॅजिस्ट्रेटच्या हुकुमांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराबद्दल द्वेष, तिरस्कार व अप्रीति रा. टिळक यांनीं आपल्या भाषणानें उत्पन्न केली आहे. तेव्हां प्रथम आपण कायद्यानें प्रस्थापित झालेलें ब्रिटिश सरकार म्हणजे काय हें पाहूं या. माझ्या मतें ज्या सरकाराविरुद्ध रा. टिळक यांनीं टीका केली आहे, तेंच सरकार कायद्यानें प्रस्थापित केलेलें सरकार असा मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं खोटा ग्रह करून घेतला आहे. मी आतां असें सिद्ध करून दाखविणार आहें कीं, या भाषणांमधून कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविरुद्ध एकहि शब्द नाहीं. भाषणांतून सत्तेचाळीस उतारे मीं काढून ठेवले आहेत, व या सत्तेचाळीस उताऱ्यांत रा. टिळक यांनीं ब्रिटिश सरकार हें फार चांगलें सरकार आहे, असें अगदीं स्पष्ट म्हटलें आहे. इं. पि. कोड कलम १६ मध्यें हिंदुस्थानसरकार या शब्दाची व्याख्या केली आहे. क. १६ म्हणतें हिंदुस्थानसरकार म्हणजे गव्हर्नर जनरल व त्यांचें कौंसिल अगर त्या कौंसिलचे अध्यक्ष अगर गव्हर्नर जनरल एकटेच, हें होय. सरकार आणि हिंदुस्थानसरकार यामध्यें भेद करतांना कलम १७ त असें सांगितलें आहे कीं, सरकार म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याहि भागांत प्रत्यक्ष राज्यकारभार चालविणारी व्यक्ति अगर अनेक व्यक्तींचा समुदाय हें होय.

न्या. बॅचलर—प्रश्न हा आहे कीं, कलम १२४ अ मध्यें सरकार म्हणजे हिंदुस्थानसरकार आहे कीं काय?

बॅ. जिनाः—क. १७ मध्यें सरकार या शब्दाची व्याख्या दिली आहे.

न्या. बॅचलरः—क. १२४ अ मध्यें "किंवा कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार," असे शब्द आहेत.

बॅ. जिनाः—जर आपण क. १७ मध्यें सांगितलेली सरकार या शब्दाची व्याख्या बरोबर आहे असें धरलें, तर क. १२४ अ मध्यें 'सरकार' शब्दानंतर 'किंवा कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' असे जे शब्द आहेत ते शब्द निरुपयोगी ठरतात. म्हणून माझें म्हणणें असें आहे कीं, सरकार या शब्दाचा अर्थ प्रत्यक्ष दृश्य सरकार नसून सर्वसाधारण सरकार ही अदृश्य कल्पना व्यक्त केली आहे. व या सरकाराविरुद्ध जर अप्रीति उत्पन्न केली गेली तर १२४ अ कलमाप्रमाणें गुन्हा होतो. महाराज! सतराव्या कलमांत सांगितलेली व्याख्या जर आपण या ठिकाणीं लागू कराल तर यःकश्चित पोलीस शिपायाचा सुद्धां त्या कलमांत अंतर्भाव होईल. कोणत्याहि कलेक्टराचा होईल, कोणत्याहि मुलकी कारभार चालविणाऱ्या हपिसराचा होईल. म्हणून माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारचा कलम १७ मध्यें अंतर्भाव होत नाहीं. याकरितां ज. बॅटी यांनीं आठ बॉ. लॉ रि. पान ४३८ यांत जी व्याख्या दिली आहे, तीच व्याख्या बरोबर आहे असें वाटतें. (४३८ पान वाचून दाखविलें). ज. बॅटी यांच्या मतानें सरकार म्हणजे अव्यक्त भावनाच आहे.

न्या. बॅचलरः—तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे. १७ व्या कलमामध्यें सरकार शब्दानें व्यक्तींचा समुदाय हेंच गृहीत धरलें आहे. आपण हा प्रश्न कां टाळतां?

बॅ० जिनाः—मीं आपल्याला सांगितलेंच कीं, सरकार शब्दाची व्याख्या पीनलकोडमधूनच घेतली आहे. एक व्यक्ति अगर अनेक व्यक्ति असा अर्थ त्यांनीं घेतला नाहीं. न्या. बॅटी यांनीं पुढें म्हटलें आहे कीं, सरकार म्हणजे एक अधिकारी अगर अनेक अधिकारी नव्हेत. पुढें ते असेंहि म्हणतात कीं, सरकार म्हणजे क्षणिक टिकणारी प्रासंगिक अशी कल्पना नाहीं, तर सरकार म्हणजे चिरंतन टिकणारी कल्पना आहे. म्हणून माझें म्हणणें इतकेंच का, रा. टिळक यांच्या भाषणांत सर्व राज्यकारभाराविरुद्ध तक्रार नसून एका विवक्षित

राज्यपद्धतीवर त्यांचा कटाक्ष आहे. राज्यव्यवस्थेपैकीं, "सिव्हिल सर्व्हिस" अगर ज्याला "ब्युरॉक्रसी" असें म्हणतात त्याच लोकांवर रा. टिळक यांची टीका आहे. आपण हें लक्षांत ठेवावें कीं, सर्व सिव्हिल सर्व्हिस नाहींशी करावी असेंहि त्यांनीं म्हटलें नाहीं; तर त्यांच्या हातांत जी अनियंत्रित सत्ता आहे ती काढून घेऊन त्यांना लोकांना जबाबदार करावें, अशी टीका केली आहे.

न्या. बॅचलरः—मग सिव्हिल सर्व्हिस न काढतां लोकांचा ताबा त्यांच्यावर राहावा असेंच म्हणणें कीं नाहीं ?

बॅ. जिनाः—आतां आपण १२४ अ कलमाला जें स्पष्टीकरण दिलें आहे त्याकडे वळूं या. अप्रीति या शब्दाचा अर्थ मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं अगदीं चुकीचा केला आहे. अप्रीति म्हणजे प्रत्यक्ष द्वेषबुद्धि आहे; अप्रत्यक्ष विचार नव्हे. १२४ अ कलमाच्या दुसऱ्या स्पष्टीकरणांत हीच गोष्ट व्यक्त केली आहे. रा. टिळकांचीं सर्व भाषणें वाचून पाहतां असें आढळून येईल कीं, त्यांनीं सरकारच्या कांहीं कृत्यांवर टीका केली आहे व त्या टीकेचा उद्देश त्या अन्यायाचा प्रतिकार करावा एवढाच आहे. या खटल्यांत दुसरा मुद्दा जो मला सांगावयाचा आहे तो हेतूसंबंधाचा आहे व कोणत्याहि फौजदारी खटल्यांत लेखक, वक्ता यांच्या हेतूकडे लक्ष दिलें पाहिजे. अप्रीति उत्पन्न करण्याचा हेतु होता हें स्पष्ट सिद्ध झालें पाहिजे, व हा हेतु भाषणें अगर लेख यांवरूनच काढला गेला पाहिजे. वाईट हेतु सिद्ध करणें हें फिर्यादीपक्षाचें काम आहे. मी रा. टिळक यांच्या भाषणांतून सत्तेचाळीस उतारे काढले आहेत,त्यांवरून कायद्यानें प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश-सरकाराविरुद्ध त्यांचा अप्रीति उत्पन्न करण्याचा उद्देश नाहीं, हें स्पष्ट होतें. भाषणासंबंधीं आणखी एक गोष्ट मला सांगणें प्राप्त आहे. हीं भाषणें सी. आय्. डी.च्या लघुलेखकांनीं उतरून घेतलीं आहेत व त्यांचीं हीं नोटबुकें फारफार तर स्मरणशक्तीस चालन देण्याकरितां उपयोगीं पडतील. भाषणांचें तात्पर्य बरोबर आहे. रा. टिळक यांनीं ही गोष्ट कबूल केली आहे, व मलाहि ती गोष्ट नाकबूल नाहीं. माझा मुद्दा एवढाच आहे कीं, लघुलेखकांनीं भाषणें टिपून घेतांना एकादा शब्द अगर एखादें वाक्य कमी-अधिक झालें तर बराच अर्थ बदलतो. म्हणून सर्व भाषणें एकत्र वाचावीं अशी माझी विनंति आहे. भाषांतरासंबंधानें तर माझी तक्रार विशेष आहे. भाषांतराच्या शब्दांसंबंधानें

खालच्या कोर्टांत बराच वादविवाद झाला आहे.

न्या. बॅचलरः–तुमच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच दिसतो कीं, आम्ही विवक्षित शब्दांच्या भाषांतराकडे लक्ष न देतां सर्व भाषण एकत्र वाचावें. ठीक आहे. आम्हीं दोघांनींहि तिन्ही भाषणें वाचलीं आहेत, व तीं वाचलीं आहेत असें समजून आपलें म्हणणें आपण पुढें चालूं द्यावें.

बॅ. जिनाः–मग मीहि भाषणें वाचीत बसत नाहीं. आतां आपण १९१५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट पहा. त्यासंबंधानें माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारचीहि तेथें व्याख्या केली आहे. त्या व्याख्येंत सरकार म्हणजे बादशहा असें दिलें आहे (त्या कायद्याचें कलम एक व दोन पहा). त्यावरून आपल्याला असें आढळून येईल कीं, कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार म्हणजे राजा स्वतः व पार्लमेंट हेंच होय. राजानें आपले अधिकार कांहीं कारणाकरितां सेक्रेटरी ऑफ स्टेटला दिलेले आहेत. त्यांनीं गव्हर्नर जनरल यांना दिले आहेत. व ज. बॅटी यांच्या मतानेंहि कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार म्हणजे बादशहा व पार्लमेंट असून त्यांनीं आपले अधिकार सेक्रेटरी ऑफ स्टेट व गव्हर्नर जनरल यांना दिलेले आहेत. म्हणून फार फार तर सरकार शब्दाची व्याप्ति गव्हर्नर जनरलपर्यंत येईल. लष्करी खातें, जंगलखातें व सिव्हिल सर्व्हिस हीं सर्व नोकरीवजा खातीं आहेत. मला असें वाटतें कीं, या खात्यांपैकीं कोणतेंहि खातें काढून टाका असें म्हणण्याचा प्रत्येक प्रजाजनाला हक्क आहे. मी असें ठासून म्हणतों कीं, या खात्यावर अविचाराचीहि टीका करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. त्यायोगें ब्रिटिश हिंदुस्थानांत कायद्यानें प्रस्थापित केलेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न केल्याचा गुन्हा केला असें होत नाहीं.

हेतूसंबंधानें लॉ. हॉलिसबरी यांच्या 'लॉज ऑफ इंग्लंड' या पुस्तकाच्या नवव्या भागांत ४६३ पानावर राजद्रोह या शब्दाचें विवेचन केलें आहे. (४६३ पान वाचलें.) इंग्लंड व हिंदुस्थान येथील राजद्रोहाच्या कायद्यांमध्यें फारसा फरक नाहीं. कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार याची व्याख्या करतांना सरकार म्हणजे अप्रत्यक्ष भावना अशीच केली आहे. व सरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्याचा रा. टिळक यांचा हेतु होता हें सिद्ध करण्याचा बोजा फिर्यादी-

पक्षावर आहे. नुसतें होमरूलवर व्याख्यान देणें हें मिष करून सरकारासंबंधानें अप्रीति उत्पन्न केली आहे, असें म्हणूत चालावयाचें नाहीं. भाषणांमध्यें टिळकांचा काय हेतु होता हें मी आपणांस स्पष्ट करून सांगतों. पहिली गोष्ट ही लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बेळगांव येथें होमरूल-लीगची स्थापना झाली, ही गोष्ट फिर्यादीपक्षालाहि नाकबूल नाहीं. आणि खालच्या कोर्टांत बॅ. बिनिंग यांनीं असेंहि सांगितलें आहे कीं, या चळवळीसंबंधानें ते कोणतेंहि मत प्रदर्शित करूं इच्छित नाहींत. म्हणून मला असें गृहीत धरून चालावयास हरकत नाहीं कीं, होमरूल-लीग ही कायदेशीर संस्था आहे. रा. टिळक बेळगांवास गेले आणि त्यांनीं ही होमरूल-लीग संस्था फार चांगली संस्था आहे अशी लोकांची खात्री करून देण्याकरितां व्याख्यान दिलें. व्याख्यानांत लोकांनीं या लीगचे सभासद व्हावें व या लीगला द्रव्यद्वारा मदत करावी अशी लोकांना त्यांनीं विनंति केली. अशी परिस्थिति असतांना राजद्रोही मतांचा प्रसार करण्याचा टिळकांचा हेतु होता असें म्हणणें वस्तुस्थितीस धरून नाहीं. त्यांच्या भाषणाकडेहि पाहिलें तरी आपल्यास हीच गोष्ट आढळून येते. आपल्या भाषणाच्या प्रारंभींच त्यांनीं सरकारचे अव्यक्त सरकार व व्यक्त सरकार असे दोन भाग केले आहेत. नंतर ते म्हणतात, "स्वराज्याचा प्रश्न हा बादशहासंबंधाचा नाहीं. हा व्यक्त सरकारचा प्रश्न आहे, हें प्रारंभींच लक्षांत ठेवलें पाहिजे... ... ... अराजक राष्ट्रांची गोष्ट निराळी ... . अराजक राष्ट्रांत घराला आग केव्हां लागेल याचाहि कांहीं नेम नाहीं." म्हणून महाराज! इतकें स्पष्ट सिद्ध होतें कीं, बादशहासंबंधानें एक अवाक्षरहि रा. टिळक काढीत नाहींत. त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, अराजक राष्ट्रांचा केव्हांहि उदय होत नाहीं. सरकार अवश्य आहे. पुढें ते म्हणतात, "इंग्रज लोकांच्याच हाताखालीं इंग्रज राष्ट्राच्याच देखरेखीखालीं ... ... याबद्दल मला कांहीं बोलावयाचें नाहीं." ही पहिली गोष्ट त्यांनीं सांगितली आहे. महाराज! मी आपल्याला अगदीं एक साधा प्रश्न विचारतों कीं, ब्रिटिशराज्याची अशा रीतीनें प्रारंभींच स्तुति करून नंतर या देशांतील ब्रिटिश राज्याविरुद्ध अप्रीति उत्पन्न करणें कोणत्याहि वक्त्याला शक्य आहे काय? शिवाय रा. टिळक श्रोतृगणांना असें बजावतात कीं, या राष्ट्राचा भाग्योदय ब्रिटिश सरकारच्या

सहानुभूतीनें त्यांच्याच उदार बुद्धीनें व्हावयाचा आहे. अशा रीतीनें ब्रिटिश सरकारची स्तुति करून मग ते म्हणतात कीं, हिंदुस्थानचें कल्याण ब्रिटिश सरकारच्या मदतीनेंच करून घेणें इष्ट आहे. प्रारंभींच असें सांगितल्यानंतर त्याच सरकारींविरुद्ध अप्रीति उत्पन्न करणें कोणाहि मनुष्याला शक्य आहे काय? पुढें ते म्हणतात, "अव्यक्त सरकार कायम रहावयाचें आहे, आणि क्षणोक्षणीं बदलणाऱ्या व्यक्त सरकारामध्यें आम्हांस फरक करून घ्यावयाचा आहे. हा प्रश्न स्वराज्याचा आहे. ... ... इंग्रज सरकार आम्ही वदलूं इच्छित नाहीं. ... ... आमचें जें मागणें आहे तें स्वराज्यासंबंधानें आहे." याचा अर्थ काय? इंग्रजी राज्य नको असा याचा अर्थ होत नाहीं. टिळक स्पष्टपणें म्हणतात कीं, इंग्रजी राज्याच्याच छत्राखालीं आम्हांस रहावयाचें आहे. माझी अशी खात्री आहे कीं, ब्रिटिश सरकाराविरुद्ध आपल्या सगळ्या व्याख्यानांत एक शब्दहि सांगितला गेला नसतांना जर इंग्लिश सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न होऊं लागली तर श्रोत्यांचीं डोकीं ताळ्यावर नव्हतीं असें म्हणणें मला प्राप्त आहे. मीं आपल्यास वाचून दाखविलेले उतारे भाषणांमधून इतस्ततः घेतलेले आहेत. जर एखाद्या मनुष्याला अप्रीति उत्पन्न करावयाची असेल तर तो मनुष्य आपल्या व्याख्यानाच्या प्रारंभींच तसें करील व आपल्या मनांतील उद्देश साधण्याकरितां त्याचेंच पुनरुच्चारण भाषण संपेपर्यंत तो करीत राहील. पण तशी स्थिति येथें नाहीं. आपल्याला आढळून येईल कीं, भाषणाच्या प्रारंभीं, भाषणाच्या मध्यें व भाषणाच्या शेवटीं हल्लींची राज्यपद्धति बदलावयाची आहे अशा तऱ्हेचा आपला हेतु रा. टिळक यांनीं स्पष्ट सांगितला आहे. ते म्हणतात, "ही पद्धति आम्हांला नको आहे ... ... या उद्योगाचें फळ तुमच्या डोळ्यांदेखत नाहीं तरी तुमच्या पुढील पिढीला मिळाल्याखेरीज राहणार नाहीं." महाराज! हें टिळकांचें पहिलें भाषण आहे. या भाषणांतील मीं निवडलेले २४ उतारे हे भाषणाच्या प्रारंभांतून अगर शेवटच्या भागांतून काढले नसून भाषणांतून निरनिराळ्या वेळेस बोलले गेलेले आहेत. चालू राज्यपद्धतींत फरक करावा, एवढाच त्यांचा उद्देश आहे. या पहिल्या भाषणाविरुद्ध ज्या तक्रारी केल्या गेल्या आहेत त्या सर्व तक्रारी वक्त्याच्या मुख्य उद्देशासंबंधानें गैरसमजूत झाल्याकारणानें केल्या गेल्या आहेत. त्या तक्रारी काय आहेत हें आपण पाहूं या. महाराज!

मला हीं सर्व भाषण वाचलीं पाहिजेत.

न्या. बॅचलरः—आपण बेलाशक तिन्ही भाषणें वाचा. तुमच्या विवरणाच्या आड यावें असें मला वाटत नाहीं. तुम्हांला भाषणें वाचावयाचीं असतील तर वाचा, खुशाल तुमच्या मर्जीप्रमाणें करा.

बॅ. जिनाः—भाषणें वाचणें हेंच मला बरें वाटतें. कारण, त्यायोगेंच माझें म्हणणें स्पष्ट होईल. "स्वराज्य म्हणजे काय......उत्तर एवढेंच कीं, घमेंड आहे म्हणून." Conceit शब्दाच्या ऐवजीं Overconfidence असें घालून मूळ शब्दाचें भाषांतर करावयास पाहिजे होतें.

न्या. बॅचलरः–Conceit काय Overconfidence काय, आम्हांला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

न्या. शहाः–मूळ मराठी शब्द काय आहे? माझ्या तो कांहीं लक्षांत येत नाहीं.

मि. जिनाः—घमेंड.

न्या. बॅचलरः—माझ्या स्वतःच्या मतानें या शब्दाचा अर्थ Conceit काय किंवा Overconfidence काय, विशेष फरक नाहीं.

मि. जिनाः—Conceit शब्द जास्ती झोंबणारा आहे.

न्या. बॅचलरः—तसा असेल; आम्हांला त्याच्याशीं काय कर्तव्य आहे?

बॅ. जिनाः—पण याच वाक्यावर फिर्यादीपक्षानें आक्षेप घेतला आहे. पण यांत काय गैर आहे हें मला समजत नाहीं. सर्व उतारा असा आहे कीं, ज्याचें पोट दुखतें त्यालाच अनुभव येतो. मला वाटतें, हें बरोबर उतरून घेतलें गेलें नाहीं. टिळकांच्या म्हणण्याचा आशय असा आहे कीं, या अधिकाऱ्यांना कोणतीहि गोष्ट करण्यासंबंधानें विनंति करा, ते इतके घमेंडखोर असतात कीं, ते आमचें ऐकत नाहींत; व म्हणूनच टिळक म्हणतात, ज्याचें पोट दुखतें त्यालाच अनुभव येतो.

न्या. बॅचलरः—इंग्रजींत एक म्हण आहे कीं, जोडा घालणाऱ्यालाच जोडा कोठें लागतो हें समजतें.

बॅ. जिनाः—अगदीं बरोबर असेंच आहे. कांहीं अधिकाऱ्यांना स्वतःच्या व्यवस्थेसंबंधानें इतका आत्मविश्वास असतो व तो खास प्रामाणिकपणाचा असतो कीं, त्या व्यवस्थेंतील ढोबळ दोष जे लोकांना दिसत असतात ते यांना

दिसणें शक्य नाहीं. पुढें टिळक म्हणतात, " दुसरें कांहीं कारण नाहीं........ स्वराज्याला पात्र नाहींत." लोकांचीं गाऱ्हाणीं ते पुढें मांडीत आहेत.

" एक खेडेगांवचा मनुष्य एक मेंढरूं डोक्यावर घेऊन चालला होता... तशासारखी आमची स्थिति आहे."

न्या. बॅचलरः—ही गोष्ट लॉ रिपोर्ट्समध्यें वर्णन केलेल्या गोष्टीसारखी दिसत आहे.

बॅ. जिनाः—ही गोष्ट लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्येंहि सांगितली गेली होती.

न्या. बॅचलरः—गोष्ट इसापनीतीसारखी दिसते. त्या मनुष्याच्या डोक्या-वर कांहीं तरी होतें झालें !

बॅ. जिनाः—नाहीं नाहीं, खरोखरीच त्याच्या डोक्यावर मेंढरूं होतें !

न्या. बॅचलरः—होय का ? मग एकामागून एक तीन माणसें भेटलीं ?

बॅ. जिनाः—होय. त्यांतील एक म्हणाला, तें कुत्रें आहे. दुसरा म्हणाला, दुसरेंच कांहीं तरी आहे. आणि तो मनुष्य इतका साधाभोळा होता कीं, त्याच्या मनाची चलबिचल होऊन त्यानें तें मेंढरूं डोक्यावरून टाकून दिलें. रा. टिळक श्रोत्यांना म्हणतात, असे भोळेभाबडे तुम्ही होऊं नका. टिळकांनीं कोणा एका व्यक्तीविषयीं अगर जातीविषयीं विशेषेंकरून धूर्त हा शब्द वापरलेला नाहीं. होमरूलच्या चळवळीच्या विरुद्ध जे लोक आहेत, त्यांच्यासंबंधानें त्यांनीं हा शब्द वापरलेला आहे. कायदेकौन्सिलांत डॉ. भांडारकर यांनींहि या गोष्टीचा उपयोग केला आहे.

न्या. बॅचलरः-शेक्सपियरच्या नाटकांत मॉउंट समरी नांवाच्या मनुष्यानें अशीच एक गोष्ट सांगितली आहे. (गोष्ट सांगितली.) मला वाटतें, या गोष्टीचा अर्थ इतकाच कीं, जी गोष्ट आपणास श्रेयस्कर वाटते, ती गोष्ट एकामागून एक पुष्कळ लोकांनीं वाईट आहे म्हणून सांगितली तरी आपण करण्याचें सोडूं नये.

बॅ. जिनाः—माझेंहि मत असेंच आहे. रा. टिळक यांचें म्हणणें असें आहे कीं, स्वराज्यसंघरूपी मेंढरूं आपण डोक्यावर घेऊन जात असतां त्या-बद्दल कोणीं कितीहि नांवें ठेवलीं तरी तें सोडून देऊं नका.

न्या. शहाः—यांत मुख्य कटाक्ष होमरूलच्या विरुद्ध जे लोक आहेत, त्यांना रा. टिळक लुच्चे म्हणतात असा नाहीं काय ?

बॅ. जिनाः--फिर्यादीपक्षाचें काय म्हणणें आहे हें मला समजत नाहीं. होमरूलच्या चळवळीच्या विरुद्ध जे जे आहेत, त्या सर्वांना हें विशेषण लागू आहे.

बॅ. जार्डिनः—होमरूल–लीगच्या चळवळीविरुद्ध जे लोक आहेत ते होमरूल–लीग ही चांगली संस्था आहे असें जाणत असून बुद्धिपुरःसर त्या चळवळीला वाईट म्हणतात. म्हणून रा. टिळक त्यांना लुच्चे म्हणतात, असें माझें म्हणणें आहे.

बॅ. जिनाः—माझ्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, ही गोष्ट अगदीं साधी असून यांत कोणालाहि लागण्यासारखा एक शब्दहि नाहीं. यांत कोणावरहि अप्रामाणिकपणाचा आरोप केलेला नाहीं. डॉ. भांडारकर यांनीं कायदेकौन्सिलांत जेव्हां या गोष्टीचा उपयोग केला, त्या वेळीं युनिव्हर्सिटीचा कायदा हा चांगला कायदा नाहीं, असें कायदेकौन्सिलांतील पुष्कळ नामदार सभासद म्हणत होते व त्यांनाच उद्देशून वरील गोष्ट त्यांनीं सांगितली. डॉ. भांडारकर यांनीं कायदेकौन्सिलांत ही गोष्ट जशीच्या तशी सांगितली, आणि ते पुढें म्हणाले. "मला या गोष्टींतील मनुष्याप्रमाणें भोळसट होण्याची इच्छा नाहीं. आणि पुष्कळ नामदार सभासद हें बिल वाईट आहे म्हणून सांगत आहेत, तरी सुद्धां मी हें बिल टाकण्यास तयार नाहीं." महाराज! डॉ. भांडारकर यांच्यावर असें म्हटल्याबद्दल असभ्यतेचा तरी आरोप कोणी करील काय?

न्या. बॅचलरः—असभ्यता होते कीं नाहीं हा आमच्यापुढचा आजचा प्रश्न नाहीं.

बॅ. जार्डिनः–तीन धूर्तांची गोष्ट सांगून जे जे लोक होमरूलच्या विरुद्ध आहेत ते लोक लुच्चे आहेत, असें रा. टिळक यांचें म्हणणें आहे.

बॅ. जिनाः--या मुद्द्याचें जास्ती विवरण करून मी आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं. या गोष्टींत लुच्चेगिरीचा आरोप कोणावरहि केलेला नाहीं. फार फार तर धूर्त म्हटल्याबद्दल असभ्यतेचा दोष मानतां येईल.

न्या. बॅचलरः--फौजदारी गुन्हा झाला आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां आपण येथें बसलों आहों. सभ्यासभ्यतेचा विचार आपणांस कर्तव्य नाहीं.

बॅ. जिनाः–मग मी या मुद्द्यावर आपल्याला जास्ती त्रास देऊं इच्छित नाहीं. ज्या दुसऱ्या भागावर फिर्यादीपक्षाकडून आक्षेप घेण्यांत आला आहे तो

भाग असा: "आम्हीं कधीं काम केलें नाहीं...आम्ही अयोग्य आहोंत,...द्याव-याचें नाहीं असें म्हणा. आम्ही अयोग्य आहों असें म्हणूं नका." या ठिकाणीं आम्ही अयोग्य आहोंत असें म्हणणाऱ्यांस रा. टिळक यांनीं उत्तर दिलें आहे. रा. टिळक म्हणतात कीं, जेव्हां ना. सर सत्येंद्रप्रसन्न सिंह यांना कार्यकारी कौन्सिलांत सभासद नेमले त्या वेळीं नामदार सिंहांनीं आपण त्या जागेला नालायक आहोंत असें केव्हांहि म्हटलें नाहीं. पुढें रा. टिळकांनीं एकवीस वर्षांच्या असिस्टंट कलेक्टराच्या हाताखालीं साठ वर्षें वयाच्या मामलेदारास काम करावें लागतें हें उदाहरण दिलें आहे. यांत रा. टिळक यांचा उद्देश इत-काच आहे कीं, एकवीस वर्षें वयाच्या असिस्टंट कलेक्टराला पोक्त, अनुभवी, नोकरींत काळयाचे पांढरे केस झालेल्या मामलेदारापेक्षां अधिक अधिकार दिलेले असतात. प्रचलित राज्यपद्धतींत हें एक मोठें व्यंग आहे, एवढाच टिळकांचा मुद्दा आहे, व हा भाग सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न कसा करतो हें परमेश्वरास माहित! हल्लींची राज्यपद्धति कशी आहे एवढेंच टिळकांना दाखवावयाचें आहे.

न्या. बॅचलर:—यांत कांहीं राजद्रोह आहे, असें मला स्वतःला तर कांहीं दिसत नाहीं.

बॅ. जिना:—खालच्या कोर्टांत मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं असें म्हटलें आहे कीं, अधिकारीवर्गाला अनुभवाचे गड्डे आपणच आहोंत असा अभिमान वाटतो, असें म्हणण्याचा रा. टिळक यांचा व्यंग्यार्थ आहे. परंतु हें म्हणणें साफ चुकीचें आहे. रा. टिळकांच्या मतानें हल्लीं आमचें ज्ञान वाढलें आहे, आम्हांला पुष्कळ अनुभव आला आहे, म्हणून पूर्वीपेक्षां आतां आम्ही जास्ती लायख आहोंत. एका विवक्षित राज्यपद्धतीवर टीका करणें झाल्यास ती राज्यपद्धति वाईट आहे, निदान लोकहिताची तरी नाहीं, असें दाखविल्याशिवाय तिच्यावर टीका करणें केव्हांहि शक्य नाहीं. रा. टिळक म्हणतात, "आम्हांला स्वराज्य द्यावयाचें नाहीं असें म्हणा, काय म्हणावयाचें असेल तें स्पष्ट म्हणा, परंतु आम्ही नालायक आहों असें म्हणूं नका." टिळक हें रागानें म्हणत आहेत. ते असेंहि म्हणतात, तुम्ही आम्हांस किती दिवस शिकवणार आहां? या सर्व गोष्टी तुम्ही नालायक आहां अशा शंकेस उत्तर देतांना म्हटल्या आहेत.

न्या. बॅचलर:—"हीहि गोष्ट करावयाची नाहीं, तेव्हां हिंदी लोक राज्य-

कारभार चालविण्यास पात्र नाहींत. ... ... त्याचें सामर्थ्य ज्या प्रकारें वाढेल ते मार्ग अजीबात बंद करावयाचे." हा भाग सर्वस्वीं तुमच्याविरुद्ध आहे; याला तुम्ही उत्तर काय देतां ?

बॅ. जिनाः—आपण मागचा पुढचा संदर्भ पहा. म्हणजे आपल्या लक्षांत येईल कीं, रा. टिळक हे या ठिकाणीं लायकी-नालायकीच्या प्रश्नाची चर्चा करीत आहेत. खालसा मुलखांत काय चाललें आहे, म्हैसुरास काय चाललें आहे हें पहा व त्याला लागून असलेल्या बेळगांव वगैरे जिल्ह्यांत कशी राज्यव्यवस्था चालली आहे पहा. म्हैसूरचा राज्यकारभार चालविण्यास जर आम्ही लायक आहोंत तर मग अलीकडच्या दोन जिल्ह्यांची राज्यव्यवस्था चालविण्यास आम्ही नालायक कां असें रा. टिळक यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानचे लोक राज्यकारभार चालविण्यास नालायक आहेत, असें म्हणणाऱ्या लोकांना रा. टिळक यांनीं उत्तर दिलें आहे. आणि सदैव नालायक ठरलें जाणें म्हणजे सदैव गुलामगिरींत राहणें आहे. या ठिकाणीं 'गुलामगिरी' हा शब्द राजकीय गुलामगिरी या अर्थानें वापरला आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं, प्रजेला कांहीं हक्क असूं नयेत. देहाचा क्रयविक्रय या अर्थानें गुलामगिरी हा शब्द वापरलेला नाहीं. मनुष्य रागावला म्हणजे नेहमीं म्हणतो, मी कांहीं तुमचा गुलाम नाहीं.

न्या. बॅचलरः—असें म्हणतात खरें ! 'हम तुमारा गुलाम नही है'

बॅ. जिनाः—याचा अर्थ इतकाच कीं, तूं सांगशील तें मी ऐकणार नाहीं.

न्या. शहाः—तुमचे म्हणण्याचा आशय असा दिसतो कीं, हे शब्द थोडे रागानें उच्चारले आहेत.

बॅ. जिनाः—होय, यापेक्षां दुसरा अर्थ संभवत नाहीं.

न्या. बॅचलरः—'उद्देश आहे' असें म्हणण्यापेक्षां 'तात्पर्य असें आहे' असें म्हटलें असतें तर चाललें नसतें काय ?

बॅ. जिनाः—मागचा पुढचा संदर्भ आपण पाहिला असतां लायकी-नालायकीच्या प्रश्नाची चर्चा करतांना हा भाग आला आहे. म्हणून यांत मला आक्षेपार्ह कांहीं आहे असें वाटत नाहीं. आपण सर्व भाग वाचला म्हणजे आपल्यास सर्व गोष्ट स्पष्ट समजेल. (या ठिकाणीं रा. बखले यांनीं मूळ मराठी भाग वाचून दाखविला).

न्या. बॅचलरः--पुष्कळ वर्षांपूर्वी इसापनीतींतील गोष्टी मी वाचल्या होत्या. त्या गोष्टींच्या खालीं गोष्टींचें तात्पर्य दिलेलें असतें व या तात्पर्याचा अर्थ उद्देश नसून परिणाम असा आहे.

बॅ. जिनाः--या ठिकाणीं परिणाम असा अर्थ आहे.

न्या. बॅचलरः--अहो सरकारी वकील! असाच अर्थ हे तो ना?

सरकारी वकीलः--होय, याचा अर्थ तात्पर्य असा होतो खरा.

बॅ. जिनाः--अगदीं बरोबर आहे. सगळें भाषण वाचलें असतां तोच अर्थ निघतो.

न्या. बॅचलरः--तात्पर्य असें आपण घेऊन चालूं.

बॅ. जिनाः--रा. टिळक पुढें म्हणतात, "आम्ही दाद मागतों... ... अधिकारारूढ जे लोक आहेत त्यांच्याकडून हा विरोध होत असतो." अधिकारारूढ लोक म्हणजे सिव्हिल सर्व्हंटस् असें रा. टिळक यांचें म्हणणें आहे. "बादशहाच्या दृष्टीनें अराजकत्व आहे... ...राजनिष्ठा नाहीं... ... त्याला भीक घालूं नका." रा. टिळक या ठिकाणीं म्हणतात, ज्या लोकांच्या हातांत हल्लीं सत्ता आहे ते लोक स्वराज्याच्या विरुद्ध आहेत. हल्लीं जो सर्व सत्तेचा मक्ता सिव्हिल सर्व्हंटना दिला आहे, तो काढून घेतला पाहिजे, ही पद्धत बदलली पाहिजे. व असें म्हणणें म्हणजे कायद्यानें प्रस्थापित झालेल्या राज्याविरुद्ध हल्ला आहे असें मानणें चुकीचें आहे.

बॅ. जिनाः—यापुढें रा. टिळकांनीं ईस्ट इंडिया कंपनीपासूनचा इतिहास दिला आहे. व ते म्हणतात, कंपनीचें राज्य गेलें तरी तें धोरण कायम आहे; आणि मधल्यामधें जाहिरनामा फुकट गेला. या ठिकाणीं रा. टिळक यांचें म्हणणें इतकेंच आहे कीं, कंपनीचा कारभार अव्यवस्थित, देशाच्या हिताविरुद्ध आहे असें आढळल्यावरून त्यांत फरक केला; परंतु तो फरक वरवर झाला, तत्त्वतः झाला नाहीं. व म्हणून राणीचा जाहीरनामा मधल्यामध्यें फुकट गेला; तेव्हां ही पद्धत मूळापासून बदलली पाहिजे.

रा. टिळक म्हणतात, "मग हीं कायदेकौन्सिलें निघालीं ... ... तीं ग्याझेटांत प्रसिद्ध करूं"

न्या. बॅचलरः—यांत आक्षेपार्ह कोणता भाग आहे?

बॅ. जिनाः--कशावर आक्षेप घेतात हें त्यांचें त्यांना माहित!

रा. टिळक पुढें म्हणतात "महाभारतांत एक श्लोक आहे ... ... असें ब्युरॉक्रसीनें चाळवीत ठेवलें आहे."

न्या. बॅचलरः--खालच्या कोर्टांत याहि भागावर आक्षेप घेतला आहे कीं काय?

बॅ. जिनाः—होय.

बॅ. विनिंगः—खालच्या कोर्टांत काय झालें हें सविस्तर सांगण्याची मला परवानगी द्यावी.

न्या. बॅचलरः—नाहीं, परवानगी नाहीं.

बॅ. जार्डिनः—'आशां कालवतीं कुर्यात्' येथून पुढच्या भागावर माझा आक्षेप आहे.

बॅ. जिनाः--याहि भागाचा आपण अर्थ पाहूं या. याचा अर्थ इतकाच होतो कीं, आमच्या मागण्या फेटाळण्याकरितां एकामागून एक निरनिराळ्या सबबी सांगितल्या जातात. बरोबर असोत वा चूक असोत, आम्ही मागण्या मागतों व त्या मागण्या निरर्थक सबबी सांगून फेटाळल्या जातात. हें जर खरें आहे, तर सरकाराविषयीं कशी अप्रीति उत्पन्न होते, हें समजणें कठीण आहे. पुढें रा. टिळक म्हणतात, "आम्हांला गेल्या पांचपन्नास वर्षांमध्यें स्टेटसेक्रेटरी ... ... म्हणून जांवई उत्पन्न केला आहे." या ठिकाणीं 'जांवई' असें स्टेटसेक्रेटरीला म्हणण्यांत टिळकांनीं एका मराठी म्हणीचा उपयोग केला आहे. याचा अर्थ इतकाच कीं, जांवई जसा हक्कानें मालक नसतांना प्रत्यक्ष मालकीचे हक्क गाजवितो, तशी स्थिति स्टेटसेक्रेटरीची आहे. याचा अर्थ इतकाच कीं, नांवाला पार्लमेंटला जबाबदार पण वस्तुतः सर्व कारभार तोच चालवतो. असें जर म्हटलें तर यांत चूक काय केली? स्टेटसेक्रेटरीला काढून टाका असें म्हणण्यांत राजद्रोह कोठें होतो?

यानंतर "ही जी रचना केली आहे, ती कंपनीसरकारच्या धोरणावर केली आहे......आणि जाहिरनामा मधल्यामधें फुकट." राजधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर आहे, अशा अर्थाच्या भाषणावरील आक्षेपास उत्तर देतांना बॅ. जिना म्हणाले कीं, १८५८ मध्यें जो जाहिरनामा महाराणीसाहेबांनीं काढला,

तो जाहीरनामा जरी उदारमतप्रदर्शक होता, तरी राज्यव्यवस्था म्हणजे ती ज्या अधिकाऱ्यांनीं चालवावयाची तो अधिकारी वर्ग कंपनीच्या अधिकारीवर्गाच्या जागीं आला आहे. यामुळें पायापासून ही पद्धति बदलल्याशिवाय जाहीरनाम्याचा खराखुरा अंमल होणार नाहीं. पूर्वी कंपनीच्या डायरेक्टर्सकडे जी सत्ता व जे अधिकार होते, ती सत्ता व ते अधिकार हल्लींच्या स्टेटसेक्रेटरीकडे आहेत. म्हणूनच टिळक म्हणतात कीं, पूर्वीचे नोकर कायम आहेत, पूर्वीच्या नोकरांच्याच हातांत सत्ता आहे, यामुळें जाहिरनामा मधल्यामधें फुकट गेला. यांत राजद्रोह कोठें झाला, हें मला समजत नाहीं. यानंतर कायदेकौन्सिलच्या लोकनियुक्त सभासदांच्या हातांत सत्ता नसते, वगैरे बाबतींतील टिळकांच्या टीकेबद्दल बोलूं लागतांच न्या. बॅचलर म्हणाले, "काय ? याबद्दलहि फिर्यादीपक्षाचा आक्षेप आहे कीं काय ?" तेव्हां मि. जार्डिन यांनीं सांगितलें कीं, या बाबतींत आमचा कांहीं आग्रह नाहीं.

नंतर न्यायमूर्तींच्या प्रश्नावरून "परकी" "धक्का देणें" या शब्दप्रयोगांचा खुलासा बॅ. जिना यांनीं केला. मूळ रिपोर्टांत याच ठिकाणीं कांहीं भाग गळलेला आहे असें सांगून, ब्युरॉक्रसीच्या द्वारें म्हणजे मार्फत जाऊं नका, तेथें तुम्हांस अडथळा होईल. म्हणून जेथें तुम्हांस कोणी अडथळा करणार नाहीं, (धक्का देणार नाहीं) अशा मार्गानें म्हणजे पार्लमेंटच्या द्वारें दाद मागा, असें सांगण्याचाच काय तो टिळकांचा हेतु आहे असें ते म्हणाले. "इंग्रजांना येथें कोणीं बोलावलें?" अशा प्रकारचा प्रश्न विचारण्यांत नवीन कांहीं नाहीं, हें न्या. बॅचलर यांनीं मान्य केलें व त्यावर कोणाचा आक्षेप नाहीं असें सांगण्यांत आलें. बॅ. जिना म्हणाले कीं, परकी शब्द टिळकांनीं 'कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' याविषयीं वापरलेला नाहीं. सिव्हिल सर्व्हिसचे लोक परकी असतात यावरहि त्यांचा जोर नाहीं. ज्या विवक्षित पद्धतीनें राज्यकारभार चालविला जातो त्यावर त्यांचा कटाक्ष आहे. जो फक्त स्वार्थाचीच काळजी करतो, दुसऱ्याच्या हिताकडे लक्ष पुरवीत नाहीं, तो परकी, असें टिळकांनीं म्हटलें आहे. त्यांची सर्व टीका ब्युरॉक्रसीरूपी सरकारावर आहे. अव्यक्त सरकारावर नव्हे. मला स्वतःला रा. टिळक यांच्या भाषणाचा आशय इतकाच वाटतो कीं, या विवक्षित अधिकारीवर्गाचें हिताहित लोकांच्या हिताहिताशीं

विरोधी आहे, म्हणून पार्लमेंटकडे जाऊन ही पद्धत बदलून घेतली पाहिजे.

न्या. बॅचलरः--मुख्य प्रश्न हा आहे कीं, सरकारविरुद्ध अप्रीति टिळकांनीं वापरलेल्या भाषेंतून उत्पन्न होईल किंवा नाहीं?

बॅ. जिनाः–ज्या लोकांच्या हातीं सत्ता आहे ते आम्हांला न्यायानें वागवीत नाहींत अशी आमची तक्रार आहे. हा राजद्रोह होतो काय? असें म्हणण्यानें सरकाराविरुद्ध अप्रीति कशी उत्पन्न होईल? राजद्रोह होण्याला श्रोत्यांच्या मनावर कांहीं विपरीत परिणाम होणें अवश्य आहे. वरच्यासारख्या तक्रारीनें अनिष्ट परिणाम काय घडणार?

न्या. बॅचलर–श्रोत्यांमध्यें मराठे शेतकरी पुष्कळ होते व रा. टिळक यांच्या भाषणानें या वर्गाच्या मनामध्यें सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न होणार नाहीं काय?

बॅ. जिनाः–माझ्या मतानें श्रोतृवर्ग बुद्धिवान् नसला तरी निर्बुद्ध खास नव्हता. फार तर त्यांना 'हल्लींची राज्यपद्धति अपायकारक आहे म्हणून तिच्यामध्यें फरक केला पाहिजे' इतकाच रा. टिळक यांच्या भाषणाचा अर्थ समजला असेल.

न्या. शहाः–'गव्हर्नमेंट' या शब्दाबद्दल मुळांत शब्द काय आहे? सरकार असा आहे काय?

बॅ. जिनाः–होय, पण मामलेदारांनासुद्धां सरकार म्हणतांना मीं ऐकलें आहे. येथें सरकारचा वास्तविक अर्थ 'राज्यपद्धति' (Administration) असा आहे. 'ब्युरॉक्रसी' याला तंतोतंत मराठी शब्दच नाहीं.

बॅ. जिनाः—खालच्या कोर्टांत "पोट दुखतें" या शब्दांबद्दल फिर्यादीपक्षानें फारच गडबड उडविली होती.

बॅ. जार्डिनः–पण आतां त्या शब्दांवर आमचा जोर नाहीं.

बॅ. जिनाः---सरकार शब्दाचें भाषान्तर जेथें तेथें 'गव्हर्नमेंट' असें केलें आहे; पण त्या सर्व ठिकाणीं अव्यक्त सरकार अगर कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार अभिप्रेत नसून ब्युरॉक्रसी अभिप्रेत आहे, हें जरूर लक्षांत ठेवलें पाहिजे. 'परकी' शब्द कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्याकरितां मुळींच वापरलेला नाहीं.

रा. टिळकांनीं आपला उद्देश अगदीं स्पष्ट करून दाखविला आहे. कोणाहि समंजस माणसानें हीं तिन्ही भाषणें एकत्र वाचलीं असतां त्याच्या मनामध्यें सरकारविरुद्ध अप्रीति कधींहि उत्पन्न होणार नाहीं. म्हणून हीं भाषणें १२४ अ कलमाखालीं राजद्रोही ठरणार नाहींत. आतां आपण तिसरें भाषण पाहूं या.

(या ठिकाणीं उपहाराकरितां कोर्ट उठलें.)

उपहारानंतर

बॅ. जिनाः--' सरकार परकीय आहे ' याबद्दल मीं स्पष्टीकरण केलें आहे; तथापि तें आपल्याला पूर्णपणें पटलें आहे कीं नाहीं, हें मला समजत नाहीं. रा. टिळकांनीं जात, धर्म अगर वर्ण यायोगानें उत्पन्न झालेल्या परकीपणावर जोर देऊं नका असें वारंवार बजाविलें आहे. त्यांच्या मताप्रमाणें जेव्हां दोघांच्या हिताहितामध्यें विरोध उत्पन्न होतो, त्या वेळीं परकीपणा उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, स्वदेशी उद्योगधंद्यांची गोष्ट घ्या. रा. टिळकांनींच एक्साईज (गिरणींतील कापडावरील जकात) कराचें उदाहरण घेतलें आहे; व ते म्हणतात, तेवढ्या बाबीपुरता त्यांच्या व आमच्या हितांत विरोध उत्पन्न होतो. म्हणून त्या बाबीविषयीं सरकार परकीय आहे असें मी म्हणतों. या प्रश्नाला माझें पूर्ण उत्तर असें आहे कीं, भाषान्तरकारानें ' सरकार ' या मराठी शब्दाबद्दल " कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार " अशा अर्थाचे शब्द वापरले आहेत. वस्तुतः आपण सर्व भाषण वाचून पाहिलें म्हणजे आपणांस असें आढळून येईल कीं, रा. टिळक यांचा हल्ला अधिकारीवर्गावर आहे; सरकारावर नाहीं.

तिसऱ्या भाषणांतील " पशु " या शब्दासंबंधानें खालच्या कोर्टांत पुष्कळ चर्चा झाली होती. त्या बाबतींत माझें म्हणणें असें आहे कीं, पशूसारखे वागवितात असें म्हणण्याचा रा. टिळक यांचा हेतु नसून इतर राष्ट्रांप्रमाणें आमच्याहि राष्ट्राच्या भावना व आकांक्षा यांना योग्य मान मिळावा इतकाच आहे. ' पशूसारखा ' हा रोजचा प्रचारांतील शब्द आहे, व याचा वाच्यार्थ न घेतां व्यंग्यार्थ घेणें हेंच बरोबर आहे. खालच्या कोर्टांत पोपटाच्या गोष्टीलाहि आक्षेप घेतला गेला होता.

बॅ. जार्डिनः-येथें आम्ही तो आक्षेप घेऊं इच्छित नाहीं.

पुढें बॅ. जिना यांनीं तिसऱ्या भाषणांतील बराचसा भाग वाचून दाख-

विला व ते म्हणाले, सर्व भाषणांत रा. टिळकांचा मुख्य मुद्दा, सरकार पाहिजे, पण हल्लींची राज्यपद्धति नको, एवढाच आहे. राज्य चालविणारे अधिकारी आज आम्हांला जबाबदार नाहींत, ते तसे झाले पाहिजेत, असें रा. टिळकांचें म्हणणें आहे. तसेंच राज्यपद्धतींत हा जो फरक घडवून आणावयाचा तो पार्लमेंटला अर्ज करून म्हणजे पूर्ण कायदेशीर उपायांनीं आणावयाचा आहे, हेंहि रा. टिळकांनीं ठिकठिकाणीं स्पष्ट करून सांगितलें आहे. अशा भाषणांचा श्रोत्यांवर कांहीं विपरीत परिणाम होईल असें मला वाटत नाहीं. माझ्या तक्रारीचा निष्कर्ष हा आहे कीं, राज्यपद्धतीच्या एका विवक्षित अंगावर म्हणजे सिव्हिल सर्व्हिसवर रा. टिळकांनीं टीका केली आहे, व अशी टीका १२४ अ कलमाखालीं कशी येते हें समजणें फार कठीण आहे. होमरूल-लीग ही उत्तम संस्था असून तिचे सभासद लोकांनीं होऊन हल्लींची राज्यपद्धति बदलण्याची खटपट करावी, असा रा. टिळकांचा उपदेश आहे, यांत काय वावगें आहे? व याचा श्रोत्यांच्या मनावर वाईट परिणाम तरी कसा होतो, हें मला समजत नाहीं. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आपल्या हुकमामध्यें असें म्हटलें आहे कीं, रा. टिळकांचा श्रोतृवर्ग अज्ञानी होता. रा. टिळकांचा श्रोतृवर्ग मोठा पंडित होता, असें माझेंहि म्हणणें नाहीं; परंतु तो अगदीं अप्रबुद्ध–अडाणी होता, असें म्हणणेंहि रास्त होणार नाहीं.

न्या. बॅचलरः—श्रोतृवर्गांत सर्व मराठे शेतकरी होते काय?

बॅ. जिनाः—मॅजिस्ट्रेटपुढें असा पुरावा आला आहे कीं, श्रोतृवर्गांत व्यापारी, धंदेवाले वगैरे सर्व जातींचे व वर्गांचे लोक होते. मी पुन्हा म्हणतों कीं, रा. टिळकांचे श्रोते मोठे तैलबुद्धीचे नसतील; पण त्यांना अगदीं अडाणी म्हणणें गैरवाजवी आहे. रा. टिळक हे कांहीं स्वतःची जिह्वा शिणविण्याकरितां व्याख्यानें खास देत नव्हते. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आपल्या हुकमांत असें म्हटलें आहे कीं, रा. टिळक यांनीं वेळोवेळीं 'ब्युरॉक्रसी' असा इंग्रजी शब्द वापरला आहे; परंतु सर्व संदर्भ लक्षांत घेतां गव्हर्नर जनरलपासून पोलीस शिपायापर्यंत सर्व अधिकारीवर्ग व सर्व राज्यपद्धति यांवर रा. टिळकांचा हल्ला आहे. यासंबंधानें न्यायमूर्तींनीं सर्व भाषणें एकत्र वाचून त्याचा गोळाबेरीज अर्थ ध्यानांत घेतला, तर रा. टिळक यांची टीका सिव्हिल सर्व्हिसवर आहे, व प्रचलित राज्यपद्धति बदलून घ्यावी एवढाच त्यांचा उद्देश आहे, अशी आपली खात्री होईल; व म्हणून रा. टिळकांनीं

कांहींएक गुन्हा केला नाहीं असें माझें म्हणणें आहे.

यानंतर सरकारतर्फे अॅ. ज. हे बोलावयास उठले.

अॅ. ज. मि. जार्डिन यांचें उत्तर

'कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' या शब्दांचा मि. जिना यांनीं फार कीस काढला आहे. सदर सरकार म्हणजे राजा व पार्लमेंट हा अर्थ बरोबर नाहीं. न्या. स्ट्रॅची यांनीं या शब्दांचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. फुलबेंचपुढें हा प्रश्न त्या वेळीं गेला होता.

न्या. शहाः--सरकार व कायद्यानें प्रस्थापित सरकार याबद्दलचा मुद्दा त्या खटल्यांत किरकोळ होता, असें फुलबेंचनेंच म्हटलें नाहीं काय?

मि. जार्डिनः--होय.

न्या. बॅचलरः--सरकारची क्रिया एजंटमार्फतच होत असते. जंगलखातें, पोलिसखातें किंवा मी स्वतः ज्या दुर्दैवी 'ब्युरॉक्रसी-'पैकीं आहें ती ब्युरॉक्रसी हे सर्व एजंटच होत. सदर एजंटांविरुद्ध टीका कशा रीतीनें केली आहे हाच मुद्दयाचा प्रश्न आहे. हा प्रश्न कायद्याचा नसून, वस्तुस्थितीचा आहे.

मि. जार्डिनः--अंमलबजावणीचे अधिकार ज्यांच्यावर सोंपविलेले असतात ते अधिकारी म्हणजेच सरकार असें माझें म्हणणें आहे.

न्या. शहाः--आपण एखादें स्पष्ट उदाहरण घेऊं. जंगलखातें अगर सिव्हिल सर्व्हिस यावर टीका करण्यांत आली आहे असें समजा. अशी टीकाहि सरकारावरील टीकाच असें तुम्ही म्हणाल काय?

मि. जार्डिन--होय, मी बरोबर असेंच म्हणेन.

नंतर टिळकांच्या भाषणांतील कित्येक उतारे मि. जार्डिन यांनीं वाचून दाखविले व सांगितलें कीं, सरकार व ब्यूरॉक्रसी यांमध्यें आपल्या सोयीप्रमाणें टिळकांनीं भेद केला आहे. टिळकांनीं सरकाराला परकी म्हटलें आहे व म्हणूनच लोकांचें तें हितशत्रु आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ज्या आशा तृप्त करण्याचा इरादा नाहीं अशा आशा उगाच सरकार लोकांना दाखवितें असाहि त्यांचा आरोप आहे, व कंपनीच्या अमदानीप्रमाणें सरकारचा नुसता खिसे भरण्याचा क्रम अद्यापहि चालू आहे असें ते म्हणतात. लोकांच्या गुलामगिरीबद्दलहि त्यांनीं अनेकवार उल्लेख केला आहे. नंतर अनुभविक मामलेदारावर

नवा सिव्हिलियनहि कसा अंमल गाजवितो याबद्दलचें वाक्य मि. जार्डिन यांनीं वाचून दाखविलें.

न्या. बॅचलरः—ही तर रास्त टीका आहे.

मि. जार्डिनः—निःस्वार्थबुद्धीनें राज्यकारभार केला जात नाहीं, अशी अस्पष्ट सूचना टिळक करीत आहेत. मी म्हणतों कीं, अशा टीकेनें श्रोत्यांच्या अंतःकरणांत सरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न झालीच पाहिजे.

न्या. बॅचलरः—कोणतीहि टीका घेतली तरी तिच्यायोगानें टीका-विषयाबद्दल थोडी तरी अप्रीति उत्पन्न होणारच. प्रश्न एवढाच आहे कीं, खरोखर ' सरकार 'विरुद्ध अप्रीति उत्पन्न झाली आहे कीं काय? तुम्ही किंवा मी व्याख्यानास हजर होतों असें समजा. सरकार प्रत्यक्ष करीत आहे त्यापेक्षां त्यानें अधिक केलें पाहिजे, असाच ग्रह समंजस श्रोत्यांच्या मनांवर व्याख्यान ऐकून होणार नाहीं काय?

न्या. शहाः—लेख लिहिणाराला जसा विचारपूर्वक लिहिण्याला अवसर असतो तसा बोलणाराला नसतो, ही गोष्ट लक्षांत घेऊन वक्त्याच्या भाषणाकडे थोड्या सौम्य दृष्टीनें बघावयास नको काय? वक्त्यानेंहि अर्थात् कायद्याची मर्यादा उल्लंघितां कामा नये.

न्या. बॅचलरः—वक्त्याला कांहींच मेहेरनजर दाखवूं नये असें म्हणतां येईल काय?

नंतर वक्त्याच्या हेतूसंबंधानें मि. जार्डिन म्हणाले कीं, १०८ कलमा-प्रमाणें चाललेल्या खटल्यांत हेतु जमेस धरण्याचें प्रयोजनच नाहीं. म्याजिस्ट्रेटनें त्याचा विचारच करावयास नको.

न्या. बॅचलरः—वक्त्याच्या भाषणाचा परिणाम जर अप्रीति उत्पन्न कर-ण्यांत होईल, तर मात्र, माझा तसा हेतु नव्हता असें त्यानें म्हणून भागावयाचें नाहीं एवढें खरें.

बॅ. जिनांचें प्रत्युत्तर

बॅ. जिना यांनीं प्रत्युत्तरांत सांगितलें कीं, टिळकांनीं आक्षिप्त भाषणांत फक्त ब्युरॉक्रसीवर टीका केली आहे. १२४ अ अगर १५३ अ प्रमाणें त्यांच्या-वर जर गुन्हा शाबीत होण्यासारखा नसेल, तर १०८ कलमाचा उपयोगच करतां

येणार नाहीं. हेतूशिवाय राजद्रोह नाहीं, असा इंग्लंडांत कायदा आहे.

न्या. बॅचलरः—पण हिंदुस्थानांतहि तसाच कायदा आहे काय?

बॅ. जिनाः—माझ्या मतें तसाच आहे. १२४ अ मध्यें जें मूलभूत तत्त्व आहे त्याविरुद्ध जातां येणार नाहीं.

यानंतर न्यायमूर्तींनीं उद्यां निकाल देऊं असें सांगितलें.

ना. न्यायमूर्तींनीं दिलेला निकाल

गुरुवार ता. ९ नोव्हेंबर १९१६ रोजीं दोन प्रहरीं ११॥ वाजतां न्यायमूर्तींच्या स्वाऱ्या विराजमान झाल्या. निकाल ऐकण्याकरितां कोर्टांत पुष्कळच गर्दी झाली होती; कोर्टाबाहेरील ग्यॅलरींतहि मंडळींची फार गर्दी झाली होती. प्रथम न्यायमूर्ति बॅचलर यांनीं आपला निकाल पुढीलप्रमाणें वाचून दाखविला.

न्या. बॅचलर यांचा निकाल

पुण्याचे डि. म्याजिस्ट्रेट यांनीं क्रि. प्रो. कोडाच्या १०८ व पुढील कलमान्वयें एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल दहा दहा हजारांचे दोन जामीन व वीस हजारांचा जातमुचलका रा. बा. गं. टिळक यांनीं द्यावा असा जो हुकूम केला होता, त्याची तपासणी या कोर्टानें करावी, अशाविषयीं हा विनंतिअर्ज आहे. रा. टिळक यांनीं खटल्यांत दाखल असलेल्या तीन भाषणांचे द्वारें राजद्रोहाचा प्रसार केला, असें विद्वान म्याजिस्ट्रेटांचें मत झाल्यामुळें त्यांनीं हा हुकूम केला. आक्षिप्त भाषणें टिळकांनीं केलीं आहेत ही गोष्ट रा. टिळक यांनाहि कबूल आहे. तीं मराठींत केलेलीं असून आमच्यापुढें त्यांचीं भाषांतरें आहेत. भाषांतरें सारतः बरोबर आहेत, हें डिफेन्सपक्षानें कबूल केलें आहे. पण भाषांतरांत कोठें कोठें अधिक कडक शब्दांची योजना करण्यांत आली आहे, अशी त्यांची तक्रार आहे. भाषांतरांत कोठें कोठें अशी कडक शब्दयोजना असली तरी तेवढ्यावरून अर्थात् मोठासा फरक होऊन जाईल असें मला वाटत नाहीं. तेव्हां निकाल करण्याचा मुख्य प्रश्न एवढाच कीं, अर्जदारानें सदर तीन भाषणांच्या द्वारें पिनल कोडाच्या १२४ अ कलमान्वयें हिंदुस्थानांत कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न केली अगर करण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट सिद्ध झाली होती काय? माझ्या मतें या अर्जाचा विचार करतांना खरोखर कायद्याचे कोणत्याच प्रश्नाचा निकाल आम्हांला करावयास

नको आहे. तथापि "अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव" ही २२ बॉंबे, पान ११२ मधील न्या. स्ट्राची यांची व्याख्या बरोबर आहे, अशी जी गैरसमजूत म्याजिस्ट्रेटांनीं करून घेतली आहे, ती **कायद्याचे दृष्टीनें चुकीची आहे,** हें स्पष्ट सांगितलें पाहिजे. या गैरसमजाचा परिणाम त्यांनीं केलेल्या निकालावर झालेला आहे कीं नाहीं हें मी सांगूं शकत नाहीं; पण तसा परिणाम होणें संभवनीय आहे. म्याजिस्ट्रेटसाहेबांनीं अप्रीतीचा जो अर्थ केला आहे, तो इंग्रजी भाषेंतील Dis या उपसर्गयुक्त शब्दांचा अर्थ करण्याच्या नेहमींच्या प्रघाताला सोडून आहे. Dis या उपसर्गाचा असा अर्थ करण्याची वहिवाट नाहीं. नावड (Dislike) म्हणजे आवडीचा (Liking) अभाव किंवा अरुचि (Disgust) म्हणजे रुचीचा (Taste) अभाव एवढाच कांहीं अर्थ नाहीं. न्या. स्ट्राचींचा निकाल फुलबेंचापुढें गेला असतां त्यानें वरील भेद स्पष्ट केलेला आहे. १२४ अ कलमाला हल्लीं जें पहिलें स्पष्टीकरण जोडलें आहे, त्यावरून या बाबतींत कांहींच शंका उरलेली नाहीं. व प्रस्तुत खटल्याला लागू असणारा कायदा माझ्या मतें निर्विवाद ठरलेला आहे. डिफेन्सपक्षातर्फे जे आणखी दोन प्राथमिक आक्षेप घेण्यांत आले होते; पण त्यांबद्दल मला पाल्हाळ न करतां थोडक्यांत सांगावयाचें आहे; कारण, माझ्या मतें त्यांत कांहींच अर्थ नाहीं.

डिफेन्सपक्षाचा पहिला मुद्दा असा होता कीं, राजेसाहेब व पार्लमेंट यांच्याबद्दलची आपली राजनिष्ठा अर्जदारानें स्पष्ट शब्दांत व मनःपूर्वक सदर भाषणांत प्रकट केली असल्यामुळें त्यांपासून राजद्रोहाचा फैलाव होणें शक्य नाहीं. यावर माझें असें म्हणणें आहे कीं, राजा व पार्लमेंट यांच्याबद्दलची राजनिष्ठा कितीहि मनःपूर्वक असली तरी १२४ अ कलमाखालील हिंदुस्थानांत कायद्यानें प्रस्थापित असलेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्याच्या आरोपाला ती उत्तर होऊं शकत नाहीं. डिफेन्सपक्षाचा दुसरा मुद्दा असा होता कीं, भाषणांतील टीका कायद्यानें संस्थापित सरकाराविरुद्ध नसून फक्त सिव्हिल सर्व्हिसविरुद्ध आहे, सबब १२४ अ कलम लागू पडत नाहीं. मला वाटतें वस्तुस्थिति केवळ अशीच आहे असें नाहीं. तथापि तसें गृहीत धरलें तरीहि त्यायोगें आरोप खोडून निघत नाहीं; कारण, हिंदुस्थानांत कायद्यानें संस्थापित झालेलें सरकार मनुष्याच्याच मार्फत आपला व्यवहार चालवितें व शांततेच्या काळांत राज्य-

व्यवस्था पहाणारी सिव्हिल सर्व्हिस ही सरकारची एक विशिष्ट एजन्सी आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणून या भाषणांप्रमाणें ज्या वेळीं सबंध सिव्हिल सर्व्हिस-वर टीका करावयाची असेल त्या वेळीं बोलणारा सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न करतो कीं नाहीं हा माझ्या मतें कायद्याचा प्रश्न नसून पुराव्यानें सिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीचा प्रश्न आहे. सिव्हिल सर्व्हिसवर टीका करतांना नेमस्त व योग्य भाषेचा उपयोग केल्यास सरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न होण्याचा संभव टळेल.

भाषणांचा विचार करणें तो माझ्या मतें सर्व भाषणांचा एकदमच केला पाहिजे. सरकार किंवा आरोपी यांना अनुकूल काय होईल या दृष्टीनें अगर इकडचे तिकडचे कांहीं शब्द किंवा वाक्यें घेऊन अर्थ काय होतो हें पहाणें प्रशस्त होणार नाहीं. त्यांचा एकंदर परिणाम श्रोत्यांवर काय होईल हेंच मुख्यतः पाहिलें पाहिजे. अशा रीतीनें विचार केल्यास भाषणें १२४ अ कलमाखालीं येतात कीं काय हा मुख्य प्रश्न आहे.

भाषणें करण्यांत टिळकांचा हेतु काय होता, याचा विचार केल्यास हें स्पष्ट दिसतें कीं, स्वराज्याची मागणी त्यांत केलेली असून हिंदी राज्यकारभारा-वर हिंदी लोकांचा ताबा असावा व राजकीय सत्तेचा अंश दिवसेंदिवस हळूहळू पण अधिकाधिक हिंदी लोकांना मिळावा असें त्यांचें म्हणणें आहे. माझ्या मतें एवढीच मागणी करण्यांत गैरकायदेशीर कांहींहि नाहीं व त्याविरुद्ध सरकारतर्फे-हि अवाक्षर काढलेलें नाहीं. मला या ठिकाणीं येवढें सांगितलें पाहिजे कीं, मी जो विचार करीत आहें तो फक्त या खटल्यापुरताच आहे. 'स्वराज्य' शब्दाचे निरनिराळ्या वक्त्यांच्या तोंडीं निरनिराळे अर्थ होऊं शकतील, आणि ते सर्वच कायद्याच्या दृष्टीनें ग्राह्य असतील असें नाहीं. म्हणून मीं वर जी गोष्ट सांगितली ती कोर्टापुढील भाषणांतील स्वराज्यसंबंधाची आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

आतां वक्त्यानें यासंबंधानें काय भाषा वापरली आहे आणि आपल्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ कोणत्या उपायांचा अवलंब करण्यास तो सांगतो, हें पाहिलें पाहिजे. माझें म्हणणें राजद्रोही नाहीं असें त्यानें अनेकदां स्पष्ट सांगितलें आहे; पण नुसतें असें सांगणें बस्स नाहीं. परंतु वक्ता तसें सांगतो, हीहि गोष्ट इतर गोष्टींबरोबरच ध्यानांत ठेवली पाहिजे. आणि स्वतः निर्विकार मनानें भाषणें वाचून मला असें वाटतें कीं, स्वतःवरील राजद्रोहीपणाच्या आरोपाचा त्यांनीं केलेला निषेध ढोंगीपणाचा अगर कृत्रिमतेचा नाहीं. गुन्हा शाबीत होण्यास राज-द्रोह करण्याचा हेतु सिद्ध झाला पाहिजे. स्वतःच्या कृत्याचे स्वाभाविक व सहज परिणाम घडावे असा तें कृत्य करणाराचा हेतु असतो, असें गृहीत धरण्याची कायद्यामध्यें वहिवाट आहे. कायद्याच्या या वहिवाटीस अनुसरून टिळकांचा

हेतु भाषणांवरून काय दिसून येतो तें पाहूं. भाषणांतील कित्येक वाक्यांवर फिर्यादीपक्षानें केलेली टीका योग्य आहे. पुष्कळ ठिकाणीं या भाषणांतील भाषा व्यक्तिदृष्ट्या झोंबण्यासारखी अगर अपमान करण्यासारखी आहे. पण त्यावरून फार तर बोलणारा सदभिरुचीचा नाहीं किंवा रागीट आहे, एवढेंच सिद्ध होतें. त्यायोगानें फौजदारी कायद्याचा भंग होतो असें मला वाटत नाहीं. भाषणांत सुचविलेल्या उपायांत अगर योजलेल्या भाषेंत वक्त्याला पीनल-कोडाच्या कलमांत रास्त रीतीनें आणण्यासारखें कांहीं आहे काय हें पाहिलें पाहिजे. श्रोत्यांच्या मनावर भाषणांचा परिणाम काय होण्यासारखा आहे यावरून तें ठरविण्याचें असून १२४ अ कलमांत सांगितलेली ‘अप्रीति’ भाषणांपासून फैलावेल अगर कायद्यास असंमत नसणारी केवळ ‘नापसंती’ फैलावेल हें मुख्यतः पाहणें आहे. आमच्यापुढें झालेल्या उभयपक्षीय तक्रारींवरून आक्षेपार्ह भाषणांचा खरा अर्थ समजण्याच्या कामीं बरीच मदत झाली आहे; पण या तक्रारींत विवक्षित वाक्यावरच प्रत्येक पक्षाचा भर असतो ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, व आमचा हेतु तर एकंदर भाषणांचा परिणाम काय होण्यासारखा आहे, हें पाहण्याचाच आहे. दोनाहि पक्षांच्या तक्रारींचे मुद्दे ध्यानांत धरून व राजकीय दृष्ट्या अज्ञान असणाऱ्या श्रोत्यांपुढें भाषणें झालीं आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवून शांतपणानें काळजीपूर्वक टिळकांचीं तीनहि भाषणें प्रारंभापासून शेवटपर्यंत वाचल्यास त्यांचा वास्तविक परिणाम श्रोत्यांवर काय झाला पाहिजे हें सहज समजेल असें मला वाटतें. सदर भाषणें एकदां दोनदां नव्हे, तर अनेक वेळां वरील पद्धतीनें मीं वाचलीं असून त्यावरून माझा असा ग्रह झाला आहे कीं, फिर्यादीपक्षानें आक्षेप घेतलेलीं कांहीं वाक्यें खेरीज करून तीं ऐकून श्रोत्यांच्या मनांत सरकाराविरुद्ध अप्रीति, द्वेष किंवा शत्रुत्व स्वाभाविकतः उत्पन्न होणें शक्य नाहीं. ज्यास ‘जनता’ (People) म्हणण्यांत येतें, तिच्या हातीं राजकीय सत्ता न दिल्याबद्दल फार तर श्रोत्यांच्या मनांत सरकाराबद्दल ‘नापसंती-’चा मनोविकार तीं ऐकून उत्पन्न होईल. तीनहि भाषणांचीं छापील पानें ३४ आहेत; तेव्हां तीं सर्वच येथें देणें मला शक्य नाहीं. भाषणांचा एकंदर परिणाम काय होण्यासारखा आहे यावरूनच जरी मी निर्णय करणार आहें, तरी आधारादाखल कांहीं विशिष्ट उतारे देणें अगत्याचें आहे. स्वराज्याबद्दल टिळक काय म्हणतात हें त्यांच्याच शब्दांनीं पुढील उताऱ्यांत स्पष्ट होत आहे.

“पण परकी लोकांच्या हातची व्यवस्था कितीहि चांगली असली तरी ज्याला ही व्यवस्था करण्याचा अधिकार पाहिजे असतो, त्याला नेहमीं हें पसंत

असतें असें नाहीं. स्वराज्याचें हें तत्व आहे. तुम्हांला आपला कलेक्टर निवडण्याचे अधिकार मिळाले तर तो कलेक्टर हल्लींच्या कलेक्टरापेक्षां कांहीं अधिकच काम करील असें सांगतां येत नाहीं. नाहीं करणार कदाचित्, वाईटहि करील; मला कबूल आहे...थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्यासंबंधींची जी व्यवस्था ती आपल्या हातांत असावी, अशी जी मागणी ती स्वराज्याची मागणी...असा जर उद्योग तुम्ही आतां ५।२५ वर्षें चालविला तर ह्याचें फळ आल्याखेरीज केव्हांहि राहावयाचें नाहीं."

सदर उतारा फार महत्त्वाचा आहे; कारण, त्यावरून ज्या राजकीय सुधारणा टिळकांना पाहिजे आहेत, त्या एकदम पदरांत पडतील अगर लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं मिळूं शकतील अशी त्यांची अपेक्षा नाहीं, हें स्पष्ट होत आहे. दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणतात—

"ते अधिकार लोकांना द्या, म्हणजे लोक आपआपल्या घरची रीतीप्रमाणें व्यवस्था पाहतील. या प्रकारचें स्वराज्य आम्ही मागतों. स्वराज्य म्हणजे 'इंग्रज सरकार काढून टाका, बादशाहांची सत्ता काढून टाका, आणि आमच्या एखाद्या संस्थानाची सत्ता त्या ठिकाणीं स्थापन करा' असा या स्वराज्याचा अर्थ नव्हे...ज्या गोष्टी व्यवहारांतल्या, व्यापारांतल्या, धर्मांतल्या, आणि समाजांतल्या आहेत, त्या गोष्टी आम्हांला करावयाला पाहिजेत. त्या गोष्टी करण्याची सत्ता आमच्या हातांत थोडीबहुत आल्याखेरीज–सरतेशेवटीं पूर्ण आली पाहिजे–पूर्णपणें आमच्या ताब्यांत आल्याखेरीज आम्हांला कोणत्याहि प्रकारें सुवत्तेचा, भाग्योदयाचा, फायद्याचा किंवा उत्कर्षाचा काल येणें अशक्य आहे. लोकांच्या तोंडानें कांहीं पाणी पितां येत नाहीं. तें आपणच प्यावें लागतें......याकरितां तुम्हांला जर कांहीं कर्तव्य असेल, तर पहिलें कर्तव्य हें कीं, या सत्तेपैकीं कांहीं अंश आपल्या ताब्यांत घ्या, थोडाशा घ्याना...राजा दुसरा नको आहे; पण हे जे अधिकार आपल्या हातांतले गेले, आणि त्यामुळें आमची पोरक्या पोराप्रमाणें स्थिति होत चालली, ह्या सत्तेपैकीं भाग आमच्या ताब्यांत द्या."

राजकीय मागण्या या नात्यानें मला या गोष्टींचा विचार करावयाचा नाहीं व मी करूं इच्छीतहि नाहीं. वरीलप्रमाणें मागणीचें प्रतिपादन करितांना टिळकांनीं कायद्याचा भंग केला आहे कीं काय, एवढेंच मला जज्ज या नात्यानें पहावयाचें आहे. ध्येय कोणत्या उपायानें मिळवावयाचें याबद्दल टिळकांचे विचार ज्यावरून स्पष्ट होतील असे पुढील पांच उतारे मीं निवडून काढले आहेत.

"इंग्रज लोकांच्याच हाताखालीं, इंग्रज राष्ट्राच्या देखरेखीखालीं, इंग्रज राष्ट्राच्या मदतीनें, त्यांच्या सहानुभूतीनें, आणि त्यांच्या कळकळीनें, त्यांच्या

ज्या कांहीं उच्च भावना आहेत त्या भावनांच्या योगानें आम्हीं आपलें कल्याण करून घ्यावें, ही गोष्ट निर्विवाद आहे ... ... अशा तऱ्हेनें ह्याच्यामध्यें चांगली व्यवस्था मागावयाची आहे. हल्लीं जो कायदा आहे त्यामध्यें दुरुस्ती करून घ्यावयाची आहे. ती पार्लमेंटकडून दुरुस्त करून घ्यावयाची आहे. दुसऱ्याकडून नाहीं आम्ही मागणार. फ्रान्स देशाला अर्ज करून ही मागणी करून घ्यावयाची नाहीं. Allies असले तरी (त्यांच्याकडे अर्ज करावयाचा नाहीं.) इंग्रज लोकांना, इंग्रज पार्लमेंटाला अर्ज करावयाचा ... ... हल्लीं युरोप खंडांत जें युद्ध सुरू झालें आहे त्या युद्धामुळें आतां असें वाटूं लागलें आहे कीं, इंग्रजी साम्राज्याचे जे कांहीं अनेक प्रांत आहेत ते सगळे एकवट झाल्याखेरीज या साम्राज्याला जितकी शक्ति यावयास पाहिजे, तितकी शक्ति येणार नाहीं. आज असें झालें आहे कीं, त्यांचे जे दुसरे देश आहेत–आस्त्रेलिया, कानडा, न्यूझीलंड, येथें साहेबलोकांची वस्ती आहे–वसाहती म्हणतात त्यांना–त्यांची मदत आपल्याला पाहिजे आहे, अशी बुद्धि जागृत झाली आहे. या जागृत बुद्धीचा जर तुम्ही फायदा घ्याल तर तुम्हांलाहि कांहीं हक्क मिळण्याची संधि आलेली आहे. तुम्हांला हे हक्क कांहीं तरवार घेऊन मिळवावे म्हणून कोणी सांगत नाहीं. पण आज राष्ट्राची बुद्धि पालटली आहे. हिंदुस्थानाकडून इंग्लंडला कांहीं मदत होऊं शकते, हिंदुस्थान सुखी असलें तर इंग्लंडला एक प्रकारचें वैभव, एक प्रकारची शक्ति, आणि एक प्रकारें मोठेपणा येणार आहे, ही बुद्धि इंग्लंडांत जागृत झालेली आहे. ... ... ही लढाई झाल्यानंतर राज्यव्यवस्था कांहीं तरी निराळी करावी करावी लागेल ... ... मला तुमच्या पैकीं कोणाला असें सांगणें नाहीं कीं, हे हक्क मिळविण्याकरितां बेकायदेशीर गोष्टी करा. कायदेशीर मार्ग आहे."

सदर उतारे वक्त्याचा हेतु समजण्यास पुरेसे आहेत. त्यांत कांहींहि बेकायदेशीर नाहीं, इतकेंच नव्हे, तर ज्या राजकीय सुधारणा पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे त्या कायदेशीर व सनदशीर उपायांनींच घडवून आणावयाच्या आहेत, हेंहि वक्त्यानें अगदीं स्पष्टपणें बजावलें आहे. त्यानें दिलेल्या सर्व कारणांचा मी येथें निर्देश करीत नाहीं; पण त्याविरुद्ध साधारणतः बेकायदेशीरपणाचा आक्षेप आणतां येईल असें मला वाटत नाहीं. एक कारण असें म्हणण्यांत आलें आहे कीं, हिंदी संस्थानांचा राज्यकारभार हिंदी मुत्सद्दी बिनबोभाट करीत आहेत. खालसा मुलुखांतून इंग्रजी अंमलदारांना देत असलेला पगार फाजील अधिक आहे. हिंदी लोकांना वादविवाद करण्याची मोकळीक असली तरी राजकीय धोरणावर अगर तिजोरीवर त्यांची कांहींएक सत्ता

नाहीं. हल्लींचे अधिकारी हे वस्तुतः परकीय जातीचे आहेत व ते हुषार आणि उद्योगी असले तरी त्यांना लोकांचें कोठें अडतें हें चांगल्या रीतीनें कळत नाहीं.

हें म्हणणें राजकीय दृष्ट्या शहाणपणाचें अगर मूर्खपणाचें असेल; मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. ती रास्त टीका आहे, १२४ अ-खालीं दोषास्पद ठरणारी नाहीं एवढें मात्र मी म्हणूं शकतों. अशाच प्रकारचे मुद्दे तीनहि भाषणांत अनेक आले आहेत, आणि या सर्वांवरूनच बोलणाराचा हेतु ठरविला पाहिजे. अर्जदाराबद्दल रास्त बोलावयाचें म्हणजे, त्यानें भाषणांत सरकारचे फक्त दोष दाखविले आहेत असें नाहीं. ३१ मेच्या भाषणांत एके ठिकाणीं तो म्हणतो—

"या गोष्टी इंग्रजसरकारनें केल्या नाहींत असें माझें म्हणणें नाहीं; परंतु केल्या एवढ्या पुऱ्या नाहींत. ह्या गोष्टी केल्या आहेत, चांगल्या केल्या आहेत, पूर्वींच्या सरकारानें केल्या असत्या त्यापेक्षांहि इंग्रजसरकारानें अधिक चांगल्या केल्या आहेत, हें त्यांना भूषणावह आहे; पण ज्या गोष्टी सरकार करीत नाहीं, त्या गोष्टी आम्ही त्यास करावयास सांगूं नयेत कीं काय?"

एवढ्यावरच सर्व भागतें तर सरकारला खटला करण्याला आधार मिळणेंच कठिण होतें; पण दुर्दैवानें भाषणांत दोनतीन वाक्यें अशीं आहेत कीं, त्यांच्या समर्थनार्थ कांहींच बोलतां यावयाचें नाहीं. टिळकांच्या विद्वान् बॅरिस्टरांनींहि त्या वाक्यांचें समर्थन केलें नाहीं, व एवढ्याच वाक्यांवर मला निकाल करावयाचा असता अगर वक्त्याचा खरा हेतु त्यांत प्रतिबिंबित झाला आहे असें मला वाटतें, तर मीं मॅजिस्ट्रेटचा हुकूम कायम करण्यास कमी केलें नसतें. सदर वाक्यें येथें उतरून त्यांना जास्त प्रसिद्धी देण्याची माझी इच्छा नाहीं. पहिल्या भाषणांत गुलामगिरीबद्दल ज्यांत उल्लेख आहे तें व दुसऱ्या व्याख्यानांत, सरकार परकी व स्वार्थ पहाणारें असल्याबद्दलचा उल्लेख आहे तें, अशीं हीं वाक्यें होत. पण एवढ्याच वाक्यांवरून मॅजिस्ट्रेटाचा हुकूम न्याय्य मानतां येणार नाहीं; कारण, त्याचा पूर्वसंबंध पाहिला कीं, त्यांतील कडकपणा कमी होतो; शिवाय सर्व भाषणांचा एकंदर परिणामहि, त्या वाक्यांवरून होईलसा वाटणाऱ्या परिणामाहून भिन्न होणार आहे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. सारांश, १२४ अ कलमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या स्पष्टीकरणाचें अतिक्रमण करणारी टीका अर्जदारानें केली आहे असें सिद्ध होत नाहीं. म्हणून मॅजिस्ट्रेटाचा हुकूम मी रद्द करीत आहें.

नंतर न्या. शहा यांनीं आपलें जजमेंट वाचलें.

ना. न्या. शहा यांचा निकाल

पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनीं केलेला हुकूम रद्द व्हावा म्हणून हा अर्ज केलेला आहे. क्रि. प्रो. कोडाच्या १०८ कलमान्वयें मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं असा हुकूम दिला होता कीं, एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवीन अशाबद्दल वीस हजारांचा जातमुचलका व दहा दहा हजारांचे दोन जामीन अर्जदारानें द्यावे. क्रि. प्रो. को. १०८ कलमाखालीं अर्जदाराविरुद्ध अशी तक्रार करण्यांत आली होती कीं, इं. पी. को. १२४ अ कलमाखालीं गुन्हा मानला जाईल अशा राजद्रोही मजकुराचा अर्जदारानें फैलाव केला व हा फैलाव बेळगांव येथें तारीख १ मे रोजीं व अहमदनगर येथें ३१ मे व १ जून रोजीं स्वराज्य किंवा होमरूल या विषयांवर तीन व्याख्यानें देऊन केला. विद्वान् डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या मतानें १२४ अ कलमाखालीं राजद्रोही ठरतील अशीं हीं भाषणें आहेत म्हणून त्यांनीं वरील जामीन देण्याबद्दल हुकूम केला. या अर्जाच्या विचारांत मुख्य प्रश्न हा आहे कीं, आक्षिप्त भाषणें १२४ अ-खालीं येणारीं आहेत काय? स्वराज्य अथवा होमरूल हा या भाषणांचा विषय आहे. त्याविरुद्ध फिर्यादीपक्षाचें कांहीं म्हणणें नाहीं; स्वराज्य हा शब्द सुद्धां कांहीं वाईट हेतूनें वक्त्यानें वापरला आहे अशीहि त्याची तक्रार नाहीं. हिंदुस्थानांत कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराचे हेतु प्रामाणिक अगर शुद्ध नाहींत असा ध्वनि सदर भाषणांतून निघत असल्यामुळें तीं राजद्रोही आहेत असें खालच्या व या कोर्टांतहि फिर्यादीपक्षानें प्रतिपादिलें आहे.

"अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव" असा अर्थ विद्वान् मॅजिस्ट्रेटांनीं केला तो चुकीचा आहे. (इं. लॉ रि. २२ बॉ. पान १५१ व १५२ पहा.) १२४ अ-ला हल्लीं जें स्पष्टीकरण जोडलें आहे त्यावरूनहि तीच गोष्ट सिद्ध होते. ८ बॉ. लॉ रि. पान ४३७ मध्यें न्या. बॅटी यांनीं या प्रश्नासंबंधीं जे विचार प्रकट केले आहेत ते मला मान्य आहेत.

"हिंदुस्थानांत कायद्यानें संस्थापित झालेलें सरकार" म्हणजे काय याबद्दल आमच्यापुढें बरीच चर्चा झाली आहे. या खटल्यापुरतें पाहिल्यास, १९१५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमध्यें एकत्र केलेल्या निरनिराळ्या कायद्यांत ज्या ज्या सरकारांचा उल्लेख आहे, तीं तीं सर्व सरकारें हिंदुस्थानांत कायद्यानें संस्थापित झालेल्या सरकारांत अंतर्भूत होतात व हिंदुस्थानांतील कोणत्याहि भागांत सरकारचा अंमल चालविणाऱ्या व्यक्तींचाहि त्यांत अंतर्भाव होतो, असें माझें मत आहे. ब्युरॉक्रसीवरील टीका म्हणजे सरकारवरील टीका नव्हे, हें बॅ. जिना यांचें म्हणणें मला मान्य नाहीं. १२४ अ-मधील 'सरकार'

शब्दांत निरनिराळ्या सरकारी खात्यांचा अंतर्भाव होतहि नसेल अगर त्या खात्यांविरुद्ध केलेली टीका 'सरकार-'वरील टीका झालीच पाहिजे असेंहि नसेल; पण १२४ अ-मध्यें सरकारविरुद्ध ज्या मनोवृत्ति उत्पन्न होण्यास प्रतिबंध करण्याचा उद्देश आहे त्या मनोवृत्ति अनेक तऱ्हांनीं उत्पन्न करणें शक्य आहे व माझ्या मतें निरनिराळ्या खात्यांवर गैरशिस्त टीका करून तशा मनोवृत्ति उत्पन्न करणें अशक्य नाहीं. विवक्षित खात्यावरील टीका वरील मनोवृत्ति सरकारविरुद्ध उत्पन्न करण्यासारखी आहे कीं नाहीं, हें त्या टीकेची पद्धत, खात्याचा दर्जा वगैरेवरून ठरवावें लागेल; म्हणजे तो प्रश्न पुराव्यानें सिद्ध होणाऱ्या वस्तुस्थितीच्या विचाराचा होईल. पण कायदा पाहिला तर, एका खात्यावरील टीका हिंदुस्थानांत कायद्यानें स्थापलेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न करणारी म्हणजे १२४ अ-प्रमाणें दोषास्पद कधींहि होणार नाहीं, असें म्हणणें चुकीचें होणार आहे.

आतां टिळकांचीं भाषणें १२४ अ-खालीं येतात कीं काय तें पाहूं. सरकारविरुद्ध बोलणारानें केव्हांहि अप्रीति उत्पन्न करतां कामा नये, ही गोष्ट या बाबतींत नेहमीं लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. बॅ. जिना म्हणतात, राजाबद्दल राजनिष्ठा टिळकांच्या भाषणांत अनेक ठिकाणीं प्रकट झालेली आहे; परंतु तेवढ्यानें भागतें असें मला वाटत नाहीं. शिवाय फिर्यादीपक्षाची तक्रार टिळकांनीं 'सरकारा-'विरुद्ध अप्रीति उत्पन्न केली अशी आहे, राजाविरुद्ध केली अशी नाहीं. १२४ अ-खालील आरोपास राजाबद्दलची राजनिष्ठा उत्तर होऊं शकत नाहीं.

आक्षेपित भाषणें मराठींत केलीं आहेत व तीं पुष्कळ मोठीं आहेत. बोलणाराचा हेतु काय हें एकंदर भाषणांचा श्रोत्यांवर काय परिणाम होईल याचा विचार करून ठरविलें पाहिजे. तीं सर्व "उदार बुद्धीनें, सरळपणें व स्वतंत्र विचारानें" वाचावीं; "एखादा इकडचा कडक शब्द अगर एखादें तिकडचें कडक वाक्य घेऊन त्यावर जोर देऊं नये;" "क्षुद्र टीका करण्याच्या दृष्टीनें त्यांच्याकडे न पाहतां पूर्वग्रहविरहित स्वतंत्र दृष्टीनें त्याकडे पहावें." "अर्जदाराविषयीं उदारपणा धारण करून खटल्याचा विचार निस्पृहपणानें व छातीठोकपणानें केला पाहिजे." (R. Burns I6 case page 362) इत्यादि तत्त्वें मनांत ठेवून सदर भाषणें मीं वाचलीं आहेत. सदर भाषणें करण्यांत टिळकांचा हेतु होमरूलच्या बाजूला लोकमत वळविण्याचा व होमरूल-लीगला मेंबर मिळविण्याचा होता. होमरूलची सर्व चळवळ कायदेशीर मार्गानींच चालणार असल्याबद्दलहि भाषणांत स्पष्ट निर्देश आहे. अशा स्थितींत एकादुसऱ्या आक्षेपार्ह वाक्यावरून उलट अनुमान काढणें वाजवी होणार नाहीं. गुलामगिरी व सरकारच्या परकीपणाबद्दलचीं वाक्यें क्वचित आक्षेपार्ह आहेत. सर्व भाषणें

फिर्यादीपक्षाला अनुकूल अशा दृष्टीनें वाचून नंतर डिफेन्सपक्षालाहि अनुकूल दृष्टी ठेवून मीं वाचून पाहिलीं आहेत. पण त्यांचा एकंदर परिणाम कायद्यानें स्थापलेल्या सरकाराविरुद्ध अप्रीति उत्पन्न करणें हा होतो, असें मला वाटत नाहीं; म्हणून क्रि. प्रो. कोडाच्या १०८ अ–अन्वयें राजद्रोहाचा फैलाव सदर भाषणांच्या योगानें अर्जदारानें केला असें म्हणण्यास मी तयार नाहीं. कांहीं वाक्यें तेवढींच मागीलपुढील संदर्भ लक्षांत न घेतां वाचलीं तर तीं आक्षेपार्ह आहेत हें मीं म्हटलेंच आहे. पण तोंडीं दिलेल्या लांबलचक व्याख्यानांत त्या वाक्यांचा परिणाम जमेस धरण्यासारखा होणारा नाहीं. अर्जदाराचा राजद्रोह करण्याचा हेतु सिद्ध झाला नसल्यामुळें, सदर भाषणें १२४ अ-खालीं येत नसल्यासहि मॅजिस्ट्रेटाला १०८ कलमाखालीं जामीन देण्याचा हुकूम काढण्यास हरकत नाहीं, असा एक मुद्दा ॲ. जनरलांनीं आमच्यापुढें मांडला आहे. शीतलप्रसाद वि. किंग एंपरर (इं. लॉ रि. ४३ कलकत्ता ५०१) या खटल्याचा आधाराहि त्यांनीं दिला आहे. पण माझ्या मतें क्रि. प्रो. कोडाच्या १०८ अन्वयें राजद्रोह पसरविण्याचा हेतु शाबीत होणें प्रथम जरूर आहे. कलमाची भाषा स्पष्ट आहे व त्याचा अंमल झाला पाहिजे. वरील कोटिक्रम मान्य केल्यास १०८ कलमच निरर्थक होईल असें मला वाटत नाहीं. पीनल कोडाच्या १२४ अ-प्रमाणें प्रत्यक्ष राजद्रोहाचा खटला करण्यापेक्षां कित्येक वेळां क्रि. प्रो. कोडाच्या १०८ कलमाखालीं जामीन घेणेंच अधिक योग्य होण्याचा संभव आहे, व म्हणूनच या कलमाअन्वयें राजद्रोहाचा प्रतिबंध करण्याच्या बाबतींत सरकारच्या हातीं आणखी एक उपाय देण्यांत आला आहे. जामीन रद्द करण्याबद्दल न्या. बॅचलर यांनीं आतां जो हुकूम केला तो मला मान्य आहे.

दोघांहि न्यायमूर्तींचे निकाल वाचून झाल्यानंतर टिळकांनीं दिलेला जातमुचलका रद्द करण्याबद्दलचा हुकूम देण्याविषयीं बॅ. जिना यांनीं कोर्टास विनंति केली व कोर्टानें ती मान्य केली.

निकाल ऐकल्यावर लो. टिळक ना. पटेल यांच्या चेंबरमध्यें येऊन बसले. हायकोर्टाच्या आवारांत बरीच गर्दी त्यांच्या दर्शनार्थ जमली होती. चेंबरमध्यें त्यांना हार घालण्यांत आला व सर्वांस पेढेहि वाटण्यांत आले. न्या. बॅचलर व न्या. शहा यांनीं हायकोर्टाचें नांव राखलें अशी वाखाणणी ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येत होती. हायकोर्टांतून जातांना जमलेल्या लोकसमुदायानें टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांचा जयजयकार करून आपला आनंद व्यक्त करण्यास कमी केलें नाहीं.

परिशिष्ट १

[खालीं दिलेलें व्याख्यान सरकारच्या लघुलेखकांनीं जसें शुद्ध वा अशुद्ध लिहून दाखल केलें तसेंच छापलें आहे.]

लो. बाळ गंगाधर टिळक यांचें "होमरूल"वरील बेळगांव येथील व्याख्यान

तारीख १ मे सन १९१६.

स्थळः—१८ व्या प्रांतिक परिषदेचा तंबू.

वेळः—सायंकाळीं ६ ते ७-३० पर्यंत.

सदरहू व्याख्यान इतिहाससंशोधक मंडळाच्या मार्फत झालेल्या सभेनंतर तावडतोब देण्यांत आलेलें आहे.

पहिल्या प्रथम नामदार डी. व्ही. बेळवी यांनीं सुचविलें कीं, 'होमरूल' या विषयावर माझे मित्र बाळ गंगाधर टिळक यांचं व्याख्यान होणार आहे. या प्रसंगीं आपल्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष श्री. रा. रा. दादासाहेब खापर्डे ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें—अशी मी सूचना करतो. या सूचनेस रा. मासूर यांनीं अनुमोदन दिल्यानंतर दादासाहेब खापर्डे टाळ्यांच्या कडकडाटांत बोलावयास उठले. ते म्हणाले:—" आपल्या लोकांचे सुदैव समजा. तें सुदैव असें कीं, स्वराज्यासारखा विषय असावा आणि टिळकासारखे व्याख्याते असावे. या दोन्ही गोष्टी आपल्या घरीं जमून याव्या आणखी या वर्षीं स्वराज्यसंघ जो उत्पन्न करावयाचा त्याची स्थापनाहि आजच व्हावी हा त्रिवेणीसंगम येथें प्राप्त झाला आहे. तेव्हां आपण कृपा करून शांत मनानें लोकमान्य टिळकांचें म्हणणें ऐकून घ्यावें त्याचें मनन करावें तें मनामधें उत्तम प्रकारें उतरावें. तें इतके कीं स्वतः आपण स्वराज्यासंबंधानें कळकळ करणारे भांडणारे काळजी करणारे शिपाई बनावे.

'ज्या विषयाचा मनुष्य विचार करीत असतो त्या विषयाशी तो तद्रूप

होत असतो. भृंग नांवाच्या किड्याला संतती नसते. परंतु तो बाहेरचे किडे धरून आणून त्यांच्याकडे पाहतो आणि त्या किड्यांचें लक्ष आपल्याकडे घेतो. परिणामीं ते किडे भृंग होऊन जात असतात. याप्रमाणें आपण सुद्धां या विषयाचा अभ्यास करावा इतकें सांगण्यासाठीं मी उभा राहिलों आहे. यानंतर लोकमान्य टिळक आपला विषय सविस्तर सांगतील." (Cheers)

नंतर टिळक टाळ्यांच्या कडकडाटांत बोलावयास उठले. ते म्हणाले:—

"मला आज या ठिकाणीं व्याख्यान देण्याकरितां जेव्हां विनंति करण्यांत आली त्या वेळीं कशावर व्याख्यान द्यावें हें मला कांहीं कळेना. कोणत्याहि विषयाची विशेष तयारी करून आज मी आपल्यापुढें उभा राहिलों नाहीं. आलों होतों तो परिषदेकरितां. तेव्हां या २।४ दिवसांत ज्या विषयांची चर्चा झाली आणखी कांग्रसच्या—पूर्वी ज्या कामाकरितां येथें एक होमरूल लीग स्थापन झाली त्याच विषयासंबंधीं आपल्याला दोन शब्द कळविलें असतां अयोग्य होणार नाहीं असें वाटल्यावरून मी आजच्या व्याख्यानाचा तो विषय निवडला आहे.

स्वराज्य म्हणजे काय? ह्याच्या बद्दल पुष्कळांचा गैर समज आहे. कित्येकांनां ही गोष्ट कळत नाहीं. कित्येकांना ती गोष्ट कळून ते–तिचा विपर्यास करतात. कित्येकांनां ही गोष्ट नको असते. असे त्यांत अनेक प्रकार आहेत. तेव्हां स्वराज्य म्हणजे काय? आम्ही तें कां मागतो? त्याला आम्ही पात्र आहों कीं नाहीं? आणि आपल्याला ज्यांच्या जवळ ही स्वराज्याची मागणी करावयाची आहे त्यांच्या जवळ ती कोणत्या प्रकारानें केली पाहिजे; आपल्याला उद्योग करावयाचा तो कोणत्या दिशेनें आणि कोणत्या धोरणानें केला पाहिजे इत्यादि गोष्टींबद्दल चार सामान्य शब्द सांगण्यापलीकडे कोणत्याहि प्रकारचें विशिष्ट विवेचन करण्याला मी आज तयार नाहीं. हे जे सामान्य शब्द मी आपल्याला सांगणार आहे ते सामान्य शब्द केवळ माझ्याच प्रयत्नानें माझ्याच उद्योगानें आज उपस्थित झाले आहेत असें नाहीं. स्वराज्याची कल्पना फार जुनी आहे. अर्थात् स्वराज्य म्हटले म्हणजे 'स्व'च्या उलट कांहीं तरी राज्य असते आणि त्या वेळीं ही कल्पना निघत असते. हें उघड आहे. अशी स्थिति जेव्हां येते तेव्हां स्वराज्य असावें असें वाटूं लागतें आणि त्या कामाकरितां

माणसें उद्योग करतात. तशा स्थितींत तुम्हीं हल्लीं आहां. तुमच्यावर जे राज्य करीत आहेत ते तुमच्या धर्माचे जातीचे तुमच्या देशांतीलहि नाहींत. हें इंग्रज-सरकारचें राज्य चांगलें कीं वाईट हा प्रश्न निराळा. स्वकीय आणि परकीय हा प्रश्न निराळा. दोहोंचा घोंटाळा पहिल्यानें करूं नका. परकीय वा स्वकीय हा प्रश्न आला म्हणजे परकीय म्हटले पाहिजे. चांगलें कां वाईट हा प्रश्न आला तर चांगलें म्हणा किंवा वाईट म्हणा. वाईट म्हटलें तर त्यांत काय सुधारणा केली पाहिजे हा प्रश्न निराळा. चांगलें म्हटलें असतां पूर्वीच्या राज्यापेक्षां त्यांत चांगल्या गोष्टी कोणत्या हें पाहिलें पाहिजे. या भिन्न भिन्न दृष्टी आहेत. तेव्हां पहिल्यानें स्वराज्याची मागणी निघण्याचें कारण असें झालें आहे कीं, या पूर्वीं जीं आपल्या हिंदुस्थानांत अनेक राज्यें होतीं—कांहीं ठिकाणीं मुसलमानां[illegible] कांहीं ठिकाणीं रजपुतांचें होतें, कांहीं ठिकाणीं हिंदूंचे होते कांहीं ठि[illegible]शिवाय—ख्यांचे होतें. तीं हीं जीं स्वराज्यें होतीं तीं वाईट कां चांगलीं हा [illegible]परले म्ह-हें मी पुनः बजावतो. तें मग पाहूं. तीं सगळीं मोडून एकछत्री[illegible]या मदतीनें स्थानांत इंग्रज सरकारचें झालें आहे तीं मोडण्याचा इतिहास अ[illegible]योदय करून बघावयाचा नाहीं. कशीं मोडून गेलीं हें ही आपल्याला अ[illegible]सरा प्रश्न उप-नाहीं. मला सांगावयाचें ही नाहीं. पण हल्लींची राज्यव्यवस्था अ[illegible]या भेदामधेंच कांहीं इंग्लंडांत शिकलेले सुशिक्षित ज्यांना कालेजांतून चांगल्या प्र[illegible]ते त्यांच्या मिळालें आहे अशा कर्तबगारीचे लोक हिंदुस्थानांत येऊन त्यांच्या ह[illegible]व्यक्तभाव स्थानांतील राज्यकारभार चाललेला असतो. बादशहा हें नांव आहे.[illegible]गल तर म्हणून जी कांहीं एक प्रकारची भावना तुमच्या मनांत उत्पन्न होते त्या भा[illegible]वनेला व्यक्त स्वरूप दिलें म्हणजे हल्लींचा बादशहा होतो. ही भावना अव्यक्त आहे. या अव्यक्ताला व्यक्त स्वरूप दिलें म्हणजे राजा होतो—बादशहा होतो—पण कारभार कांहीं बादशहा पहात नाहीं. स्वराज्याचा जो प्रश्न आहे तो बादशहाबद्दलचा नव्हे आणि या अव्यक्त भावनेबद्दलचाहि नव्हे. हें पहिलें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोणताहि देश असो—त्याला राजा पाहिजे व्यवस्था करणारा कोणी तरी मनुष्य पाहिजे आणि त्यामधें एक प्रकारचें राज्यहि चाललें पाहिजे. अराजक राष्ट्रांची गोष्ट निराळी हीं राष्ट्रें कधीं वर येत नाहींत. घरामधें ज्या-प्रमाणें कोणी तरी व्यवस्था पाहणारा मनुष्य पाहिजे—घरचा पुरुष नसला तर

बाहेरचा trustee म्हणून आणतात तशीच राज्याची ही व्यवस्था आहे. कोणत्याहि देशांत त्यांतील कारभार चालविण्याकरितां कांहीं मंडळी असते; आणि कांहीं व्यवस्था असते. ही जी व्यवस्था आहे, ही जी मंडळी आहे ह्यांचा आणि अध्यक्षांनीं (प्रांतिक परिषदेचे अध्यक्षांनीं) आपल्या भाषणांत काल सांगितल्याप्रमाणें राजा या भावनांचें—या दोन्ही गोष्टींचें पृथःकरण केलें पाहिजे. राजा पाहिजे. राज्यव्यवस्था पाहिजे. हे दोन्ही सिद्धांत इतिहासदृष्ट्या अबाधित आहेत. ज्या देशांत व्यवस्था नाहीं ज्या ठिकाणीं राजा नाहीं म्हणजे देखरेख करणारी कांहीं एक मंडळी नाहीं त्या ठिकाणीं महाभारतांत असें वर्णन केलें आहे कीं "त्या ठिकाणीं शहाण्या मनुष्यानें एक क्षणभर आस्था होऊं नये. त्या ठिकाणीं आपल्या जीविताचा कधीं घात होईल आपलें द्रव्य आणि कोण चोरून नेईल–आपल्या घरावर केव्हां दरवडा येईल किंवहुना स्थापन झालेला आग केव्हां लागेल ह्याचाहि कांहीं नेम नाहीं." सरकार पाहिजे. अयोग्य होणा कृतयुगामध्यें काय काय होतें तें मी सांगत बसत नाहीं. त्या निवडला आहेना राजा लागत नव्हता. जो तो परस्परांचें कल्याण कशांत आहे

स्वराज्यवहार करीत असे. राजा नव्हता अशी एकदा स्थिति होती. असें कित्येकांनां तंणांतून वर्णन आहे. पण अशी स्थिति इतिहासाच्या काळीं होती किंवा करतथाचा जर आपण विचार केला तर इतिहासकाळीं अशी स्थिति नव्हत. असें दिसून येईल. कोणी तरी नियंता पाहिजे. सर्व लोकांना एके ठिकाणीं जमून दरएक वेळीं तें नियंत्रणत्व चालवितां येत नाहीं. म्हणून राजसत्तेचे नेहमीं दोन विभाग होतात. एक सल्लागार मंडळ आणि एक कार्यकारी मंडळ. हल्लीं हिंदुस्थानांत जो प्रश्न स्वराज्यासंबंधानें उपस्थित झालेला आहे तो या वरच्या अव्यक्त कल्पनेबद्दलचा नाहीं. आमच्यावर ज्यांनीं राज्य करावयाचें ज्यांच्या तंत्रानें हुकमानें ज्यांच्या अधिष्ठानाखालीं तें राज्य चालवावयाचें त्याबद्दलचा हा प्रश्न नव्हे. इंग्रज लोकांच्याच हाताखालीं इंग्रज राष्ट्राच्या देखरेखीखालीं इंग्रज राष्ट्राच्या मदतीनें त्यांच्या सहानुभूतीनें आणि त्यांच्या कळकळीनें त्यांच्या ज्या कांहीं उच्च भावना आहेत त्या भावनांच्या योगानें आम्हीं आपलें कल्याण करून घ्यावें ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि याबद्दल मला कांहीं बोलावयाचें नाहीं. (टाळ्या) ही पहिली गोष्ट आहे. दोन्ही गोष्टींचा

आणखी भ्रम करून घेऊन मनामधें घोंटाळा करून घेऊं नका. या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. आम्हाला जें कांहीं करावयाचें आहे तें कोणाच्या तरी–आज आम्हां अशा पंगू स्थितींत आहोंत म्हणून–सहायानें केलें पाहिजे. त्यांच्या आश्रयानें आपलें कल्याण आपल्याला करून घेतलें पाहिजे. एवढी गोष्ट निर्विवाद आहे. असें नसतें तर तुमचें स्वातंत्र्य कधींहि गेलें नसतें. तेव्हां ही गोष्ट जर आपण गृहीत धरली कीं इंग्रज सरकारच्या इंग्रजी राज्याच्या मदतीनें आपला भाग्योदय आपल्याला करून घ्यावयाचा तर यामधें जो कांहीं कांहीं लोकांना आणखी एक चमत्कारिक प्रकार वाटतो तो सर्व नाहींसा होईल. निराळ्या शब्दांनीं बोलावयाचें म्हणजे यांत कांहीं राजद्रोह नाहीं–मग तुम्हांला जर इंग्रज सरकारच्या मदतीशिवाय–इंग्रज सरकारच्या म्हणजे अव्यक्त इंग्रज सरकार असे शब्द वापरले म्हणजे कांहीं चूक व्हावयाची नाहीं–या अव्यक्त इंग्रज सरकारच्या मदतीनें या अव्यक्त इंग्रज सरकारच्या सहायानें जर तुम्हाला आपला भाग्योदय करून घ्यावयाचा असेल तर मग तुम्ही मागता काय आहात? हा दुसरा प्रश्न उपस्थित होतो. ह्याचें उत्तर पुनः मी आपल्याला जो भेद सांगितला त्या भेदामधेंच आहे. अव्यक्त जरी सरकार असले तरी ते जेव्हां व्यक्त होऊं लागते त्यांच्या हातून त्यांच्या कृतीनें त्या राज्याची व्यवस्था ठेवली जाते. हा जो व्यक्तभाव आहे हा अव्यक्त सरकारापासून निराळा आहे. कोणत्या प्रकारचा म्हणाल तर परब्रह्म जसें निराळें आहे मायेहून त्या सारखें. हें व्यक्त अव्यक्त शब्द मी वेदांतांतून घेतले आहेत. निर्गुण निराकार असे परब्रह्म निराळें. आणि मायेच्या मोहांत यावयाला लागलें म्हणजे मग त्याला जें व्यक्त स्वरूप येतें तें निराळें. तर मग हे मायेचे जे व्यवहार आहेत. ते पालटणारच. मायेचें लक्षण काय क्षणोक्षणीं बदलणें. सरकार रहावयाचें एक. अव्यक्त सरकार. आणि व्यक्त सरकार क्षणोक्षणीं पालटणारें आहे. स्वराज्य जो शब्द हल्लीं निघाला आहे तो व्यक्त सरकारा संबंधानें आहे. अव्यक्त सरकार एक ठेवून व्यक्त सरकार जें क्षणोक्षणीं बदलणारें त्यांत कोणत्या प्रकारचा बदल झाला असतां आपल्या राष्ट्राला श्रेयस्कर होईल हा प्रश्न स्वराज्याचा आहे. आणि हा स्वराज्याचा प्रश्न म्हटला म्हणजे आपल्या हिंदुस्थानांत हल्लीं ज्या तऱ्हेचा कारभार चालला आहे. तो कोणाच्या

हातांत असावा असा प्रश्न उपस्थित होतो. अव्यक्त सरकार-इंग्रज सरकार-आम्ही बदलूं इच्छित नाहीं. व्यक्त जें स्वरूप आहे ज्यांच्या हातून हें अव्यक्त सरकार कामें करून घेत आहे त्यांच्या हातीं नसून दुसऱ्या कोणाच्या हातीं यावा असें आमचें म्हणणें आहे. ज्यांच्या हातानें हे कारभार चालले जातात त्यापेक्षां दुसऱ्या कोणत्या तरी हातानें दुसऱ्या कोणाच्या तरी सहायानें दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्त मूर्तीनें हे केल असतां लोकांना हितकारक होईल अशा समजुतीनें हल्लीं जी स्वराज्याची चळवळ चालू आहे ती चळवळ आज चाल-लेली आहे. दुसरें उदाहरण द्यावयाचें असेल तर असें सांगतां येईल कीं इंग्लं-डांत बादशहा आहेत. एका इंग्रजी कायद्याचा असा नियम आहे कीं King commits no wrong राजा कधींही गुन्हा करीत नाहीं. कारण त्याची सत्ता अशा प्रकारें मर्यादीत केली असतें कीं त्याला जेव्हां कोणी एखाद्या प्रधा-नानें जाऊन सांगावें त्या वेळीं त्याला तें कळतें. मुख्य प्रधान आपल्या जबाब-दारीवर कार्यें करीत असतो. इंग्रजी इतिहासाचें अध्ययन केलेले एथें पुष्कळसे असतील. नाहीं असें नाहीं. हें तत्व त्यामध्यें मुख्य आहे. हें तत्व इंग्रजी इति-हासांत उद्भूत झालें असल्यामुळें तेथें राजद्रोहाचे खटले कमी होऊं लागले. आणि येथें हे राजद्रोहाचे खटले करूं लागतात. राज्य चालविणारे निराळे आणि राजा निराळा. राजा एकच परंतु प्रधानमंडळ पांच पांच वर्षांनीं बदलत असते. त्या वेळेला असें कोणी कांहीं म्हणत नाहीं कीं हें प्रधानमंडळ बदलावें याबद्दल जर कोणी कांहीं चर्चा करूं लागला तर तो राजद्रोह झाला. इंग्लीश लोकांच्या डोळ्यादेखत या प्रत्यही घडणाऱ्या गोष्टी आहेत. राजाचें मंडळ पांच वर्षांनीं गेलें दोन वर्षांनीं गेले त्यांनीं आपसांत वाटेल तितके भांडावें. राजाला काय? तो निर्गुण परब्रह्म. त्याला कांहीं याचा लेप नाहीं. तर हल्लीं हिंदुस्थानांत जी स्वराज्याची चळवळ आहे ती असले प्रधान मंडळ बदलण्याबद्दलची आहे. कोण हिंदुस्थानांत राज्य करतो. बादशहा येऊन करतात कां? मोठ्या प्रसंगी देवा-सारखी त्याची मिरवणूक काढावयाची त्यांच्या ठिकाणीं आपली निष्ठा आपण प्रदर्शित करावयाची एवढेंच त्यांचें काम आहे. मग राज्यकारभार चालला आहे कोणाच्या द्वारें? हल्लीं जे नोकर आहेत स्टेटसेक्रेटरी व्हाईसराय गव्हर्नर त्याच्या हाताखालीं कलेक्टर पाटील आहे पोलीस शिपाई शेवटीं घेऊं आपण

यांच्या द्वारें चालला आहे. एक पोलीस शिपाई बदलावा व दुसरा पोलीस शिपाई द्यावा असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय? एक कलेक्टर आला हा नको दुसरा कलेक्टर पाहिजे असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय? एक गव्हर्नर नको दुसरा गव्हर्नर आणा असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय? हा स्टेटसेक्रेटरी नको दुसरा आणा असें म्हटलें तर राजद्रोह झाला काय? कोणीही ह्याला राजद्रोह म्हटलें नाहीं. पोलीस शिपायाला जो न्याय लागू आहे तोच स्टेटसेक्रेटरीलाही लागू आहे. स्टेटसेक्रेटरी ज्या राजाचा प्रधान आहे ज्या राजाचा तो नोकर आहे त्या राजाचीच आम्ही प्रजा आहोंत. मग असें जर आहे तर हा स्टेट सेक्रेटरी नको हा व्हाईसरॉय नको बंगाल्यांत फुलरसाहेब नको. आणखी गव्हर्नरच्या बाबतींत असे पुष्कळदा ठराव झालेले आहेत. हल्लींच्या काळीं नाहींत. मागच्या काळीं. असें जर कोणी म्हटलें तर आणि त्याला कारणें दिलीं तर तुम्ही त्याला असें म्हणाल कीं ह्याचे डोकें फिरलें असेल तो कारणें देतो तीं बरी किंवा पुरी नाहीं. पण तो असें म्हणू लागला म्हणजे तो राजद्रोह झाला असें मात्र इतिहासदृष्ट्या होत नाहीं. (टाळ्या) आमचें जें मागणें आहे तें दुसऱ्या वर्गांतील आहे स्वराज्यासंबधानें आहे. मी काय म्हणतो हें नीट लक्षांत घ्या. हल्लीची राजव्यवस्था नीट चालली असेल असें जर तुम्हाला वाटत असेल तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. हल्लीं ज्या कांग्रेसा होतात कान्फरन्से होतात त्यामधें तुम्ही येऊन सांगतां कीं आमचें कुळकर्णी वतन घेतलें. जंगल खात्यासंबंधीं आमच्यावर ज़ुल्म झाला. अबकारीच्या संबंधी दारूचा अधीक प्रसार झाला. शिक्षणही आम्हाला ज्या तऱ्हेचे मिळाले पाहिजे त्या तऱ्हेचें मिळत नाहीं. या सगळ्यांचें मूळ काय आहे? हें नुसतें सांगण्यांत काय फायदा आहे. तुह्माला शिक्षण कां मिळत नाहीं? अबकारी खात्याचीं दुकानें जेथें आपल्याला नको तेथें कां उघडली जातात? फारेस्टमधें रिझर्व फारेस्ट अमूक फारेस्ट तमूक फारेस्ट अशा तऱ्हेचे कायदे होतात. तें कां झाले? हल्लीं कांग्रेसच्या पुढें ह्याच्या याद्याच्या याद्या येत असतात. ज्यूरी तुमचा बंद कां झाली तुमच्या इच्छेविरुद्ध? कर्नाटकांत आजपर्यंत कॉलेज कां निघालें नाहीं? हे सगळे प्रश्न अशा तऱ्हेचे आहेत कीं त्यांना एकच उत्तर आहे. आज आमचे विचार काय चाललेले असतात की कालेज नाहीं कां करा कलेक्टरला अर्ज किंवा गव्हर्नरला करा. कारण

त्यांच्या हातांत सत्ता आहे. ही सत्ता तुमच्या हातांत आली असती, त्यांच्या ठिकाणीं जर तुम्ही अधिकारी असता किंवा त्यांचे अधिकार लोकमताला जबाबदार असते तर या गोष्टी घडून आल्या नसत्या. याशिवाय याला दुसरें उत्तर देतां येत नाहीं. या घडून येण्याला कारण सत्ता तुमच्या हातांत नाहीं. तुम्ही म्हणजे ज्यांच्या कल्याणाकारितां ही सर्व व्यवस्था करावयाची असे जे तुम्ही त्यांना या गोष्टी ठरविण्याचा अधिकार दिलेला नाहीं. तेव्हां आम्हाला काय मागावयाचें असेल तें लहान पोरासारखे होते. भूक लागली म्हणजे तें रडते त्याला सांगता येत नाहीं भूक लागली. मग आईनें ओळखावयाचे भूक लागली असेल किंवा त्याच्या पोटांत दुखत असेल. कित्येक वेळेला उपचार होतात ते केवळ अनाठायीं होतात. तशी आपली आज सध्यां स्थितीं झालेली आहे. तुम्हाला काय पाहिजे कोठें आडतें आहे हें पहिल्यानें तुम्हाला कळत नाहीं मुळींच. त कळूं लागले तेव्हां तोंडानें तुम्ही बोलूं लागला. परंतु तुमच्या बोलाप्रमाणें करवून घेण्याची शक्ती तुमच्या हातामधें नाहीं अशी स्थिती असल्यामुळें हल्लीं काय झालेलें आहे. जें काय करावयाचें, जें काय पाहिजे तुम्हाला—घरामधें विहीर खणावयाला—पाहिजे कलेक्टरसाहेबाकडे अर्ज करा. रानांतील वाघ मारावयाला पाहिजे कलेक्टरसाहेबाकडे करा अर्ज. गवत मिळत नाहीं जंगलातील भारा मिळत नाहीं गवत तोडण्याची परवानगी पाहिजे करा कलेक्टरसाहेबाकडे अर्ज. म्हणजे हें सर्व दुबळयासारखे झालेले आहे. ही व्यवस्था आम्हाला नको आहे यापेक्षां कांहीं तरी चांगली व्यवस्था पाहिजे तें स्वराज्य. तें होमरूल. पहिल्या पहिल्यानें हे प्रश्न निघत नाहींत. ज्याप्रमाणें मुलगा लहान असला म्हणजे त्याला कांहीं कळत नाहीं. मोठा झाला म्हणजे या गोष्टी कळूं लागतात. मग त्याला असें वाटूं लागतें कीं आपल्या घरांतील व्यवस्था कांहीं तरी आपल्या मताप्रमाणें झाली तर चांगली. तसेंच राष्ट्राचें. ज्याप्रमाणें त्याला या गोष्टीचें विवेचन करतां येईल विवेचन करण्याची शक्ति त्याच्या अंगामधें येईल त्यावेळीं हा प्रश्न निघण्यासारखा आहे. पण आतां आमच्याइकडे अशी अवस्था झाली आहे कीं, आपण वरचा विचार सोडून द्या अव्यक्त सरकाराचा विचार सोडून द्या व्यक्त सरकारच्या मर्यादेंत या तर ही व्यवस्था हा राज्यकारभार करणारे लोक विलायतेहून कांहीं एक प्रकारच्या नियमानें

व कायद्यानें नेमले जातात आणि त्याचे धोरण कोणत्या प्रकारचे असावे याबद्दल त्या त्या कायद्याच्या मर्यादेंत नियम केलेले असतात. हे नियम चांगले असतील किंवा वाईट असतील. चांगले असतील मोठे अगदीं सुयंत्रीत असतील व्यवस्थीत असतील नाहीं—असें मी म्हणत नाहीं. पण लोकांच्या हातची व्यवस्था कितीही चांगली असली तरी ज्याला ही व्यवस्था करण्याचा अधिकार पाहिजे असतो त्याला नेहमीं हे पसंत असते असें नाहीं. स्वराज्याचें हें तत्व आहे. तुम्हाला आपला कलेक्टर निवडण्याचे अधिकार मिळाले तर तो कलेक्टर हल्लीच्या कलेक्टरापेक्षां कांहीं अधिकच काम करील असें सांगता येत नाहीं. नाहीं करणार कदाचीत. वाईटहि करील. मला कबूल आहे. पण यांच्या आणि त्यांच्यामधें भेद असा होतो कीं हा आम्ही निवडलेला असतो आमचा मनुष्य असतो आम्ही ज्या दिशेनें संतुष्ट राहूं इकडे तो पहात असतो. व जो दुसरा असतो त्याला असें वाटतें कीं, आमच्या बुद्धीला जें चांगलें तें इतरांना चांगलें वाटलेंच पाहिजे. लोकांचें काय ऐकायाचें. मी इतका शिकलेला मला इतका पगार मिळतो माझ्या ठायीं इतकी कर्तबगारी आहे मी जें करीन ते लोकांचे अकल्याण काय म्हणून करीन. उत्तर एवढेंच कीं अशी घमेंड आहे म्हणून (हंशा) एक मार्ग त्याला कांहीं नियम नाहीं. ज्याच्या पोटाला चिमटा बसतो त्याला त्याचा अनुभव नाहीं एवढेंच त्याला कारण दुसरें कांहीं कारण नाहीं. तेव्हां आपल्याकडे ज्या ज्या कांहीं तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत याचें सूक्ष्मरीतीनें विवेचन कराल तर हल्लींची जी पद्धती आहे ती पद्धती आम्हाला नको आहे. राजा नको आहे असें नाहीं. इंग्रज सरकार नको आहे असें नाहीं बादशहा नको आहे असें नाहीं ज्या पद्धतीमुळें ही राज्यव्यवस्था चाललेली आहे तींत एक प्रकारचा विशिष्ट फरक आम्हाला पाहिजे आहे. आणि तो फरक केला असतांना इंग्रज राज्याला कांहीं धोका येईल असें त्यांत मला तरी कांहीं दिसत नाहीं, मग कांहीं लोकांना आणखी ज्यांचा चष्मा आमच्याहून निराळा त्यांना दिसत असेल असें मानण्यास जागा आहे. कारण ते तसें बोलतात. (टाळ्या) तेव्हां अशा तऱ्हेनें जें इंग्रज सरकारचें राज्य चाललेलें आहे त्या राज्यपद्धतींत कोणता फरक केला पाहिजे या गोष्टीकडे आतां पुष्कळ लोकांची मनें लागलीं आहेत. आम्ही ज्या किरकोळ मागण्या

मागतो कीं अमुक एक घोडेगांवचें (दारूचें) दुकान उठवा त्यांनीं सांगावें उठवूं नये म्हणून. झालें. मिठावरचा कर कमी करा (असें म्हटलें तर) ते म्हणतात कीं मिठावर जें जकातीचें उत्पन्न येते ते–किती पैसे येतात इकडे आमचें लक्ष असतें. हा (कर) कमी केला, तर तिकडे कसें करावें पण जो व्यवस्था करणारा असतो त्याला ह्या गोष्टी करावयाच्या असतात. माझ्या घरच्या व्यवस्थेचा अधिकार जेव्हां मी मागतों, तेव्हां असें म्हणत नाहीं कीं तुमची जी प्राप्ती असेल ती मला द्या आणि खर्च करूं नका. खर्च आम्हालाच करावयाचा पैसे ही गोळा करावयाचे ही जी एक प्रकारची संयुक्त–जबाबदारी आहे ती आम्हाला पाहिजे आहे. मग आम्हाला काय करावयाचें तें पाहूं. हल्लीं असा तंटा आहे. दुसरे जे ब्यूराक्रसीचे लोक येतात अधिकारी वर्गाचे लोक येतात ते म्हणतात आमच्या मर्जीप्रमाणें करा आम्ही म्हणतो आमच्या मर्जीप्रमाणें करा म्हणजे सर्व दुःखांचें निरसन होईल. आपल्याला माहीत आहे कीं कित्येक वेळेला बापाजवळ एखादा मुलगा हट्ट धरून बसतो कीं मला २५ रुपयाची टोपी पाहिजे तो जर बापाच्या ठिकाणीं असता तर त्यानें टोपीला २५ रुपये दिले असते कीं नाहीं याची शंकाच आहे. बाप नाहीं म्हणतो पण त्याला त्यावेळीं वाईट वाटतें. आणि हें वाईट वाटतें तें कां वाईट वाटतें तर त्याला तें कळत नसतें. त्याच्या हातांत व्यवस्था नसते म्हणून. तर अशा प्रकारची राज्यव्यवस्था अमलांत येणें हें हिंदुस्थानाला श्रेयस्कर आहे. ही गोष्ट आज आम्हाला पाहिजे आहे. ही एक मिळाली असता बाकीच्या गोष्टी आपोआप ताब्यांत येतात. आम्ही ज्या हजारों गोष्टी मागतों त्या सर्वांचे मूळ हें एक आहे. ही किल्ली आपल्या हातांत सांपडली म्हणजे एकच नव्हे तर १०१५ दरवाजे आम्हाला एकदम उघडता येतील. अशा तऱ्हेचा हा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष लागावें म्हणून ही होमरूल लीग परवां येथें स्थापन केली आहे.

वाईट वाटेल कोणाला. नाहीं असें म्हणत नाहीं. प्रत्येकाला वाईट वाटतें. पूर्वी येथें सांगितलें कीं, मुलगा अज्ञानी असला म्हणजे बाप मरतांना पंच नेमतो. तो पंच नेमला म्हणजे तो पंच सगळ्या इस्टेटीची देखरेख करीत असतो. त्यांत कांहीं फायदाहि होत असतो नाहीं असें नाहीं. मग हा मुलगा

थोडासा मोठा होऊं लागला म्हणजे त्याला दिसतें कीं ह्याच्यामधें कांहीं गैरशिस्त आहे. मला व्यवस्था करण्याचा हक्क संपादन करावयाला पाहिजे. म्हणजे मी यापेक्षां बरी व्यवस्था ठेवीन. त्याला भरंवसा असतो. तशी तो ठेवतोच असें असा नाहीं. कदाचित् उधळा असला तर बापाचे पैसे उडवून टाकतो. पण असें त्याला वाटूं लागतें. आणखी या दोघामधें विरोध येऊं नये, म्हणून कायद्यानें अशी मर्यादा करण्यांत येतें कीं, २१ वर्षें झालीं म्हणजे ट्रस्टीनें आपली देखरेख पुरी करून ती मुलाच्या ताब्यांत दिली जावी. ही जी व्यवहारांतील गोष्ट ती ही. राष्ट्राला लागू आहे. राष्ट्रांतील लोक सुशिक्षित झाले त्यांना आपले व्यवहार कसें करावें हें कळूं लागले म्हणजे ह्यांच्याकरितां म्हणून जे व्यवहार इतर लोक करीत असतात ते आपल्या हातांत यावें अशी इच्छा होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण या इतिहासामध्यें किंवा राजकारणामध्यें मौज अशी आहे कीं हा जो २१ वर्षांचा कायदा आहे तो राजकारणांत नाहीं. शंभर वर्षें तुम्ही एखाद्या राष्ट्राला शिक्षण दिलें आतां त्याचा कारभार त्याच्या हातामधें द्या असें सांगणारा कायदा कोणत्याहि प्रकारें यदाकदाचित् कल्पिला तरी त्याची अमलबजावणी होणें कांहीं शक्य नाहीं. ही अमलबजावणी करून घेणें म्हणजे लोकांनींच करून घेतली पाहिजे. त्यांचा हक्क आहे. तेव्हां अशी कांहीं व्यवस्था आपल्याकडे पाहिजे. पूर्वीं अशी कांहीं थोडीशी व्यवस्था होती. तशी व्यवस्था हल्लीं नाहीं. आणखी ह्या सर्व आपल्या मागण्यांचे, आपल्याला जीं दुःखें होतात आपल्याला ज्या कांहीं उणिवा आहेत राज्यकारभारांत आपल्याला ज्या कांहीं गैरसोयी नजरेस येतात, त्या सर्वांचें मूळ यामध्यें आहे. आणि अशा तऱ्हेनें त्या मूळाची चौकशी करून त्याच्यावर जो उपाय योजिलेला आहे त्याला होमरूल असें म्हणतात. त्याचें नांव स्वराज्य. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्या संबंधीची जी व्यवस्था ती आपल्या हातांत असावी, अशी जी मागणी ती स्वराज्याची मागणी. पुष्कळांचे सुद्धां आतां याच्या विरुद्ध आक्षेप आहेत. मी नुसती व्याख्या सांगितली ती स्पष्ट करण्याकरितां सांगितली. दुसऱ्या बाजूचे लोक असतात ते नेहमीं त्याचा विपर्यास करीत असतात. हें मी आतां जें सांगितलें तें तर्कशास्त्राच्या विचारसरणींत जर कांहीं चूक नसेल तर ह्याच्या पैकीं कांहींसा विपर्यास केल्याशिवाय चूक कशी

उत्पन्न होणार. तेव्हां ज्यांना चूक दाखवावयाची असते ते लोक ह्याच्या पैकीं कांहीं वाक्यांचा विपर्यास करून हें अमूक आहे हे तमूक आहे असें करून त्याला नांवें ठेवीत असतात. तेव्हां ज्या गोष्टी आम्ही कधीं मागतही नाहीं त्या आमच्यावर लादणें आमची निंदा करणें आमचा एक प्रकारें लोकांमधें उपहास करणें हें कांहीं शहाण्या पुरुषाचें कर्तव्य नव्हे. या पेक्षां मी जास्त काय सांगूं. (टाळया) तेव्हां तुमच्या पैकीं असा गैर समज कोणाचा असेल तर तो काढून टाका. निदान एवढें पक्कें लक्षांत ठेवा कीं मी जें सांगतों तें सुसंगत आहे. हें तर्कशास्त्राला अनुरूप आहे. हें इतिहासाला धरून आहे. मी जो राजा म्हणजे जो अव्यक्त राजा किंवा सरकार सांगितलें याबद्दल कोणत्याही प्रकारचा गुन्हा होत नाहीं. मधें देवता असतात. कित्येक वेळेला परमेश्वर रागावत नाहीं. ह्या देवता क्रुद्ध होत असतात. मधल्या मधेंच. त्यांची व्यवस्था लावावी लागते. तेव्हां असा जो कांहीं गैरसमज झाला असेल तर तो काढावा. एवढयाकरितां मी हें सांगितलें.

आतां त्याचे स्वरूप मी आपल्याला सांगतों. आणि त्याच्याही पूर्वी आम्ही अशा प्रकारच्या राज्यकारभाराला योग्य आहों कीं नाहीं याहि प्रश्नाचा थोडाबहुत विचार करूं. मघाशी मी आपल्याला पंच आणि त्यांच्या हाताखालच्या वॉर्डचें उदाहरण दिलें. तेथें बहुत करून असें होत असतें कीं ज्यांना आणखी दुसऱ्याच्या हातामधें व्यवस्था जाऊं नये असे वाटते ते, मुलगा जसा जसा मोठा होईल तसें तसें रिपोर्ट होतात कीं त्याचें आतां डोकें फिरावयाला लागलें आहे. दुसरा म्हणतो वेड कांहीं लागले नाहीं. परंतु अर्धवट वेडा दिसतो. ह्याचें कारण ह्याच्यामधें दोन वर्ष व्यवस्था अधीक रहावी म्हणून. तिसरा सांगतो तुम्ही त्याच्या हातामधें अधिकार द्याल खरा परंतु त्याला वाईट सवयीं आहेत हें माहीत आहे काय? ह्यांनीं त्याच्याबद्दलच्या १०।५ गोष्टी सांगाव्या. इतकें करून करावयाचे काय? मग तो कोर्टांत जातो तंटा आणि मग तो वेडा आहे म्हणून ठरवून घेतात. तशा प्रकारच्या हल्लीं कांहीं आमच्याकडे गोष्टी होऊं लागल्या आहेत. लोकांच्या हातांत अधिकार देणें हें राज्यकारभाराचें उत्कृष्ट तत्व आहे. याबद्दल कोणी वाद करीत नाहीं कारण जे येथें अधिकारी आहेत त्यांच्या देशांत तोच प्रकार चालू आहे. तेथें गेलें असतांनां

त्यांना तेंच तत्व प्रतिपादन करावें लागतें. तेव्हां इतिहासाचें हें तत्व वाईट आहे असें कोणी सांगत नाहीं. मग वाईट काय आहे. हिंदी लोक स्वराज्याला आज पात्र झाले नाहींत (हंशा) असे स्पष्ट सांगतात. आणि आमच्यापैकीं कांहीं अशी मंडळी आहेत कीं—पंचतंत्रामधें त्रयाणां धूर्तानाम् गोष्ट आहे त्यासारखी आहेत. ती गोष्ट अशी. एक खेडेगांवचा मनुष्य एक मेंढरू डोक्यावर घेऊन आला होता. एक धूर्त त्याला म्हणाला तुझ्या डोक्यावर शेळी आहे. दुसरा म्हणाला तुझ्या डोक्यावर कुत्रा आहे. तिसऱ्यानें तिसरेंच सांगितलें. त्यानें मेंढरूं टाकून दिलें. धूर्तांनीं मेंढरूं नेलें. तशासारखी आमची स्थिति आहे. ही मनुष्य स्वभावाची गोष्ट आहे. तशीच आमच्यांत कांहीं मंडळी आहेत. कां आम्ही पात्र नाहीं! कारण आमच्यांत पात्रता आणली गेली नाहीं. आम्ही केलेले नाहीं. आमच्या आइबापांनीं केलेलें नाहीं. आम्हालाही असे अधिकार मिळाले नाहींत. पण सरकारानें तुम्हाला काऊन्सिलांतून कांहीं अधिकार दिलें आहेत. सिंह, चौबळ काऊन्सिलमधें आहेत. दुसऱ्या ठिकाणच्या एक्झीक्युटिव् काऊन्सिलामधेंहि निवडलेले लोक आहेत. हे लोक जेव्हां नेमणुकीकरितां निवडले गेले तेंव्हां कोणी असें कधीं लिहिले आहे काय कीं आम्ही पात्र नाहीं आम्हाला जागा देऊं नका. कोणी सांगितलें नाहीं. (टाळ्या) तेव्हां आमच्या सभेमध्यें येऊन सांगण्यांत काय फायदा ब्यूराक्रसी जेव्हां प्रत्यक्ष तुम्हाला एखादा मोठा अधिकार देईल त्या वेळेला उभे राहून ज्या वेळेला ही कोणी मंडळी म्हणूं लागतील कीं आम्हाला ते नको आम्ही त्याला पात्र नाहीं. आमच्या घरचे श्राद्ध ब्राह्मणानींच येऊन केले पाहिजे आम्हाला ते करतां येत नाहीं असे जेव्हां म्हणूं लागतील त्या वेळेला हे खरोखर बोलतात असें मी समजेन. अमक्याला आवडणार नाहीं म्हणून अशा गोष्टी सांगणें आणि अशा करतां अशा प्रकारच्या सबबी पुढें आणतात. तीं मनुष्यें एक प्रकारें आपल्या दुर्बल स्वभावाचें प्रदर्शन करतात असें मी समजतों. (टाळ्या) आम्ही पात्र कां नाहीं आम्हाला नाक नाहीं? डोळे नाहींत? कान नाहींत? बुद्धी नाहीं? लिहितां येत नाहीं? ग्रंथ वाचलेले नाहींत? घोड्यावर बसतां येत नाहीं? कां नाहीं आम्ही पात्र? शेक्सपीअरच्या एका नाटकांत एका ज्यूनें विचारलेल्या प्रश्नासारखे मी आपल्याला विचा-

रतो. नाहीं काय आम्हाला? तुम्ही काम केलें नाहीं. दिलेच नाहीं तर केव्हां करणार आम्हीं? (टाळ्या) देऊन, केलें नाहीं अशी कधीं गोष्ट झाली होती काय? तेव्हां कोणी सांगितलें नाहीं कीं आम्हीं नालायक आहोंत. आम्हाला नेमूं नका. त्यांनां तुम्हीं नेमतां त्यांच्याकडून काम करून घेतां व मग पाठी-मागून He has done his duty and so on असें सरकारी ठरावांतहि प्रसिद्ध होतें. उलट याही पेक्षां असें विचारावयाचे कीं विलायतेहून करकरीत २१ वर्षांचा मनुष्य तुम्ही आणता. त्याला काय करतां येते. त्याला कोठें अनु-भव असतो. तो एकदम येतो तो येथें assistant Collector होतो व ६० वर्षांचा मामलेदार असला तरी त्याच्यावर हाच. २१ वर्षांचा कलेक्टर कोठें (टाळ्या) ६० वर्षांचा अनुभव फुकट? २१ वर्षांचा मनुष्य येतो तो तुम्हाला सांगावयाला लागतो. या ६० वर्षांच्या मामलेदाराला बहूत करून तो आपल्या पुढें उभा करतो. बसावयाला खुर्ची ही देत नाहीं. आणि हा बिचारा १५०।२००।४०० रुपये मिळवावयाचे असतात म्हणून त्याच्यापुढें हात जोडून उभा असतो. (टाळ्या) मग या साहेबाला अनुभव मिळावयाचा कसा हा पात्र व्हावयाचा कसा आणि हें गाडें चालावयाचे कसें याचा कोणी विचार केला आहे कां? हिंदुस्थानातील लोक स्वराज्याला पात्र नाहींत त्यांच्या हातून आ-पल्या राज्याचा बंदोबस्त नीट ठेवतां येणार नाहीं अशी जर हीच गोष्ट खरी असती तर या देशामध्यें प्राचीन काळीं हिंदु व मुसलमान यांनीं कधींही राज्यें केली नसती. या देशांत पूर्वीं आपली राज्यें होतीं. व्यवस्था लावणारे पुरुष होते. ह्याचा पुरावा एवढाच ध्यावयाचा कीं इंग्रज सरकार या देशांत येण्यापूर्वीं कांहीं तरी व्यवस्था होती सर्वत्र अंधादुधीं नव्हती. एक मनुष्य दुसऱ्याला कांहीं मारीत नव्हता. अशी जर व्यवस्था होती तर ह्याला पात्र नाहीं असें कसें म्हणावयाचें? हल्लींच्या काळीं शास्त्राची प्रगति झालेली आहे माहिती वाढ-लेली आहे अनुभवाचा एके ठिकाणीं संग्रह झालेला आहे. तेव्हां पूर्वींच्या पेक्षां अधीक मोकळीक आम्हाला पाहिजे आहे. आणि आम्ही अधीक पात्र व्हाव-याला पाहिजे. उलट ते न होऊन आम्ही पात्र नाहीं पूर्वी काय असेल ते असो–हे म्हणणें सर्वस्वी चुकीचें आहे. द्यावयाचें नाहीं म्हणा यापेक्षां (टाळ्या) पात्र नाहीं हे शब्द लावूं नका असें माझें सांगणें आहे. निदान खरे तरी हे

द्यावयाचें नाहीं हें आम्हाला कळेल. आम्हाला ते मिळेल. पण आम्हाला का मिळत नाहीं तें? पर्यायानें सांगावयाचें कीं आम्हीं पात्र नाहीं. आम्हीं येथें आलो आहोत ते तुम्हाला शिकवायला आलो आहोत. हें कबूल आहे. पण किती दिवस शिकविणार! (हशा) १ पिढी, २ पिढया का ३ पिढया! ह्याला कांहीं अंत आहे का असेच आम्ही अंतीं तुमच्या हाताखालीं ... ... रावले पाहिजे (टाळ्या) कांहीं मर्यादा घाला. तुम्ही आम्हाला शिकवायाला आला. ज्यावेळीं शिक्षक घरामध्ये मुलाकरितां आम्ही नेमतो त्यावेळीं किती दिवसांत शिकविशील १० वर्षांत, २० वर्षांत का २५ वर्षांत असा प्रश्न त्याला विचारतो. दोन महिन्यांत चार महिन्यांत पण जर आमच्या अदमासाबाहेर सांगितले कीं, या मुलाचा जितका अभ्यास सहा महिन्यांत व्हावा तो वर्षांत होईल असें सांगितलें तर त्याला सांगतो तू कुचकामाचा आहेस, जा. आम्ही दुसरा शिक्षक नेमू. (टाळ्या) तेव्हां अशा तऱ्हेनें लोकांवर— सर्व लोकावर ज्या लोकाचें शिक्षण ह्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे, ज्याना सुधारणें हें ज्या अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे तें कर्तव्य करण्याचें एका बाजूला राहिलें. प्रयत्न करित असतात दुसऱ्या बाजूला. सांगावयाचे कीं आम्ही कितीहि प्रयत्न केले तरी हे लोक ह्या कामांला तयार होणें अशक्य आहे. ... ... तुमच्यासारखीं माणसें, तुमच्याइतकीं प्रबुद्ध तुम्ही त्यांना कामावर घेतां, त्यांच्याकडून काम करवून घेतां सक्ति कमी करतां असें नाहीं. खालसा (?) मुलुखामधें काय चाललें आहे? व्यवस्था कांहीं अडली नाहीं. म्हैसूरमध्यें काय अडली आहे? कोण कामें करीत आहेत. म्हैसूरचा राजा हिंदु, प्रधान हिंदु, प्रजा हिंदु, खालचे अमलदार हिंदु. म्हैसूर एवढें राज्य चालवितें तर म्हैसूरच्या पलीकडील दोन जिल्ह्यांतील लोकांना म्हणतात असें चालवितां यावयाचे नाहीं (हशा, टाळ्या) म्हैसूरच्या मुलुखांत सहा जिल्हे असतात तेव्हां सहा पात्र आणि आठ पात्र नाहीं असें म्हणण्यासारखें आहे पात्रता निःसंशय आमच्यामध्यें आहे (टाळ्या) मग कांहीं कारणामुळे तुम्ही ती कबूल करा अगर नका करूं. बरे पात्रता आमच्यामध्यें आहे असें मानावयाला प्रमाण काय आहे? नेटिव्ह संस्थान मी दाखविलें. दुसरें असें सांगतो. आपण एका बाजूला दहा वर्षें रहा. आणि चालतें कीं नाहीं हें पहा.

(टाळ्या, हशा.) नाहीं चाललें तर दहा वर्षांनीं तुम्ही आपल्या ताब्यांत घ्या. (टाळ्या) मोकळेच आहां तुम्ही. ... ... स्वराज्य नाहीं, स्वराज्य नाहीं म्हणजे काय? आम्ही काय मागतो? इंग्रज सरकारला हाकलून द्या असें म्हणतो? पण मी असें विचारतो कीं, बादशहाला काय सिव्हिल सर्वंटानें कारभार चालविला काय आणखी आमच्या वेळवी साहेबांनीं चालविला काय? (टाळ्या) बादशहाचें कांहीं नुकसान आहे का याच्यांत? तें राज्य कायमच आहे तो बादशहा कायमच आहे. फरक काय होणार कीं, त्याच्यापाशीं एक गोरा नोकर होता तो काळा होणार (टाळ्या) मग हा विरोध कोणाकडून येतो. तर अधिकारारूढ जे लोक झाले आहेत त्याच्याकडून हा विरोध होत असतो. हा बादशहाकडून विरोध होत नाहीं यांत कांहीं बादशहाच्या दृष्टीनें अराजकत्व आहे राजनिष्ठा नाहीं असें होत नाहीं, राजद्रोह होत नाहीं. राजद्रोह म्हणजे काय राजाचा द्रोह. राजा म्हणजे काय पोलीस शिपाई? (हशा) मघाशी मी सांगितलें कीं हा भेद पहिल्यानें केला पाहिजे. मग उद्या तुम्ही म्हणाल कीं पोलीसच्या शिपायाला काढा तर झाला कां राजद्रोह? पोलीस शिपायांची तशी समजूत आहे. (हशा) तसेच जरा वर चढा म्हणजे आपल्याला कळून येईल कीं जी कांहीं आपण मागणी करीत अहो ती बरोबर आहे, योग्य आहे, न्याय्य आहे, मनुष्यस्वभावाला अनुसरून आहे. इतर राष्ट्रांनीं तेच केले आहे. फक्त आमच्याकडे मात्र झाले नाहीं स्वराज्य स्वराज्य स्वराज्य म्हणजे काय? तुम्हाला इंग्रजी राज्य नको असें नाहीं. मुळांत चूक आहे. कांहीं तरी कोणाचा तरी त्याच्यामधें हेतु आहे. तुम्हाला फसविण्यामध्यें ज्यांचें हित आहे अशी माणसे ही कोटी पुढे आणीत असतात याला कांहीं भीक घालू नका. तुम्हाला जर वाटत असेल कीं तुम्ही इतर माणसासारखी माणसें अहांत तर विलायतेंत गेले म्हणजे त्यांच्या बुद्धीची, त्यांची परीक्षा तेथें होते. त्यांत आम्ही वर येतो. मग दुसरे काय निघाले? बुद्धी चांगली असेल तुमची पण तुमच्या अंगांत शील, धैर्यादिगुण, त्यांचा स्वभाव तुमच्यांत नाहीं. ही गोष्ट मला घटकाभर कबूल आहे. पण येणार नाहीं असे होत नाहीं. (हशा) ज्यांचा जन्म सेवा करण्यांत गेला त्यांचा स्वभाव तरी असा कसा बनणार? असें जर सांगितले कीं ज्यानें कारकुनीचे काम २५ वर्षे केलें, कांहीं हुकूम साहेबानें

द्यावे, यानें ते लखोट्यावर लिहावें, त्यावर साहेबाची सही घेऊन पाठवावे तेव्हां त्याला २५।४० वर्षांची सवय झाली तरी पहिल्या पहिल्यानें काम करण्याला अडचण पडेल नाहीं असें नाहीं पण अशीं माणसें ज्या पद्धतींत आहेत ती गेली असतां पुढच्या पिढींत तयार होणार नाहीं असें मात्र सांगतां येणार नाहीं. तेव्हां माझ्या समजुतीनें आम्ही स्वराज्याला पात्र आहोंत. आतां आम्ही काय मिळवूं इच्छितों आणि काय आपण मागावें हें मी आपल्याला थोडक्यांत सांगणार आहे. व माझें भाषण पुरें करणार आहे हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा आहे हें आपल्याला माहीत आहे. पण सांगावयाची गोष्ट अशी कीं ती विशिष्ट कायद्याप्रमाणें होत असते. तिचे नियम ठरलेले आहेत. स्टेट सेक्रेटरीचे अधिकार काय गव्हर्नर जनरलाचे अधिकार काय त्यांत पद्धतीचे तीन मोठे भाग आहेत. विलायतेंत स्टेट सेक्रेटरी साहेब आहेत. हिंदुस्थानांत दिल्लीला गव्हर्नर जनरल आहे. याखालीं इलाख्यापर्यंत एक गव्हर्नर आहे. ह्याच्या खालचे तूर्त सोडून देऊं. पण मोठी व्यवस्था म्हणजे ही तीन प्रकारची आहे ह्या रीतीची. आतां पुढें प्रत्येकीं विचार करावयाला लागलो तर स्टेट सेक्रेटरी नेमतो कोण? आम्ही नाहीं. ही जी रचना केली आहे ती कंपनी सरकारच्या धोरणावर केली आहे. ईस्ट इंडिया कंपनीकडे जेव्हां या देशांत राज्य होते तेव्हां व्यापारी तत्वावर सर्व व्यवहार चालला होता. कंपनीच्या भागीदारांना पुष्कळसा नफा कसा मिळेल इकडे सगळे लक्ष असे. आणि कंपनीचे जे डायरेक्टर होते ते हल्लींच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं होते. सगळें राज्य चालविण्याचा हा एक मक्ता दिलेला होता म्हणांनां. पेशवाईत मक्त्याच्या मामलती होत्या. ईस्ट इंडिया कंपनीकडे जणूं हा सरकारच्या त्या वेळेच्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थानचा राज्यकारभार हा एक त्यांचा व्यापार होता. त्यांतून जितका फायदा मिळेल तितका घ्यावा. कंपनीचे डायरेक्टर विलायतेंत असावयाचे त्यांचे लक्ष असावयाचें कीं डायरेक्टरला म्हणजे भागीदारांनां नफा द्यावा लागतो इकडे गव्हर्नर जनरलाला पत्र यावयाचें कीं आम्हाला यंदाच्या सालीं इतका नफा दिलाच पाहिजे. तसा तो उत्पन्न करून आमच्याकडे पाठवा ही राज्यव्यवस्था. लोकांचे त्याचेमधें हित नाहीं. गवळी आणि त्याच्या गाई. गाई दूध देत नाहींत तर मग तो सांगतो कीं पाणी घालून भरून आण. तसा हिंदुस्थानचा व्यवहार

चालला होता. हा राज्यकारभार कांहीं चांगल्या प्रकारचा नाहीं. असें पुढें वाद-विवादाअंतीं दिसून आलें. आणि राणीसरकारांनीं व्हिक्टोरिया राणी सरकारांनीं जेव्हां आपल्या ताब्यांत घेतला पार्लमेंटनीं आपल्या ताब्यांत घेतला म्हणा त्या वेळेला ही व्यापाराची पद्धती त्यांना पसंत पडली नाहीं. त्यांनीं आपल्या हाता-मध्यें घेतला हा एक भाग झाला. आपल्या हातांत घेते वेळेला व्यापारी म्हणून जे कांहीं धोरण राहिलें होतें तेथें विलायतेमध्यें डायरेक्टर होते येथें त्यांचे नोकर असत त्या धोरणाचें अनुकरण करून ही राज्यपद्धति बसविलेली आहे. डायरेक्टराच्या ऐवजी स्टेट सेक्रेटरी आला आहे. त्यांचा जो गव्हर्नर होता त्याच्या ठिकाणीं गव्हर्नर जनरल. म्हणजे केलें काय? व्यवहार राजानें आपल्या ताब्यांत घेतला पार्लमेंटनें आपल्या ताब्यांत घेतला पण नोकर लोकांची जी प्रणाली होती ती तशीच तेथें कायम राहिली आहे. ही गोष्ट १८५८ सालीं बंडानंतर झाली. तेव्हां पासून आतांपर्यंत त्या कंपनीच्या धोरणावर रचलेल्या नियमाप्रमाणें व्यवस्थेप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार चाललेला आहे. जर राजा-कडे वास्तविक जावें राजा होता तेव्हां हे कंपनीचे स्वरूप जावें. तो राजा त्याची आम्ही प्रजा. प्रजेच्या कल्याणाकरितां राज्य करणें हा त्याचा धर्म. आणि त्या धर्माप्रमाणें जे नियम असतील—कायदेशीर—त्या प्रकारची व्यवस्था झाली पाहिजे. पण ही व्यवस्था अशी झाली कीं डायरेक्टर गेला त्याच्या ठिकाणीं स्टेट सेक्रेटरी आला. हिंदुस्थानांत किती पैसा खर्च करावयाचा कोणते कर बसावयाचे हे ठरवावयाचे कोणी. तर स्टेट सेक्रेटरीनें. गव्हर्नर जनरलाला असे अधिकार ठेवले नाहीं. हा मुख्य अधिकारी. ह्याच्या हाता-खालचे गव्हर्नर हा नोकर. आणि त्याच्या हाताखालीं दुसरे नोकर. आणि एकं-दर सर्व राज्यकारभार या स्टेट सेक्रेटरीच्या संमतीनें ह्याच्या विचारानें ह्याच्या सल्यानें चालला पाहिजे. असें हल्लींचें धोरण आहे. पुढें काय झालें.—हल्लीं हल्ली व्यापारीच धोरण हें जरी राणीसरकाराकडे राज्यकारभार गेला त्यांनीं मोठा जाहीरनामा काढला तरी त्या जाहीनाम्याच्या धोरणावर मात्र राजधोरण नाहीं. राजधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर राज्याची व्यवस्था कंपनीच्या धोरणावर. आणि जाहीरनामा मधल्यामधें फुकट. (हंशा. टाळ्या) अशी व्यवस्था झाली. त्या वेळेला आमच्या कडच्या लोकांना कळलें नाहीं.

मला वाटतें त्या वेळेला जर हल्लींच्या इतका शिक्षणप्रसार असता, तर लोकांनीं तक्रार केली असती कीं खुद्द राणी सरकारनें ज्या अर्थीं आपल्या हातांत राज्याची सूत्रें घेतली आहेत त्या अर्थीं राजा व प्रजा ह्यांच्या प्रकारें राज्याची व्यवस्था प्रजेच्या हिताची असावी. कंपनीनें जी (व्यवस्था) केली होती ती केवळ आपल्या फायद्या कारितां केली होती. त्या धोरणांत त्या व्यवस्थेत फरक झाला पाहिजे असें आपल्या लोकांनीं त्या वेळेला सांगितलें असते. लोकांनीं ह्या तक्रारी पुष्कळ वर्षें चालविल्या. अगदीं कमीत कमी आपल्याला सांगावयाचे असेल तर ही व्यवस्था पाहिलेले – ह्यांत काय उणीवा आहेत हे दाखविणारे आमच्यांत जे पुरुष हयात आहेत त्यांपैकीं ते दादाभाई नौरोजी (टाळ्या) हे हयात आहेत. त्यांनीं या कामाकरितां उपक्रम केला. काय उपक्रम केला? त्यांनीं सांगितलें कीं कंपनीच्या व ह्याच्यांत भेद काय आम्हाला कांहीं नाहीं यांत नियम केले ते सर्व कंपनीच्या धोरणावर लोकांना कांहीं आहे कां त्यांच्यामधें फायदा? मग ही कायदे काउन्सिलें निघाली. तीं हीं अशीं कीं गव्हर्नर जनरलानें आम्हाला नेमावयाचें. पहिलें कांहीं लोकांनीं नेमावयाचें नव्हते. हळूं हळूं म्युनिसिपालिटींत तुमचे कामगार झाले. कायदे काउन्सिलांत झाले तरी अखेरच्या किल्या अझून त्यांच्यांत ताब्यांत आहेत. कायदे काउन्सिलांत वादविवाद करावा. वादविवाद करण्याला तुम्हाला पूर्ण मोकळीक आहे. हे पैसे इकडे खर्च करा याबद्दल वादविवाद करा. करावयाचे कीं नाहीं तें आम्ही ठरवूं. तुमच्या तोंडाला तुमच्या मनाला वाटेल तेवढे श्रम द्या आमची कांहीं हरकत नाहीं. रात्रभर जागा आपली Speeches तयार करा वर्तमानपत्रांत छापण्या ऐवजीं मुंबईच्या ग्याझेटांत प्रसिद्ध करूं. एवढाच काय तो फरक. यामधें कांहीं मिळाले नाहीं. मिळण्याची आशा दाखविली आहे. महाभारतांत एक श्लोक आहे. त्यांत असे सांगितलें आहे कीं "आशां कालवतीं कुर्यात्" हक्क तुम्हाला द्यावयाचे आहेत तुम्ही पात्र व्हाल तेव्हां. आम्हाला हिंदुस्थानांत राहण्याची इच्छा नाहीं. तुम्ही तयार झाला म्हणजे तुमच्या ताब्यांत गाठोडे द्यावयाचें आणि विलायतच्या बोटींतून विलायतला जावयाचे (टाळ्या) अशी कालमर्यादा घालावी. दोन वर्षांत देऊं दहा वर्षांत देऊं. पुढें अशी वेळ आली 'कालं विघ्नेन योजयेत्,' दहा वर्षें सांगितली होती. हे दिवस मेले ते मोठे खडतर गेले

दहाचे पंधरा करणें भाग पडले आहे. 'आशां कालां विघ्नेन योजयेत्' विघ्न आले तुम्हीच आणलें असेल. आमच्या हातून नाहीं आलें. आम्ही चांगल्या काळाची वाट पहात होतो. त्याला निमित्त जोडून द्यावें. निमित्त आले. निमित्त तरी कसें आले? निमित्त त्याला कांहीं सांगतां येत नाहीं. कांहीं तरी दुसरेंच कारण दाखवावें ही एकप्रकारची नीति आहे. जेव्हां तुम्हाला द्यावयाचें नसतें तेव्हां कसें बोलता? तेव्हां हाल्लीच्या काळांत नीतिशास्त्रांत राजकीय ग्रंथात लिहिले आहे असें नाहीं. जुनी परंपराच चालत आलेली आहे. तेव्हां असें या ब्यूराक्रसीने चाळवीत ठेवलें आहे—आम्हांला गेल्या पांच पन्नास वर्षांमधें स्टेट सेक्रेटरी गव्हर्नर जनरल ह्यांनीं सुद्धां असें चाळवीत ठेवलें आहे तरंगत ठेवलें आहे—जराशीं तुम्ही गडबड करावयाला लागला पांच मेंबर होते तें आम्ही उद्यां सहा करणार. पांचाचे सहा करून आम्हाला काय फायदा? उगीच आमच्या पैकी एखाद्या मनुष्याला चार दिवस फुकट तेथें रखडावयाला लावावयाचे. (टाळ्या) या पेक्षां कांहीं फायदा नाहीं त्याच्यांत. सहाला तुम्ही तक्रार केली आठ करतो. आमचे जे १० आहेत ते बारा करतो पाहिजे तर (हंशा टाळ्या) हें उत्तर. अशी तऱ्हेनें याचा कांहीं निकाल लागावयाचा नाहीं. अशी लोकांची खात्री होऊन चुकली आहे. तुम्हाला जे कांहीं हक्क द्यावयाचे असतील ते तोडून द्या आम्हाला. तुमचे अधिकार कितीहि मोठे असोत एका विद्याखात्याचीच व्यवस्था घेतली तर बहुतेक खालचे नोकर आहेत ते आमचेच आहेत. वर एक साहेब असतो. तो कशाला ठेवावयाचा कीं त्यांचीं तोंडें त्यांच्या बुद्धीची मर्यादा आकुंचित करण्याकरितां. मग २० वर्षे नोकरी केली तरी साहेबाशिवाय व्हावयाचे नाहीं काम असें हा म्हणावयाला लागतो बिचारा.

... ...

... ह्यांच्यामधें दोन भेद दिसून येत आहेत. एथें या पलीकडे एकानें माळयाला बाग तयार करावयाला सांगितली. म्हणजे तो कुंड्या पहातो. फारेस्ट डिपार्टमेंटमध्यें मोठीं रानें तयार करावयाचीं असली म्हणजे कुंड्या नाहीं लागत बियांचीं पोतीं आणतात आणि सोडून देतात सरास. झाडें वाटेल तेवढीं वाढतात. कांहीं लहान होतात कांहीं मोठीं होतात तशा प्रकारची ही व्यवस्था आहे. तशा प्रकारची ही व्यवस्था आहे. या

व्यवस्थेमुळें आमच्यांतील झाडें वाढत नाहीं. किंबहुना काळजीच. असते कीं बागेंतील कुंडयांत घातलेलीं झाडें गोजिरवाणी दिसतात हातानें त्यांचीं फुलें फळें तोडतां येतात. तशा तऱ्हेचीं हीं गोजिरवाणी झाडें वाढावीं अशा तऱ्हेचें त्याला शिक्षण दिलें जातें. अशा तऱ्हेनें त्याला वागविलें जातें राबविलें जातें. आणि मग २५।३० वर्षें गेल्यानंतर हा म्हणूं लागतो आपण खरोखरच या कामाला पात्र नाहीं. ही पद्धती आम्हाला नको आहे इंग्रज सरकार पाहिजे आहे. या राजछत्राखालीं आम्हाला रहावयाचें आहे. पण हा स्टेट सेक्रेटरी म्हणून जो जांवई उत्पन्न केला आहे (टाळ्या) तो जांवई आम्हाला नको. ह्याच्या निदान सल्लागार मंडळांत आमचे लोक पाहिजे आहेत आम्ही निवडलेले. ही पहिली सुधारणा झाली पाहिजे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचा खर्च कोण करणार पैसा किती गोळा करणार कर किती बसविणार हें आमच्या मतानें ठरलें पाहिजे. (टाळ्या) आम्ही म्हणतो ते कर नसावयाला पाहिजेत. ते म्हणतील खर्च कसा चालेल ते पुढें आम्ही पाहूं. आम्हाला इतकें कळतें कीं जितके पैसे असतील त्या मानानें खर्च करावा लागतो किंवा जितका खर्च होईल त्या मानानें पैसे वसूल करावे लागतात. हें आम्हाला समजतें हें पाहूं आम्ही मग कोणती तरी व्यवस्था — होमरूलचें दुसरें तत्व असें आहे कीं हे अधिकार लोकांच्या हातांत पाहिजेत. चांगल्या माणसांच्या अर्थात लोकांनीं निवडून दिलेल्या लोकांच्या हातांत पाहिजे. आतां एवढी लढाई चालली आहे युरोपमधें. लढाईवर किती पैसा खर्च करावा लागतो हें बादशहा कांहीं ठरवीत नाहीं. आस्क्विथ ठरवितात, मग आस्क्विथनीं काम केलें त्याच्यावर तक्रार झाली तर ती पार्लमेंटापुढें जाते आणि आस्क्विथची चूक झाली तर आस्क्विथला राजीनामा द्यावा लागतो. राजीनामा देण्याची त्याला पाळी आली म्हणजे तो राजद्रोह झाला? व्यवस्थेंत फरक आहे. मांडणींत फरक आहे. पद्धतींत फरक आहे. आणि अशा प्रकारचा फरक पद्धतींत आपण मागत आहोंत. राज्य बुडेल, राज्य जाईल, हे विचार मुळीं बाहेरचे आहेत. आमच्या मर्यादेंत आमच्या टप्यांत आमच्या नजरेंत येत नाहींत. आणि हें पण आम्ही इच्छित नाहीं. पुन्हा असें सांगतों कीं जर राष्ट्राला सुख व्हावयाला पाहिजे—हजारों ज्या आज तक्रारी उपस्थित झालेल्या आहेत, त्या जर काढून टाकावयाच्या

असतील तर पहिल्यानें ही राज्यपद्धती बदला. मराठीमधें एक म्हण आहे. "घोडा कशानें अडला, विडयाचीं पानें कशानें सडलीं, भाकरी कशानें जळली?" त्याला उत्तर एक. न फिरविल्यामुळें. पानें चाळवावयाला पाहिजे होतीं. भाकरी फिरवावयाला पाहिजे होती. घोडा फिरविला असता तर तो अडला नसता. त्याचें मूळ असें आहे कीं आमच्या जंगलाच्या तक्रारी काय अबकारीच्या तक्रारी काय—कुळकर्णी वतनाच्या तक्रारी काय—सत्ता आमच्या ताब्यांत नाहीं म्हणून. ह्याचें थोडेंसें भाषांतर केलें तर स्वराज्य नाहीं म्हणून. (टाळ्या) स्वराज्य आम्हाला असणें हें मूळ आहे त्याच्यांत. मग कांहीं कोणाच्या तंत्रानें नाचावयाला नको. असेंही होईल नाहीं असें मी म्हणत नाहीं. स्वराज्यामधें कीं आम्हाला पैशाची तूट आली असतां तुमच्या हातांत अधिकार आलें असतां तुम्ही कर वाढवाल, आपण होऊनच वाढवाल. खर्च कोठून करावयाचा? पण तो आपण होऊन वाढविलेला असल्यामुळें तो आपल्या मनावर कांहीं जाचावयाचा नाहीं. परक्यांनीं विद्वान लोकांनीं सांगणें आम्हाला असें या दरवाजामधून आम्ही चाललो म्हणजे या दरवाजांतून न जातांना त्या दरवाजातून जा पण तेथें कोणी येऊन उभा राहिला या दरवाजांतून जाऊं नको म्हणायाला तर त्याला आह्मी धक्का देऊन बाहेर जाणें आहे तशीच ही स्वराज्याची गोष्ट आहे. ही ब्यूराक्रसीची नडवणूक आहे. आम्हाला अशी नडवणूक नको आहे. स्वराज्याची मागणी म्हणजे अशी आहे कीं तींत राजद्रोहाचा संबंध नाहीं. बादशहाचा संबंध नाहीं. अव्यक्त सरकारचाहि पण संबंध नाहीं ही जी कांहीं घरची व्यवस्था तुमची तुह्मीच करावी आणि असें केलें असतांना काय होईल एक तर मनें तुमची शांत राहतील. तुम्हाला काय करावयाचें तें आपल्या हिताकारितां आपण करीत आहोंत अशा बुद्धीनें कराल इतकेंच नव्हे पण खर्चही आपण कमी कराल. मला वाटत नाहीं कीं कोणत्याही नेटीव संस्थानांत कलेक्टरला पंचवीसशे हें रुपयें पगार नाहीं. जगामधें कलेक्टराचें काम करणाऱ्याला मनुष्याला अधिकांत जर अधीक कोठें पगार असेल तर तो हिंदुस्थानांत आहे. (टाळ्या) पूर्वीच्या राज्यांत एका कलेक्टरला २५०० रुपये पगार म्हणजे सरासरी ३०००० ची वर्षांची जहागिरी होते. ती आपण आपल्या स्वराज्यांत ३०००० ची जहागिरी कधीं काढून दिली आहे कां? ३०००

रुपये म्हणजे कांहीं थोडे होत नाहींत. कारण आहे त्याला. काय कारण देतात. प्रत्येक गोष्टीला कांहीं तरी कारण असते हें ध्यानांत ठेवा. ह्याला २५०० रुपये विलायतेला पाठवावे लागतात मुलींकरतां वगैरे. विलायतेतल्या थंड हवेतून उष्ण हवेंत येतात प्रकृती बिघडून येतात. तुमच्या कल्याणाकरितां तर मग त्यांना पगार द्यावयाला नको. इतकी मेहनत केली स्वार्थत्याग केला इतके कष्ट सोसले त्यांनीं आणि त्याला पैसे देत नाहीं तुम्ही एकदा सांगितलें म्हणजे सकृद्दर्शनी बरोबर वाटते. पण आतां मुख्य प्रश्न असा आहे कीं तिकडून इकडे येण्याला त्याला कोणी सांगितलें? (टाळ्या) आम्ही कांहीं बोलाविले नव्हते. जशी योग्यता असेल तुझी तसें तूं काम करतोस. तुझ्याइतकी योग्यता आमच्यांत असेल पण तें काम आम्हांला कमी पगारात करतां येईल. मनुष्यें मिळतात. मग इतका कां त्याला एवढा पगार आम्हाला जरूर नाहीं शिक्षणा कडे आज पैसे आपल्याला मिळत नाहींत असें वाटतें. लोकोपयोगी कामें करण्याकरितां पैसे नाहींत ही सबब पुढें येते ती प्रथम नाहींशीं होईल. व्यवहार इतका सुरळीत चालेल. आरंभीं नाहीं सुरळीत चालणार. यदाकदाचित एक आणा रुपयांत कमी चालेल तरी तो (व्यवहार) आपल्या लोकांनीं चालविला आहे आणि तो लोकांच्या अनुमतीनें ह्यामुळें जें कांहीं चीज होईल त्याची किंमत अधिक आहे. अशा तऱ्हेनें ह्याच्यामधें चांगली व्यवस्था मागावयाची आहे हल्लीं जो कायदा आहे त्यामध्यें दुरुस्ती करून घ्यावयाची आहे. ती पार्लमेंटकडून दुरुस्त करून घ्यावयाची आहे. दुसऱ्याकडून नाहीं आम्ही मागणार. फ्रान्स देशाला अर्ज करून ही मागणी करून घ्यावयाची नाहीं. allies असले तरी (त्यांच्याकडे अर्ज करावयाचा नाहीं) इंग्रज लोकांना इंग्रज पार्लमेंटाला अर्ज करावयाचा त्यांच्या पुढें ही स्थिति मांडावयाची याकरितां जें कांहीं करावयास लागेल तें करावयाचें असा जर उद्योग तुम्ही आतां ५।२५ वर्षे चालविला तर ह्याचें फळ आल्या खेरीज केव्हांही रहावयाचें नाहीं. त्यांतून आतां जी लढाई चालू आहे त्या लढाईमुळें आतां अशी वेळ आली आहे कीं हिंदुस्थानाची किंमत हिंदुस्थानचें शौर्य हिंदुस्थानचें धैर्य आणि स्थैर्य ज्या तऱ्हेनें वाढेल असा कांहीं तरी उद्योग करणें प्राप्त आहे. हा उद्योग ते (आपण) करीत असतात ही गोष्ट जर सरकारच्या

बजरेस आली तर आपली मागणी लवकर सफल होण्याची आशा आहे. याकरितां हा विषय मुद्दाम मी आपल्यापुढें घेतलेला आहे. दुसरीकडेही या विषयाची चर्चा चालू आहे. आम्ही याकरितां जो संघ स्थापिला आहे तो असा आहे कीं या उद्योगाला आजच नव्हे तर पुढें कांहीं दिवसांनीं प्रत्येक ठिकाणीं मला किंवा दुसऱ्या कोणाला विषय मांडण्याचा प्रसंग येईल हा जो विषय आहे हा आपल्या चर्चेमध्यें ठेवून त्याची नित्य चर्चा करा त्याचे नित्य ध्यान करा त्याचा उपयोग काय आहे हें समजून घ्या त्यांत राजनिष्ठपणा किती अराजनिष्ठपणा किती ह्याची नीट मीमांसा करून ठेवा असें आजच्या प्रसंगी माझें आपल्याला सांगणें आहे. माझें जें कांहीं म्हणणें आहे तें जरी यापेक्षां पुष्कळ अधिक असलें तरी त्यांतील मथितार्थ काय आहे तो मी थोडक्यांत आपल्याला सांगितला आहे ह्याचा विचार आपल्याकडे सुरू झाला महाराष्ट्रांत सुरू झाला हिंदुस्थानांत सुरू झाला तर केव्हाना केव्हां तरी या उद्योगाला यश येणार आणि ही परमेश्वराच्या हातची गोष्ट असली तरी ती अवश्य आहे. आमच्या हातची नाहीं हें मी कबूल करतो. पण कर्माचा परिणाम होणें हें जगांत कांहीं चुकत नाहीं. कर्माला फळ केव्हांना केव्हां तरी मी म्हणतो इतक्या लवकर मिळणार नाहीं माझ्या डोळयादेखत मिळणार नाहीं कदाचित मला त्यापासून फायदा व्हावयाचा नाहीं परंतु या कर्माचें फळ हें झालेंच पाहिजे. (टाळ्या) मग कर्माच्या कायद्याप्रमाणें अमूक कर्म केले त्याच्यापासून दुसरे उत्पन्न होते. त्याच्यापासून तिसरे उत्पन्न होते अशी ही परंपरा चालते. वेळ लागेल उशीर लागेल. परंतु आम्हाला मोक्ष हा आमच्या डोळयादेखत व्हावा म्हणून तरी कोठें मागतो. अमूक पुरुषाच्या हातून व्हावा अशा बुद्धीनें तरी कोठें मागतो. आताच आपल्या परिषदेमध्यें ठराव पास झाला माडरेट्स आणि न्याशन्यालिस्ट हे पक्ष नकोत. म्हणजे कोणालाहि स्वराज्य देणें आम्हाला सारखेच आहे उद्यां तुमच्या शिपायाला दिले अधिकार तरी हरकत नाहीं. कारण तुम्ही म्हणाल शिपाई एवढा मोठा अधिकार चालवील कसा. शिपाई केव्हां तरी मरावयाचा आहे. आणि मग पुढें पाहूं. (टाळ्या) हक्क आम्हाला पाहिजे आहेत. अमूक एक प्रकारची सुखकर व्यवस्था आम्हाला पाहिजे आहे. आम्हाला मिळेल. आमच्या मुलाबाळांना मिळेल उद्योग करणें तो करा. हें आपलें काम

आहे अशा बुद्धीनें या उद्योगाला प्रवृत्त व्हा. माझी खात्री आहे कीं, परमेश्वर कृपेनें या उद्योगाचें फळ तुमच्या डोळ्यादेखत नाहीं तरी तुमच्या पुढील पिढीला मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. (टाळ्या)

Compared by B. S. Purandhare.
Comparing fee Rs. 2—3—0
Copy applied for by Mr. S. K. Damle, Pleader for Mr. B G. Tilak on—24th July 1916.
Copy ready on—26th July 1916.
Copy delivered on—26th July 1916.

True Copy
G. W. HATCH,
District Magistrate, Poona.

M. S. K.
D. C.

परिशिष्ट २

[खालीं दिलेलें व्याख्यान सरकारच्या लघुलेखकांनीं जसें शुद्ध वा अशुद्ध लिहून दाखल केलें तसेंच छापलें आहे.]

लो. बाळ गंगाधर टिळक यांचें "होमरूल" वरील
नगर येथील पहिलें व्याख्यान

(ता. ३१ मे १९१६)

चोकर वकील म्हणाले कीं:—

सद्गृहस्थहो आज आपल्या शहरचा मोठा भाग्याचा दिवस आहे. आज आपल्याला श्रीयुत लो. टिळक (टाळ्या) यांचेकडून उपदेशामृत ऐकण्याचा लाभ होणार आहे तेव्हां त्या विषयीं जास्त आतां कांहीं एक बोलता ते ज्य विषयावर बोलतील त्या विषयावर ते जें विवेचन करतील ते आपण शांत अंतः- करणानीं कांहीं एक गडबड न करतां ऐकावे. आणि त्या प्रमाणें वर्तन करण्याचें मनामधें आणावे. एवढी आपल्याला विनंती करून मी (referriug to Tilak) आपल्याला व्याख्यान सुरूं करण्यास विनंति करितो. (टाळ्या)

लो. बाळ गंगाधर टिळक म्हणाले:—

सद्गृहस्थहो, आपल्याला कांहीं दोन शब्द सांगण्यापूर्वी माझे पहिले काम आपले अत्यंत आभार मानणें हें होय. आपण या ठिकाणीं मला बोलावून माझा जो सन्मान केला मला जे मानपत्र दिले याबद्दल आपले आभार मानणें हे माझे पहिले कर्तव्य आहे. आपण मला जो मान दिलांत तो ज्या कांहीं हेतूनें दिला असेल तो जरी कोणत्याही प्रकारचा असला तरी मला या प्रसंगीं आपल्याला जे दोन शब्द सांगावयाचे आहेत ते माझ्या कार्यासंबंधाचे आहेत. कदाचित ही गोष्ट आपल्याला विपरीत वाटेल. आपण मला याठिकाणीं बोलावून आणले. आणि मी आपलेच कार्य तुमच्या पुढें सांगावे हा एक प्रकारचा विरोध आहे. टिळक येथें आले आणि आपल्याच गोष्टी त्यांनीं लोकाना सांगितल्या असे जर तुम्हाला वाटेल तर मला ज्या गोष्टी येथें सांगावयाच्या आहेत त्या माझ्या जितक्या फायद्याच्या आहेत तितक्याच आपल्याही फायद्याच्या असल्यामुळें मला त्या गोष्टी या ठिकाणीं सांगण्याला कांहीं दिक्कत वाटत नाहीं. आजपर्यंत पुष्कळ प्रकारें आपल्या देशाच्या स्थितीसंबंधानें ठिकठिकाणीं वादविवाद आणि विवेचन झाले आहे. एकंदर लोकानां हितावह काय आहे? पुष्कळ गोष्टी हितावह आहेत. पारलौकिक धर्म हितावह आहे. त्याचप्रमाणें नीती धर्म ही हितावह आहे. पोटापाण्याची सोय होणें हितावह आहे. आपला व्यापार वाढावा प्रजा वाढावी सुबत्ता व्हावी. सुरक्षीत पणानें ती सुबत्ता आपल्या पदरांत पडावी या सर्व गोष्टींची मनुष्यांना अपेक्षा आहे. परंतु इतक्या सगळ्या गोष्टींचे विवेचन थोड्या काळयांत मला नेमून दिलेल्या वेळांत होणें शक्य नाहीं. तेव्हां या पैकीं मुख्य गोष्टी ज्या आहेत, ज्या हजारो लोकांच्या विचारानें मुख्य ठरल्या आहेत ज्याबद्दल हल्लीं चोहोकडे चर्चा होत आहे अशा विषयासंबंधानें मी आज दोन शब्द आपल्याला सांगणार आहे. हा विषय म्हटला म्हणजे स्वराज्य हा होय (टाळ्या) ज्या कांहीं आपल्या घरच्या गोष्टी आहेत त्या आपल्या घरी आपण सत्तेनें करतों. मला अमुक गोष्ट कराविशी वाटली जर ती केवळ खासगी असली तर त्याबद्दल कोणास विचारावे लागत नाहीं कोणाची परवानगी घावी लागत नाहीं किंवा दुसऱ्या कोणाचा सल्ला आपल्याला घेण्याचे जरूरी नाही. सार्वजनीक बाबतींत तशी स्थिति नाहीं.

ज्या प्रमाणें स्वतःचे कल्याण त्याच प्रमाणें सर्व लोकांचे कल्याण. लोक चांगल्या रीतीनें नांदण्यास कसें लागतील त्यांना अधिकाधिक सुस्थिति कशी प्राप्त होईल त्यासंबंधीं विचार केला तर आपल्या ध्यानांत असे येईल कीं कोणत्याही गोष्टी घेतल्या तरी त्या आपल्या हातांत सत्ता नसल्यामुळें आडतें. या ठिकाणाहून आगगाडी दुसऱ्या ठिकाणीं न्यावयाची असली तर ह्या गोष्टी आपले ताब्यांतल्या नाहींत. व्यापार काय, अमुक धंद्यांत देशांत उत्तेजन यावें असे मी पुष्कळ बोललो पण ज्या ठिकाणीं हा धंदा चालतो त्या ठिकाणचे ज्ञान संपादन करून आणून त्या लोकांचा व्यापार या देशांत आहे तो कमी करून आपला व्यापार वाढविणें ही कांहीं सर्वस्वी आमच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. कोणती ही गोष्ट घेतली तरी अशीच आहे. आपल्याला दारू कांहीं बंद करतां येत नाहीं आम्हाला नको आमच्या सरकाराला नको अशाही कांहीं गोष्टी आहेत. ज्या आम्हाला नको आमच्या सरकारालाहि नको पण जो कांहीं एकंदर राज्यव्यवस्थेचा ओघ आहे तो असा पडलेला आहे कीं त्यात फेरफार करणें, यत्कींचित फेरफार करणें आमच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. आम्ही पुष्कळ आजपर्यंत गाऱ्हाणीं केली सरकारनीं ऐकली. पण सर्व गाऱ्हाण्याचे मूळ काय? आम्ही म्हणतो त्या प्रमाणें आमची स्थिती सुधारण्याचे आड कोणकोणत्या गोष्टी येतात. आमची अडचण काय, याचा विचार आज ५।५० वर्षे होऊन पुष्कळ शहाण्या लोकांनीं या गोष्टींचा विचार करून त्याचे एक कारण शोधून काढले आहे ते हे कीं आमच्या लोकांच्या हातांत सत्ता नाहीं. सार्वजनिक बाबतींत पुष्कळ लोकांचे पुष्कळ अभिप्राय आहे. कोणी म्हणतात तुमचे हातांत सत्ता का नाहीं. तुम्ही दारू पीऊ नका म्हणजे झाले. उपदेश गोड दिसतो खरा. पण सर्व लोकानां बंदी करणे हे काम नुसत्या उपदेशाचे नाहीं. याला काही सत्ता लागत असते ती सत्ता ज्यांचे हातांत नाहीं त्याला ते काम करतां येत नाहीं. आणि अशा नुसत्या उपदेशाने काम होण्याजोगे असते तर राजाची आम्हाला जरूर पडलि नसती. पुष्कळ लोकांचे मनांत ज्या गोष्टी येतात त्या गोष्टींचा अंमल व्हावा त्या गोष्टी अमलांत याव्यात याकरितां राजव्यवस्था निर्माण झालेली आहे आणि ती राजव्यवस्था आपल्या हातात नसल्याने जर तुमच्यापैकीं हजारो लोकांना ऐकादी गोष्ट इष्ट वाटली आणि ज्यांच्या हातांत राज्यव्यवस्था आहे

त्यांना ती गोष्ट इष्ट वाटली नाहींतर त्या गोष्टी कधींहि अमलांत यावयाच्या नाहीत. मागे मी या ठिकाणीं आलेलो होतो. दुष्काळाची व्यवस्था काय, दुष्काळा मध्ये कोष्टयांचे अतिशय नुकसान होते. ही गोष्ट सरकारच्या मनांत ज्या दिवशी आली त्या दिवशी त्याचा थोडा बहुत कांहीं बंदोबस्त झाला. आपला व्यापार बुडाला. अडतेगिरीचा धंदा पूर्वी चाले पूर्वी अडतेगिरी नव्हती असें नाहीं हल्ली नाहीं असें नाहीं, अडत्यांचा धंदा चालू आहे. फरक काय झाला आहे कीं त्या काळामधें आमच्या व्यापाराचे जे तुम्ही आडते होता ते ह्या विलायतच्या धंदेवाल्याचे आडते बनला आहा. कापूस येथे खरेदी करून विलायतेला पाठवावयाचा आणि त्याचे विलायतेतले कापड आले म्हणजे अडतीने खरेदी करून आम्हाला विकावयाचे. अडतेचा धंदा कायमच राहिला पण त्या मध्ये झाले काय कीं ज्या अडतीच्या धंद्यामुळें देशाला अधीक फायदा होत होता तो जाऊन या अडतीच्या धंद्यामध्यें जो कांहीं फायदा व्हावयाचा तो विलायतच्या लोकांचा होतो. गोष्ट मनुष्य धंदा एकच पण राजव्यवस्थेमधें फरक पडल्यामुळें काही गोष्टी आपल्याला करता येत नाही. देशाला हितावह होतील अशा तऱ्हेच्या करता येत नाहींत असे झाले आहे. पहिल्या पहिल्यांदा आमची समजुत अशी होती कीं बोलून चालून इंग्रज सरकार परकी आहे, त्याना परकीय म्हणण्यात राजद्रोह नाहीं, तर परकीय ज्या गोष्टी आहेत त्या सांगणे यांत कांहीं राजद्रोह नाहीं कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाही. परकीयपणाने होते काय ? परकीय व आपल्या मधे भेद काय होतो तर परकीयांची दृष्टी परकीय असते. परकीयांचे विचार परकीय असतात. आणि परकीयांची एकंदर वागणूक अश्या तऱ्हेची असते कीं ज्यांना ते परकीय आहे त्या लोकांचे कल्याण विशेष करण्याकडे त्यांचे बुद्धीची प्रवृत्ती होत नाहीं आपण असें समजू कीं या ठिकाणीं अहमदनगरला जे मुसलमान राजे होते मी मुसलमानांना परकीय म्हणत नाहीं. ते या देशांत येऊन राहिले, येथे धंदे वाढावे अशी त्यांची बुद्धी तरी होती. धर्म निराळा असेल ज्या मनुष्याला हिंदुस्थानांत रहावयाचे त्याची मुलेबाळें हिंदुस्थानांत रहायाला इच्छितात ते रहातील त्या मुलाबाळांचे त्या मनुष्याचे आणि इतर हिंदुस्थानांत राहणाऱ्या माणसांचे जेणेकरून कल्याण होईल अशी ज्यांची इच्छा ते परकीय नाहींत. परकीय म्हणजे धर्माने परकीय मी घेत नाहीं. या

देशांत राहणाऱ्या लोकांचे जेणेकरून हीत होईल, असे जो करितो तो मनुष्य मग मुसलमान असो इंग्रज असला तरी हरकत नाहीं. परकी नाहीं. परकीयपणा हिताहिताच्या संबंधांत आहे. परकीयपणा गोऱ्या आणि काळ्या कातडीत खचीत नाहीं. परकीयपणा धर्मात नाहीं. परकीयपणा व्यापारधंद्यांत नाहीं. ज्या देशांत आपण रहावयाचे त्या देशांतील लोकांचे मधे आपली मुले बाळे रहावयाची, ज्या देशांत आपली पुढली पीढी राहिली, त्यांना चांगले दिवस येतील, त्यांचे कल्याण होईल, त्यांचे हित होईल अशी व्यवस्था जो मनुष्य करूं इच्छितो तो मनुष्य मी परका समजत नाहीं. कदाचित माझ्या बरोबर देवाची प्रार्थना करण्याला तो एक देवळात येणार नाहीं कदाचित माझा त्याचा रोटीव्यवहार बेटीव्यवहार होणार नाहीं हे सगळे प्रश्न गौण आहेत. पण जो मनुष्य हिंदुस्थान देशाचें कल्याण होण्याला झटत असेल आणि अशी व्यवस्था योजील तर तो मनुष्य परकीय असे मी समजत नाहीं. ... ... पहिल्या पहिल्यांदा अशी माझी समजुत होती कीं यांत कांहीं विशेष झाले नाहीं, पेशवाई गेली मुसलमानी राज्य गेले इंग्रजाच्या ताब्यांत आले पण राजाचे म्हणून जे कर्तव्य ते कर्तव्य हे कीं ह्या राष्ट्राचा उदय व्हावा, या राष्ट्राचा फायदा व्हावा, हे राष्ट्र वर चढावे, हे इतर राष्ट्रांच्या बरोबरीला यावे वगैरे ज्या कांहीं गोष्टी त्या सर्व करण्याचे काम राजाचे आहे. जो राजा हे काम करतो तो परकीय नाहीं. जो हे काम करीत नाहीं केवळ आपल्या फायद्याकडे पाहतो, आपल्या ज्ञातीच्या फायद्याकडे पाहतो, आपल्या मुळच्या देशाच्या फायद्याकडे पाहतो, तो परकीय समजावयाचा. ... ... पहिल्यानें हजारों प्रश्न आले. शेती संबंधी सारा पुढें वाढला जंगल खात्याची व्यवस्था अमुक तऱ्हेची झाली, अबकारी खात्याची व्यवस्था अमुक प्रकारची झाली या ज्या गोष्टी होत आल्या त्या आम्ही २५–३० वर्षे एक सारख्या सरकारच्या काना पाशी आरडत आहो. त्या त्या खात्याची व्यवस्था, त्या, त्या प्रकारच्या पेशाची व्यवस्था त्या त्या प्रकारच्या व्यापाराची व्यवस्था त्या त्या प्रकारच्या उद्योगधंद्याची व्यवस्थाही कांहीं झालेली नाहीं. ५० वर्षांत हा प्रश्न मुख्य आहे. याचे कारण शोधतां शोधतां आम्ही पहिल्यांदा असे समजत होतो कीं ह्या सरकाराला कळविले म्हणजे आमच्या सारखे सरकार ताबडतोब करावयाला लागेल. परकीय सरकार आहे.

त्यांना कळत नाहीं. त्यांना आमच्या १०१५ प्रमुख लोकांनीं एके ठिकाणीं जमून सांगितलें म्हणजे त्या लोकांच्या ही गोष्ट लक्षांत येईल. ते परकीय असल्यामुळें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. आम्ही कळविले म्हणजे ते इतके उदार बुध्धीचे-आहेत शहाणे आहेत की त्यांना ह्या गोष्टी कळविल्या बरोबर ते तुमचे म्हणणे काय आहे ते ऐकून घेऊन त्याचा प्रतिकार करतील असा आमचा समज होता. पण ही समजूत सुटायला गेली. ५० वर्षांचे सरकारचे वर्तन कारण झाले आहे. कितीही तुम्ही ओरडा, कितीही चळवळ करा, कितीही कारणे दाखवा त्यांच्या रिपोर्टांतले आंकडे त्यांचे पुढे मांडा पण त्यांच्या दृष्टीला असा कांहीं विकार झाला आहे कीं तेच आंकडे त्यांना दिसत नाहींत. त्याच कोट्या तीच कारणें त्याना पटत नाहींत. आम्ही जर एखादी गोष्ट सांगितली तर त्याच्या विरुद्ध जे कांहीं असेल तेवढेंच ते घेऊन बसतात. तुम्हाला असे कदाचित कोणी येऊन सांगेल कीं यांत कांहीं नवल नाहीं. तुमचे राज्य मुसलमानाचे असो किंवा हिंदूचें असो पेशवाई असो किंवा नगरच्या बादशहाचे असो हीं राज्यें मोडून आतां इंग्रजांची सत्ता झाली आहे. अर्थात ते लोक आपला फायदाच करतात मग त्यांच्याबद्दल तुम्ही ओरडता कां? हे व्हावयाचेच असे कित्येकांचे म्हणणे आहे. तुमची ही ओरड ही मात्र उगीच सरकारला दुखविण्याकरितां सरकाराचे मन एक प्रकारें विकारवश करण्याकरितां कारण होते याकरतां ही ओरड कांहीं करूं नका. आणखी ते काय देतील ते मुकाट्यानें ध्या. चतकोर भाकर देतील तिचा आनंदानें स्वीकार करा आणि त्यांचे आभार माना असे कित्येक लोकांचे म्हणणें आहे. मला कांहीं हे म्हणणें पसंत नाहीं माझे म्हणणें असें आहे कीं सरकार जरी झाले कोणतेही का असेना इंग्लंडचे असो कोणतेंही असो सरकार म्हणून सरकारला एक प्रकारचे कर्तव्य आहे. सरकारला एक प्रकारचा धर्म आहे. एक प्रकारची जबाबदारी त्यांचे अंगावर आहे. ती जेव्हां जबाबदारी सरकार टाळील तेव्हां ते सरकारच नव्हे असे मी म्हणतो. सरकारचा अधिकार आहे सरकारची एकंदर लोकांवर जी कांहीं हुकमत मग ती त्यांनीं लढाई करून मिळविली असो किंवा लोकांनीं दिलेली असो परंतु सरकारला कर्तव्य आहे. तुम्हा आम्हाला जसे कर्तव्य आहे तसे ज्याना सरकार म्हणतात त्यानाही कर्तव्य आहे. त्यांनीं अमुक कामें केलींच पाहिजेत. कांहीं कर्तव्य सरकारला कबूलच

आहे. रस्ते करणें, सडका बांधणें, पोष्ट ऑफिसे स्थापणें तारायंत्रे, हीं कामें सरकार करते कीं नाहीं? करते. उद्या जर असे कोणी म्हणेल कीं सरकारनें सडका बांधल्या नाहींत तर त्यांची खुशी वाटेल तर बांधील नाहीं तर बांधणार नाहीं. असे जर कोणी म्हणूं लागेल तर हे सगळे तुम्ही लोक जमला आहा त्या लोकांनीं त्याला दूषण द्याल. ह्या गोष्टी करावयाच्या नाहीं तर आम्ही कर देतों कशाला? आमच्या पासून जे कर घ्यावयाचे त्या करांचा उपयोग लोकांच्या सोई करण्याकडे सरकार करणार नाहीं तर सरकारला आमच्यापासून कोणत्याही प्रकारचे कर घेण्याचा अधिकार नाहीं. हे आमच्या कल्याणाकरितां सरकार घेत आहे. तुम्हाला सरकार जेव्हां चांगले आहे असे कोणी प्रतिपादन करिते तेव्हां काय दाखवितात या आमच्या सरकारनें सडका बांधल्या, आगगाड्या केल्या, तारायंत्रें केलीं, पोष्ट ऑफिसे केलीं ह्या तुमच्या सोई केल्या नाहींत का? आणि तुम्ही का सरकारच्या नांवानें ओरडता? असा नेहमीं प्रश्न विचारण्यांत येतो, या गोष्टी केल्या नाहींत असे माझे म्हणणें नाहीं; परंतु केल्या ऐवढ्या पुऱ्या नाहींत. ह्या गोष्टी केल्या आहेत चांगल्या केल्या आहेत, पूर्वीच्या सरकारनें केल्या नसत्या त्यापेक्षां इंग्रज सरकारनें अधीक चांगल्या केल्या आहेत हे त्यांना भूषणावह आहे. पण ज्या गोष्टी सरकार करीत नाहीं. त्या गोष्टी आम्ही सांगूं नये कीं काय? परंतु ज्या केल्या नाहींत, ज्या करण्याची इच्छा अजून दिसून येत नाहीं. पुष्कळ रितीनें सांगितले असतां त्या लोकांचे तिकडे लक्ष जात नाहीं. त्या गोष्टी आम्ही सांगूं नये. सांगितल्या असतां त्यांत सरकारचा अपमान झाला असे ज्या सरकारला वाटते ते कांहीं खरे सरकार नव्हे. मग खरे सरकार म्हणजे काय? याचा थोडा विचार करण्याला पाहिजे. हल्लींची पद्धती आणी जुनी पद्धती फार निराळी आहे एक प्रकारचे भ्रम उत्पन्न करण्याचा हल्लीं इलाज चालू आहे कलेक्टरसाहेब किंवा हे जे सिव्हीलीयन येतात, ज्याना इंग्रजीमधें ब्युराक्रसी अधिकारी वर्ग असें म्हणतात तो अधिकारी वर्ग म्हणजे सरकार नव्हे. पोलीस शिपाई म्हणजे सरकार नव्हे. इंग्रजी राष्ट्राची जी सत्ता आमच्या देशावर आहे ती सत्ता न बिघडता, त्यांत कांहीं कमी न पडता जर आपल्याला ही सत्ता कायम ठेवून कांहीं करता आले तर ते करा असे म्हणण्यांत कांहीं कोणत्याही प्रकारचा राजद्रोह होत नाहीं. इंग्रज

लोकांची सत्ता जी आमच्यावर आहे ती पाहिजे आहे. पण हे मधें जे कोठावळे आहेत ते आम्हाला नको आहेत (cheers) धान्य यजमानाचे आहे सामुग्री यजमानाची आहे. परंतु या कोठावळ्याचे मधें जे पोट दुखते ते तेवढे मधले काढून टाका; आणि ते अधिकार लोकांना द्या. म्हणजे लोक आपआपल्या घरची रितीप्रमाणें व्यवस्था पहातील. या प्रकारचे स्वराज्य आम्ही मागतो. स्वराज्य म्हणजे इंग्रज सरकार काढून टाका, बादशहाची सत्ता काढून टाका आमच्या एखाद्या संस्थानाची सत्ता त्या ठिकाणीं घेऊन असा या स्वराज्याचा अर्थ नव्हे. स्वराज्याचा अर्थ असा आहे कीं,—तो खापर्डे यांनीं बेळगांव येथें असा सांगितला आहे कीं आम्हाला देवाचे पुजारी काढून टाकावयाचे आहेत. देव ठेवावयाचे आहेत. हे पुजारी नकोत. दुसरे आमच्या पैकी पुजारी नेमा असे आमचे म्हणणे आहे. हे जे मधे कलेक्टर कमिशनर वगैरे लोक आलेले आहेत ते नको आहेत. हल्लीं तुमच्यावर सत्ता कोण चालवितो? बादशहा येऊन ती चालवीत नाहीं. ते विलायतेत आहेत. त्यांना कांहीं गोष्टी कळविल्या तर तुमचे कल्याण व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. मग तुमचे कल्याण कां होत नाहीं. म्हणोन हे पुजारी आम्हांला नको आहेत (cheers) ते लोक हुषार आहेत. तुम्ही असे म्हणता कीं पुजारी नको. ते म्हणतील कीं आम्ही परीक्षा पास झालो आहे. पुष्कळ कामें करितो ह्या सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु पुजाऱ्याचा जो कांहीं वृत्यंश आहे. त्या वृत्यंशाकडे त्यांचें लक्ष अधिक लागलेलें आहे. म्हणोन हा पुजारीपणा आपल्या हातांत राहावा. पंढरपुरच्या बडव्यांची आणि यांची स्थिति एक आहे. (chears) हा पुढारीपणा आपल्या हातांत राहण्याबद्दल हे जे लोक (Bureaucracy) खटपट करीत आहेत तो पुजारीपणा त्यांच्या हातांत जर न राहिला तर त्यांत बादशहाचे कांहीं नुकसान आहे कां? कांहीं नुकसान नाहीं. कोणी म्हणतील कीं, इंग्रज लोक हे बादशहाच्या वर्णाचे लोक आहेत. परंतु आम्हींही बादशहाची प्रजा झाल्यानंतर मग इंग्रज प्रजा काय आणि काळी प्रजा काय यांच्या मधें बादशहा भेद करीत नाहीं. करण्याची इच्छा नाहीं. स्वराज्य या शब्दाचा अर्थ असा आहे कीं–मुनिसिपालटीचे लोकल सेल्फ गव्हर्नमेंट परंतु तो एक फार्स आहे. ते पुरे नाहीं. कलेक्टरचा हुकुम आला कीं, तुम्हाला तो मानावा

लागतो त्याला (collr) ला ढवळाढवळ करण्याचा अधिकार आहे. प्रेसिडेन्टला बोलावून त्याला कांहीं तरी अमुक गोष्ट कर, असे सांगण्याचा त्याला अधिकार आहे. न करील तर प्रेसिडेन्टला काढून टाकण्याचा अधिकार आहे. मग स्वराज्य कसलें (cheers) स्वराज्य शब्दाचा अर्थ वर आपले बादशहा कायम, इंग्रज लोकांची सत्ता कायम, आणि बाकीची व्यवस्था करण्याचा अधिकार पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत असणें हे स्वराज्याचें लक्षण आहे. आम्ही जे कांहीं मागतो ते कांहीं इंग्रज सरकारची सत्ता कमी करा इंग्रज सरकार जाऊन या ठिकाणीं जर्मन सरकार यावे असे कांहीं मागत नाहीं. उलट हल्लींच्या युद्धामुळें असें सिद्ध झाले आहे कीं आणि ते सर्व जगाच्या निदर्शनास आले आहे कीं, जर्मन सरकार या ठिकाणीं यावे अशी कांहीं आमची इच्छा नाहीं. इतकेंच नव्हे तर या सरकारचे राज्य येथें कायम राहण्याकारितां अत्यंत दूर प्रदेशांत अत्यंत थंड प्रदेशांत आमच्याकडचे हजारों लोक आज प्राण देत आहेत. (hear) (hear) (cheers) मग राहिले काय? हे राज्य रहावे हे राज्य जाऊन जर्मन लोकांचे राज्य या ठिकाणीं येऊं नये याकारितां जर आम्ही आमच्या शक्तीप्रमाणें कां होईना पैसे—आम्ही इंग्रजाइतके धनाढ्य नाहीं तरी आमच्या शक्तीप्रमाणें देतो. आमच्या शक्तीप्रमाणें आमचे लढाऊ लोक जाऊन आपले प्राण तेथें खर्ची घालीत आहेत आणि अशा रीतीनें ते काम करीत आहेत. फ्रान्स जर्मनी किंवा इतर सर्व राष्ट्रेंहि त्यांची शिफारस करीत आहेत. शाबासकी देत आहेत. (cheers) here here अशा प्रकारची आपली राजनिष्ठा इंग्रजसरकारच्या ठिकाणीं, असावी अशाबद्दलची आमची बुद्धी–आमचे रक्त पाडून आम्ही शाबीत केली आहे. (hear hear cheers) यापेक्षां आपली कांहीं अधिक पुरावा कोणी मनुष्य देऊं शकेल असें मला वाटत नाहीं. तेव्हां आज ही गोष्ट निःसंशय आहे कीं, या ठिकाणीं आम्हाला इंग्रजांचेच राज्य पाहिजे आहे आणि त्याप्रमाणें आम्ही प्रयत्न करीत आहों मग अशी जर स्थिति आहे तर हे मधले जे लोक नेमिलेले आहेत त्या लोकांना काढून टाकून इंग्रजी साम्राज्यामधें इतर ठिकाणीं लोकांना जे हक्क आहेत ते आम्हाला कां मिळूं नयेत. आम्ही त्यांच्या पेक्षां शौर्यानें कमी नाहीं विद्येनें कमी नाहीं आमचे अंगी कर्तृत्व आहे. इतके असोन हे हक्क आम्हाला कां मिळूं नये? बादशहानी आप-

ऱ्या काळ्या आणि गोऱ्या प्रजेमध्यें भेद कां करावा. बादशहाला अशी कोणी सला दिलेली आहे? इंग्रजी राज सत्ते मधे जो एक विशेष आहे तो हा कीं, बादशहा लोकांच्या सल्लेवर काम करतो. प्रधान मंडळांनीं त्यांना असा सल्ला का द्यावा? हल्लीं ज्यांच्या हातांत सत्ता आहे म्हणजे जो अधिकारी वर्ग आहे तो गोरा आहे. काळा त्यांत गेला म्हणजे तोही तसाच होतो. हल्लींची जी एक पद्धत आहे तीमुळें एका नेटिवाला विलायतेहून पास होऊन आल्यानंतर जर कलेक्टर नेमिला आणी तो त्यांच्यांत गेला म्हणजे तोहि त्यांच्या सारखाच होतो. मी गोऱ्याबद्दलच बोलतो असें समजू नका. ही पद्धत आम्हाला नको आहे. एकादा मनुष्य त्यांच्यांत गेला तर काय झालें? त्याला कांहीं विशेष करितां येत नाहीं. म्हणोन ही पद्धत मोडली पाहिजे. एक दोन माणसें नेमिल्यानें कांहीं आमचें समाधान व्हावयाचें नाहीं. असो. ही पद्धत कोणी काढली ती बादशहानें काढली नाहीं. राणीचा जाहीरनामा ज्या वेळीं प्रसिद्ध झाला तो जाहीरनामा एकीकडे आणि हल्लींची पद्धत एकीकडे. हल्ली आमच्या हातांत कांहीं आमचें कल्याण करावयाचें उरले नाहीं. आम्हाला जर असें वाटलें कीं अमुक एक परदेशी माल येतो त्याच्या वर जकात बसवून स्वदेशी मालाला उत्तेजन द्यावे तर ती गोष्ट आमच्या हातांतील नाहीं. आम्हाला वाटले कीं देशामध्ये अमुक उद्योगधंदे पाहिजे आहेत ते आम्ही सुरू करू. बाहेर देशांतून पैसे देऊन शिक्षक आणवू तर ही गोष्ट कांहीं आमच्या हातांतील नाहीं. किती थोडी गोष्ट आहे. सर्व लोकांना लिहितां वाचतां यावयास पाहिजे. मुसलमान असो, कोणत्याही धर्माचा असो, कोणत्याही जातीचा असो, त्याला थोडेबहुत लिहितां वाचता आले पाहिजे. ही गोष्ट आतां सर्व पृथ्वी वरील सगळ्या लोकांना कबूल झाली आहे. या बद्दल आतां कांहीं शंका नाहीं. लिहिता वाचता आल्यानें मनुष्याला कांहीं तरी फायदा होतो. हे कांहीं कोणाला नव्यानें सांगावयास नको. मग आमच्याकडे ती गोष्ट का होत नाहीं. पैसा नाहीं म्हणून ही सबब कोण सांगतो. ही सबब अधिकारी वर्ग सांगतात. यांचा पगार २५०० असतो आणि तो ३००० हजार करावयाचा असला तर पैसे आहेत. Exchange compensation ची अशीच गोष्ट झाली. रुपयांचा or (रुप्याचा भाव उतरला तेव्हां हुंडणावळी करितां सरकारकडोन ६ कोट रुपये

बाहेर काढिले गेले तेव्हां पैसे मिळाले. ह्या ज्या गोष्टी होत असतात. त्या तुमच्या हातांत सत्ता असल्या खेरीज कांहीं निभाव लागावयाचा नाहीं. शिक्षणाला पैसा नाहीं आणि कलेक्टरचा २५०० रुपये पगार द्यावयाला पैसा आहे ही गोष्ट आम्ही जितकी स्पष्ट रीतीनें म्हणतो स्पष्ट रीतीनें सांगतो. आणखी आमचे हातांत सत्ता आली असतां आम्ही त्या गोष्टीचा ज्या दृष्टीनें विचार करूं त्या दृष्टीनें हल्लींचा अधिकारी वर्ग विचार करीत नाहीं. आम्हाला पहिल्यानें असे सांगितले कीं शिक्षणावर पैसा खर्च करावा. लोकांना लिहितां वाचतां येऊं लागले म्हणजे हजारों गुन्हे कमी होतात, ते आपले व्यवहार चांगले करितात. त्यांना नफ्याची गोष्ट कोणती आणि नुकसानीची गोष्ट कोणती हे कळते. अशा तऱ्हेनें लोक झाल्यानंतर त्यांची राज्यव्यवस्था करावयाला आम्हाला २५०० रुपयांचा अमलदार लागणार नाहीं. ५०० रुपयांचा पुरेल व २००० रुपये आम्हाला शिक्षणा करितां खर्च करितां येतील. कोणत्याही देशांत हल्लीं इतके मोठ्या पगाराचे अधिकारी नाहींत. हिंदुस्थानाला अधिकारी जो व्हाइसराय येतो त्याना दरमहा २०००० रुपये मिळतात. व इंग्लंडच्या मुख्य प्रधानाला ५००० रुपये मिळतात. सगळ्या इंग्लंडांत वसून जो साम्राज्याचें काम चालवितो त्याला ५००० रुपये व हिंदुस्थानचा जो इकडे राज्यकारभार चालवितो त्याला २०००० रुपये असे का? त्याला उत्तर कांहीं नाहीं. हे परभारे काम भागते म्हणून (cheers) हा हिंदुस्थान देश आहे. जा आणि खा. तुमच्या ताब्यांत जर लोकांचे एखादें दुकान व्यवस्था चालविण्यास दिले तर तुम्ही जर तुमच्या दुकानांत ५० रुपये पगार दिला असता तर त्याला १०० रुपये पगार द्याल. आपल्या लोकांचा किंवा जातीचा मनुष्य असेल तर तशीही व्यवस्था चालली आहे. या व्यवस्थेनें आपले कांहीं कल्याण नाहीं. तेव्हां ह्या गोष्टी आपल्या नजरेस आजच नव्यानें आल्या असें नाहीं. आज ५० वर्षें ह्या गोष्टी आपल्या नजरेस आल्या आहेत. १९०६ सालीं ज्या वेळेस कलकत्याला कांग्रेस भरली त्या वेळेस दादाभाई नौरोजी (cheers) यांनीं स्पष्ट असे सांगितले. त्यांनी पन्नास वर्षाचा आपला अनुभव सर्वांस सांगितला कीं ही जी कांहीं अव्यवस्था आहे हा जो कांहीं एका प्रकारचा अन्याय हिंदुस्थान देशांत घडत आहे याचा प्रतिकार होण्याला लोकांच्या हातांत सत्ता जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. Self Govt. असे त्याला नांव दिलें

आणि लोकांच्या हातांत आमच्या घरांत काय करावयाचे, आमच्या गांवांत काय करावयाचे आमच्या देशांत काय करावयाचे, आमच्या इलाख्यात काय करावयाचे याची व्यवस्था ठरवावयाला आम्ही पाहिजे. आम्ही ते ठरविले तर तें थोड्या खर्चानें होईल, चांगले होईल, आणि कोणीकडे आज पैसा जास्त खर्च करावा, कोणीकडे कमी करावा याचा जो कांहीं आम्ही निकाल करूं तो लोकांच्या अधीक हिताचा असा होईल. अधिकारी वर्ग म्हणतो तुम्ही शहाणे नाहीं जे कळते ते त्यानाच. अधिकाऱ्यांची पहिली दृष्टि आपला पगार कसा बचावेल ? तिजोरींत पैसे आले म्हणजे ह्यांच्या पगाराचा खर्च पहिल्यानें निघाला पाहिजे. यांचा लष्करी खर्च पहिल्यानें निघाला पाहिजे. यांची एकंदर व्यवस्था झाली पाहिजे. मग जर पैसे उरले तर मग शिक्षणाकडे द्यावयाचे. शिक्षण ते नको म्हणत नाहींत. त्यांच्या दृष्टीने शिक्षण ही कांहीं वाईट वस्तु नाहीं. परंतु सगळा खर्च भागल्यानंतर मग लोकांना शिक्षण द्यावयाचें, लोकांची कांहीं सोय असेल तर पहावयाची. हा नंतरचा विचार आहे. तुम हातात सत्ता आली असता व्यवस्था होईल कीं नाहीं ह्या गोष्टीचा आधीं विचार करूं जर आपल्याला अैसे वाटेल कीं या लोकांना अधीक पगार द्यावा लागतो तर तो कमी करा व त्याला असें सांगा कीं तुला देशाकरितां हे काम करावे लागेल. अशा तऱ्हेनें ज्या वेळीं या सर्व गोष्टीचा विचार होईल त्या वेळीं आपल्याला ज्या कांहीं गोष्टी घडवून आणणे इष्ट आहे त्या घडवून आणण्याचा योग आपल्या हातीं येईल. हा केवळ विचार झाला. तुमचे आडते आहे कोठे. मराठींत एक सामान्य म्हण आहे. एकाने तीन प्रश्न विचारले. घोडा अडतो कोठे, विड्याचीं पानें का सडली–तिसऱ्या बुकांत गोष्ट आहे, पूर्वी होती आता आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं–अशा दोन तीन प्रश्नाला त्याने एकच उत्तर दिले आणि ते हे कीं न फिरविल्यामुळे, तसे आमच्या इलाख्यांत दारु कमी खपत नाहीं. [दारूचा खप कमी होत नाहीं] फॉरेस्टमधें लोकावर जुलुम का होतो. शिक्षणाला पैसे का मिळत नाहीं. या सगळ्यांचे एक उत्तर आहे आणि ते हे कीं तुमच्या हातांत सत्ता नाहीं म्हणून (cheers) आणि ही सत्ता जोपर्यंत तुमच्या हातांत येणार नाहीं तोपर्यंत तुमचा भाग्योदयही होणार नाहीं बादशहा कोणीही असो त्याच्याबद्दल आमचे म्हणणे नाहीं पण ज्या गोष्टी व्यवहारातल्या,

व्यापारांतल्या, धर्मांतल्या समाजातील आहेत. त्या गोष्टी आम्हाला करावयाला पाहिजेत. त्या गोष्टी आम्ही करण्याची सत्ता आमच्या हातांत थोडीबहुत आल्याखेरीज–सरतेशेवटी पूर्ण आली पाहिजे–पूर्णपणे आमच्या ताब्यांत आल्याखेरीज आम्हाला कोणत्याही प्रकारें सुबत्तेचा, भाग्योदयाचा, फायद्याचा किंवा उत्कर्षाचा काल येणे अशक्य आहे. लोकांच्या तोंडाने काही पाणी पितां येत नाहीं. तें आपणच प्यावें लागतें. त्याप्रमाणें हल्लींची व्यवस्था आहे––(लोकांच्या तोंडून पाणी पिण्याची) आपले पाणी–आपल्या विहिरीचें पाणी–आपण ओढून आपण प्यालें पाहिजे. मग ती विहीर सरकारची असली तर एक रुपया महिनाप्रमाणे कर द्यावा पाहिजे तर. पण आह्माला सत्ता पाहिजे आहे. ती आमच्या ताब्यांत आल्याखेरीज, आमचा तरणोपाय नाहीं, हे एक राजनीतीचे तत्व बहुतेक ठरल्यासारखे–इतिहासाचे दृष्टीने, नीतिशास्त्राच्या दृष्टीने, समाजशास्त्राच्या दृष्टीनें सिद्ध झाल्यासारखे आहे. मग तुम्ही विचाराल कीं इतके दिवस आम्हाला का सांगितले नाहीं, यासंबंधानें मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. ती सत्ता आमच्या ताब्यांत यावी किंवा येण्याचा आज काल दिसूं लागला आहे. इतके दिवस इंग्लंडांत सामान्य लोकांची समजूत अशी होती कीं, हिंदुस्थान देशांतून जितका फायदा निघेल तितका काढावा. हिंदुस्थान एक प्रकारचे आमच्यावर ओझे आहे. इंग्लडांतील राष्ट्रांला–लोकांना असें वाटत होतें कीं, हिंदुस्थानांत ३० कोटी लोक आहेत ते केव्हांना केव्हा तरी आमचे राज्य बुडविणार. यांच्या हातचीं शस्त्रें काढून घेतली पाहिजेत यांना जितके दास्यांत आणि ताब्यांत ठेवितां येईल तितके ठेविले पाहिजे. पण आज ती स्थिती पालटली आहे. हल्ली युरोपखंडांत जे युद्ध सुरू झाले आहे त्या युद्धामुळें आता असे वाटू लागले आहे कीं इंग्रजी साम्राज्याचे जे कांहीं अनेक प्रांत आहेत. ते सगळे एकवट झाल्याखेरीज या साम्राज्याला जितकी शक्ती यावयास पाहिजे तितकी शक्ती येणार नाहीं. आज असे झाले आहे कीं. त्यांचे जे दुसरे देश आहेत––आस्ट्रेलिया, कानडा, न्यूझीलंड जेथे साहेब लोकांची वस्ती आहे वसाहती म्हणतात त्यांना त्यांची मदत आपल्याला पाहिजे आहे अशी बुद्धी जागृत झाली आहे. या जागृत झालेल्या बुद्धीचा जर तुम्ही फायदा घ्याल तर तुम्हालाही कांहीं हक्क मीळण्याची संधी आलेली आहे. तुम्हाला हे हक्क कांहीं तरवार घेऊन मीळवावे

म्हणून कोणी सांगत नाहीं. पण आज राष्ट्राची बुद्धी पालटली आहे, हिंदुस्थानाकडून इंग्लंडला कांहीं मदत होऊं शकते. हिंदुस्थान सुखी असले तर इंग्लंडलाही एक प्रकारचे वैभव, एक प्रकारची शक्ती आणि एक प्रकारे मोठेपणा येणार आहे. ही बुद्धी इंग्लंडात जागृत झालेली आहे. या जागृत झालेल्या बुद्धीचा जर या वेळीं फायदा घेतला नाही तर अशी संधी कांहीं पुन्हा यावयाची नाहीं या अधिकारी वर्गाला ही गोष्ट वाईट वाटते. यांत कोणाचे नुकसान आहे. बादशहाचे नाहीं तर या अधिकारी वर्गाचे आहे. तेव्हां त्याना ही गोष्ट वाईट वाटते. आणि ते हल्ली असा उपदेश करीत आहेत की तुम्ही स्वराज्याला पात्र नाहीं. म्हणून आम्ही येथें आलो आहों जसे काय हे ज्या वेळीं हिंदुस्थानांत नव्हते त्या वेळीं हिंदुस्थानांत कोठेहि स्वराज्य नव्हते सगळे आम्ही रानटी आणि एकमेकांचे गळे कापण्याला प्रवृत्त झालो होतो. पेशवाईत राज्यव्यवस्था नव्हती. मुसलमानीत राज्यव्यवस्था नव्हती आम्हाला कांहीं राज्यकारभार पाहता येत नव्हता आम्हाला रस्ते करता येत नव्हते. लोक सुखी कसे रहावे हे आम्हाला कळत नव्हते. नाना फडनवीस मूर्ख होता, मलीकंबर मूर्ख होता, अकबर औरंगजेब मूर्ख होते. म्हणून येथे हे आमच्या कल्याणाकरितां आले आहेत आणि तुम्ही अजून पोरे आहांत (laughter) पोरे आहात हेहि घटकाभर कबूल केलें. आता तुम्ही मोठे तरी कधी होणार आहा? कायद्यामधे २१ वर्षांचा झाला म्हणजे मोठा समजतात. यानी ५० वर्षें आमच्यावर राज्य केले तरी आम्हाला मोठे होता आले नाही तेव्हां यानी ५० वर्षें केले काय? जर हिंदुस्थानचे लोक पोरे होते तर त्याना शहाणे करण्याचे काम कोणाचे होते? यांचे काम होते. राज्यकर्ते हे होते. माझे तर असे म्हणणे आहे कीं हे काम यानी केले नाहीं—तेव्हां आम्ही पोरे आहो इतकेच नव्हे तर हे राज्य करण्याला नालायक आहेत (cheers) ज्या लोकांना ५० वर्षांत आपली प्रजा सुधारता आली नाहीं त्यानी आपला अधिकार सोडून दुसऱ्याच्या ताब्यांत द्यावा हेच चांगले. तुमच्या दुकानचा म्यानेजर असला आणि त्यानी ५० वर्षें मुनीमाचे काम चालविले परंतु ५० वर्षें सारखी तूटच येत चालली तेव्हां तुम्ही त्याला काय सांगाल? सोडून जा बाबा आम्ही आमची व्यवस्था पाहून घेऊं. दुसरा हलक्या प्रतीचा असेल कमी शहाणा असला तरी त्याला इतके तरी कळेल

कीं, दुकानची व्यवस्था करताना नुकसान तरी येऊ नये. एवढे तरी त्याला कळले पाहिजे. जे लोक आपल्याला असे सांगत आहेत की तुम्ही पात्र झालेला नाहीं तें आपमतलबीपणाचें आहे. हे सांगणे खरे असेल तर त्यांची एक प्रकारें नाचक्की आहे. ते अयोग्य ठरत आहेत आणि खोटे असले तर आपमतलबीपणाचे आहे. याशिवाय दुसरे आपल्याला त्यापासून कोणत्याहि तऱ्हेने अनुमान करता येत नाहीं. आम्ही नालायक म्हणजे आहे काय ? झाले काय आम्हाला ? म्युनिसीपालिटीची व्यवस्था केलेली चालते. कोणी विलायतेहून पास होऊन आला आणि कलेक्टर झाला तर चालतो ते कामे करितात. सरकार त्यांची शिफारस करिते. आणि स्वराज्याचे हक्क ज्या वेळीं, लोकांना द्यावयाचे, त्या वेळी तुम्ही नालायक आहा असे स्पष्टपणे सगळ्या लोकांना कोट्यावधी लोकांना नालायकीचे सर्टिफिकीट देणें म्हणजे आपल्या नालायखीचे प्रदर्शन करण्यासारखे आहे. (cheers) याशिवाय आणखी पुष्कळ प्रकारचें आक्षेप स्वराज्यावर घेतले जातात. पहिली गोष्ट मी सांगितलीच की ते एकदम सगळ्या राष्ट्राला नालायक ठरवितात. परिक्षा घ्या म्हटले तर परिक्षा ही घ्यावयाची नाहीं. नालायक नालायक म्हणजे काय तुमची माणसे काम करावयाला बसवा आणि आमची ही माणसे कामे कामे करावयाला बसवा. काम बरोबर करितात कीं नाहीं ते पहा. कामे करावयाला संधी द्यावयाची नाहीं आणि नालायक म्हणावयाचे. ज्यांना संधी दिली आहे. ते तरी नालायक ठरले आहेत का? कायदे कौन्सिलांत मेंबर आहेत ते नालायक आहेत काय? त्यांनीं आपल्याला कधी नालायक म्हटले आहे काय? तुम्ही कधीं म्हटले आहे काय? नाहीं. मग नालायक याचा अर्थ तरी काय? तुम्हाला द्यावयाचे नाहीं. ताक नाहीं म्हणावयाला काय लुच्चेगिरी करावयाला लागते? आज आदितवार आहे ताक नाहीं. अशा तऱ्हेची आज हल्ली लटपटपंची चाललेली आहे. ती चालूं न देता पूर्ण नेटाने तुम्ही मागावयाला तयार आहे किंवा नाहीं हे मला विचारावयाचे आहे. तुम्ही जर मागावयाला तयार नाहीं. तुम्ही जर याबद्दल आग्रह धरिला नाहीं. आजची संधी तुम्ही फुकट दवडली. तर अशी संधी पुन्हा १०० वर्षांत यावयाची नाहीं. तेव्हां तुम्ही तयार असले पाहिजे. मला ठाऊक आहे की तयार होऊन जर अम्मळ जोराने बोललो तर येखादा, पोलीसचा शिपाई ऐ, म्हणेल

नाहीं असें नाहीं. परंतु ते सोसले पाहिजे. याला कांहीं मार्ग नाहीं. आमच्या हातात सत्ता नाहीं. आम्ही कांहीं असे सांगूं शकत नाहीं. पोलीस शिपायाला की तूं मूर्ख आहेस परत जा. तो हुकूम पोलीस ईन्सपेक्टरचा मानतो परंतु मला तुम्हाला असे सांगता येते कीं याबद्दल जर तुम्ही निश्चयाने एकीने सर्व जातीचे लोक, सर्व धर्माचे लोक एकत्र होऊन जर या वेळीं ही मागणी सरकारकडे मागाल आग्रह धराल याकरितां जो कांहीं खर्च करावा लागेल तो करावयाला तयार व्हाल, ती मागणी आपल्याला मिळाल्या खेरीज आपली तृप्ती व्हावयाची नाहीं संतोष रहावयाचा नाहीं असे सरकारलाच नव्हे तर सर्व जगाला जाहीर कराल इतका नेट जर तुमच्या आंगात असेल तर माझी खात्री आहे कीं, परमेश्वर कृपेनें ही मागणी लवकरच तुम्हाला मिळाल्याखेरीज राहावयाची नाहीं तुमच्या निश्चयाचे फळ आहे. धर्मामधें काय किंवा राज कारणा मधें काय. निश्चय पाहिजे. आणि तो मनाचा निश्चय हिय्या केल्या खेरीज येत नाही. कसे होईल म्हणून चालावयाचे नाहीं. बरे होवो वाईट होवो हीच गोष्ट आम्हाला पाहिजे. हीच आम्ही मागणार या करितां आम्ही पैसे गोळा करून खर्च लागेल तो श्रम लागतील ते करणार आणि ही आमची मागणी पुरी होई तो पर्यंत आम्ही ही चळवळ बंद करणार नाहीं. आमच्या हयातीत हे काम पुरे झाले नाहीं तर आमची पोरेबाळे पण हीच चळवळ कायम ठेवतील अशी जेव्हां निष्ठा या कामावर असेल त्याच वेळीं फळ मिळत असते. निष्ठेखेरीज परमेश्वराकडे फळ मिळत नाहीं. राजाकडे मिळत नाहीं. इहलोकी नाहीं परलोकी नाहीं. ही निष्ठा जर तुमच्यात नसेल तर अश्या तऱ्हेने प्रयत्न जारीने करून तरी त्यापासून कांहीं फळप्राप्ती व्हावयाची नाहीं. निष्ठा प्रथम पाहिजे. श्रीमंताला गरिबाला निष्ठा पाहिजे. गरीबानें आपल्या परीनें मदत केली पाहिजे. श्रीमंतानें आपल्या परीनें मदत केली पाहिजे. जे बुध्धीमान आहेत त्यानी बुध्धीद्वारें मदत केली पाहिजे. प्रत्येक मनुष्याच्या मनाला ही गोष्ट लागून राहिली पाहिजे. असी जर गोष्ट तुमच्या मनाला लागून राहिली नाहीं. तुम्ही खटपट करावयाला तयार झाला नाहीं तर आपयशाचा बोजा लोकांच्या डोक्यावर देणें केवळ मूर्खपणा आहे. मूर्खपणा हा शब्द कदाचित वाईट लागला असेल, मी भरात बोलून गेलो. परंतु माझी अशी दृढ समजूत आहे कीं, आम्ही जितके

जारीने प्रयत्न करावयास पाहिजे तितके जोराने, तितके आस्थेनें, तितक्या निष्ठेनें अजून करावयास लागलो नाहीं. एखाद्या साहेबानें सांगितले की, तुम्हाला अधिकार दिले तर गैर व्यवस्था होईल किंवा नाहीं. तर आम्ही हो हो म्हणतों आपल्याकडे लोक नाहीं! मनुष्याची तयारी नाहीं! आणि मग साहेबाला हासतो, घरीं; तेथें हसावयास पाहिजे (cheers) (laughter) घरी हासून नाहीं चालावयाचे तोंडावर जवाब पाहिजे. आपल्याला ज्या गोष्टी खऱ्या वाटतात, त्या गोष्टी प्रतिपादन करण्याला, त्या सांगावयाला, लोकांना सांगावयाला, कळविण्याला, अधिकाऱ्याना सांगावयाला, किंबहुना बादशहासहि सांगावयास आम्ही तयार पाहिजे. ज्या दिवशीं तुम्ही तयार व्हाल त्या दिवशीं—विशेषतः या काळामधें ही लढाई झाल्यानंतर राज्य व्यवस्था काही तरी निराळी करावी लागेल हल्लीच्या सारखी राज्याची व्यवस्था असली तर युरोपियन राष्ट्रांत इंग्लंडला कांहीं अधिकार देता येत नाहीं. सध्यां इंग्लंड सर्वांना मोठे प्रबळ आहे. विलायतसरकार बलिष्ठ आहे. परंतु ते तसेच कायम ठेवण्याला हल्लीच्या राज्यव्यवस्थेंत जरूर फरक केला पाहिजे. वस्तुतः तो फरक करा असे ते म्हणत आहेत; हिंदुस्थान तो फरक करा असे कांहीं म्हणत नाहीं. त्यांत कांहीं तरी खोड्या निघतात. मी आज ऊभा राहिलो. ऊद्या दुसरा ऊभा राहीला. आणि सांगतो कीं यात तुमचे कल्याण नाहीं आज जी चालली आहे तीच व्यवस्था बरी आहे. दयाळू सरकार आहे. अधिकारी वर्ग शहाणा आहे. तेव्हां त्यांच्या तंत्राने चालला तर बरें. ... ... व्यापारी वर्गाला ही स्थिति लागू नाहीं. बुद्धिमान लोकाना ही स्थिती लागू नाहीं. कोणत्याही धर्मातील मुसलमानाना वगैरेना लागू नाहीं. एकाच केवळ वर्गाला केवळ मुसलमान व्यापाऱ्यांना लागू आहे असे नाहीं. मला जी गोष्ट सांगावयाची आहे ती मुसलमानाकरितां, हिंदुकरिता, व्यापाऱ्याकरिताही नाहीं. सगळ्यांना लागू आहे. सगळ्या लोकाना एकच औषध आहे, ते औषध सत्ता, आपल्या ताब्यांत घ्या ती तुमच्या ताब्यात आली म्हणजे तुमची आमची भांडणें असली तर ती आपल्याला तोडता येतील. आपल्या हातांत सत्ता आल्यानंतर ती भांडणें आपल्याला तोडायाला पुष्कळ वेळ आहे. धर्मसंबंधीं समजुतीत मतभेद असला तरी ही आम्ही तोडू. सत्ता याच्या करिता आम्हाला पाहिजे आहे. भांडणे मिटवाव-

यास सत्ता पाहिजे. ती वाढविण्याकारिता सत्ता नको आहे. जे कांहीं आम्हाला आमच्या देशा करितां करावयाचे आहे ते आम्हाला जितके कळते तितकें कांहीं परकीयांना कळत नाहीं त्यांची दृष्टी निराळी असते यासाठीं इंग्रज सरकारचे राज्य वर कायम ठेवून एकच बादशहा इंग्रज सरकारच्या साम्राज्यावर ज्या प्रमाणें राज्य करतो त्याचप्रमाणें तो हिंदुस्थानावरही राज्य करील. पण इतर वसाहतींत जशी व्यवस्था आहे तशी येथे सुरू करा. तेथें वसाहतीमध्यें त्यांची सत्ता त्यांची मालकी कायदे करण्याची सत्ता सर्व त्यांच्याच हातांत असते. त्यानें बादशहाला बाध येत नाहीं इंग्रज सरकारचें राज्य बुडविण्याचा प्रयत्न नाहीं तर इंग्रज सरकारचें राज्य लोकांना अधिक समाधानकारक करण्याचा हा प्रयत्न आहे. यानें कांहीं लोकांची पोटें बुडतील नाहीं असें नाहीं. तेवढ्या लोकांकरितां हिंदुस्थान बादशाहानें राखून ठेवलें आहे असें वाटत नाहीं, कांहीं कारणानें ही व्यवस्था आली आहे. ती गेली पाहिजे. लोकांच्या हातांत बादशाहानें अधिकार दिले पाहिजेत. आणि हिंदी प्रजे मध्ये, व इंग्रजी प्रजे मध्ये, गोऱ्या आणि काळ्या प्रजे मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवतां ती जशी बादशहाची प्रजा तसेच आम्हीही प्रजा आहो. ते जितके सुखी आहेत तितके आम्हालाही सुख झालें पाहिजे. या सगळ्यांची किल्ली म्हणून जी हाल्ली कांहीं लोकांनीं शहाण्या, विद्वान्, विचारी पुरुषांनीं जी गोष्ट ठरविली आहे ती स्वराज्य होय. त्याची वेळ आज आली आहे. त्याचा अर्थ काय आहे. ते मी आपल्याला समजावून सांगितलें आहे. त्याची वेळ आली आहे. ही ती कशी हें आपल्याला मी सांगितलें आहे. परंतु सर्व काहीं असलें तरी तुमचा निश्चय अखेरीचा आहे. वेळ आलेली फुकट जाईल. जी व्यवस्था मी म्हणतो ती होणार असली तरी तुम्हाला लाभणार नाहीं. तुमचा निश्चय पाहिजे. ती मिळविण्याची सुदैवानें गोष्ट अशी आहे कीं या प्रकारची चळवळ हल्ली सुरू झाली आहे. नुकतीच बेळगावाला आम्ही स्वराज्याचा उद्योग करण्याकरितां एक संस्था स्थापिली आहे. कॉंग्रेस सभेत हा विषय आहेच. आणि ते त्याची कांहीं तरी व्यवस्था लावतीलच. परंतु प्रांताप्रांतांनीं आपली जरी तजवीज केली आणी त्याना सहाय्य केले निदान इतके धैर्य दाखविले पाहिजे कीं कोणी विच्यारले. कलेक्टर कमीशनर वगैरे यानी — कीं तुम्हाला काय पाहिजे तर

आम्हाला सत्ता पाहिजें. आमच्या हातात सत्ता पाहिजे. सरकारी नोकर लोकांचे नोकर आहेत. असे समजावे. तुम्ही असे समजू नका कीं पुढें तुमचे हातांत सत्ता असली म्हणजे तुम्ही युरोपियन लोकांना नोकर ठेवावयाचेच नाहीं. त्याला चांगले काम येईल तर ठेऊं. आणि आम्हाला योग्य दिसेल ते त्याला देऊ. परंतु तो आमचा नोकर पाहिजे. त्याचे नोकर आम्ही नाहीं. अशी बुध्धी मनामध्ये बाळगून त्याकरितां आपण जर खटपट केली तर ही गोष्ट साध्य होण्यासारखी आहे. याकरितां लागेल ती मदत करा. याला जे कांहीं लोक आपल्याला सांगावयास येतील त्यांना जे कांहीं सहाय्य करावे लागेल तें करण्यास तयार व्हा. आणी असे तुम्ही तयार झाला–ठिकठिकाणचे लोक–पुणे मुंबई नगर इतकेच नव्हे तर मद्रास बंगाल वगैरे ठिकाणचे सर्व ठिकाणचे लोक तयार झाले तर ही गोष्ट साध्य आहे. ती सिद्ध होण्या करितां–लवकर सिद्ध होण्या करितां त्या उद्योगाला लागा. इतके आपल्याला सांगून त्याप्रमाणें कांहीं तरी फळ लवकरच दृष्टीस पडण्याचा काळ हिंदुस्थानावर येईल. अशी आशा प्रदर्शीत करून जर कांहीं मी आपल्या व्याख्यानामधे प्रमाद केले असले किंवा आपल्याला कांहीं लागून बोललो असलो तर त्याबद्दल आपली क्षमा मागून मी आपले अत्यंत आभार मानतो. (cheers)

Compared by B. S. Purandhare.

Comparing fee Rs. 1—12—0

Copy applied for by Mr. S. K. Damle, Pleader for Mr. B G. Tilak on—24th July 1916.

Copy ready on—26th July 1916.

Copy delivered on—26th July 1916.

True Copy

G. W. HATCH,

District Magistrate, Poona.

M. S. K.

D. C.

परिशिष्ट ३

[खालीं दिलेलें व्याख्यान सरकारच्या लघुलेखकांनीं जसें शुद्ध वा अशुद्ध लिहून दाखल केलें तसेंच छापलें आहे.]

लो. बाळ गंगाधर टिळक यांचें "होमरूल"वरील नगर येथील दुसरें व्याख्यान

तारीख १-६-१६ रोजीं रात्रीं ९। वाजतां झालेलें

जागा--जुना कापडबाजार

रा. चौकर वकील यानीं टिळकास व्याख्यान देण्याची विनंति केली. (cheers)

बाळ गंगाधर टिळक म्हणाले:— ("टिळक महाराज कीं जय अशी आरोळी") काल जे येथे व्याख्यान झाले, त्यानंतर दुसरे व्याख्यान देण्याचा बहुदा प्रसंग येणार नाहीं असे मला वाटलें होतें. स्वराज्यासंबंधीं ज्या दोनचार कांहीं सामान्य गोष्टी आहेत त्या एका तासांत जितक्या मला सांगतां येणें शक्य होतें, तितक्या त्यावेळीं मी सांगितल्या आहेत. परंतु हा विषय असा आहे कीं, त्यावर एक काय दहा व्याख्यानें झालीं तरी तीं पुरीं पडणार नाहींत. तेव्हां कालच्या विषयाला अनुलक्षुन काल ज्या कांहीं गोष्टी सांगण्यांत आल्या नव्हत्या, अशा प्रकारच्या स्वराज्यासंबंधानें दुसऱ्या २ गोष्टी, ज्यामुळें त्याच विषयाचें अधिक स्पष्टीकरण होईल, अधिक समजुत पडेल, लोकांच्या मनांतील कल्पना अधिक विषद होतील, अशा प्रकारें आज त्या विषयावर पुन्हा मी बोलणार आहें. साधारणतः माझें मत असें आहे कीं, आम्हांला ज्या कांहीं सुधारणा पाहिजे आहेत, त्या स्वराज्याच्या सुधारणा होत. आपल्याला माहित असेल "वृध्ध जरठी ती न्याय' तो असा आहे कीं, त्या म्हाताऱ्या बाईला देवता प्रसन्न झाल्यानंतर तिनें काय मागावयाचें याचा विचार केला, आणि असें सांगितले कीं, देवतेपासून असा वर मागितला कीं, माझे नातु सोन्याच्या ताटांत जेवतील असें मी प्रत्यक्ष पाहिन, असा वर देवतेनें मला द्यावा, म्हणजे

तिनें तोपर्यंत हयांत रहावें, मुलगा व्हावा, त्यानें संपत्ति मिळवावी वगैरे वगैरे-या एका लहानशा वरामध्यें सगळा अर्थ एका ठिकाणीं येतो. तद्वतच स्वराज्याची गोष्ट आहे. स्वराज्य जर मिळालें नाहीं तर औद्योगीक उन्नती व्हावयाची नाहीं, स्वराज्यं मिळालें नाहीं तर कोणत्याही प्रकारचे प्राथमीक शिक्षण असो, वरीष्ट शिक्षण असो, राष्ट्राला उपयुक्त असें शिक्षण मिळणें शक्य नाहीं-स्वराज्य जर मिळालें नाहीं तर नुसतें स्त्रीशिक्षणही वाढवून चालावयाचें नाहीं, औद्योगिक सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं, सामाजीक सुधारणा होऊन चालावयाचें नाहीं, ही सगळी स्वराज्याचीं अंगें आहेत, सत्ता आधी आणि ज्या ठिकाणीं सत्ता त्या ठिकाणीं शहाणपण, शहाणपण सत्तेला सोडुन नसतें. असेल तर तें विफळ होते. कोणत्याही राष्ट्रामध्यें हा सिध्धांत कांहीं विषेश विषद करून सांगावा लागत नाहीं पण आमच्या लोकांना हा विशेष रीतीनें समजावून द्यावा लागतो. याचें कारण आमच्याकडे स्वराज्य नाहीं. हें होय. कांहीं लोक आमच्या पक्षावर असा आक्षेप घेत असतात कीं; तुम्ही सामाजिक सुधारणा कां करीत नाहीं ? हें बोलणें आमचें नाहीं. ज्यांना आम्हाला स्वराज्याचे हक्क द्यावयाचे नाहींत, त्यांचे, आमच्या चळवळीची गाडी या रुळावरून काढून दुसऱ्या रुळावर घालण्याकारितां, हें बोलणें आहे. सामाजिक सुधारणा ज्यांची झाली आहे. असे पुष्कळ लोक आहेत. सामाजिक सुधारणा ब्रह्मदेशांत पुरी झाली आहे. धर्म एक आहे. (तेथें) हव्या त्या गोष्टीला ते लोक तयार आहेत. त्यांचीं मुलें हवे त्यांच्याशीं लग्न करितात. कोणत्याहि गोष्टीला राष्ट्रीयत्वाचे तेज येथें नाहीं. तो देश परतंत्र्यांत पूर्ण बुडून राहिला आह तेव्हां पाहिजे आहे काय ? आम्ही एक राष्ट्र आहों. आम्हांला कांहीं या जगांतील कर्तव्य आहे. मनुष्याचे जे स्वाभाविक हक्क आहेत ते आम्हाला मिळाले पाहिजेत, स्वतंत्रता. आम्हांला पाहिजे आहे. आमचा कारभार चालविण्याचा हक्क आमचे हातांत पाहिजे. या गोष्टी जर तुम्हांला मिळाल्या नाहींत, तर कोणतीही सुधारणा तुम्हांस फलद्रूप होणार नाहीं. ते सगळ्या सुधारणांचें मूळ आहे. सत्ता नाहीं. शहाणपण नाहीं, नुसतें पुस्तकी शहाणपण सत्तेशिवाय व्यर्थ आहे. अशी जर तुमची समजूत असेल, कीं जे लोक राज्यकर्ते-आमच्यावर राज्य करावयाला आले आहेत ते आमच्यापेक्षां बुद्धीनें आणि विद्येनें अधिक आहेत. माझी अशी

स्वतःची समजूत नाही. त्यांच्या इतकी विद्या, त्यांच्या इतके शौर्य, त्यांच्या इतकी कर्तबगारी, आम्ही दाखवूं शकूं. कदाचित ती आज निदर्शनास आली नसेल, पण ती आमच्या आंगांत आहे. जोतिषामध्यें जसे योग असतात तसेच इतिहासामध्येंही योग आहेत. मुसलमानांचें एक राज्य बुडत चाललें होतें तेव्हां मराठे नुकतेच उदयास आले होते. पुढें या हिंदुस्थानांत इंग्रजांचा पाय पडल्यामुळें सर्व सत्ता त्यांच्या ताब्यांत गेली आहे, आणि त्यांचें जें कांही तुम्ही कौतुक करितां, त्यांच्या कर्तबगारीबद्दल जो कांहीं एक आपल्याला अभिमान वाटतो मग तो खरा असो वा खोटा असो—तो अभिमान किंवा तें त्यांचें कौतुक याला त्यांची सत्ता कारण होते.—आणि या सत्तेचा जेव्हां कांहीं थोडा तरी अंश तुमच्या ताब्यांत येईल तेव्हां तुमच्या शहाणपणाचें चीज होईल. पुष्कळ गोष्टी आज आम्हांला पाहिजे आहेत. आमच्या उद्योगधंद्याची सुधारणा झाली पाहिजे, पण ती अडली कां ? कोणी अडविली ? याला कारण काय याचा जर विचार करावयास लागले तर ही औद्योगिक सुधारणा आम्ही अडविली नाहीं, सांपत्तिक सुधारणा आम्ही अडविली नाहीं; ज्या राष्ट्रामध्यें वर यावयास आपणास आपली कांहीं तरी कर्तबगारी दाखविण्यास मार्ग आहे, मोकळिक आहे त्या राष्ट्रामध्यें गुण उदयाला येत असतात ... ... शहाणपण असेल तर कोणत्या तरी मोठ्या अधिकाऱ्याला मदत करून त्यांनीं जेव्हां तुम्हांस शाबासकी द्यावी तेव्हां तुम्हांला वाटतें कीं तुमच्या आंगांत कर्तबगारी आहे. हा जो एक प्रकारचा मनाचा हलकेपणा,—नाहुरूपपणा, आहे तो सर्व राष्ट्राला ग्रासून राहिला आहे. म्हणावयाचें कीं; माझ्या हातून होणार नाहीं, तूं कधीं केलें नाहीं, तुला कोणी सनद दिली नाहीं, त्याच्या आधींच तूं कां ओरडतोस कीं, अमुक गोष्ट माझे हातून होणार नाहीं. म्हणून कोणत्या तरी दुसऱ्या मार्गाला लागतात. निदान आमच्या महाराष्ट्रांत तरी अशा रीतीनें लोकांनीं कांहीं कांहींनीं हीच सबब काढून स्वराज्याचे हक्क प्राप्त होण्यासाठीं जी चळवळ चालविली आहे त्याचे आड यावें हें माझ्यामतें मोठें दुर्दैव होय. आम्ही या गोष्टी केल्या नाहींत का ? याचा विचार करा. राष्ट्राकरितां उपयोग करून घेण्यासारखा गूण महाराष्ट्रांत खचित आहे. पण त्या गुणाचा उपयोग करण्याची संधी आपल्याला हल्लींच्या काळीं मिळत नाहीं. आणि ती संधी मिळत नाहीं म्हणून

दुसरें कांहीं तरी करा, स्त्रीशिक्षण करा, अमुक करा, तमुक करा, इकडे आमचें मन कांहीं वळत नाहीं (cheers) दुसऱ्या कोणाला यामध्यें जर–कांहीं धोका वाटत असेल तर त्यांनीं करावें पण माझ्या मनाची खात्री होऊं शकत नाहीं, झालेली नाहीं आणि जीं थोडीं कांहीं वर्षे राहिलीं आहेत-त्यांत होईल असें वाटत नाहीं. (cheers) इतर विषयासंबंधानें बोलणें वायफळ आहे. आमचे लोक आज वीरश्रीनें शौर्यानें विद्येनें युक्त नाहींत ते आमच्या बायका शिकल्या म्हणजे त्यांची पिढी तशी होईल परंतु ते तरी आमच्याच वीर्यापासून व्हावयाचें. (cheers) अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे स्त्रीशिक्षण नको असें मी म्हणत नाहीं पण ही इकडची चळवळ बंद करण्याकरितां तिकडे वळा असें जेव्हां आम्हांला सांगतात त्यावेळीं आमचें असें म्हणणें आहे कीं; राष्ट्र मृत करण्याचा हा उपाय आहे. तुमच्या आंगांत जर कुवत नसेल, तुमच्या आंगांत एखादी गोष्ट प्राप्त करून घेण्याची धमक नसेल तर शिकलेली बायको घेऊन तिच्या पोटीं जें संतान होईल तें तसें होईल आणि ते आमचे पुत्र उतराई म्हणून कांहीं खटपट करतील असें म्हणणें अगदीं मूर्खपणाचे आहे. (Cheers.) तुम्हांला आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे. तुम्हांला या गोष्टी घडवून आणल्या पाहिजेत. आणि त्यांतील–मुख्य गोष्ट ती प्रथमतः घडवून आणिली पाहिजे. ज्यांनीं आज ५० वर्षे प्रयत्न केले त्यांचा असा अनुभव आहे कीं; हें स्वराज्य ही सगळयांची किल्ली आहे. आणि ही जर तुमच्या हातांत आली नाहीं तर किरकोळ प्रयत्न करून मग ही सुधारणा आम्ही करितों. तुम्हांला करावयाची असेल तर करा मीझी हरकत नाहीं. परंतु तें कांहीं—याला (स्वराज्याला) पोषक नाहीं. या मार्गाला पोषक नाहीं. आणि याच—बुद्धीनें मी जें काल सांगितलें त्याच विषयावर पुन्हा मी आज बोलणार आहे. स्वराज्य म्हणजे काय हें काल सांगितलें. स्वराज्य म्हणजे इंग्रजांना घालवून द्यावयाला नको राजा कोणी असला तरी चालेल. राजाशीं आम्हांला कांहीं करावयाचें नाहीं. आमचे हक्क आम्हांला मिळाले म्हणजे झालें. आणि तो राजा कोणीही वर असोन ते हक्क मिळूं शकतात. इंग्लंडांत राजा आहे. परंतु इंग्रज लोकांना हक्क आहेत किंवा नाहींत. इंग्लंडचा राजा. तोच आमचा बादशाहा. मग इंग्लंडांत त्यांचें राजेपण कायम राहून जर इंग्रज लोकांना स्वातंत्र्याचे हक्क मिळ-

तात, तर हिंदुस्थानांत तोच राजा बादशहा म्हणोन कायम राहून ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क आम्हाला मिळण्याला अडचण कोणती ? कोणत्याहि प्रकारची अडचण राहात नाहीं. हे जे काहुर उठविलें आहे कीं, होमरूल–स्वराज्य–याबद्दलची चळवळ राजद्रोही आहे, आणि जो राजद्रोह आहे असें समजून बीझांटबाईकडोन दोन हजारांचा परवा जामीन घेण्यांत आला. हें काहुर हा आक्षेप बादशहाचा नाहीं, प्रजेचा नाहीं, मध्यंतरी जे कोठावळे आहेत त्यांचा आहे (cheers) तुम्हांला जें कांहीं कर्तव्य आहे, ते हें कीं, ही राज्य व्यवस्था बदलली पाहिजे. राजा बदलावयाला नको. ज्या पद्धतीनें ज्या वेवस्थेनें हल्लींचें राज्य चाललें आहे, ती वेवस्था ती पध्धत बदलल्याखेरीज हिंदुस्थानाचा प्रत्येक मनुष्य अधिक अधिक नामर्द होत जाईल. आपल्याला जे कांहीं कर्तव्य आहे, ते हे कीं, ... –कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ... खायाला तर देतात कीं, नाहीं, कोणाला मारित नाहींत, पशुपक्षाना सुध्धां खायाला मिळते. खायाला मिळणें हा कांहीं पुरूषार्थ नाहीं नाहीं. कुटुंबाचें उदरपोषण करणें हा कांहीं पुरुषार्थ "काकोपि जिवती चिराय बलिंच भुंक्ते" कावळा आपला उदरनिर्वाह करितो. त्यांना कांहीं शेतें पिकवावीं लागत नाहींत. रोज त्यांना शिजविलेला भात खायाला मिळतो. उदरनिर्वाह करून पोट भरून राजानें लावुन दिलेल्या मर्यादेच्या आंत, त्यांनीं मोकळया ठेवलेल्या जेवढ्या जागा असतील तेवढ्या स्वीकारून त्यांचे हुकुम मानणें, त्यांच्या तंत्रानें उदरनिर्वाह करणें, यांत कांहीं मी पुरुषार्थ समजत नाहीं. पशुंचा आणि हा समान धर्म आहे. मनुष्यामध्यें जर कांहीं मनुष्यपणा पाहिजे तर आमची बुध्धी, आमची कर्तबगारी, आमची एकंदर हिंमत, हीय्या यांना कांहीं तरी प्रदेश मोकळा आहे कीं नाहीं. हिंदुस्थानांला तसा प्रदेश मोकळा नाहीं, याकरितां तुम्हाला जर कांहीं कर्तव्य असेल तर पहिले कर्तव्य हें कीं, या सत्तेपैकीं कांहीं अंश आपल्या ताब्यांत घ्या, थोडाका घ्यानां, अध्यक्षांनीं म्हटल्याप्रमाणें (नगर जिल्हापारिषदेचे अध्यक्ष N. C. Kelkar) थोड्या मध्यें आम्ही मुखत्यार –आमचा पैसा आम्ही खर्च करणें, आम्ही कर देतों, तो कोणत्या कार्याकडे लावावा, याच्याबद्दलचा ठराव आम्ही आपल्या बुध्धीनें करणें, दहापांच लोकां-

च्या संमतीनें करणें, अशा प्रकारची उमेद जर वाळेगीली नाहीं तर उत्तरोत्तर सृष्टीनियमाप्रमाणें—अशी जी कांहीं मनुष्यामध्यें या प्रकारची उमेद किंवा बुध्धी असते ती कमी कमी होत जाईल, त्या मानानें अधिक अधिक पशुंच्या समानतेला येत जाऊं. स्वराज्य स्वराज्य म्हणजे काय? आणि त्यानें होणार काय? स्वराज्य म्हणजे काय एक कलेक्टर काढला आणि तुमचा (natives) आला. हें जरी आम्हाला कलेक्टर राहून शेवटीं ते (English) आलें तरी पाहिजे आहेत. अमुक मनुष्य काढा अमुक ठिकाणीं अमुक वेवस्था ठेवा असे सांगण्यास कांहीं हरकत नाहीं. कदाचित् गोरा मनुष्य पगार देऊन आमचाही नोकर होईल, चांगला असला तर आम्ही ठेऊंही. व्यक्तीचा वादच नाहीं. राष्ट्राचा वाद आहे. अमुक एका राष्ट्राला पशुसारखे वागवावयाचें कीं त्या राष्ट्रांतील लोकांना माणसें आहेत, असें समजून त्यांच्या मनोवृत्तीला त्यांच्या स्वातंत्र बुध्धीला कांहीं तरी वळण लावणें, त्यांना सुधारलेल्या राष्ट्राच्या पंक्तीला आणुन द्यावयाचें, हा मुख्य प्रश्न आहे. आणि अशा दृष्टीनें जर विचार केला तर त्याला स्वराज्याखेरजि–सत्ता हातीं असल्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग नाहीं. ती सत्ता ज्यावेळीं एकदां आपल्या हातांत येईल त्यावेळीं आपल्याला हजारों गोष्टी करितां येतील. पुण्याला एवढा मोठा प्रयत्न झाला कीं, घोड्याला एक दारूचें दुकान एक हजार दोन हजार प्रांतीचें असेल सरकाराला—परंतु तें उठविण्याचें आमच्या ताब्यांत नाहीं अमुक ठिकाणीं दारूचें दुकान घाला, किंवा घालूं नका, याला इतकें correspondence कशाला? ह्या येवढ्या खटाटोपाला मला वाटतें, कीं, जितके कागद लागले असतील तितका दुकानाला वर्षाचा नफा नसेल. (laughter here here) हा जो खटाटोप चालतो हल्लींच्या वेवस्थेंत तो बंद व्हावा ही अरेरावी बंद व्हावी, आणि ती सत्ता आमचे ताब्यांत यावी ती सत्ता आमचे ताब्यांत आल्यानें आमचे अंगांत असलेल्या वडलोपार्जित गुणांचा उत्कर्ष होईल. ते गुण कोणत्याही तऱ्हेनें उपयोगांत आणावयाला आम्हांला वाट सांपडेल. तें स्वराज्य, स्वराज्य म्हणजे दुसरे कांहीं नाहीं. थोडे कां असेनां? तें तुम्हाला जाचत नाहीं. जितकें जाचावें तितकें जाचत नाहीं. घरामध्यें बसला कांहीं तरी धंदा केला, दोन पैसे मिळविले, मुलाबाळांचें पोट भरलें हें इतकें पुरतें आहे. आतां स्वराज्याची खटपट कशाला

याचें उत्तर येवढेंच आहे कीं, जी एक राष्ट्राबद्दलची बुध्धी, आपल्यापेक्षां कांहीं तरी अधिक या जगामध्यें आहे, आपल्या एका व्यक्तीपेक्षां अधिक व्यक्तींच्या समुदायाचा फायदा करण्याचें जें एक अधिक कर्तव्य आहे, तें कर्तव्य तुम्ही विसरत चाललां. एक वेळ अशी होती कीं, महाराष्ट्राच्या मालीकेंत या मुलखांत असे कर्ते पुरुष होते कीं, ज्यांना ध्येयांची जागृती होती. परंतु दैवयोगानें हा मनुष्य स्वभाव राहिला नाहीं. आमचें काम जर दुसरा करूं लागला तर आम्ही म्हणतों बरें झालें. काम झालें म्हणजे झालें. पण कोठें बरें म्हणावयाचें आणि कोठें नाहीं याचा विवेक मात्र आमच्यांतून नाहींसा झाला आहे. इंग्रज लोक आमचा राज्यकारभार चालवितात, तुम्ही स्वस्थ बसलां आहां. गुरांच्या गोठ्यांत घाण असेल तर झाडलोट करितात--Sanitation--बघतात, वेळच्या वेळीं खायाला घालतात, पाणी पाजतात-परंतु गुरांनीं असा प्रश्न केला आहे कां, कीं ही वेवस्था आमच्या हातांत यावी (Laughter) मनुष्यांमध्यें आणि गुरांमध्यें भेद आहे तो हा कीं नगरच्या शहरचे Sanitation कलेक्टरसाहेबांनीं पहावयाचे, रोग आला तर काय करावे हें त्यांनीं सांगावयाचें, दुष्काळ पडला तरी त्यांनीं व्यवस्था करावयाची तुमच्यावर कोणतीही आपत्ती येऊं नये याची वेवस्था त्यांनीं करावयाची. म्हणजे ज्याप्रमाणें पोपटाला पिंजऱ्यांत ठेवितात त्याप्रमाणें तुमची स्थिती झाली आहे, ही स्थिती नको आहे, याला कारण नुसतें ते चालवितात हें नव्हे तर त्या वेवस्थेमुळें आपल्या अंगाचे सर्व गुण नाहींसे होत चालले आहेत, ते नाहींसे होऊं नयेत, याकरितां ते करितात, ते करावयाला आम्हांला मोकळीक पाहिजे, ते करतात त्या पलीकडचे दुसरे विषय शोधून काढावयाचे नाहींत. ते करीत आहेत ते सोडून दुसरें काय वाटेल ते करूं असें करावयाचें नाहीं. तेंच पाहिजे आहे. तीच सत्ता आम्हांला आमचे हातांत पाहिजे आहे. याला एकच काय तो आक्षेप आहे. परंतु अशी अवस्था होणें अत्यंत वाईट आहे. एक गोष्ट केसरीमध्यें प्रसिद्ध झाली होती, पिंजऱ्यांत ठेवल्याबद्दलची अशी कविता रविंद्रनाथ टागोर यांनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहिली आहे. पिंजऱ्यांत ठेवलेला एक पोपट आणि बाहेरचा एक पोपट या दोघांचा संवाद त्यांत सर्व सांगितलेला आहे बाहेरच्या पोपटांनीं पिंजऱ्यांतील पोपटाला सांगितलें कीं, बाहेर अशी

मजा आहे. इतकें हिंडावयाला मिळतें वाटेल तेथें जायाला मिळतें, वाटेल त्या वेळीं खायाला मिळतें. हा आनंद तुला कोठें आहे. पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटानें उत्तर दिलें कीं, बाबा तूं म्हणतोस तें खरें आहे. परंतु ही सोन्याची काठी बाहेर गेल्यावर कोठें मिळणार आहे. तशी आमची अवस्था झाली आहे! स्वराज्य मिळालें तर चालविणार कसें? देत नाहीं घेत नाहीं कोणी, तुम्हांला काळजी पडली स्वराज्य मिळाले तर आम्ही चालविणार कसें! आम्ही योग्य नाहीं त्या पोपटाला पिंजरा बसावयाला कांठी वगैरे कशी मिळणार तो बाहेर गेला तर तीच आमची अवस्था झाली आहे. ही अवस्था स्वाभाविक नव्हे. ती कृत्रीम आहे. त्या पोपटांला जसें पुष्कळ वर्षें पिंजऱ्यांत कोंडल्यामुळें त्याला अशी भावना उत्पन्न झाली, तसेंच हें अधिकार आमच्या हांतांतून गेल्यामुळें आम्हांला ही ती भावना उत्पन्न झाली. ही आमची मूळची स्वाभाविक--मनुष्याची स्वाभाविक--भावना नाहीं. जशी पोपटाची ती स्वाभाविक भावना नव्हे. तशीच आमच्या राष्ट्राचीही स्वाभाविक भावना नव्हे. हे पहिल्यानें लक्षांत घेतलें पाहिजे. जें अंगावर काम पडेल तें करावयाला आम्ही तयार होतों, याप्रमाणें जे लोक तयार होते, त्याचे वंशज आम्ही अस्होंत, आणि त्यांचे जर आपण खरे वंशज असाल तर आम्हांला ती संधी आली असतांना त्याचे on तेच गुण आमचे अंगांत प्रगट झाले पाहिजेत. आणि होतील अशा भरंशानें त्या करितां आपण उद्योग केले पाहिजेत असें माझें म्हणणें आहे (cheers) अनुवंशिक संस्काराला जर कांहीं किंमत असेल तर द्या, नाहीं तर अमक्याचे नातू पणतू हे तरी म्हणावयाचे सोडून द्या. हल्लीं आमचेकडे पुष्कळ सरदार आहेत ते म्हणतात आमचे आजे सरदार होते, त्यांच्या अंगांतहि त्यांच्या रक्ताचे गुण आलेले आहेत. परंतु त्यांनीं जें वतन मिळविलें आहे ते बचावण्याकरितां ते साहेबांची कोणत्याहि प्रकारें वाटेल त्याप्रकारें सेवा करतात, बरें मी म्हणतों हे सरदार म्हणून असे लागले. परंतु तुम्ही आम्ही ज्यांना कांहीं मिळवावयाचे नाहीं, त्यांनीं तरी त्यांच्या नादीं कां लागावें? अशा तऱ्हेची जी राष्ट्रावर एक प्रकारची छाया पडली आहे या छायेंतून आपल्याला सुटावयाचें आहे. हें ग्रहण आहे. चंद्राला ग्रहण लागलें म्हणजे तें सुटण्याकारितां दानें करितात, तुम्हाला जें ग्रहण लागलें आहे, तें सुटण्याकारितां एक पैहि खर्च

करावयाला तुम्ही तयार नाहीं. किंवा त्याकरितां हलायाला तयार नाहीं. चंद्राला ग्रहण लागलें म्हणजे पूर्वीचे ब्राह्मण जप तरी करीत होते. तुम्ही कांहीं जप तरी करितां आहां कां ?. या करितां खटपट करीत अहां कां ? याकरितां कोणाला दोन पैसे द्यायाला तयार आहां कां ? नाहीं. कांहीं नाहीं. येवढा मात्र अक्षेप काढतात कीं, हिंदूस दिलें तर मुसलमानाचें कसें चालावें ? हिंदूस स्वराज्याचे अधिकार दिले तर मुसलमानांना मिळणार नाहीं. मग मुसलमान बंधूबरोबर याचा योग्य विचार करून ठराव करितां यावयाचा नाहीं जसें ? आमचे हातांत सत्ता आली तर आम्ही मुसलमानांवर जुलूम करूं आणि मुसलमानांच्या हातांत गेली तर ते हिंदूवर जुलूम करणार ? हे लोकांच्या तर्फे ह्या गोष्टी तुम्हाला सांगाला येतात. ते कोण ? कशाकारितां ह्या गोष्टी तुम्हाला सांगितात. तुम्हाला भुरळ पाडण्याकारितां. याचा विचार केला पाहिजे. हे सिव्हिल सर्वंट लोक तुमच्या पेक्षां फार हुशार आहेत. त्यांना आपले हातांत सत्ता ठेवावयाची आहे. हा "त्रयाणां धूर्तानाम्" सारखा प्रकार आहे. राजकीय कामामध्यें तुम्ही म... तलें म्हणजे तुम्हाला सांगावयाचें कीं, तुम्ही नामर्द आहां तुमच्या विरुद्ध मुसलमान आहेत (असे ते सांगतील) मुसलमानानी सांगितलें कीं आमची कांहीं हरकत नाहीं. तर तिसराकडे बोट दाखवावें म्हणून ही धूर्तगिरी चालली आहे. या धूर्तगिरीला न फसतां मला तुमच्यापैकीं कोणाला असें सांगणें नाहीं कीं, हे हक्क मिळण्याकारितां बेकायदेशीर गोष्टी करा. कायदेशीर मार्ग आहे परंतु तो कायदेशीर मार्ग असा आहे कीं, तुम्ही अगदीं दुसऱ्याचें ऐकतां कामा नये. तुमचें जें काय आहे त्या गोष्टा आम्हाला पाहिजे असें निश्चयानें तुम्ही म्हणावयाला तयार झालें पाहिजे. जोंपर्यंत तुमच्या मनांचा निश्चय नाहीं, तोंपर्यंत कोणी पोलिसाचा अमलदार आल्याबरोबर "कां टिळकांच्या व्याख्यानाला गेला होतास काय ?" "हो मागून गेलों होतों. लांब बसलों होतों. मला सगळें ऐकूं आलें नाहीं." (cheers) पोलीस अंमलदारानीं पाहिलेलें असतें नाहीं म्हणतां येत नाहीं. अशा तऱ्हेची तुमच्या मनामध्यें भीति कां ? आम्हाला स्वराज्य पाहिजे आहे. असें म्हणण्यांत काय भीति आहे, हें अडतें घोडें ते येथें अडतें, त्याला (लोकांना) (व्याख्यानास येणाऱ्या) मागाहून विचारलें म्हणजे सांगतो खरें असेल तें. पण (पोलीसनीं विचारले तर) म्ह-

णतो "मी नीट ऐकलें नाहीं, २।४ माणसें सांगत होतीं त्याला काय करावें माझें मत नाहीं हो त्याचे सारखे" अशी लटपटपंची नाहीं चालावयाची या कामांत. लटपटपंचीनें कोणतीहि देवता प्रसन्न होत नाहीं. त्या देवतेला तुमच्या मनांत काय आहे तें कळत असतें आणि या सगळ्या ज्या कळणाऱ्या देवता आहेत त्यांत स्वतंत्रता देवीचा या विषयावर मोठा कटाक्ष आहे. तुम्हाला पाहिजे तें मागा आणि देतील, कदाचित एक दोनदां नाहीं म्हणतील कितीदां नाहीं म्हणणार हें अशा लटपटपंचीचे काम नाहीं इतकी खात्री झाली पाहिजे. यत्न झाल्या खेरीज गत्यंतरच नाहीं अशी त्यांची खात्री झाली पाहिजे. तुमच्यांत कांहीं दिसेपर्यंत भीती दाखवावयाची, हें प्रत्येक देवतेचें काम आहे. आमच्या योगशास्त्रामध्यें पाहतां देवता साधन करण्यास पाहिजे. त्या भीती दाखवावयाला लागतात. साधलें म्हणजे बरेंच झालें. आपण भीतीला न जुमानतां आपण आपलें काम निश्चयानें केलें तर योगशास्त्रांतील देवता आपल्याला प्रसन्न होतात. हें प्रमेय आहे. हा न्याय आहे. राजकीय बाबतींत हि दुसरा न्याय नाहीं. मार्ग नाहीं आम्हांला तें पाहिजे आहे, तें (स्वराज्य) प्राप्त करून घेणार आणि तें मिळाल्याखेरीज आम्ही आपले उद्योग सोडणार नाहीं अशी दृढ भावना तुमच्यामध्यें असल्याखेरीज ही गोष्ट कांहीं प्राप्त व्हावयाची नाहीं. हें भय मागें राहील, पोलीस मागें राहील, सी. आ. डी. कलेक्टर मागें राहील, अखेर ती गोष्ट प्राप्त होईल. यांच्या डुरकावणीला तुम्ही डरतां कामा नये, किंबहुना असें समजलें पाहिजे कीं, हा याचा एक निश्चित परिणाम आहे. इंग्रजीमध्यें अशी एक म्हण आहे कीं, अंधारांतून गेल्या खेरीज उजेड दिसणार कसा? सूर्याला सकाळीं उगवावयाला अंधारांतून जावें लागतें. सामान्य लोकांची समजूत सांगतो. शास्त्राची समजूत सांगत नाहीं. अंधारांतून गेल्याखेरीज उजेडाची प्राप्ती होत नाहीं, या छळा, जाचणुकींतून आणि लोकांच्या डुरकावणींतून बाहेर पडल्याखेरीज स्वतंत्रतेची प्राप्ती नाहीं. निश्चय पाहिजे आहे. स्वराज्य म्हणजे काय हें मी आपल्याला सांगितलें त्याचे प्रयत्न तितक्या जोरानें सुरू झाले पाहिजे. ईश्वरकृपेनें आज जगाची स्थिति पालटत चालली आहे. भाविक भाषेंत बोलावयाचें म्हणजे ईश्वर सहाय्य करण्याला तयार झाला आहे. पण ईश्वर तयार होऊन तुम्ही कोठें तयार आहांत (Laughter) ईश्वर

स्वस्थ आहे. आकाशांतून तुम्हांस देणगी धाडावी ! कोणीच धाडीत नाहीं, ईश्वर सुध्धां धाडीत नाहीं. आणि जर त्यानें धाडली तर तिचा उपयोग हि व्हावयाचा नाहीं. कारण तुम्ही भिऊन चाललां म्हणजे आहे हें च पाठीमागून आहे कीं नाहीं ही देणगी दिली तर तिचा उपयोग कसा करावा ? म्हणजे ईश्वराची कोठें जर जागा असली तर त्याच्या घरीं ती पोहचती कराल. जर पोस्टानें जात असेल तर पाठवाल (Laughter) अशा तऱ्हेची जी भावना ती झाल्यानंतर-राष्ट्रिय हक्क काय हें मी आपणाला सांगितलें, याच्यापैकीं भाग जी अशा तऱ्हेची सत्ता ती आपल्या हातीं आल्या नंतर काय घडून येईल. राष्ट्रावर काय परिणाम होईल हें मी आज सांगणार आहे. स्वराज्य म्हणजे काय हें मी आपल्याला सांगितलें. माझे मित्र केळकर यांनीं सांगितलेंच आहे कीं स्वराज्य म्हणजे इंग्रज लोकांना घालवून आपली सत्ता त्या ठिकाणीं स्थापित करावयाची नाहीं. कांहीं लोकांना घालवावें लागेल, राजाला घालून राजसत्ता हातांत घेणें नव्हे. तर प्रजेचे हक्क हातांत घेणें होय. इंग्लंडला या एका राष्ट्राला गुलाम ठेवण्यापासून कांहीं फायदा आहे काय याचा जर नीट विचार केला तर आज एकंदर जगाच्या स्थितीवरून असें दिसून येतें कीं, केव्हांना केव्हां तरी इंग्लंडला आपल्या हातांतील सामराज्याचे अवयव जे प्रांत व देश आहे, त्या देशांना स्वतंत्रता देणें जरूर पडेल. केव्हां तरी ही गोष्ट घडावयाची आहे. घडली पाहिजे. पण तुम्ही जर कांहींच केलें नाहीं तर मात्र घडावयाची नाहीं. सगळी रात्र जागून चोर ज्यावेळीं आला त्यावेळीं निजलेले, तशी तुमची स्थिती होईल. वेळ येते आहे. परमेश्वराच्या कृपेनें जगाच्या--इतर राष्ट्रांच्या---घडामोडीचें स्वरूप कदाचित् तुम्हाला अनुकूल होईल. पण हा काळ अनुकूल झाला, तुम्ही जागे असेल तर उपयोग-नाहीं तर निजलांत म्हणजे निजला. त्यामुळें जर आपल्याला स्वराज्याचे हक्क मिळाले तरी काय होणार आहे ? काय होणार याचें थोडक्यांत मी आपणाला चित्र सांगतों. पेशवाईच्या वेळीं काय झालें. त्याला थोडासा इतिहास अवलोकन करावयास पाहिजे. पेशवाईचे वेळीं महाराष्ट्रांतील व्यवहार चांगल्या रीतीनें चालला होता. अशी ही पेशवाई ज्यांनीं बुडविली, आणि बुडविल्यानंतर जे कमिशनर झाले ते:—Elphinstone साहेब आहेत. त्या साहेबांची साक्ष आहे. एवढें मोठें पुणें शहर असतांना, रात्रीं दरवडे पडत नसत.

दारूचा खप शून्य होता. त्याची बंदीच होती. मूळ जमाबंदीची पद्धत जी नाना फडणविसांनीं एकदां घालून दिली तिचीच नक्कल पुढें करण्यांत आली. किंब-हुना जमाखर्च ठेवावयाचा कसा, accounts ठेवावयाचे कसे हें शास्त्र पेश-वाईमधें आमच्याकडे उदयाला आलें आणि तेच आकाऊंटस अजून ठेविले आहेत. प्रांताची व्यवस्था कशी करावी हें आम्हाला ठाऊक होतें. नाना फडणविसाची सी. आय. डी. इतकी मोठी उत्तम होती कीं, अमुक सरदार जेवतांना अमक्या जवळ अमुक बोलला ही त्याच्याकडे बातमी जात असे. (cheers) एका वेळीं अशी गोष्ट सांगतात कीं, खोपोली घाटांतून मुंबई सरकारनें * रेसिडेंटकडे दारुगोळा मेण्यांतून पाठविला होता. पुणें दफतरांतून असा हुकूम सुटला कीं, अमुक तारखेला तो मेणा येईल तो घाटावर अडवून ठेवावा. याला बातमी होती कीं, मेण्यामधून दारुगोळा यावयाचा आहे. पुढें रेसिडेंटनें तक्रार केली कीं, आमचा मेणा आडविला कां ? तेव्हां नाना फडाणिसा कडोन त्यांना जबाब आला कीं, याचा तुम्ही च विचार करा. आम्ही मेणा जप्त केला आहे. तो सोडीत नाहीं. कोठें काय घडलें हें राजाला कळलें च पाहिजे. आम्ही तें केलें. सांगितलें. C. I. D. पाहिजे आहे. नको कोठें आहे. जर राजाला बख्तमी नसली तर राज्य-कारभारच करतां यावयाचा नाहीं. सी. आय. डी. बद्दल आमची मुळींच तक्रार नाहीं. त्याच्या काम करण्याच्या रीतीबद्दल तक्रार आहे. (Cheers) (hear hear) ती रीती कांहीं आमच्या ताब्यांत नाहीं. ज्याला राज्य चालवावयाचें आहे, त्याला सगळीं खातीं पाहिजे. पोलीस पाहिजे C. I. D. पाहिजे. रेव्हेन्यु पाहिजे. ज्युडिशियल पाहिजे. सगळीं खातीं पाहिजे. अडतें कोठें ? एका गोष्टींत अडते. सगळे लोकांच्या ताब्यांत आमच्या ताब्यांत पाहिजे. यामध्ये काय्तें आडते. कित्येकांचें असें मत झालें आहे कीं, इंग्रज हे अगदी सुधारलेले आहेत, आम्ही ही सुधारा. सुधारणा नको आहे कोणाला ? सगळया सुधारणा पाहिजे आहेत. नाना फडणविसाचे वेळीं पत्रें पाठवावीं लागत. आतां C. I. D. तार करील. साधनें उपलब्ध झालीं आहेत. या सगळयांचा उपयोग करून च राज्यकारभार चालवावयाचा आहे. पण ही सगळी पेशवाईच्या वेळी राज्य वेव-स्था होती. ती मोडून आता काय झालें आहे. तें लक्षांत आणा. पेशव्याचें राज्य गेलें. त्यावेळीं नगर, सातारा, पुणें, हीं जीं खुद्द पेशव्याच्याकडे ताब्यांत होती.

त्याच्या ताब्यांतील मुलूख इंग्रज सरकारच्या ताब्यांत आला. आणि पेशव्याचे जे हस्तक होते, ते त्यावेळी मोठे मोठे सेनापति होते. सैन्यावर ज्याचा अंमल चालत असे असे जाहागीरदार आणि सरदारापैकीं प्रमुख बडोदे होळकर आणि शिंदे होते हे तीघेही इंग्रज सरकारला लवकर सामील झाल्यामुळें जिवंत राहिले. आणि पेशवाई बुडाली हा १८१८तला इतिहास आहे. आज या तीघांची स्थिती काय आहे बडोदेसरकारची काय स्थिती आहे. होळकराची स्थीती काय आहे. शिंदेसरकारची स्थिती काय आहे. आणि पुण्याच्या आसपासच्या मुलखाची किंवा जिल्ह्याची स्थीती काय आहे. याचा विचार करा. हे ३१४ जिल्हे इंग्रज सरकारच्या ताब्यांत गेल्यामुळें हळू हळू यांचा सर्व कारभार एका ब्युराक्रसीच्या ताब्यांत आला. ह्या ब्युरॉक्रसीची वेवस्था कशी काय आहे कीं, लोकांचें कांहीं ऐकावयाचें नाहीं गव्हर्नर पहिल्यानें मग कमिशनर, नंतर कलेक्टर, कलेक्टरच्या हाताखालीं asstt: Collr. मामलेदार, अवल कारकून फौजदार पोलीस शिपाई सगळया एकंदर अधिकारी वर्गाची पहिल्यापासून शेवटपर्यंत अशी ही मांडणी आहे त्यांनीं लोकांकरता काय ते करावयाचें. वर सरकारला जें लोकांच्या कल्याणाचें वाटेल किंवा अकल्याणाचे वाटेल तें तिकडून हुकूम येईल त्याप्रमाणें खालीं वेवस्था व्हावयाची, पहिल्या पहिल्यानें मोठे गोड वाटलें होतें. बाजीरावाची अंदाधुंदी मोडली आतां म्हणालें आम्ही सुरक्षीत आहोत. घी दृष्टीस पडलें परंतु बडगा कोठें दृष्टीस पडला. (Laughter) तो मागून हळू हळू दिसावयास लागला. सर्व सत्ता या अधिकारीवर्गाच्या ताब्यांत गेली आणि बाकीचे जे लोक होते, जे राहिले होते शीलक त्यांना शिक्षण मिळालें. आगगाड्यांचा उपयोग करतां येऊं लागला, नगरास मी येतो किंवा नाहीं असें कळवावयाचें असेल तर तार पाठवितां येते. शिक्षण मिळालें हे सर्व फायदे मिळाले. परंतु ही जी सगळी सत्ता होती, ती सगळी सत्ता अधिकारीवर्गाचे ताब्यांत गेली ती कंपनीच्या वेळीं कांहीं गेलेली होती. आणि १८५८ सालीं हिंदुस्थानसरकारचा जो आक्ट झाला, तो आक्ट झाल्यापासून यंदा ५८ वर्षे झालीं. या ५८ वर्षांत काय झाले? अधिकारी प्रबळ झाले. सत्ताधारी झाले. लोकांची सत्ता कमी झाली. ती येथपर्यंत कीं कुलकर्णी आम्हांला नको. नोकर पाहिजेत सगळे. कोणाले आपले अधिकार जन्मतः पिढीजाद असले तेही गेले.

इनाम कमीशन आले त्या वेळीं लक्षांत आलें नाहीं. त्याला कांहीं इलाज नाहीं त्यांनीं सांगितलें कीं, विंचूरकर त्या वेळीं जाहागीरदार होते. सैन्याचे मालक होते कोणी १०००० तर कोणी १५ हजाराच्या सेनेचा अधिकारी होता. त्यांना सांगितलें कीं तुम्हाला १५ हजार सेना पुरवावयाचें आणि तुम्हाला १५ लाख रुपये द्यावयाचे, यामुळें तुम्हाला खर्च येतो १४ लाख मग एक लाख रुपये घ्या कबूल केलें. त्यांना घरीं बसून खायला मिळतात. मग काय? हें मोठें तत्व आहे. त्या वेळीं असें कोणीहि म्हटलें नाहीं कीं, आमचा सैन्य ठेवण्याचा, सरकाराकरितां लढण्याचा अधिकार गेला. असें कांहीं कोणाला वाटलें नाहीं. चांगलें आहे सरकार, घरीं बसून खायला देतें. आणखी पाहिजे आहे काय? या स्थितीमुळें आमची अशी अवस्था झाली आहे. ५०।६० वर्षांमध्यें या प्रांताचे सगळे अधिकार युरोपीअन आधिकारी वर्गाच्या ताब्यांत गेले आहेत. यावरून असें समजूं नका कीं मी युरोपीअन अधिकारी वर्ग वाईट म्हणतो. ते फार मोठे शिकलेले आहेत. विलायतेंतून उत्तम विद्यार्थी जे येतात, त्यांना या जागा मिळतात. त्यांची कर्तृत्वशक्ति अधिक असते. पण इतकें सगळे जरी कबूल केलें तरी त्यांना आपल्याकरितां काम करितांना मोठी झीज लागते विलायतची हवा थंड आणि इकडची उष्ण हवा म्हणोन त्यांना पगार अधिक द्यावा लागतो. आपल्या कल्याणाकरितां आलेले, त्यांना नाहीं म्हणोन म्हणणार तुम्ही? (Laughter) ह्या सगळ्या गोष्टी आम्हाला कबूल आहेत. ते कदाचित् आमचेपेक्षां कांकणभर जास्त काम करित असतील हे ही मी नाकबूल करित नाहीं. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, तें काम आम्ही करावयाला तयार असता, तें काम आमचें असतांना लोकाकडे का, ते वाईट करतात असेंहि म्हणणें नाहीं. आमच्या कामास आमच्या हितास निर्बंध घातल्यानें आमचीं मनें निशक्त होऊं लागलीं आहेत. आमच्या आंगाचें हुरुप कमी होऊं लागलें आहे. नामर्दपणा वाढत चालला आहे म्हणून हें आम्हाला नको आहे. हें शिकलेले नाहीं म्हणून ते नको असें माझें म्हणणें नाहीं. चांगले आहे व्यापारी आहेत. तुम्हाला तुमच्या दुकानीं तुमच्यापेक्षां एकादा हुषार मुनीम मिळणार नाहीं काय; असतील परंतु तुम्ही त्या मुनीमाच्या हवालीं दुकान कराल काय आणि बाजूला राहाल. तो पैसे देईल तेवढे घेऊन? व्यापारांत हा प्रश्नच आहे. कोठेंहि झालें तरी तो प्रश्नच

आहे तर इकडच्या प्रांताची ही अशी वेवस्था झाली. बडोद्याचे काय झालें. बडोद्याच्या इतिहासाकडे पहा. बडोद्याच्या इतिहासांत असे लेख आहेत. आणि तेथें त्यास कांहीं क्रमानें करता आलें. तसें कांहीं येथें क्रमानें झालें नाहीं. बडोद्याच्या महाराजाची गादी कायम ठेवावी लागली. त्याला कांहीं पूर्वपरंपरा आहे. हा इतिहासाचा भाग आहे. पूर्वी बडोद्याची वेवस्था किंवा बडोद्यावर देखरेख पुण्याकडून होत असे. आणि बाकीचे बडोद्याच्या राजांनीं केलें. दुसऱ्या इतर राजांनीं केलें असते. तेव्हां आतां येथें जर शिकून तयार झाला तर बडोद्यांत जाऊन नोकरी मागतो. पुण्यांत मुंबईत शिकलेले लोक आहे. ते Distt: Magt: तेथें आहे. मुनसफ तेथें आहे, सुभे आहेत, दिवाण तेथे आहेत, नायब दिवाण हायकोर्ट जज्ज तेथे आहेत. तेथें ते लोक कामें करित आहेत विनबोभाट कामें चाललीं आहेत तर मग येथें चालण्याला हरकत काय आहे? पुणे आणि सातारा या प्रांतांतील लोक जाऊन बडोद्याचा राज्यकारभार जर चालवितात, तर तोच राज्यकारभार त्याच प्रकारें या आमच्या प्रातांत चालविण्याला त्यांना हरकत कोणती? कोणी घेतली आहे हरकत? राष्ट्राचे दोन विभाग होऊन एक भाग मराठी राष्ट्र कांहीं एका ऐतिहासिक कारणामुळें इंग्रज सरकारच्या ताब्यांत गेला, एक राहिला संस्थानिकांच्या ताब्यांत. या राष्ट्रांतील माणसें काम करण्याला लायक आहेत, असें एक भाग सांगतो. दुसऱ्या भागांत ते नालायक आहेत असे अधिकारी म्हणतात. आणि आम्हीहि त्याचा शब्द झेलून आम्हीही त्यासारखे वेड्याप्रमाणें म्हणावयाला लागतो. दोन प्रमाणें दोन बाजू आहेत. तर मग स्वराज्य म्हणजे काय पाहिजे आहे. आतां आपल्या लक्षांत येईल कीं, बडोद्याची जी वेवस्था आहे तीच पुणे सातारा याची करायला काय हरकत आहे? राहिल इंग्रज सरकारचें राज्य तें बडोद्यावरहि आहे. बडोद्याचा संस्थानिक कांहीं स्वतंत्र राजा नाहीं. पुण्यामध्ये पेशवाई चालू असतांना वसईचा तह १० आणे ६ आणि असा झालेला होता. पुण्याचें संस्थान राहिलें असतें, तर त्यानाहि त्यांची वेवस्था करतां आली असती, सातारा, नगरला त्याची वेवस्था करतां आली असती, निजामच्या राज्यामध्ये तीच वेवस्था आहे, स्वराज्य म्हणजे इतकें.— जे हक्क नेटिव्ह संस्थानांना आहे जे हक्क बडोद्याला आहेत शिंदे सरकारला

आहेत, तशाच प्रकारे पुणे सातारा मध्य भागाचें एक संस्थान करा आणि त्यांना हे हक्क द्या. मात्र एक त्यामध्ये फरक करावयाला पाहिजे. आता आम्हाला पिढीजात संस्थानिक मात्र चालावयाचा नाहीं. आम्हाला आम्ही निवडलेला कोणी तरी एक अध्यक्ष निवडावा लागेल. एवढ्या फरकानें जी वेवस्था नेटीव संस्थानांचीं आहे ती जो प्रांत मराठ्याची राजधानी होती त्या प्रांताला ती संस्था व्यवस्था द्यावयाची नाहीं, आणि जे प्रांत या प्रांतावर अवलंबून होते, त्या प्रांतांना ती मिळावी हें केवळ एक ऐतिहासिक कोडें किंवा विसंगतता आहे. याला कांहीं कारण नाहीं. आम्हीं का तसें होऊं नये ? मी आपल्याला सांगितलें कीं, गायकवाड शिंदे सरकार यांनीं पैसे आणि फौजा लढाईला युरोपांत पाठविल्या आहेत. आमच्या ताब्यांत असती तर आम्हीहि तेंच केलें असतें. ब्रिटिश राज्य जाणें किंवा ब्रिटिश राज्य राहणे या गोष्टीशी याचा कांहीं एक संबंध नाहीं. परंतु अधिकारी वर्गाची, परकी अधिकारी वर्गाची सत्ता राहणें न राहणें एवढा भेद आहे. हा वेवस्थेंत भेद आहे मुळ जी साम्राज्याची सत्ता तिच्यामध्यें भेद नाहीं मला वाटतें कीं पूर्वीं Lawrence साहेबांनीं असें सुचविलें होतें कीं, ही जी स्वराज्याची चळवळ चालली आहे—त्याचें असें म्हणणें होते कीं, हिंदुस्थान तोडुन निरनिराळीं संस्थानें काढून द्या. तेथें कांहीं तज्ञ ठेवून पर राष्ट्राशीं तह करणें, इंग्रजी राज्यसत्तेला धोका येणार नाहीं अशा प्रकारची लष्कराची किंवा आरमाराची वेवस्था करणें इत्यादि जे अधिकार तेवढे मात्र आपल्या ताब्यांत ठेवा, ते अधिकार तुम्ही ताब्यांत ठेऊं नका, असें म्हणत नाहीं स्वराज्याचे वेवस्थेंत हे वरचे Imperial politics मध्यले प्रश्न आहेत. हिंदुस्थानचे इतर राष्ट्राशी संबंध कोणत्या प्रकारचे असावे. अमक्याबद्दल लढाई करावी कीं न करावी आणि ज्या वेळीं परराष्ट्राशीं संबंध येईल, त्यावेळीं कोणतें धोरण स्वीकारावें हें इंग्लंडानें खुशाल आपल्या ताब्यांत ठेवावे. स्वराज्य मागणारे लोक त्यांत ढवळा ढवळ करूं इच्छित नाहींत. आम्हाला जे काय पाहिजे आहे तें हें कीं, आज जशी नेटिव्ह संस्थानामध्ये आम्ही आपली वेवस्था करतो. त्याच प्रकारें ही वेवस्था आमच्याकडे करावयाला आम्हाला अधिकार पाहिजे आहे. आमचे जें कांहीं कराचें उत्पन्न येतें तें अमुक बाबतींमध्ये खर्च करूं शिक्षणाकडे खर्च करूं, दारू पासून कमी उत्पन्न झालें

तर त्याच्या मोबदला दुसरें कोणते कर बसवावे, ते आम्ही ठरवू आणि त्याप्रमाणें आम्ही वेवस्था ठेऊं, व्यापाराची वेवस्था ठेऊ सगळ्या गोष्टीची आम्ही वेवस्था ठेऊ, तुम्हीं त्यांत हात घालू नये, हिंदुस्थानचे लोक दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राकडे जात नाहींत का नाहीं? फ्रान्सला जर्मनीला सामील होतात कीं नाहीं, हे पाहिजे तर पहा, अजुन शंका असेल तर हल्ली जी कांहीं स्थिती आहे त्यावरून कळून यावयास पाहिजे कीं, हिंदुस्थानचे लोक जर कोणत्याहि एका राष्ट्रासी संबंध ठेवण्यास तयार असेल तर ते इंग्लंडासी संबंध ठेवावयाला तयार आहेत(Cheers) इंग्लंड जाऊन या ठिकाणीं जर्मनी येण्यांत आमचा कांहीं फायदा नाहीं. आम्हाला ती गोष्ट नको आहे. दुसऱ्या व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तरी १०० वर्षे आज इंग्लंड येथें आहे जर्मनी नवा येणार त्याचा नवा दम नवी भुक आणि तें चालणार कसे? आहे तें ठीक आहे. राजा दुसरा नको आहे. पण हे जे अधिकार आपल्या हातांतले गेले आणि त्यामुळें आमची पोरक्या पोराप्रमाणें स्थिति होत चालली ह्या सत्तेपैकीं भाग आमच्या ताब्यांत द्या. हे मीच आपल्याला सांगतो असें नाहीं. हे लॉरेन्स साहेबांनीं म्हटलें आहे. जर हिंदुस्थानांत पुढें सुधारणा करावयाची असेल लढाईनंतर जर कांहीं एक प्रकारें यांची वेवस्था लावावयाचा सरकारचा हेतु असेल तर सर्व हिंदुस्थानचे निरनिराळे प्रांत करा. त्यांच्या डोक्यांत कांहीं भाषेची कल्पना नव्हती. परंतु आम्ही ती आणखी घालतो. मराठी प्रांताचे, तेलंगी प्रांताचे, कानडी प्रांताचे असें एक संस्थान करा. देशी भाषेचा वाद सुद्धा या स्वराज्यांतच येतो. कोणताहि असा प्रश्न नाहीं कीं जो स्वराज्यावर अवलंबुन नाहीं, सामान्य मोकळीक असती तर एक गुजराथी युनिव्हरसिटी झाली असती, एक मराठी युनिव्हरसिटी झाली असती, शेतकी युनिव्हरसिटी झाली असती, परंतु तें करणें आपल्या हातांतील गोष्ट नाहीं. देशीभाषेंतून शिक्षण द्यावे कीं नाहीं हा केवढा मोठा प्रश्न आहे कीं, त्यांत मतभेद होणार आहे! परंतु येथें चालत नाहीं. इंग्लीश आपले लोकांना फ्रेंच भाषेंतून शिक्षण देतात? जर्मन इंग्लिश भाषेंतून? तुर्क फ्रेंच भाषेंतून देतात काय? इतकीं उदाहरणें डोळ्यापुढें असतांना त्यांच्यावर आम्ही त्रासून कॉलमच्या कॉलम लेख लिहावे हे कां. हे म्हणतात तसे हल्ली कां होत नाहीं. सत्ता नाहीं म्हणोन. आमच्या पोरांना काय शिकवावें

हे ठरविण्याची सत्ता तुमच्या ताब्यांत नाहीं. तुम्ही इतके लोक शाळेंत पोरांना पाठवितां परंतु तिकडे त्यांची वाट काय, होईल तें होईल. याचा विचार नाहीं. तात्पर्य हल्ली कोणताहि प्रस्न असा नाहीं कीं,जो स्वराज्यावर–सत्तेवर अवलंबून नाहीं आज फर्ग्युसन कॉलेजमध्यें युनीव्हरसिटींत रानडे वगैरे सगळ्यांनीं प्रयत्न केले. परंतु वळवावयाचे कोणाला? सरकारला? त्यांच्या देशांत काय वेवस्था आहे हें त्यांना माहित होतें. तुमच्या देशांत का नको ती. इंग्रजी शिक्षण सगळ्याना देऊन ७।८ वर्षें इंग्रजी भाषा शिकवावी लागते. आयुष्यांतील आठ वर्षे कांहीं लहान सहान नाहीं. असें कोठेंही नाहीं. कोणत्याही सुधारलेल्या देशांत ही वेवस्था नाहीं. असें असतांना जर तुमचे या स्वराज्याकडे लक्ष जात नाहीं, तर कांहीं तरी तुमच्या डोळ्याला विकार झाला आहे हें खास समजा. (Cheers) जें कांहीं सांगावयाचें असेल जी प्रार्थना सरकारची करावयाची असेल, ती सत्ता देण्याकारितां प्रार्थना करा. दुसऱ्याकरतां करूं नका. या राज्यामध्यें आम्हाला मुख्य गोष्टी पाहिजे आहेत. कोठेहि गेलें तरी अखेरीला आमचें अडतें ते मी आपल्याला सांगितलेंच आहे. शिक्षणाचा साधा प्रस्न आहे. दरगावीं शाळा पाहिजेत. कोठुन आणावयाचा आम्ही पैसा? सरकारला कर देतो. ते फुकट देतो? इंग्लंडांत पद्धत आहे ती आम्हाला शिक्षण देण्याकारितां द्या. पैसे आहेत तिजोरींत, दुसऱ्या कामाला उपयोगी पडतात दिले जातात, आम्हाला ज्या गोष्टी जरूर आहेत तिकडे मात्र ते खर्च होत नाहींत. म्हणोन अखेरीस जे सांगितलें कीं, हिंदुस्थान हा मोठा देश आहे. भाषावार त्याची वांटणी करा पाहिजे तर मराठीचा भाग निराळा काढा, गुजराथीचा निराळा काढा, पण हिंदु मुसलमान त्यांत कसे शिकवावयाचे? यांच्या बद्दल ही मी बोलणार आहे. कानडामध्यें फ्रेंच आणि मुसलमान लोकांची वास्ति आहे. तेथें इंग्रज मुत्सद्याला ते ठरवितां आले तर मुसलमान आणि हिंदु यांनीं कसें चालावें हे कां त्यांना ठरवितां यावयाचे नाहीं? मग हल्ली या गोष्टी न देण्याच्या बाबतातें या सबबी आहेत या न देण्याच्या सबबी आहेत अशी तुमची दृढ बुद्धि झाली पाहिजे. हिंदुस्थानची जर याप्रमाणें निरनिराळीं संस्थानें केली. बंगाल प्रांत निराळा त्या प्रांतावर इकडचा एक संस्थानिक न नेमता मी म्हणतो कांहीं वर्षे युरोपिअन गव्हर्नर नेमला तरी चालेल लोकनीयुक्त अध्यक्ष मिळण्यापूर्वी काय

होत होतें विलायतेंतून गव्हर्नर आस्ट्रेलियांत जात होता. त्यांना कौन्सिलमध्यें ते सांगतील-त्याप्रमाणें काम करावें लागे. येथें उलट तुम्हाला काय गोष्टी पाहिजे असल्या तर कौंउसील मध्यें रेझोल्यूशन आणावा मारून खटाटोप करावा आंकडे गोळा करावे त्याला एकहि पैसा मिळत नसतो. बाकीच्या कौंसिलांना पगार असतो. यांनीं फुकट मेहनत करावी आणि अखेरीस ठराव नापास होतो. पास झाला तरी सरकारावर सक्ति नाहीं. त्यांनीं तो अमलांत आणावा म्हणोन. तो पोरखेळ आहे. ज्याला तो पोरखेळ वाटत नाहीं, त्या मानानें तितका त्यांच्यामध्यें राष्ट्राबद्दल अभीमान कमी आहे असें मी समजतों (Cheers) कांहीं हातांत न देतांना कोणत्याहि प्रकारची सत्ता आपल्या ताब्यांत नसतांना शीतें टाकून झुंजावयची गोष्ट आहे. तशांतला हा प्रकार आहे. या पासून पुढें जर कांहीं हक्क मिळतील, सत्ता ताब्यांत येईल, त्याची ही पायरी आहे म्हणून जर आम्हांला दिलें असेल तर त्याची किंमत आहे. नाहीं तर त्याची कांहीं किंमत नाहीं. होतें काय ? चांगल्या सुशिक्षित लोकांना २।४ घटका झुंजवावयाचे कसे याची ही विद्या आहे. या साठीं स्वराज्यानें होणार काय मागतो आहों काय ? हें लक्षांत आणा, स्वराज्यानें आम्हीं असें मागतो आहो कीं, सर्व हिंदुस्थानभर अशा प्रकारची अखेर संस्थानें होऊन त्या संस्थानांत पहिल्यानें विलायतेहून आलेलीं इंग्रज माणसें—अखेरीस लोकांनीं निवडलेले अध्यक्ष राहून सर्व राष्ट्रसंबंधानें जे कांहीं प्रश्न आहेत, यांचे निराळे कौंसिल ठेवावें. युरोप अमेरिका युनायटेड स्टेट्समध्ये जशी वेवस्था आहे त्याचीं निरनिराळीं लहान संस्थानें होऊन त्यांचें ऐकीकरण करण्याला त्या ठिकाणीं जसें कॉंग्रेस आहे, त्याच प्रकारचे अधिकार Imperial Council चे आधिकार हिंदुस्थान-सरकारनें आपले ताब्यांत ठेवावे. आणि हल्लीं जे निर निराळे ७।८ प्रांत आहेत, त्यापेक्षां पाहिजे तर आठाचे विस प्रांत करा आणि लोकांना ज्याप्रमाणें सुलभ पडेल अशा तऱ्हेनें, त्यांना पसंत होईल, त्यांच्या हातांत सत्ता राहील, अशा तऱ्हेनें या प्रांताची वेवस्था लावा. हेंच स्वराज्याचे मागणें आहे. स्वराज्याचें मागणें म्हणजे बादशहाला काढा असें नाहीं. कदाचित या वेवस्थेकरितां कांहीं कांहीं ठिकाणीं इंग्रजी अंबलदार तुम्हाला आणावे लागतील. कबूल आहे गोष्ट. पण ते अंबलदार आमचे राहतील, लोकांचे राहतील, लोकांचे नोकर म्हणोन राह-

तील, ते आपले धनी म्हणून राहणार नाहींत. जी कांहीं आतां हिंदुस्थानची सुधारणा म्हणोन करावयाची ती सुधारणा घडवून आणण्याला केवळ आमच्या कडच्या लोकांची बुध्धी पुरी पडणार नाहीं. आम्हाला इंग्लंडांतून अमेरिकेंतून लोक आणावे लागतील, पण ते लोक आम्हाला जबाबदार राहतील बेजबाबदार राहणार नाहींत. तेव्हां एका दृष्टीनें विचार केला तर युरोपीयन लोकांच्या विरूध्ध ही चळवळ आहे असें कांहीं म्हणतां येत नाहीं. जबाबदार कोणाला ते आपल्या स्वतःला कीं लोकांना? ही जबाबदारी जोपर्यंत आमचेकडे आली नाहीं त्यांची जबाबदारी आमच्या सत्तेखालीं आली नाहीं, तोपर्यंत ही अशीच चालणार! तोपर्यंत आम्ही कोणत्याहि दिशेनें प्रयत्न केले तरी ते वायफळ होणार. तो पर्यंत दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत आम्ही हालचाल केली तरी ती लंगडी पडून उद्दीष्ट हेतु जो आहे तो कधींहि सिध्धीस जाणार नाहीं. ज्या राष्ट्राला आपलें कल्याण करावयाचे स्वातंत्र्य नाहीं ज्या राष्ट्राला अमुक एक गोष्ट मनांत आली असतां ती अंमलांत येऊन त्याप्रमाणें सुरू होणें, अशा तऱ्हेची वेवस्था आपल्या हातांत सत्ता नाहीं तोपर्यंत लोकांनीं तुम्हाला भरवून तुमचे पोट भरेल असें मला वाटत नाहीं. आतां ज्याला इंग्रजीमध्यें Despotic rule म्हणतात. एकतंत्री सत्ता—त्या सत्तेनें लोकांना कल्याण व्हावयाचें नाहीं ही गोष्ट कळली. कांहीं लोकांच्या मनांत ही गोष्ट बिंबली आहे, त्यासाठीं तुम्ही प्रयत्न करा, हें सांगण्याचा माझा उद्देश आहे. जर माझे शब्द त्याला कमी पडले असेल तर तो माझा दोष आहे यांत कल्पनेचा कांहीं दोष नाहीं. ती निर्दोष आहे. इतक्या सगळया गोष्टी, त्याचीं निरनिराळीं स्वरूपें एकाच व्याख्यानांत आपल्यापुढें मांडता येत नाहींत. ही जी मी संस्थानाची कल्पना सांगितली, यांत काय काय वेवस्था असावी यांत कोणते हक्क असावे. जी वेस्वथा इंडीयन आक्ट १८६८ चा आक्ट प्रमाणें कॉनसालीडेशन बद्दल झाला आहे. त्यांत कोणत्या तऱ्हेची दुरुस्ति केली पाहिजे. इत्यादि पुष्कळ प्रश्न आहेत. आणि ते मी एक नाहीं ४, १० व्याख्यानें दिली तरी पुरे पडण्याची नाहीं. आमचें तत्व एक आहे, ऐवढ्याचबद्दल व्याख्यानांत काय तें सांगावयाचें आहे तुमच्यापैकीं जे लोक बुध्धीनें पैशानें किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें या गोष्टीचा विचार करण्याला अधीकृत असतील त्यांना या गोष्टी पाहिजे आहेत असें आपोआप

कळून येईल. हें मिळेल कीं नाहीं. हें मिळेल कीं नाहीं हें विचारावयाचें काय? मिळविणें ही त्यांच्या हातांतील गोष्ट आहे. मला हा प्रश्न मुळीं कळत नाहीं. इतकी तुम्ही खटपट करता नाहीं मिळालें. उद्योग करावयाचें तर आपल्या हातांत आहे. मिळेल कीं नाहीं ही आपल्याला दृष्टी नको. उद्योग करा, जें तुम्ही काम कराल त्याचा कांहीं तरी परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. मनांची दृढ समजूत ठेवा. राज्यांत स्वतंत्रता कोणी मनुष्यांनी मिळविली आहे कीं नाहीं. इतर राष्ट्रांतून काय देवता वरून पडल्या होत्या? तुमची हिंमत नसेल तर मिळणार नाहीं. मी साफ सांगतो. हिंमत असेल तर आज नाहीं उद्या मिळेल, १०।२० वर्षांनीं मिळेल. परंतु तुमचा उद्योग पाहिजे आहे त्याकरितां, तुमचे धर्माचें तत्व आहे कीं, "कर्मण्येवाधीकारस्ते मा फलेषु कदाचन" तें कशाला म्हटलें आहे गीतेमध्ये? पुजेला जाऊन देवळांत पुराण सांगून शेर-भर तांदुळ मिळविण्याकरितां! श्रेष्ठ धर्म हीच गोष्ट सांगतात. पाश्चीमात्य इतिहास हीच गोष्ट सांगतो. इतके सगळे असून आपण विचाराल कीं, आपलें कसें होईल काय होईल? "यथा मृतपिंडकृता" &c. मातीचा गोळा आहे. आम्ही त्याला विष्णु म्हणवितो. त्याला शिव म्हणवितो. आणि त्याची पुजा लोकांनीं करावी. इतकी त्याच्या ठिकाणीं योग्यता आणतो. आहो अगदीं मातीचा गोळा, ज्याला हालचाल नाहीं. जमीनीवर टाकला असतांना थब्बदिनी खालीं पडतो. त्या गोळयावर कांहीं कृतीनें, कांहीं उद्योगानें, संस्कारानें आपल्याला स्वरूप देता येते. तर त्या मातीच्या गोळ्या पेक्षां सजीव जे हे आपले पिंड आहेत. मातीच्या गोळ्याला एकप्रकारचे स्वरूप देता आलें नाहीं तर तो तुमचा दोष आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांना स्वरूप देणें शक्य आहे. घाई करु नका. यांत (घाईत) कांहीं मिळावयाचें नाहीं. निश्चयानें जर तुम्ही कराल तर मातीच्या गोळ्याला निराळ्या प्रकारचें स्वरूप येते. ही गोष्ट शास्त्रांत आहे. सीद्ध आहे. अनुभवानें शिध्ध आहे. प्रमाणानें, इतिहासानें शिध्ध आहे. इतकी साक्ष तुमच्या पुढें मांडली असतांना जर तुमचे समाधान होणार नाहीं. तुमची खात्री होणार नाहीं तर देशाच्या नुतन अभ्युदयाची गोष्ट तरी बोलण्याची सोडुन द्या. आमचें डोकें सतावूं नका. या गोष्टी घडणाऱ्या आहेत. घडल्याच पाहिजेत. असा विश्वास पाहिजे. त्या विश्वा-

सानें कामें होत असतात. तो विश्वास जेथें नाहीं, तेथें काय करावें हें कांहीं देत नाहींत देऊं म्हणतात तेवढेंच. द्या ही बुध्धी नको. कांहीं दिले तर घेऊं नका असें माझें म्हणणें नाहीं. दिलें तेवढें घ्या, अधिक मागा, मागणे आपले सोडूं नका (Laughter) आम्हाला अमुक रुपये पाहिजे तुम्ही शंभर दिले दुसरीकडोन शंभर घ्या अशी कां तुमची बुध्धी व्हावी ? शंभरांतील ही देऊं केले नाहीं तर आतां काय बोलतां त्यांचे विरुद्ध (Laughter) आम्हाला हजार पाहिजे आहेत. हजार रुपये आमच्या पदरांत पडतील, तेव्हां आमची तृप्ती होईल. शंभरांतील एक दशांश जर दिले तर आम्ही आभार मानुं (Laughter) आभार मानणार नाहीं असें नाहीं. हा मनुष्य स्वभाव आहे. माझा कागद खालीं पडला आणि तो तुम्ही मला दिला म्हणजे मी Thank You म्हणणार. मनुष्यांची ही मनोवृत्ती आहे. ती सोडुन द्या असें मी सांगत नाहीं. परंतु या मनोवृत्तींत ज्या कांहीं महात्वाकांक्षा आहेत, त्या संपादन करण्यांत मनुष्याचें मनुष्यपण आहे. त्या मनोवृत्तीला त्या एका उद्योगाला, त्या एका ध्येयाला या सर्व बाकीच्या मनोवृत्ती नोकरासारख्या वागविल्या पाहिजेत. इतकें होईल तेव्हां स्वराज्य हातांत पडेल. स्वराज्य हें कांहीं फळ नाहीं. कीं लगेच ते आकाशांतून तोंडांत पडेल. तोंडांत घालायाला आणखी एक मनुष्य लागतो. ही अशी कृती आहे; आणि या कारितां हा आरंभ झालेला आहे. आतां माझ्या हातांत माझे मित्र तात्यासाहेब यांनीं जो एक कागद दिला आहे तो अशा प्रकारचा आहे. कृतीला हिंदुस्थानांत थोडा थोडा आरंभ झाला आहे. मद्रासेस बीझांट बाईनीं होमरूल लीग काढला आहे. येथेंही आम्ही काढली आहे. आणि याच प्रमाणें बंगाल्यांत किंवा इतर ठिकाणीं लवकर होमरूल लीग निघेल. कदाचित् कॉंग्रेस हा प्रश्न हातीं घेऊन तेच स्वतः लीग काढतील तर बाकीच्या लीग तीच्यामध्यें मिसळून जातील. उद्योग एकच करावयाचा. हा उद्योग एक आणि तुम्ही करणारे आहा. फायद्याचा प्रस्न आहे. स्वराज्य आम्हाला मिळवावयाचे आहे. ते कोणत्या प्रकारचे मिळवयाचे हे सांगितले. त्याने हल्लीच्या स्थितींत पुढें काय फरक पडेल, ते सांगितले. लॉर्डांच्या सभेला अशी स्वप्नें पडायाला लागली आहेत. लॉर्ड हार्डींगसाहेब यांनीं सांगितले. सिव्हिलीयन लोकांना थोड्या काळांत तुमचे अधिकार तुमच्या हातांतून तुम्हांला लोकांला द्यावे लागणार. आपल्या विरूध्ध

पक्षाचे जे लोक आहेत या कामांत त्यांना वाईट स्वप्नें पडावयाला लागली आहेत (Laughter) आणि तुम्हीं मात्र नालायकः—आम्ही नाहीं घेणार हे, हा कोठचा आग्रह ? (Laughter) याची उपपत्ती काय ? तर त्यांना अशीं स्वप्नें पडुं लागली आहेत. या तऱ्हेची कांही तरी वेवस्था करावी लागणार असे त्यांच्या बुध्धीनें घेतले आहे. तुम्हाला उद्योग करावयाचा तो एक करावयाचा पहिल्यानें सर्व देशभर चळवळ करून प्रत्येक मनुष्याची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, हेच आमचे ध्येय आहे. याकरितां आम्ही खटपट करण्याची आहे. एवढेंच नव्हे तर कांहीं तरी वेवस्था आम्हाला काय पाहिजे ती मागणी कायम केली पाहिजे. विलायतेत जाऊन लोकांची तशी खात्री केली पाहिजे. आणि पार्लमेंट सभेंत ज्या वेळीं या विषयाचा वादविवाद होईल, त्या वेळीं त्या सभेपुढें आपला हा हेतु योग्य तऱ्हेनें मांडला पाहिजे. ती योग्य तऱ्हा म्हणजे इंडीयन आक्ट (act) हल्लीं जो आहे त्याची दुरुस्ती करण्याबद्दल पार्लमेंटमध्यें बील आणीले पाहिजे. हे आम्हाला मागावयाचे आहे कीं, हा कायदा आम्हाला दुरुस्त करून द्या. कंपनी ज्या वेळीं गेली (East India company,) आणि राणी सरकारचे राज्य आले, तेव्हां हा कायदा दुरुस्त केला, म्हणजे त्यांत किरकोळ दुरुस्ती केली. त्यांत आम्हाला अमुक तऱ्हेची दुरुस्ती पाहिजे आहे. आणि ती केवळ आमच्या हिताकरितां नाहीं तर साम्राज्याचे हिताकरितां आपल्याला पाहिजे आहे. अशा तऱ्हेची मागणी त्यांच्यापुढें मागणे हे ह्या उद्योगाचें काम आहे. हा उद्योग सर्वांच्या साह्यानें, सर्वांच्या अनुकूलतेनें झाला पाहिजे. याबद्दल मतभेद राहता कामा नये. moderates आणि nationalists यांचे एकच ध्येय, एकच मागणी मांडुन एकच मिळविण्याचे आहे. अशी भावना ठेऊन जो हा उद्योग करावयाचा त्याकारितां होम रूल लीग म्हणोन निराळी संस्था काढली आहे. कॉंग्रेसपुढें हा विषय मांडला गेला आहे. परंतु कॉंग्रेस ही वर्षांतुन एकदा मिळणारी असल्यामुळें एकदांची संधी गेली, म्हणजे दुसरे वर्षी—परंतु वर्षभर हा उद्योग आम्हाला करावयाला पाहिजे आहे. हे कॉंग्रेसला कबुल झाले आहे. अशा बुध्धीनें ही लीग आम्ही काढली आहे. याला विशेष खटपट नाहीं. हे ध्येय कबूल करा, ध्येयं मागण्याचा आम्हाला अधिकार आहे. आज जी पैशाची मागणी केली

आहे ती इतकीच कीं, प्रत्येक मनुष्यानें एक रुपया द्यावा. २ रुपये Admission बद्दल आहेत, पण हे द्यावयाचे नसेल तर निदान एक रुपया द्या. ३० कोटींमध्यें लाख माणसे मिळाली नाहींत तर हिंदुस्थान बद्दलच्या गप्पा तरी बोलावयाच्या सोडा. कान किटऊं नका आमचे. मला वाटत नाहीं कीं, एक वर्षापेक्षां अधिक या चळवळीला यश यावयाला वेळ लागेल, वर्षाची वर्गणी एक रुपया ठेवली आहे. १०।२० वर्षे चळवळ करावयाला नको आहे. अशी वेळ आली आहे तर या चळवळीकरितां एक रूपया तुमच्या खिशांतून काढण्या इतका स्वार्थत्याग करण्याची जर तुमची बुध्धी नसेल तर मग या व्याख्यानाला तरी येऊं नका. म्हणजे ऐवढ्या मोठ्यानें बोलावे लागणार नाहीं. कांहीं करावयाचे असेल तर तुम्हाला ऐवढेंच करावयाचे आहे. बाकीची व्यवस्था या संस्थेंतील लोक करावयाला तयार आहेत. याकरितां पुष्कळ जागोजाग या तऱ्हेची व्याख्यानें द्यावी लागतील. लोक गोळा करावे लागतील लोकांना समजावुन सांगावे लागेल. पोलीस बंद करावयाला आले. येथें नाहीं तर दुसऱ्या ठिकाणीं जाऊन मिळाले पाहिजे. त्या ठिकाणीं पोलीस जाण्यापूर्वी आपण गेले पाहिजे. पिच्छा याचा सोडावयाचा नाहीं. हे कांहीं सुखासमाधानें मिळेल असें समजुं नका. एक रुपया हा कांहीं नाहीं. मनाचा निश्चय पाहिजे आहे. कोणी विचारायाला आले तर इतके तुम्ही स्पष्ट सांगायाला पाहिजे कीं, हे जे ध्येय आम्ही मागतो हे कायदेशीर आहे. आम्ही त्याचे मेंबर होऊन आम्ही एक रुपया दिला आहे. आम्हाला ती गोष्ट पाहिजे आहे. इतके निर्भीडपणें तुम्ही सांगितलें पाहिजे. इतके सांगावयाचें धैर्य नसेल तर मग गोष्ट निराळी आहे. अगदीं सगळ्या हिंदुस्थानास, तुम्हांस नाहीं, तुमच्या वंशजास कदाचित् ही गोष्ट बरी वाटेल. असा मला भरंवसा आहे. इच्छा जरी तुमची नसली तरी ही गोष्ट व्हावयाला पाहिजे. तुम्ही नाहीं तर तुमच्या पुढच्या पिढीचे लोक प्रयत्न करतील. परंतु तुम्हाला गाढव म्हणतील. हे जर सोसून घ्यावयाचे असेल तर माझी हरकत नाहीं. ते मिळणार अशी माझी स्वतःची खात्री आहे. तुम्ही आपला उद्योग काय करावयाचा याला काय मदत करावयाची ही गोष्ट लक्षांत आणा. कदाचित् पोलीसचा त्रास होईल मागें, नाहीं असें नाहीं. कां वर्गणीदार झाला, कां मेंबर झाला कां? होय झालों. म्हणोन सांगावयाला पाहिजे ऐवढा

कायदा आहे. दुसरे होत नाहीं खटला झाला तर यांतील वकील पैसे न घेतां चालवितील. (Laughter) एक रूपाया या कामाला दिला. हा राजद्रोह नाहीं. याचे मेंबर होणें हा कांहीं राजद्रोह नाहीं. यापेक्षां (१ रूपया देण्यापेक्षां आणि मेंबर होण्यापेक्षां) तुम्हाला कांहीं करावयाचे नाहीं. बाकी काम करण्याचा बोजा ही लीग आपल्या आंगावर घेत आहे. तर अशा वेळीं महाराष्ट्रांतील लोकांनीं गप्प बसावें! कोणीही असो, मुसलमान, हिंदु, मारवाडी असो, सगळे आम्हाला पाहिजे आहेत. नको असे कोणी नाहीं. यांत जातीभेद धर्माचा भेद नाहीं यांत, हे हिंदुस्थानाकारितां काम करावयाचे आहे. मागें जसे एक ठिकाणीं मी सांगितले कीं, तुमच्या व्यापारामध्यें असें आहे कीं, एक आणा आपल्या नफ्यापैकीं गोरक्षणाकरितां ठेवितात. अशी एक सवय आहे तुम्हाला. मी असें विचारतो कीं इकडे सुद्धां एक आण्यापैकीं एक पैसा अर्धा पैसा आम्हाला व्यापारी लोकांनीं कां देऊं नये. हिंदुस्थान ही मोठी गौ आहे लहानसहान गौ नाहीं. त्या गौनें तुम्हाला जन्म दिला आहे. त्या गौच्या उद्योगावर तिच्या फलद्रुपतेवर, तिचे दुध पिऊन तुम्ही आपला उदरनिर्वाह करित आहां. त्या गौला विसरावयाचे आणि त्याचा जमाखर्च पहावा तर एक आणा एक आणा नावे घातला आहे. (गोरक्षणाकरितां) कशाला काढला तर गाईला चारा घालण्याकारितां कसायाचे हातून सोडवावयाला, येथें आम्ही कामाशिवाय आज मरतो आहो. परंतु तुम्हांला ही गौ आहे. ही कोठें कल्पना येते. ती कल्पनाच येत नाहीं. हे धर्मरक्षणाचे काम आहे, गौरक्षणाचे काम आहे, हे राष्ट्राचे काम आहे, हे राजकीय उन्नतीचे काम आहे, हे धर्माचे आहे. उन्नतीचे आहे. हे सर्व लक्षांत आणुन यथाशक्ती जी कांहीं तुम्हांला मदत होईल ती मी सांगितलीच आहे कीं, एक रुपया माणसापेक्षां अधिक आम्ही मागत नाहीं, ज्याला ती शक्ति आहे त्यांनीं एकदां तरी हा रूपया या संस्थेला देऊन. गौचे रक्षण करण्याचे श्रेय घ्यावें. हे मोठे काम आहे. गौचे जे पुत्र आहेत ते जर काळजी करणार नाहीं तर गोपुत्रांना बैल म्हणतात. तसे तुम्हाला म्हणावें लागेल. (Laughter) साधारण गो पुत्रांना जे लोकामध्यें नांव आहे ते म्हणावे लागेल. येवढ्या मी आपल्याला गोष्टी सांगितल्या, ही संस्था निर्माण झाली आहे. उद्योग सुरू झाला आहे. तिच्यावर संकटें आली, तर ती आम्ही सोसायाला तयार आहों, ती

सोसलीच पाहिजेत सुस्त म्हणोन (बसोन) सगळ्याचा निर्वाह लागावयाचा नाहीं. या साठीं अशा तऱ्हेनें मदत करा, याप्रमाणें कार्याला मदत करा, मग ईश्वर तुम्हाला सोडणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. ईश्वराच्या कृपेनें या गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत. आम्ही मात्र उद्योग केला पाहिजे, फार जुनें तत्व असे आहे कीं, God helps them who help themselves हे ऋग्वेदांतील तत्व आहे. ईश्वर अवतार घेतो केव्हां ? तुम्ही जेव्हां त्याच्याकडे गाऱ्हाणीं नेऊन देवाची प्रार्थना कराल तेव्हां. फुकट अवतार ईश्वर घेत नाहीं. आळशी लोकाकरितां ईश्वर अवतार घेत नाहीं. उद्योगी लोकांकरितां ईश्वर अवतार घेतो. म्हणोन उद्योगाला लागा. दुरुस्ती कायद्यांत कोणत्या प्रकारची करावी हे सर्व लोकांना आज सांगण्याची वेळ नाहीं. इतक्या प्रत्येक गोष्टीबद्दल ऐवढ्या मोठ्या सभेंत त्याची चर्चा करणें कठीण आहे यासाठीं सामान्यतः मी आपल्याला ज्या चार गोष्टी सांगितल्या, काल ज्या कांहीं सांगितल्या त्या दोघाचें एकीकरण करा, उद्योगाला लागा, आणि परमेश्वर तुमच्या प्रयत्नाला यश देवो अशी परमेश्वराची अखेर प्रार्थना करून मी आपले भाषण पुरे करितो (cheers) (टिळक महाराजकी जय From the audience).

(या ठिकाणीं मूळ निशाणी I च्या रिपोर्टांत लोकमान्यांच्या व्याख्यानानंतर रा. देशपांडे वकील (संगमनेर), रा. चौकर वकील (अहमदनगर), रा. अळतेकर वकील (कराड) यांनीं उपवक्ते या नात्यानें केलेलीं भाषणें दिलीं आहेत. परंतु खटल्याशीं त्यांचा संबंध कोठेंच दाखविला न गेल्यामुळें तीं आम्हीं गाळलीं आहेत–**प्रकाशक**)॰

Compared by B. S. Purandhare.
Comparing fee Rs. 1—12—0
Copy applied for by Mr. S. K. Damle, Pleader for Mr. B G. Tilak on—24th July 1916.
Copy ready on—26th July 1916.
Copy delivered on—26th July 1916.

True Copy
G. W. HATCH,
District Magistrate, Poona.

M. S. K.
D. C.

डि. मॅजिस्ट्रेटच्या निकालावरील
वर्तमानपत्रकर्त्यांचे अभिप्राय

पंजाबी (लाहोर) —रा. टिळकांच्या खटल्याचा निकाल सांगतांना डि. मॅजिस्ट्रेटनें, "सरकारनें तुमच्यावर राजद्रोहाच्या कलमाखालीं खटला केला नाहीं हें तुमचें भाग्य समजा व ह्यापासून तुम्ही इशारत घ्या." इत्यादि ज उद्गार काढले ते अवास्तव होते. "मी सत्याला अनुसरून चाललों आहें, खात्री पटेपर्यंत मी अन्य मार्ग स्वीकारणार नाहीं," ह्या बाण्याचीं कांहीं तेजस्वी माणसें प्रत्येक कालांत आणि प्रत्येक देशांत असतात आणि त्यांपैकींच रा. टिळक हे आहेत. त्यांच्यावर असल्या बोलण्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. दुराग्रहामुळें नव्हे, तर ह्या बाण्यामुळेंच–सत्याग्रहामुळेंच रा. टिळकांवर संकटपरंपरा आदळली आहे. एका संकटानेंच भीतिग्रस्त होऊन अधिकारीवर्गास पसंत नसलेलीं मतें व मार्ग सोडून देणारीं माणसें कांहीं थोडीं नाहींत. पण ६।७ वर्षें तुरुंगांत काढूनहि रा. टिळक हे पूर्वींप्रमाणेंच निर्भय आहेत, ह्याचें स्पष्टीकरण दोन तऱ्हेनें होऊं शकेल. एक तर रा. टिळकांस आपलीं मतें कायदेशीर आहेत असें वाटत असलें पाहिजे, किंवा जरी तीं कायदेशीर नसलीं तरी तीं कायदेशीर झालीं पाहिजेत, असें त्यांस वाटत असावें. तें कसेंहि असलें तरी आपलीं मतें देशाला आणि जनतेला हितावह आहेत, असा रा. टिळकांचा भरंवसा आहे. पूर्वीं दोन वेळां मुंबई हायकोर्टानें व आतां डि. मॅजिस्ट्रेटनें तीं मतें कायदेशीर नाहींत म्हणून ठरविलें आहे. पूर्वींच्या दोनहि खटल्यांच्या वेळीं रा. टिळकांच्या पुष्कळ देशबांधवांस त्यांचीं मतें राजद्रोही नाहींत, कायदेशीर आहेत, असें वाटत होतें. पहिल्या प्रसंगीं जज्जानें जी राजद्रोहाची व्याख्या ठरविली ती तर हिंदी जनतेनें अंगीकारण्याचें साफ नाकारलें. त्या वेळेस रा. टिळकांबद्दल इतकी सहानुभूति लोकांना वाटली कीं, "रा. टिळकांकरतां सर्व राष्ट्र अश्रु गाळीत आहे." असे उद्गार भर कांग्रेसमध्यें एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें काढले. आतां तर रा. टिळकांकरतां त्याहूनहि जास्त सहानुभूति लोकांस वाटत असली पाहिजे. यदा-

कदाचित् जरी त्यांच्या मुखांतून आक्षेपार्ह उद्गार निघाले असले तरी त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगींच त्यांच्यावर हा आघात करणें अधिकाऱ्यांस योग्य नव्हतें. एखाद्या खात्यावर किंवा सबंध अधिकारीवर्गावर टीका करणें म्हणजेच कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकाराबद्दल असंतोष पसरविणें, हा मि. बिनिंगचा मुद्दा 'कर्मयोगिन्' वरील खटल्यांत कलकत्ता हायकोर्टांत निघाला होता; पण तो तत्कालीन न्यायाधीशांनीं—आणि त्यांत एक सिव्हिलियन होते—साफ धुडकावून दिला. मि. जिना ह्यांच्या समर्पक समर्थनाकडे लक्ष न देतां म्याजिस्ट्रेटनें असल्या लेच्यापेच्या मुद्द्यावर रा. टिळकांस दोषी ठरवावें, ही गोष्ट खरोखरच अनुकंपनीय आहे.

लीडर (अलाहाबाद)—रा. टिळकांवरच्या खटल्याचा काय निकाल होणार हें भाकित अगोदर ठरलेंच होतें, व तसाच तो झाला. भाषणें **राजद्रोही नाहींत,** असेंच हिंदी आणि स्वतंत्र बाण्याच्या इंग्रजांचेंहि मत पडेल, अशी आमची खात्री आहे. राज्यकारभारावर प्रामाणिक आणि निर्भीड टीका करणें हें अधिकारीवर्गास दुःसह होऊं लागल्यामुळें मोठें कठिण झालें आहे. पुण्याच्या विद्वान मॅजिस्ट्रेटाचें मत कसेंहि असो, हीं व्याख्यानें राजद्रोही ठरविणें हें अशक्यच आहे.

न्यू इंडिया (मद्रास)—अवघड आणि कांटेरी अशा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यपथावरचा दुसरा टप्पा म्हटला म्हणजे ज्या अधिकारीवर्गावर रा. टिळकांनीं परिणामकारक आणि जोरदार टीका केली त्यांच्यापैकींच एकानें रा. टिळकांची केलेली मुस्कटदाबी ही होय. देशभक्तीकरितां सोसलेल्या ७॥ वर्षांच्या तुरुंगवासानें रा. टिळकांची प्रकृति जरी खालावली असली तरी त्या हालअपेष्टांनीं त्यांचें आयुष्य २० वर्षें वाढविलेंच आहे. त्यांची तनु अशक्त झाली असेल; पण त्यांचें मन पूर्वीप्रमाणेंच समर्थ असून त्यांचा निश्चयहि अबाधित आहे. ह्या मुस्कटदाबीनें तर ब्युरॉक्रसीच्या अमलापासून हिंदुस्थानाला मुक्त करण्याचा त्यांचा निश्चय दृढतर होईल.

ज्ञानप्रकाश (पुणें)—या निकालावर हायकोर्टाकडे रिव्हिजनसाठीं अर्ज करण्यांत यावयाचा असल्यानें न्यायाच्या दृष्टीनें आतांच त्यावर टीका न करतां हायकोर्टाचा अखेर निर्णय होईपर्यंत त्याविषयीं लिहिण्याचें आम्ही तहकूब ठेवतों. तथापि हा खटला अशा वेळीं उपस्थित करण्यांत सरकारनें जें धोरण स्वीका-

रलें आहे, तें गैरमुत्संद्दीपणाचें आहे, इतकें तरी तूर्त म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. लोकांमध्यें जेणेंकरून क्षोभ उत्पन्न होईल अशीं कृत्यें या वेळीं सरकारनें करतां कामा नये, व म्हणूनच प्रस्तुतचा खटला सुरू करण्यांत अधिकाऱ्यांनीं फार मोठी चूक केली आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. ज्या गोष्टी त्यांनीं अशा प्रसंगीं टाळाव्या त्याच गोष्टी ते अचुक करीत आहेत हें पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें.

ॲडव्होकेट (लखनौ)–भाषणांच्या सरकारी भाषांतरावरून आम्हांस असें वाटतें कीं, तीं **भाषणें राजद्रोही नाहींत.** १८९७ प्रमाणेंच सध्यांहि लोकमत रा. टिळकांच्या बाजूचेंच आहे. प्रेसॲक्ट, राजद्रोही मंडळयांचा कायदा, राज्यरक्षण-कानू वगैरे दडपशाहीच्या कायद्यांनीं बादशहांच्या एकनिष्ठ प्रजेच्या स्वातंत्र्याच्या हक्कावर गदा घालणाऱ्या बऱ्याचशा ॲंग्लो-इंडियन अधिकारी-वर्गावर निर्भीड टीका करणें दिवसानुदिवस कठीण होत चाललें आहे, हा धडा मॅजिस्ट्रेटच्या निवाड्यावरून घेण्यासारखा आहे. ज्या भूमींत आपला जन्म झाला त्या मातृभूमीची सेवा कशी करावी हें उदाहरणानें आणि उपदेशानें आपल्या देशबांधवांच्या मनांत बिंबवण्याच्या प्रयत्नांत, आणि स्वतः मातृभूमीची सेवा करण्यांत, रा. टिळकांनीं कोणत्याहि व्यक्तीपेक्षां दुर्धर प्रसंग सोसले असल्यानें त्यांच्याबद्दल आम्हांस अत्यंत सहानुभूति वाटत आहे.

स्वदेशमित्रम् (मद्रास)-रा. टिळकांवरच्या खटल्यांत मॅजिस्ट्रेटनें पूर्वी झालेल्या शिक्षा अगोदर दाखल करण्यांत चूक केली. तसेंच "सरकारनें तुमच्यावर राजद्रोहाच्या कलमाखालीं खटला केला नाहीं, हें भाग्य समजा." वगैरे जे उद्गार काढले ते निरर्थक होते. रा. टिळकांचे उद्देश चांगले आहेत, हें कोणीहि कबूल करील. ब्रिटिश राजसत्तेखालीं साम्राज्याच्या इतर नागरिकां-प्रमाणें आपणा हिंदी लोकांसहि स्वतंत्र रीतीनें वागतां यावें, हाच प्रधान विचार त्यांच्या व्याख्यानांत दिसून येतो. तेव्हां त्यांचीं व्याख्यानें ऐकणारांच्या मनांत स्वराज्यापासून होणारे फायदे काय आहेत हेंच ठसेल व राजद्रोह उत्पन्न होण्याचा यत्किंचितहि संभव नाहीं. रा. टिळकांवर खटला करणें हें लोकांशीं मिळूनमिसळून वागण्याचें व त्यांच्या आकांक्षांबद्दल सहानुभूति प्रदर्शित करण्याचें चिन्ह नव्हे.

हिंदु (मद्रास)—"सरकारनें तुमच्यावर मेहेरनजर केली" वगैरे

म्याजिस्ट्रेटांचे उद्गार अवास्तव होते. आम्हीं रा. टिळकांचीं तीनहि भाषणें छापलीं आहेत. त्यांत स्वराज्याचें समर्थन अत्यंत स्पष्ट, जोरदार आणि सप्रमाण केलेलें आहे. राजद्रोहाच्या कायद्याचा ओढूनताणून कसा तरी अर्थ करून त्या भाषणांवर बसविल्याखेरीज त्यांत राजद्रोह आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कायदा लागू होईल कीं नाहीं ह्या संशयामुळें व लोकांत प्रक्षोभ होईल ह्या कल्पनेमुळेंच सरकारनें हें मवाळपणाचें धोरण स्वीकारलें असावें. दडपशाहीच्या धोरणांतील हा एक भाग आहे असें मानल्याखेरीज मुंबईसरकारनें हा खटला काय म्हणून करावा ह्याचा उलगडा होत नाहीं. बेझंटबाईंच्या हद्दपारीपासून ह्या धोरणास सुरुवात झाली. मद्राससरकारनें 'न्यू इंडिया-'चा घेतलेला जामीन आणि मुंबईसरकारचीं हीं कृत्यें पाहिलीं म्हणजे भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य वगैरे इंग्रज लोकांनीं जीव कीं प्राण मानलेले हक्क हिंदुस्थानांत कसे आभासिक आहेत, हें कळतें. ज्या सिव्हिलियन्सवर रा. टिळकांनीं टीका केली त्यांच्याचपैकीं एकानें ह्या खटल्यांत न्यायाधीश व्हावें ही मोठी चूक होय. इंग्लंडमध्यें असा खटला आरोपीच्या देशबांधवांच्या ज्यूरीपुढें चालला असता. त्यांच्या व्याख्यानांत असें एकहि वाक्य नाहीं कीं, जें खुद्द राष्ट्रीय किंवा प्रांतिक परिषदांतून अगर वर्तमानपत्रांतून किंवा इतर भाषणांतून म्हटलें गेलेलें नाहीं. अँग्लो-इंडियन वर्तमानत्रांतून कशीहि तीव्र टीका आली तरी चालते; पण राजकीय उन्नतीकरतां एखाद्या न्याय्य गोष्टीची चर्चा जर हिंदी लोक करूं लागले तर त्यांत मात्र राजद्रोहाचा वास येऊं लागतो. खुद्द कॉंग्रेसवर असेच आघात ह्या ब्यूरॉक्रसीनें एका वेळीं केल्याचें मि. बर्नार्ड हौटन ह्या सिव्हिलियनानेंच आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे. आतां ते आघात कॉंग्रेसमधील एका विशिष्ट पक्षावर होऊं लागले आहेत.

बंगाली (कलकत्ता)—रा. टिळकांकडून जामीन घेतल्यानें त्यांना आतां स्वराज्यावर बोलणें मुष्किलीचें झालें आहे. मॅजिस्ट्रेटच्या तडाक्यांत सांपडलेल्या गोष्टी सोडून त्यांना बोलतां येईल; पण तसें करणें फार कठीण आहे. म्याजिस्ट्रेटांच्या मतें ब्रिटिश सरकार म्हणजे अधिकारीवर्ग, आणि त्यावर टीका करणें म्हणजेच सरकारावर टीका करणें! वर्तमानपत्रकर्त्यांनीं ह्या नवीन मताबद्दल सावध असावें. मुद्रण-स्वातंत्र्यावर हें आणखी एक बंधन घातलें जात

आहे. राज्यपद्धतीवर टीका करून त्यांतील दोष दाखविल्याशिवाय राज्यपद्धतीवर बोलावयाचें कसें? परंतु पुण्याच्या म्याजिस्ट्रेटास सर्व राज्यपद्धतीवर टीका करणें रुचत नाहीं.; हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकमत तरी म्याजिस्ट्रेटाच्या निकालाबद्दल तिरस्कारच व्यक्त करील.

वऱ्हाडसमाचार (अकोला)—मुंबईसरकारला आपली इभ्रत प्रिय असणें हें सुंदर खरें; पण त्याच्या अतिरेकाचा मासला म्हणजे रा. टिळकांवरचा खटला होय. म्याजिस्ट्रेटाचा निकाल म्हणजे रा. टिळकांच्या वाणीला घातलेलें कुलूपच आहे. साम्राज्यदेव बनवूं पाहणाऱ्या ह्या राष्ट्रीय थोर संताला मनःसृष्टींतच रममाण होण्याची आज्ञा देण्यासारखें आहे. काल निरवधि आहे, तेव्हां सत्यप्रतीति होईपर्यंत मौन हें देखील संजीवनी विद्येसारखें उपकार करील.

प्रवासी (बंगाली मासिक, कलकत्ता)--श्रीयुत बाळ गंगाधर टिळक ह्यांस एक वर्षपर्यंत अत्यंत भल्या माणसाप्रमाणें वागण्याचा हुकूम सोडण्यांत आला आहे आणि त्यासाठीं त्यांचेपासून ४० हजार रुपयांचे जामीन घेण्यांत आले आहेत. अर्थात् ते कांहीं चोर किंवा बदमाष नाहींत; पण राजद्रोहा भाषणें केल्याबद्दल त्यांस हें शासन मिळालें आहे! राजद्रोहाचा कायदा ज्या प्रकारचा आहे, तशा प्रकारच्या कायद्याखालीं कोणाहि राजकीय विषयांवर बोलणाराला अगर लिहिणाराला शिक्षा ठोठावणें अगदीं सोपें काम आहे. एखाद्यानें सर्वस्वीं केवळ सत्याला धरूनहि आजच्या राजनीतीचा विचार केला, तरी त्याचीहि ह्या कायद्यांतून सुटका होणार नाहीं. आम्हांला तरी श्रीयुत टिळक राजद्रोही वाटत नाहींत. कारण, त्यांनीं भारतवर्षाचा इंग्लंडशीं संबंध तोडावा असें मुळींच प्रतिपादन केलेलें नाहीं. एखाद्या कायद्यांत किंवा शासनपद्धतींत फेरफार करण्यासाठीं कांहीं अधिकाऱ्यांवर अगर अधिकारीवर्गावर टीका करणें हा खरोखरी राजद्रोह नाहीं; तरी पण आजच्या अधिकारीवर्गानें केलेल्या कायद्याप्रमाणें हा राजद्रोह गणला जातो.

अभ्युदय (प्रयाग)--इस समाचार को सुनकर क्या हिन्दु क्या मुसलमान सभी देशवासियों को बडा खेद होगा। मि० हैच ने अपने फैसले में जो बातें कहीं हैं उन्हें पढकर तो यही जान पडता है, कि बोलने लिखने की जो थोडीसी स्वतंत्रता हम लोगों का रह गई वह भी छीन ली जायगी। श्रीमान्

तिलक ने अपनी बेलगांव और अहमदनगर की वक्तृताओं में होमरूल (स्वराज्य) की आवश्यकता बतलाई थी और जो कोई इस विषय पर बोलेगा उसे जरूर ही वर्तमानशासनप्रणाली के दोष दिखलाई पड़ेंगे। ब्यूरोक्रसी और सिविल सर्विस के दोष दिखाये बिना स्वराज्य का प्रतिपादन नहीं हो सकता। बम्बई सरकारको उचित था कि ऐसे महत्वपूर्ण मुकद्दमे को किसी सिविल सर्विस के मनुष्य के हाथ न देकर किसी प्रतिष्ठित जज्ज को सौंपती।

प्रताप (कानपूर)—उन व्याख्यानों में उन व्याख्यानों से कोई अन्तर नहीं है, जो कांग्रेस के प्लेटफार्मोंसे दिये जाते हैं। यदि देश के न्यायभवन तिलक के इन व्याख्यानों को राजविद्रोह-पूर्ण मानते हैं तो हम उन के फैसले से बागी नहीं बन सकते, और एक अत्यन्त विनीत राजभक्त प्रजा की हैसियत से उस साहित्य के नष्ट कर देने की प्रार्थना करेंगे जो कांग्रेस और कान्फेरन्स, मालवीय और बेनरजी, नहीं, यहां तक कि मुधोलकर और भूपेन्द्रनाथ बोस, सर आगाखाँ और सर चिटनवीस तक अपने कामों और अपनी बातों से तैयार होने दे रहे हैं। क्योंकि इस साहित्य की बातों और तिलक के व्याख्यानों मे कोई अन्तर नहीं! बम्बई हाईकोर्ट से जो फैसला होनेवाला है, उस से देश यह जानेगा कि 'राजविद्रोह' क्या है और वह कितना व्यापक हो सकता है, और क्या सरकारी विभागों और अधिकारी–वर्ग की तीव्र आलोचना करना सरकार का विरोध करना है?

भारतमित्र (कलकत्ता)—आश्चर्य तो इस बातका है कि, "इंग्लिशमैन" का मत मि० हैच के मत से नहीं मिलता। "इंग्लिशमैन" लिखता है, "जिन स्पीचों पर आपत्ति की गयी है वे हमने पढी हैं और उन्हें लम्बी, इधर उधर भटकनेवाली, तर्कशून्य और जी उबानेवाली पाया है। जहां तहां, ऐसे वाक्य और शब्द हैं, जिनपर यथार्थमें आपत्ति की जा सकती है।" मैजिस्ट्रेट साहब स्पीचों को राजद्रोहपूर्ण समझते है और 'इंग्लिशमैन' उनके अंशविशेषपर आपत्ति करता है!

बंगवासी (कलकत्ता)—अङ्गरेज राजनीतिज्ञोंका कहना है, कि भारतवासी न्यायोचित रूप से स्वराज प्राप्त करनेका यत्न करें। किन्तु हम यह सोचकर हैरान हैं, कि जब पण्डित तिलक जैसे सुचतुर राजनीतिज्ञ की भी

स्वराज-सम्बधिनी वक्तृतापर इतनी आपत्ति कीजा सकती हैं, तब भारतवासी किस न्यायोचित मार्ग से स्वराज प्राप्त कर सकते हैं? पण्डित तिलक के इस मुकद्दमे को देख कहना होता है, कि बृटिश सरकार या तो भारतवासियों की स्वराजप्राप्ति के यत्न का कोई पथ निर्देश कर दे या उन्हें इस आकाशकुसुम के प्राप्त करनेके यत्न से विलकुल वर्जित कर दे। नहीं तो वर्तमान सरकार के कर्म्मचारियों और उनकी कार्य्यकुशलता की प्रशंसाकर कोई स्वराज का पक्ष कैसे समर्थन कर सकता हैं? बृटिश सरकार इस देश के लोगों से स्वराज-सम्बन्धीय आन्दोलन यदि करना ही चाहती हैं, तो वह स्पष्ट कह दे, कि किस रीति से इसका आन्दोलन होना न्यायसङ्गत हैं?

पाटलिपुत्र (बाँकीपुर)—यदि इन व्याख्यानों सें राजद्रोह का जरा भी गन्ध आता, तो हम भी जोरों के साथ कहते, कि लो॰ तिलक की यह सजा उचित और न्यायानुमोदित हैं। हमारी राय में लो॰ तिलक निर्दोषी हैं; अतएव लो॰ तिलक को राजद्रोही समझ बैठना भूल की बात हैं। पुने के मेजिस्ट्रेट महोदयने लो॰ तिलक को नेक चलनी की आज्ञा सुनाते समय कहा हैं, कि जासूसी विभाग और सिविलियनों के कामों पर कुछ कहने का अर्थ यह हैं, कि भारत-सरकार के विरुद्धाचरण करना। हमारी राय में मेजिस्ट्रेट बहादुर की यह राय कदापि मानने के योग्य नहीं। यदि मेजिस्ट्रेट बहादुर की यह राय ठीक समझी जायगी तो यह कहना उचित होगा, कि एक मेजिस्ट्रेट की राय के विरुद्ध अपील करना भी भारत-सरकार के विरुद्धाचरण करना कहा जायगा।

सूचना—हिंदी पत्रांतून घेतलेल्या उताऱ्यांचा मराठींत तर्जुमा न करितां ते जसेच्या तसेच हिंदी भाषेंत दिले आहेत. यांत उद्देश एवढाच कीं, हिंदी भाषा समजण्यास किती सुलभ आहे तें स्वानुभवानें समजून हिंदी पत्रें वाचण्याकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष लागावें आणि एकभाषाप्रचाराला प्रोत्साहन मिळावें.

हायकोर्टाच्या निकालाविषयीं
वर्तमानपत्रकर्त्यांचे अभिप्राय

टाइम्स ऑफ इंडिया (मुंबई)–टिळकांच्या जामिनकीच्या खटल्यांत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें 'अप्रीति' शब्दाचा 'प्रीतीचा अभाव' असा अर्थ करण्यांत मोठी चूक केली. इंग्रजी भाषेंत Disaffection अप्रीति याचा absence of affection प्रीतीचा अभाव असा अर्थ होत नाहीं. टिळकांच्या तीनहि भाषणांचा परिणाम सरकारविरुद्ध अप्रीति उत्पन्न करण्यांत होत नाहीं असें न्यायमूर्ति बॅचलर व शहा यांचें मत पडल्यानें, मॅजिस्ट्रेटच्या निकालास अनुसरून आम्हीं टिळकांवर ता. १५ आगस्टच्या अंकांत जी टीका केली होती तीबद्दल आम्हांस दिलगिरी वाटत असून आम्हीं आमची ती टीका आतां सपशेल परत घेतों.

बॉंबे क्रानिकल (मुंबई)––या खटल्यांत उभय न्यायमूर्तींनीं जो निकाल दिला त्याहून अन्य निकाल देणें आमच्या मतें तरी शक्यच नव्हतें. लोकस्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितां अधिकारीवर्गावर दाब असणें किती अवश्य आहे, हें ह्या खटल्यावरून दिसून येतें. अलीकडच्या दडपशाहीच्या कायद्यांत हें तत्त्व झुगारून दिलें गेलें आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. तसेंच मॅजिस्ट्रेटचा निकाल बाहेर पडल्याबरोबर अपिलाची वाट न पाहतां, ज्या वर्तमानपत्रकारांनीं मॅजिस्ट्रेटास शाबासकी दिली त्यांचाहि उतावळेपणा दोषार्ह व गैरकायदेशीर होता हेंहि आतां व्यक्त झालें आहे!

एक्सप्रेस (बांकीपूर)–न्या. बॅचलर व शहा ह्यांनीं टिळकांची टीका राज्यपद्धतीवर असून ती सरकाराविरुद्ध नाहीं, असें ठरविलें. ह्यायोगानें त्यांच्या ठरावाबद्दल सर्व लोकांस समाधान वाटेल.

ट्रायब्यून (लाहोर)—टिळकांची राजनिष्ठा व सद्धेतु ह्यांबद्दल सर्व जनतेस एक क्षणभरसुद्धां शंका नव्हती. हीच गोष्ट मुंबई-हायकोर्टानें आपल्या निकालांत व्यक्त केल्यानें सर्व लोकांस आनंद होत आहे. टिळकांनीं आपल्या धोरणाचें व टीकेचें योग्य समर्थन केलें व हायकोर्टानेंहि तें मान्य केलें, ह्याबद्दल आम्हास फार आनंद होत आहे.

अमृतबझारपत्रिका (कलकत्ता)–सरकारी अधिकाऱ्यांवर व त्यांच्या कृत्यांवर टीका करतांना खिळ्याला खिळा म्हणूं नये म्हणून टिळकांच्या गळ्यांत त्यांना सुधारण्याकरितां (!) बदमाष लोकांच्या गळ्यांत अडकवण्यांत येणारा जो फांस अडकवला गेला होता तो मुंबई-हायकोर्टानें काढून टाकला. सरकारी अधिकारी अद्यापि सर्वसमर्थ नाहींत व मधूनमधून न्यायदेवता आपला प्रभाव गाजवीत आहे, असें ह्यावरून दिसून येतें. मंबईसरकारची आतां काय अनुकंपनीय स्थिति झाली असेल? परंतु ती त्यांनीं आपणावर ओढून कां घेतवी?

इंडियन पेट्रियट (मद्रास)—टिळकांचीं भाषणें जो कोणी वाचील त्याला हायकोर्टाचा निकाल वाचून आश्चर्य वाटणार नाहीं. हायकोर्टाला जें निरपवाद वाटतें तें सरकारास पचत नाहीं, असें त्यांनीं खटल्याला जी मंजुरी दिली तीवरून वाटतें. तुमच्यावर सरकारनें मुख्य कलमाखालीं खटला केला नाहीं ही मेहेरबानगी समजा, असें जें म्याजिस्ट्रेटनें म्हटलें होतें, तें निरर्थकचा होतें. पुराव्याची छाननीहि म्याजिस्ट्रेटास करतां आली नाहीं. टिळकांच्या विरुद्ध बराच गैरसमज असल्यानें त्यांच्या भाषणांवर वाईटच अर्थ लादण्यांत येतो. सरकारनें त्यांच्यावर खटला करून त्यांना आपल्या टीकेचें समर्थन करण्यास परवानगी दिली एवढें तरी चांगलें झालें. ह्यायोगानें हायकोर्टापर्यंत खटला जाऊन भाषण-लेखन-स्वातंत्र्य अबाधित राहिलें.

हिंदु (मद्रास)—राजकीय वातावरणांत आलेल्या काळ्याकुट्ट मेघडंबरास टिळकांच्या खटल्यांतील निकाल म्हणजे एक रुपेरी झालरच आहे. ह्या निकालानें सर्वांसच समाधान वाटेल.

न्यू इंडिया (मद्रास)—सरकारी अधिकारी व प्रजाजन यांच्यामध्यें उभें राहून प्रजाजनांस (राजकीय खटल्यांत) न्याय मिळवून देण्याचें व त्यांचें संरक्षण केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. ह्या खटल्यांतील निकाल म्हणजे स्वातंत्र्यपथावरचा प्रवास किती झाला हें दर्शवणारा मैलाचा दगडच होय.

ॲडव्होकेट ऑफ इंडिया (मुंबई)--टिळकांवरील खटल्याचा पाया अगदींच कच्चा होता, हें माहीत असून त्यांच्यावर खटला करणें हें राजधोरण गर्ह्य होय. मराठी भाषेचा द्व्यर्थी उपयोग होत असल्यानें व टिळकांचें त्या भाषेवर असामान्य प्रभुत्व असल्यानें त्यांच्या निष्पाप वचनांचा सुद्धां अधि-

कान्यांस संशय येतो. पण भाषणाचा सर्वसाधारण परिणाम पहाणें हेंच उचित होय. टिळकांचा ह्या खटल्यांत विजय झाल्यानें आम्हांस आनंद होत आहे.

इंडियन सोशल रिफॉर्मर (मुंबई)--भाषणांतील कुठल्या तरी उतान्यांवरून राजद्रोह प्रस्थापित करूं लागल्यास कोणतेंहि भाषण राजद्रोही ठरवितां येईल. पण असें करणें हायकोर्टानें त्याज्य ठरविलें आहे. सध्यांच्या खटल्यासारखा खटला करण्यांत सरकारची मोठीच चूक झाली. एखादा सामान्य वक्ता आपल्या राजद्रोही भाषणांत मधून मधून राजनिष्ठादर्शक वाक्यें मुद्दाम घुसडून देईल. पण ही भ्याडपणाची निंद्य लपंडावी टिळकांसारखा माणूस कधीं हि खेळणार नाहीं. खटल्याला संमति देण्यांत सरकारच्या कायदेपंडितांनीं निष्काळजीपणा दर्शविला; पण त्यायोगें सरकारास व टिळकांस निष्कारण भूर्दंड भोगावा लागला.

गुजराथी (मुंबई)--टिळकांच्या खटल्यांत त्यांच्या व्यक्तिविषयक प्रश्नापेक्षां अत्यंत महत्त्वाचा राजकीय प्रश्न उद्भवला होता. सिव्हिल सर्व्हिसवर जरहा टीका करणें म्हणजे सरकारावर टीका करणें होतें असें उभय न्यायमूर्ति म्हणतात. परंतु इंग्लंडमध्यें प्रतिपक्षाकडून प्रधानमंडळावर अत्यंत कडक टीकेचा वर्षाव चालतो. प्रसंगीं निंद्य हेतूनें प्रधानमंडळ प्रेरित झालें आहे असेंहि म्हणण्यांत येतें. परंतु असें करणें राजद्रोही आहे कीं नाहीं, हें ठरविणें कठिण आहे व आम्ही तें करीतहि नाहीं. ह्या निकालानें स्वराज्य मागण्याचा व टीका करण्याचा हक्क शाबीत झाला हें मात्र निर्विवाद आहे. मॅजिस्ट्रेटाच्या हातांत किती सत्ता असते व तिचा दुरुपयोग कसा केला जातो व कायद्याचें स्वरूप निश्चित झालें असतांहि मॅजिस्ट्रेटास त्याचा अर्थ कसा समजत नाहीं हेंहि दिसून येतें. सरकारनें हा खटला करून त्यावर हजारों रुपये उधळले नसते तर बरें झालें असतें. असे खटले उपस्थित करणारांत दूरदृष्टि, शहाणपणा व न्यायाचा समतोलपणा नसतो हें मात्र ह्या खटल्यानें व्यक्त झालें आहे.

लीडर (अलाहाबाद)--राजकीय गोष्टी बाजूस ठेवून न्यायमूर्तींनीं जो सरळपणें न्याय दिला, त्यामुळें ब्रिटिश न्यायाबद्दल लोकांस समाधान वाटेल

ज्ञानप्रकाश (पुणें)--सध्यां स्वराज्यावर अथवा अन्य राजकीय विषयांवर होणान्या सहस्रावधि भाषणांपैकीं एकहि भाषण १२४ अ या सर्व-

व्यापी कलमांतून सुटलें नसतें; परंतु प्रस्तुत निर्णयानें भाषणस्वातंत्र्याचें क्षेत्र बरेंचसें खुलें झालें आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं. रा. टिळक यांचें व्यक्तिशः या निर्णयाबद्दल अभिनंदन करणें जसें अगत्याचें आहे, त्याप्रमाणें सद्धेतु धरून प्रचलित राज्यव्यवस्थेवर टीका करणें व ही राज्यव्यवस्था सुधारण्याचे मार्ग दाखविणें हें पूर्णपणें कायदेशीर आहे, असें वरिष्ठ कोर्टात सिद्ध झालें आहे, याबद्दल सर्व हिंदी प्रजेचेंहि अभिनंदन करणें योग्य आहे.

सयाजीविजय आणि **इंदुप्रकाश** (मुंबई) रा. टिळक यांजवरील चाललेला खटला व्यक्तिविषयक नव्हता, किंबहुना या खटल्याच्या निकालावर एका महत्त्वाच्या गोष्टीचा निकाल अवलंबून होता. सरकारच्या कृत्यावर टीका करावयाची झाली तर तिची मर्यादा कोठपर्यंत असूं शकते, 'सरकार' या शब्दाची व्याप्ति कोठपर्यंत होऊं शकते, हें या निकालावरून ठरवावयाचें होतें. अधिकाऱ्यांच्या वऱ्यावाईट कृत्यांचा निषेध करतांना निषेधप्रदर्शक भाषणाची मर्यादा कोठपर्यंत असावी हें या निकालावरून दिसून येतें. रा. टिळक प्र कडून जामीन घेण्याचा हुकूम होतांच ज्या कुत्सित पत्रकारांनीं रा. टिळक म. भाषणेंच राजद्रोही होतीं असें भासविण्याचा यत्न केला, त्यांची चांगलीच तोंडफोड झाली म्हणावयाची. या कामीं दाखविलेल्या मनोधैर्याबद्दल जस्टिस बॅचलर व जस्टिस शहा यांचें आम्हीं अभिनंदन करतों.

संदेश (मुंबई)–होमरूलच्या तात्त्विक मागणीचाच नव्हे तर त्या मागणीचें मूर्तस्वरूपच असे जे लोकमान्य टिळक त्यांची होमरूलची मागणी करण्याची शैली आक्षेपरहित ठरून त्यांचा मुंबई हायकोर्टात अखेर जो विजय झाला आहे आणि त्यांच्या प्रासादिक वाणींतून होमरूलसंबंधाचीं अमृतवचनें श्रवण करण्याची मध्यंतरीं लोपलेली जी संधि मुमुक्षु श्रोत्यांस पुनः उपलब्ध झाली आहे, तो योगायोग केवळ अपूर्व आणि 'प्रसादचिह्नानि पुरःफलानि' या न्यायानें भावी ध्येयसिद्धीचा सूचकच होय, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

पंजाबी (लाहोर)–'कर्मयोगिन्' वरच्या खटल्यानंतर इतका महत्त्वाचा खटला आजपर्यंत झालाच नाहीं. त्या खटल्यांतहि 'कायद्यानें स्थापित झालेलें सरकार' म्हणजे कोण हाच प्रश्न उपस्थित झाला होता. एवंगुणविशिष्ट

सरकार म्हणजे वॅ. जिनाप्रमाणेंच आमचेहि मतें ब्युरॉक्रसी अथवा नोकरशाही हेंच सरकार नव्हे, तर पार्लमेंट हेंच होय. मुंबई हायकोर्टानें सरकारी अधिकाऱ्यांवर टीका करणें म्हणजे सरकारावर टीका करणें नव्हे असें स्पष्ट म्हटलें नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. न्या. बॅचलर ह्यांच्याविषयीं आमच्या मनांत पूज्यबुद्धि आहे; पण सिव्हिल सर्व्हिस म्हणजे सरकार नव्हे असें आम्ही स्पष्ट म्हणतों. हा प्रश्न येथें राहूं न देतां त्याचा एकदां सोक्ष-मोक्ष झालाच पाहिजे; असो. ह्या खटल्याच्या निकालानें सरकारची नाचक्की झाली असें कोणीं समजूं नये. सरकारचा पक्ष म्हणजे न्यायाचा, कायद्याचा पक्ष होय. आणि फिर्यादी पक्षाचा पराजय म्हणजे सरकारचा, न्यायाचा (टिळकांचा!) विजय होय.

मेसेज (मुंबई)--टिळकांवरच्या खटल्यांत मुंबईसरकारनें गुप्त पोलिसांच्या रिपोर्टावर भिस्त ठेवून आपली मात्र फजिती करून घेतली आहे. ह्या निकालानें तरी सी. आय्. डी. च्या लंगड्या पुराव्यावर विश्वसून राहणें धोक्याचें असल्यामुळें तो त्याज्य समजावा, हा धडा सरकारनें घ्यावा. सी. आय्. डी. नें तयार केलेल्या खड्ड्यांत पडतां पडतां मुंबईसरकारास हायकोर्टानें वांचवून ब्रिटिश न्यायाची अब्रू राखली, हें न्यायमूर्तीस भूषणावह आहे.

बंगाली (कलकत्ता)--मॅजिस्ट्रेटांचा कल प्रारंभापासूनच टिळकांच्या विरुद्ध दिसत होता; पण तो किती चुकीचा होता हें हायकोर्टाच्या निकालवरून दिसून येतें.

मद्रास टाइम्स (मद्रास)--मॅजिस्ट्रेटचा निकाल कडक आणि चुकीचा होता हें न्यायमूर्तींनीं योग्य रीतीनें दर्शविलें आहे. टिळकांच्या विजयाबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों.

हिंदुस्थान (मुंबई)--टिळकांच्या खटल्यांत ब्रिटिश न्यायदेवतेची अब्रू मुंबई-हायकोर्टानें राखली. १२४ अ-खालील आरोपाचा विचार कर्तव्य असतां एखाददुसऱ्या वाक्यावर अगर शब्दावर जोर न देतां सबंध लेखाचा अगर भाषणाचा सरळ अर्थ पाहिला पाहिजे, हें न्यायमूर्तींनीं या खटल्यांत प्रस्थापित केलेलें तत्त्व वर्तमानपत्रकारांच्या दृष्टीनें बहुमोल आहे. मि. हॅच यांचा पहिला निकाल ऐकून ज्यांना आनंदाचें भरतें आलें होतें, त्यांच्याशिवाय सर्वांना या निकालानें आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

रास्तगोफ्तार (मुंबई)—टिळकांचीं राजकीय मतें मान्य नसणारांनाहि झालेला निकाल ऐकून वाईट वाटणार नाहीं. ज्यांनीं त्यांचीं भाषणें शांतपणें वाचलीं होतीं त्यांना प्रथमपासूनच तीं राजद्रोही ठरतील असें वाटत नव्हतें. हायकोर्टाला याहून अन्य निकाल देतां आला असता असें आम्हांस वाटत नाहीं.

प्रजामित्र व पार्शी (मुंबई)—टिळकांसारखा आरोपी व सिव्हिल सर्व्हिसपैकींच न्या. बॅचलर जज्ज अशी स्थिति असतांहि न्या. बॅचलर यांनीं व्यक्तिविषयक अगर राजकीय विचार बाजूला ठेवून या खटल्यांत न्याय केला हें त्यांस भूषणावह आहे. न्या. शहा यांचें जजमेंटहि विचारपूर्वक लिहिलेलें व सरळ आहे. अंमलबजावणी-खात्याच्या दडपशाहीस सदर निकालामुळें आळा पडेल अशी आशा वाटते.

सांजवर्तमान (मुंबई)—या खटल्यांत हायकोर्टानें जो उत्तम इनसाफ केला आहे त्यावरून मुंबईसरकारचे कायद्याचे सल्लागार राजद्रोहविषयक स्वतःच्या कल्पनांत बराच फेरफार करतील अशी आम्ही आशा करतों.

खुद्देशप्रकाश (मुंबई)—हिंदी प्रजा स्वभावतःच राजनिष्ठ आहे व टिळकहि तसेच आहेत यांत शंका नाहीं. या खटल्याच्या निकालानें लोकांचा टीका करण्याचा हक्क प्रस्थापित झाला असून होमरूल मागणेंहि कायदेशीर ठरलें आहे.

अभ्युदय (अलाहाबाद)—इस फैसले से यह पूर्णतः स्पष्ट है कि राजनैतिक वक्तृता ओं या लेखों के तौलनेका काम मेजिस्ट्रेटों को सौंपने से कहां तक न्याय की रक्षा हो सकती है ।

हिंदी समाचार (दिल्ली)—और सच तो यों है कि बम्बई की हाईकोर्ट ने अपनी न्यायप्रियता से अंगरेजी राज की खूबियों में और भी चार चांद लगा दिये. भारत में कलकत्ता, मद्रास और बम्बई की हाईकोर्ट अपनी न्यायप्रियता के लिये बडी प्रसिद्ध है ।

भारतमित्र (कलकत्ता)—यह दुसरा अवसर है जब बम्बई हाईकोर्ट ने अधिकारियोंके अन्यायसे लोकमान्य तिलककी रक्षा की है । पहली वार ताई महाराजके मामलेमें बम्बई हाईकोर्टनें उनकी जेलकी सजाका हुक्म रद्द कर दिया था । यह कहनेका प्रयोजन नहीं है कि, बम्बई हाईकोर्टके इस निर्णयसे

देशहितैषी मात्र अत्यन्त प्रसन्न होंगे । यह प्रसन्नता दो कारणोंसे होगी । एक तो यह कि, लोकमान्य तिलकका मुंह बन्द करनेका सरकारका प्रयत्न निष्फल हुआ, और दूसरे, स्वराज्यके आन्दोलनकी कुछ बाधा दूर हुई । बम्बई हाईकोर्टनें यह निश्चयकर स्वराज्यके आन्दोलनको सहायता पहुंचायी है, इस लिये हम उसका अभिनन्दन करते हैं । इस मामलेमें लोकमान्य तिलककी प्रत्यक्ष विजय हुई है, पर यह विजय उनकी आन्दोलनपद्धति और वक्तृत्वशक्तिकी है इस लिये समस्त स्वराज्यवादियोंकी यह विजय है । अब लोकमान्य तिलकके विलायत जाकर स्वराज्यका आन्दोलन करनेमें कोई बाधा नहीं रही । आशा है कि विलायतमें उन्हे बहुतसे सहायक मिल जायगे ।

कलकत्ता-समाचार (कलकत्ता)–लो॰ तिलक अन्तमे जीत ही गये । कहना पडता है, कि यदि न्यायसे काम लिया जाये, तो सदा सत्यकी ही जय होगी । लो॰ तिलकने जिस अधिकारीवर्गकी तीव्र निन्दा की, वह सिविल सर्विसके कर्मचारियोंकी है । भाषणोंमे शासनप्रणालीके विरुद्ध आवाज उठायी गयी है, न कि बृटिश शासनपर । प्रणालीके दोष बतानेमें सरकारको समालोचकका आदर करना चाहिये, न कि उसे इस तरह आपना शत्रु समझ लेना चाहिये । समरारम्भके समय लो॰ तिलक बृटिश शासनके प्रति अपनी पूर्ण श्रद्धा प्रकट कर चुके है । उनके यदि कोई बात खटकती है तो दूषित शासनप्रणाली । बम्बई हाईकोर्टने लो॰ तिलकको विजयपताका प्रदानकर अवश्य ही निष्पक्षपातका परिचय दिया है । लोकमान्यको हार्दिक बधाई !

प्रकाश (सातारा)—लो॰ टिळक यांस मिळालेला हा विजय केवळ वैय्यक्तिक स्वरूपाचा नसून राजकीय मतप्रतिपादनाचे जन्मसिद्ध हक्कावर म्याजिस्ट्रेटी ठरावानें घातलेली मर्यादा दूर करणारा आहे.

खानदेशवैभव (धुळें)—न्यायमूर्ति बॅचलर यांचा निकाल फारच चांगला आहे. त्यांनीं निकालांत स्पष्ट म्हटलें कीं, रा. टिळक यांचा मुख्य उद्देश विवक्षित अधिकाऱ्यांवर टीका करण्याचा नसून होमरूल लीगला जास्त सभासद मिळविण्याचा होता. मात्र दोघांहि न्यायमूर्तींनीं सरकारी अधिकाऱ्यांवर कडक टीका करणें म्हणजे सरकारविरुद्ध टीका करणें असें मत दिलें आहे, तें तत्त्व मात्र लोकांस मान्य होणार नाहीं.

सत्यशोधक (रत्नागिरी)—न्यायमूर्तींनीं हा समाधानकारक निकाल करण्याचे कामीं दाखविलेलें मनोधैर्य खरोखरच अभिनंदनीय असून होमरूल-संबंधीं भाषणस्वातंत्र्यास लागलेलें ग्रहण सुटण्यास याचा फारच चांगला उपयोग होईल.

श्रीशाहू (सातारा)—या निकालानें राष्ट्रीय पक्षाच्या ध्येयावर जें अभ्राचें पटल येत होतें तें नाहींसें होऊन या पक्षाचा दिनमणी वृद्धिंगत गतीनें फांकणार, एवढेंच नव्हे, तर ब्रिटिश न्यायदेवता आपल्या कामांत दक्ष आहे हेंहि स्पष्ट दिसून आलें आहे.

वऱ्हाड-समाचार (अकोला)—मुंबई-हायकोर्टाचें वातावरण पुनः शुद्ध, पवित्र व आशामयत्वाच्या पूर्वपरंपरेप्रमाणें कायम आहे, याची साक्ष या अपिलांत पटली. हा राजद्रोहाच्या खटल्यांतील प्रथम विजय होय, आणि शांत अंतःकरणानें जर राजश्री टिळक यांच्या हृदयाचा गाभा अधिक शोधून पाहण्यांत येईल तर खऱ्या राजनिष्ठेचें उज्ज्वल स्वरूप सरकारच्या दृष्टीस पडेल असें आम्ही निश्चयानें सांगतों. मोठ्या आनंदाचा व आश्चर्याचा हा नवा दृष्टिकोन असाच विजयी होत जावो.

ज्ञानोदय (मुंबई)—नुकतेंच हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा ठराव रद्द करून लोकमान्य टिळकांस दोषमुक्त केलें, म्हणून जिकडेतिकडे लोक ब्रिटिश न्यायदेवतेचा जयजयकार करीत आहेत व लोकमान्यांचें अभिनंदन करीत आहेत. आम्हीहि ह्या प्रसंगीं अन्तःकरणपूर्वक लोकानुवर्ती होतों. कोणाचेंहि खरें अंतरंग संकटसमयीं समजत असतें, त्याप्रमाणें राजद्रोहाच्या आरोपावरून दोनदां बंदिवास भोगून आलेल्या ह्या लोकसेवकाचें अंतरंग मूलतः राजनिष्ठ आहे हें ब्रिटिश सरकार सध्यां ज्या संकटावस्थेंत आहे, तिनें नुकतेंच निदर्शनास आणून दिलें आहे.

कर्नाटक (बंगलोर)—टिळकांच्या अभिनंदनार्थ सर्व देशभर जयघोष चालू असून त्यांत आम्हीहि मोठ्या आनंदानें अंशभागी होतों. निकालांतील कांहीं उताऱ्यांवरून टिळकांकडे जज्जांचा ओढा होता, अथवा त्यांचीं सर्व मतें त्यांस मान्य होतीं असें दिसत नाहीं. तथापि त्यांनीं हा अनुकूल निकाल दिला यावरून त्यांची न्यायप्रियता व स्वतंत्र बाणा उघड होतो.

ॲडव्होकेट (लखनौ)-एका मोठ्या बंगाली गृहस्थानें एकदां असें लिहिलें होतें कीं, महाराष्ट्र वगळून हिंदुस्थानदेशाची कल्पना बांधणें कोणालाहि अशक्य आहे, आणि हें सर्वस्वीं खरेंहि आहे. या महाराष्ट्रानें जसा पूर्वकाळीं शिवाजीसारख्या वीरपुरुषास जन्म दिला, तसाच अर्वाचीन काळीं रानडे, गोखले व टिळक यांना जन्म दिला आहे. या सर्व देशभक्तांनीं आपल्या जन्मभूमीची अमोल सेवा बजाविली असून हिंदी तरुण पिढीला ते अनुकरणीय उदाहरण होऊन बसले आहेत. रानडे व गोखले निजधामाला गेले; आतां महाराष्ट्रांत टिळक हा एकच वीरपुरुष उरला आहे. रा. टिळक हे महाराष्ट्रांत म्हणजे ऋषींच्या भूमींत रहातात, तसेंच ते स्वतःहि ऋषि आहेत. आपणांमध्यें जे पुढारी झाले त्या सर्वांपेक्षा रा. टिळक यांनीं देशापायीं अधिक क्लेश भोगले आहेत. हिंदी लोकांनीं त्यांना देवासारखें मानलें आहे, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंतःकरणावर 'टिळक' हें नांव कोरलें गेलें आहे..................मिळालेल्या विजयाबद्दल हिंदी राष्ट्रीय पक्षाचें आम्ही अभिनंदन करतों.

यंग इंडिया (मुंबई)-या निकालानें भाषणस्वातंत्र्याचा मोठा विजय झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. तसेंच स्वराज्याच्या चळवळीच्या पायांत शृंखला अडकविण्याचा प्रयत्न फसून त्या चळवळीचाहि विजय झाला. प्रथमतः ज्या सद्गृहस्थांनीं स्वराज्याच्या कार्याकारितां निर्भयपणें अहर्निश खटपट करून आमच्याकारितां हा विजय संपादिला त्या गृहस्थांना वंदन करणें जरूर आहे. हायकोर्टाच्या निकालानें रा. टिळकांवर लादलेला राजद्रोहाचा कलंक साफ धुऊन गेला आहे. रा. टिळकांनीं राष्ट्राकारितां आजपर्यंत अनेक आपत्ति भोगल्या आहेत. ज्यांना त्यांची पूर्ण ओळख आहे व ज्यांनीं त्यांच्याबरोबर काम केलें आहे त्यांना पुष्कळांचा त्यांचेविषयीं असलेला गैरसमज किती चुकीचा आहे हें कळून चुकलें आहे. त्यांचें तोंड आजपर्यंत कधीं गप्प बसलें नाहीं, व कोणीहि त्यांचें तोंड बंद करूं शकणार नाहीं. सांप्रतचा विजय हा व्यक्तिशः टिळकांचा विजय म्हणण्यापेक्षां सर्व हिंदी राष्ट्राचा विजय आहे असें म्हटलें पाहिजे.

स्वामी रामतीर्थ यांचे समग्र ग्रंथ

संपादकः-भास्कर विष्णु फडके बी. ए.; रामकृष्ण वासुदेव वर्वे, बी. ए.

स्वामी रामतीर्थ हे विसाव्या शतकांतील **अवतारी पुरुष** होत. **स्वामीं**नीं आपल्या ग्रंथांत अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या प्रकाशांत वेदान्ताच्या सिद्धान्तांचें श्रेष्ठत्व सर्व जगाच्या निदर्शनास आणलें असून सध्यांच्या जीवनकलहांत आपण कसें वागावें याचें फारच मार्मिक, मुद्देसूद व हृदयंगम विवेचन केलें आहे. धार्मिक, सामाजिक, नैतिक अशा अनेक प्रचलित प्रश्नांवर स्वामींनीं अगदीं नवा प्रकाश पाडला असून समाजाच्या विचाराला अत्यंत **श्रेयस्कर** असें नवीन **वळण** लावलें आहे. अशा ह्या प्रासादिक ग्रंथांचा महाराष्ट्रीय बंधु-भगिनींस लाभ घडावा म्हणून स्वामींचीं समग्र व्याख्यानें, लेख, कविता, संवाद वगैरे **समग्र ग्रंथ मराठींत** बारा भागांत प्रसिद्ध केले आहेत. निरनिराळ्या पेहेरावांतील स्वामींचा एकेक फोटो दर भागांत दिला आहे. प्रत्येक भागाची किंमत **कागदी बांधणी** बारा आणे व **कापडी बांधणी** एक रुपया. (शिवाय ट. ख)

पत्ताः--**भास्कर विष्णु फडके**, हिरजी आसूची वाडी, पोष्ट माटुंगा, मुंबई.

राष्ट्रीयशिक्षणमाला

गीर्वाणलघुकोश (सरकारमंजूर)	...	...	...	४
संस्कृतप्रवेश (तिसरी आवृत्ति)	...	...	...	१
प्रथमगुच्छ (संस्कृत वाचनपुस्तक)	...	...	...	१
बीजगणित (सरकारमंजूर)	...	...	...	२
काव्हूर (इटालीचा रामदास)	...	...	...	०१२
इंग्रजीप्रवेश (संभाषणपद्धतीनें शिक्षकांकरितां)		...	...	०८
मुलांचा महाराष्ट्र (महाराष्ट्राचा खरा इतिहास)		...	...	१
प्रिन्स बिस्मार्क (जर्मन राष्ट्राचा आदि पुरुष)		...	...	१
लोकशिक्षण (मुख्यतः राष्ट्रीय शिक्षणाला वाहिलेलें मासिक) वा. व.				२८

पुढील पत्त्यावर मागणी करा--

लोकशिक्षणकार्यालय, पुणे

किंवा

धी प्रिंटिंग एजन्सी, पुणे

सुशिक्षितांपुढील प्रश्न

आपल्या वाङ्मयासंबंधीं कांहीं विचारपूस करावयाची झाल्यास कोठें करावी?

आपण लिहीत असलेल्या एखाद्या पुस्तकाविषयीं तज्ज्ञांच्या हितकर सूचना मिळवून कोण देईल?

आपलें पुस्तक मनाजोगें छापण्याची व्यवस्था कोठें होईल?

आपलें पुस्तक पडून न राहतां कोण खपवील?

आपलें पुस्तक कोणामार्फत प्रकाशित करणें फायदेशीर होईल?

छापण्याच्या वगैरे बाबतींत नुसता विश्वसनीय सल्ला पाहिजे असला तरी तो कोठें मिळेल?

अमुक विषयावरील ग्रंथांची माहिती कोण पुरवील?

कोणतें [illegible] लागल्यास गिऱ्हाइकाच्याहि फायद्याकडे [illegible] देऊन कोण पाठवील?

वगैरे अने[illegible] [illegible]क्षित लोकांपुढें पुष्कळ वेळां [illegible]

[illegible]